
यशवंत मनोहर
गौरव ग्रंथ

# नवनिर्माणाची कार्यशाळा



संपादन
प्रा. सुधीर भगत

# नवनिर्माणाची कार्यशाळा
## (डॉ.यशवंत मनोहर गौरवग्रंथ)

संपादक

प्रा.सुधीर भगत

युगसाक्षी प्रकाशन, नागपूर-४४००२२

Navnirmanachi Karyashala (Dr.Yashwant Manohar Gauravgranth)
Editor : Prof.Sudhir Bagat
नवनिर्माणाची कार्यशाळा (डॉ.यशवंत मनोहर गौरवग्रंथ)
संपादक : प्रा.सुधीर भगत

प्रकाशक
नितीन धनराज हनवते, युगसाक्षी प्रकाशन
राहुल अपार्टमेंट, त्रिमूर्तीनगर, रिंग रोड,
नागपूर-४४००२२
मो.फोन:९८२२७००३२२

पहिली आवृत्ती: २६ मार्च २००९

मुखपृष्ठ : नयन बारहाते, नांदेड

© प्रा.सुधीर भगत
भगवंतराव कला महाविद्यालय, एटापल्ली जि. गडचिरोली-४४२७०४
फोन : निवास : ०७१३६-२२३१७९ मो.: ९४२१७८५१९३

संगणकीय अक्षरजुळवणी व मुद्रणस्थळ
वैभव ऑफसेट
१७,कन्नमवार नगर,
वर्धा रोड, नागपूर-४४००२५
फोन:९८२२२०३४७४

किंमत:रुपये २०० फक्त

# डॉ.यशवंत मनोहर यांचे प्रकाशित साहित्य

**कवितासंग्रह :**

१. उत्थानगुंफा : कॉन्टिनेंटल, पुणे, तिसरी आवृत्ती २००१. पृ. ११०
२. काव्यभीमायन, दुसरी आवृत्ती, युगसाक्षी प्रकाशन, २००७. पृ. ११२
३. मूर्तिभंजन : श्रीविद्या, पुणे १९८५ पृ. ११४
४. जीवनायन : मौज प्रकाशन गृह, मुंबई, २००१ पृ. ११४
५. प्रतीक्षायन, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर २००७ . पृ. ८०
६. अग्नीचा आदिबंध, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००८. पृ. १०४
७. स्वप्नसंहिता, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २००८. पृ. १८८

**वैचारिक साहित्य :**

१. डॉ. आंबेडकरांचा बुद्धधम्म : डॉ. आंबेडकर प्रकाशन, यवतमाळ, १९८७ पृ. ७२
२. प्रबोधनविचार : महाबोधी, नागपूर १९८९ पृ. १७६
३. मंडल आयोग : भ्रम आणि सत्य : अशोक खंडाळे, चंद्रपूर, दु.आ. १९९१ पृ. ३२
४. आपले महाकाव्यातील नायकःशंबूक-कर्ण-एकलव्य :संघमित्रा, नागपूर, १९९१ पृ. ४०
५. आपल्या क्रांतीचे शिल्पकार :आंबेडकर - फुले - बुद्ध : महाबोधी, नागपूर, १९९१ पृ.४८
६. डॉ. आंबेडकर एक शक्तिवेध : संघमित्रा, नागपूर, १९९१ पृ. १२०
७. बुद्ध आणि त्याचा धम्म : सारतत्त्व : प्रियदर्शी, कोल्हापूर, दु.आ. २००४ पृ. ११९
८. आंबेडकर संस्कृती : कल्पना, नागपूर, १९९१ पृ. ४८
९. आंबेडकरवादी विद्रोही निबंध : ऋचा, नागपूर, १९९२ पृ. १६८
१०. आंबेडकरी चळवळीतील अंतर्विरोध : क्रांतीपर्व प्रकाशन, पुणे, १९९८ पृ. ७२
११. डॉ. आंबेडकरांचा बुद्ध कोणता? : युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, दु.आ. २००५, पृ.४०
१२. बहुजनक्रांतीचे महानायक जोतीबा फुले : क्रांतीपर्व प्रकाशन, पुणे, १९९८ पृ. ३९
१३. मूल्यमंथन, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, एप्रिल २००४, पृ. ११२
१४. रिपब्लिकन पक्ष : बांधणीची एक दिशा, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर २००४, पृ. ६४
१५. शिक्षकांपुढील आव्हाने, २००३, पृ. १६
१६. अध्यापकांपुढील जळते प्रश्न, युगसाक्षी प्रकाशन, २००४, पृ. १६
१७. आजचे शिक्षण आणि अध्यापक, २००४, पृ.१६
१८. समाजपरिवर्तनाची दिशा, धम्मभूमी प्रकाशन, २००५ पृ. १५०
१९. डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती का जाळली?, युगसाक्षी, २००५, पृ. ३२
२०. डॉ. आंबेडकरांनी विपश्यना का नाकारली? युगसाक्षी, २००५, दुसरी आवृत्ती, पृ. ३२
२१. महाबुद्ध डॉ. आंबेडकर, युगसाक्षी, २००५, पृ. ४०
२२. आंबेडकरी क्रांतीचा जाहीरनामा, समता सैनिक दल, युगसाक्षी, २००५, पृ.२०
२३. धम्मदीक्षा सुवर्णमहोत्सव तुम्हाला काय मागतो?, युगसाक्षी, २००५, पृ. २४
२४. आंबेडकरवादी बौद्धभिक्खू कसा असावा?, युगसाक्षी, २००५, पृ.१६
२५. डॉ. आंबेडकरांची धम्मसंकल्पना, युगसाक्षी २००७. पृ. ३२
२६. डॉ. आंबेडकर आणि स्त्रीमुक्तीचे युद्ध, युगसाक्षी २००६. पृ. २४
२७. बुद्धाचा आचारधम्म, युगसाक्षी, २००७. पृ. ३२
२८. धम्मक्रांतीची पन्नास वर्षे, युगसाक्षी, २००६. पृ. ५६
२९. अभिनव बौद्ध आचारप्रणाली, युगसाक्षी, २००७. पृ. ४४
३०. बौद्धांची राजकीय संस्कृती, युगसाक्षी २००७. पृ. ३२
३१. बुद्धाचे तत्त्वज्ञान आणि बौद्धांची भाषा, युगसाक्षी, २००७. पृ. ४४

**समीक्षाग्रंथ :**

१. दलित साहित्य : सिद्धांत आणि स्वरूप : नागपूर १९७८ पृ. १३४

२. स्वाद आणि चिकित्सा : धनंजय, नागपूर, १९७८ पृ. ११०
३. बाळ सीताराम मर्ढेकर:साहित्य अकादमी, दिल्ली, १९८७,१९९३ ति.आ.१९९७ पृ.११९
४. निबंधकार डॉ. आंबेडकर : संघमित्रा, नागपूर, १९८८ पृ. १२०
५. दलित साहित्य चिंतन : संघमित्रा, नागपूर, १९८८ पृ. ११२
६. आंबेडकरवादी आस्वादक समीक्षा : प्रियदर्शी, कोल्हापूर, १९९१ पृ. १२२
७. समाज आणि साहित्यसमीक्षा : सुगावा, पुणे, १९९२ पृ. २६८
८. शरच्चंद्र मुक्तिबोधांची कविता : संपादन, साहित्य अकादमी, दिल्ली, १९९२ पृ. २३७
९. मराठी कविता आणि आधुनिकता : आंबेडकर धम्म, नागपूर दु.आ. १९९८ पृ. २७२
१०. आंबेडकरी चळवळ आणि साहित्य : अभय प्रकाशन, नागपूर, १९९३ पृ. १४४
११. परिवर्तनवादी जीवनमूल्ये आणि वाङ्मयीन मूल्ये: ठिय्या प्रकाशन, नागपूर, १९९८ पृ. ४०
१२. आंबेडकरवादी मराठी साहित्य : भीमरत्न प्रकाशन, १९९९ पृ. ३२०
१३. युगसाक्षी साहित्य : श्रेयस प्रकाशन, हिंगणघाट, २००१ पृ. ४९६
१४. नवे साहित्यशास्त्र : विजय प्रकाशन, नागपूर, २००१ पृ. ३६८
१५. विचारसंघर्ष : युगंधरा, यवतमाळ, एप्रिल २००४, पृ. ११२
१६. आंबेडकरवादी महागीतकार : वामनदादा कर्डक, युगसाक्षी, २००५, पृ. १०८
१७. प्रतिभावंत साहित्यिक : आत्माराम कनीराम राठोड, युगसाक्षी, २००५, पृ. ४०
१८. साहित्य संस्कृतीच्या प्रकाशवाटा, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, २००५, पृ. १५०
१९. दलित साहित्याचे नामांतर : आंबेडकरवादी साहित्य, युगसाक्षी, २००५, पृ. ४८
२०. बुद्धिवादी सौंदर्यशास्त्र, युगसाक्षी, नागपूर २००७ पृ.१२०. दु.आ. २००८

**प्रवासवर्णन :**

१. स्मरणांची कारंजी : समुचित, नागपूर, १९८७ पृ. ६८ दु.आ. युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००५, पृ. ८८

**कादंबरीलेखन :**

१. रमाई, युगसाक्षी प्रकाशन, आवृत्ती १६ वी २००७. पृ. ९२
२. मी सावित्री, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००६. पृ. ४८
३. मी यशोधरा, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर. पृ. ४०
४. रमाई, मी सावित्री, मी यशोधरा, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००४, पृ. १५२

**ललित लेखन - अ) पत्रसंग्रह :**

१. पत्रप्राजक्त, अभिनव पब्लिकेशन, गडचिरोली, २००३ पृ. १५०
२. लक्ष्मण माने यांना धम्मपत्रे, युगसाक्षी, नागपूर २००६. पृ. १०४
३. निळूभाऊ फुले यांना दोन पत्रे : युगसाक्षी, नागपूर, २००६. पृ. १६
४. पत्रपौर्णिमा, युगसाक्षी, नागपूर, २००७. पृ. ९६

**आ) श्रद्धांजलीपर लेख आणि ललितलेख :**

१. सातवा ऋतू अश्रूंचा, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर २००५, पृ. ८८
२. वणव्यात हसलेली फुले, युगसाक्षी, २००६. पृ. ८०

**प्रकाशनाच्या मार्गावरील पुस्तके :**

१. उजेडाची झाडे (ललितलेख) २००९ २. प्रस्तावनांचा दीपराग (कवितासंग्रहांना लिहिलेल्या प्रस्तावना) पद्मगंधा, पुणे २००९ ३. वाङ्मयीन प्रतीत्यसमुत्पाद (यशवंत मनोहर यांची भाषणे आणि मुलाखती) संपादक:शरणकुमार लिंबाळे, सुविद्या प्रकाशन, पुणे, २००९

**गौरवग्रंथ :**

१. डॉ. यशवंत मनोहर : एक प्रज्ञाशील प्रतिभा, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, सप्टेंबर २००४, पृ. २४८. संपा. डॉ. अरुणा देशमुख, डॉ. शैलेंद्र लेंडे, डॉ. प्रभंजन चव्हाण
२. वेध : एका युगसाक्षी प्रतिभेचा : संपा. प्रा. अनमोल शेंडे, युगसाक्षी, २००७. पृ. २१२

# अनुक्रमणिका


• संपादकीय : प्रा. सुधीर भगत/७

१. काळाला पुरून उरणारी कविता : कालचा पाऊस : बाबुराव बागूल/९
२. 'यशवंत' झालेले यशवंत मनोहर : प्रा. अविनाश वरोकर (काटोल)/१३
३. यशवंत मनोहर : असामान्य कादंबरीकार : यशोधरा गायकवाड(मुंबई)/१७
४. कवी यशवंत मनोहर यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक चिंतनकाव्य : ना.रा.शेंडे/२५
५. हे गाव : एक आस्वाद : दिलीप वि.चित्रे/३१
६. उत्थानगुंफा : अध्यात्मवादी प्रवाहाचा दंभस्फोट करणारी क्रांतीकारी, युगप्रवर्तक कविता : प्रा.विठ्ठल शिंदे (उल्हासनगर)/३६
७. डॉ.यशवंत मनोहर : प्रज्ञाशील प्रतिभा आणि कारुण्यमय व्यक्तिमत्त्व! : गंगाधर वाघ, (मुंबई)/४९
८. उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचा उत्थानगुंफाकार:डॉ.यशवंत मनोहर : डॉ.प्रदीप आगलावे/५८
९. 'यशवंत' प्राध्यापक : डॉ.किशोर महाबळ/६४
१०. सर, मी तुमचा एकलव्य! : डॉ.प्रवीण जोशी/७१
११. सम्यक दृष्टी देणारा प्राज्ञ विचारवंत : डॉ.यशवंत मनोहर : भदन्त एन.बोधिरत्न नायक थेरो/७४
१२. युगसाक्षी साहित्यिक : डॉ.यशवंत मनोहर:डॉ. शैलेंद्र लेंडे/८२
१३. डॉ.यशवंत मनोहरांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व : डॉ.वासुदेव डहाके (नरखेड)/८७
१४. कलासक्त डॉ.यशवंत मनोहर : डॉ.प्रा.चंद्रकांत नगराळे (हिंगणघाट)/९५
१५. डॉ.यशवंत मनोहर : एक विद्यापीठ : डॉ.प्रभंजन चव्हाण (पुणे)/१००
१६. 'यशवंत' होण्यासाठी झालेला मनोहर प्रवास : सुनिल शिनखेडे/१०७
१७. मनोहरांचे मूर्तिभंजन : डॉ.शिरीष गोपाळ देशपांडे (मुंबई)/११४
१८. वैदर्भीय काव्याची सत्वधारा:प्रमोद शिखरे/११६
१९. मधुर यातनांच्या हवाल्याने : डॉ.यशवंत मनोहरांना : प्रा.मुकुंद राजपंखे (अंबाजोगाई) /११९
२०. काय आठवावे? : डॉ.सुलभा हेर्लेकर/१२३
२१. जीवनायन : एक सर्वेक्षण : डॉ.युवराज सोनटक्के (बंगलोर)/१२५
२२. एका वादळलेल्या उजेडाच्या सहवासात : प्रमोद वाळके 'युगंधर'/१३५
२३. डॉ.यशवंत मनोहर:जीवनवादी वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व : डॉ.प्रकाश खरात/१४१

२४. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिभेचा हुंकार : डॉ.यशवंत मनोहर : प्रा.दि.वा. बागूल (पुणे)/१४६
२५. डॉ.यशवंत मनोहर : एक मार्गदर्शक दीपस्तंभ : डॉ.इंद्रजित ओरके/१५३
२६. स्वतंत्र प्रज्ञेचे बुद्धिवादी विचारवंत : डॉ.यशवंत मनोहर : प्रा.अशोक कांबळे (यवतमाळ)/१५७
२७. 'मूल्यमंथन' : नवभारताचे टेक्स्टबुक : डॉ.नीलकांत चव्हाण (नाशिक)/१६०
२८. महाप्राध्यापक डॉ.यशवंत मनोहर : प्रा.प्रकाश राठोड/१६६
२९. यशवंत मनोहर : आंबेडकरी साहित्याचा महामेरू : डॉ.भूषण रामटेके (पुलगाव)/१७०
३०. युगसाक्षी साहित्यिक : यशवंत मनोहर सर : अक्रम खान, हबीबखान पठाण/१७५
३१. कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही! : प्रा. सुरेश खोब्रागडे/१८०
३२. क्रांतदर्शी कवी यशवंत मनोहर : डॉ. स्मिता शेंडे (यवतमाळ)/१८३
३३. डॉ.यशवंत मनोहर नावाचा विद्रोही उजेड : प्रा. अनमोल शेंडे (नागभिड)/१९३
३४. डॉ.यशवंत मनोहर : उजेडाची कार्यशाळा : प्रा. रूपेश नरहरी कऱ्हाडे (दिग्रस, जि.यवतमाळ)/१९५
३५. डॉ.यशवंत मनोहर नावाच्या विद्रोहाचा वाढदिवस:प्रा. धनंजय वाघमारे(पुणे)/२०२
३६. नीलाग्नी संप्रदायाचे अग्रणी : डॉ.यशवंत मनोहर : प्राचार्य डॉ. भगवान ठाकूर (पुणे)/२०६
३७. माझ्या उत्थानाचे विद्यापीठ : डॉ.यशवंत मनोहर : धनराज हनवते/२१२
३८. यशवंत मनोहर यांचे शिल्पकार कुटुंब : प्रा. विलास मनोहर/२१७

कविता :

१. यशवंताची पासष्टी : भदन्त डॉ.तिस्सवंस महास्थवीर (पुणे)/२२८
२. यशवंत : भदन्त डॉ.तिस्सवंस महास्थवीर (पुणे)/२२९
३. नागसेनवनातील दोन फुले : भदन्त डॉ.तिस्सवंस महास्थवीर (पुणे)/२२९
४. एक पत्र यशवंत मनोहरांना : प्राचार्य दिवाकर बोबडे (काटोल)/२३०
५. यशवंत तुझ्या ज्ञानाचे : प्रमोद वाळके 'युगंधर'/२३१
५. हा यशवंत आहे : प्रा.दि.वा.बागूल (पुणे)/२३२

# संपादकीय...

'यशवंत मनोहर : नवनिर्माणाची कार्यशाळा' हा डॉ. यशवंत मनोहरांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा गौरव करणारा तिसरा ग्रंथ! यापूर्वी 'डॉ.यशवंत मनोहर : एक प्रज्ञाशील प्रतिभा' आणि 'वेध : एका युगसाक्षी प्रतिभेचा' हे त्यांच्या वाङ्मयीन जीवनाचा गौरव करणारे ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. पहिल्या ग्रंथाचे संपादन डॉ. अरुणा देशमुख, डॉ.शैलेंद्र लेंडे आणि डॉ.प्रभंजन चव्हाण यांनी केले आहे. दुसऱ्या ग्रंथाचे संपादन प्रा. अनमोल शेंडे यांनी केले आहे आणि सरांच्या या तिसऱ्या गौरवग्रंथाचे संपादन करण्याची सुसंधी मला मिळालेली आहे हा मी माझा बहुमानच समजतो.

या गौरवग्रंथात डॉ. यशवंत मनोहर यांच्या अध्यापकीय जीवनाचे आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडून दाखविणारे लेख आहेत. बाबुराव बागूल, ना.रा.शेंडे, प्रा. विठ्ठल शिंदे, दिलीप वि.चित्रे, डॉ.स्मिता शेंडे, डॉ.सुलभा हेर्लेकर, डॉ.युवराज सोनटक्के, शिरीष गोपाळ देशपांडे इत्यादी लेखकांनी सरांच्या कवितेचा वेगवेगळ्या अंगांनी विचार केलेला आहे. तर डॉ. प्रवीण जोशी, डॉ.किशोर महाबळ आणि डॉ. प्रदीप आगलावे या अनुक्रमे इंग्रजी, राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र या विषयांच्या नामवंत प्राध्यापकांनी डॉ.यशवंत मनोहर यांच्या अध्यापनकौशल्याची वैशिष्ट्ये मांडलेली आहेत. एम.ए.ला वेगळ्या विषयांचे विद्यार्थी असतानाही त्यांनी मनोहर सरांच्या अध्यापनाचा लाभ घेतलेला आहे. त्यावेळी नागपूर विद्यापीठ परिसरात आणि इतरत्रही सरांच्या अध्यापनाचा लौकिक पसरला होता. त्यामुळे इतर विषयांचे अनेक विद्यार्थी सरांच्या वर्गात बसत असत. त्यापैकी प्रातिनिधिक स्वरूपात वरील तीन प्राध्यापकांचे सरांच्या अध्यापनासंबंधीचे अनुभव या गौरवग्रंथात आलेले आहेत. प्रा. प्रकाश राठोड हे मराठीचे प्राध्यापक आहेत आणि ते सरांचे एम.ए.,एम.फिल.चे विद्यार्थीही आहेत. सरांच्या अध्यापनासंबंधीचा, त्यांचाही 'महाप्राध्यापक' हा लेख या ग्रंथात घेतलेला आहे.

काही लेख आंबेडकरवादी साहित्यातील आणि एकूणच मराठी साहित्यातील सरांच्या योगदानाची मांडणी करणारे आहेत. गंगाधर वाघ, भदन्त एन. बोधिरत्न, डॉ. शैलेंद्र लेंडे, डॉ. वासुदेव डहाके, डॉ. प्रभंजन चव्हाण, प्रमोद वाळके,

प्रा. अशोक कांबळे, अक्रम पठाण, डॉ. भगवान ठाकूर, यांचे लेख या संदर्भात अत्यंत मौलिक आहेत. डॉ. नीलकांत चव्हाण, प्रा. अनमोल शेंडे, डॉ.भूषण रामटेके, डॉ. इंद्रजित ओरके, प्रा. रूपेश कऱ्हाडे, प्रा. धनंजय वाघमारे यांच्या लेखांमधून सरांची आंबेडकरनिष्ठ मार्गदर्शकाची भूमिका स्पष्ट होते. प्रा. विलास मनोहर यांनी आपल्या लेखातून सरांच्या घडणीत उदंड योगदान असलेल्या त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींचा परिचय करून दिलेला आहे.

पुण्याचे भदन्त डॉ. तिस्सवंस महास्थवीर यांनी सरांसंबंधी 'प्रबुद्ध बंधो!' या नावाचा सव्वाशे पृष्ठांचा स्वतंत्र कवितासंग्रहच तयार केलेला आहे. त्याचे प्रकाशन येत्या एखाद्या महिन्यात होईल. पण त्या संग्रहाव्यतिरिक्तच्या त्यांच्या सरांसंबंधीच्या तीन कविता या गौरवग्रंथात शेवटी दिलेल्या आहेत. शिवाय काटोलचे प्राचार्य दिवाकर बोबडे, प्रमोद वाळके 'युगंधर' आणि पुण्याचे प्रा.दि.वा.बागूल यांचीही प्रत्येकी एकेक कविता या गौरवग्रंथात दिलेली आहे. मागल्या वर्षी सरांची पासष्टी भदन्त डॉ. तिस्सवंस यांनी पुण्यात साजरी केली. पुण्यातील अनेक संघटनांचा त्यात सहभाग होता.

याप्रकारे सरांच्या वाङ्मयीन जडणघडणीचा, त्यांच्या अध्यापकीय जीवनाचा, त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा आणि त्यांच्यातील माणूसपणाचा या ग्रंथातील लेखकांनी आणि कवींनी वेध घेतलेला आहे. डॉ. यशवंत मनोहरांनी अनेक विद्यार्थ्यांच्या हातात उजेडाची दिशा ठेवली. एक प्रगतीशील आणि अभ्यासू प्राध्यापकांची पिढी सरांनी घडविली. आपल्या लेखनाने समाजाला सतत शुद्ध आंबेडकरनिष्ठ मार्गदर्शन केले. याप्रकारे नवनिर्माणाची कार्यशाळा असलेल्या सरांसंबंधी संपूर्ण महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही गौरवाने बोलले जाते. त्यातील काही शब्द वाचकांपर्यंत या संपादनाच्या रूपाने मी पोहचविले आहेत. सरांच्या साहित्याचा अभ्यास करणारांना, कार्यकर्त्यांना, अध्यापकांना आणि विद्यार्थ्यांना या गौरवग्रंथाचा लाभ होईल अशी खात्री मला आहे.

धन्यवाद!

**- प्रा. सुधीर भगत**

१

# काळाला पुरून उरणारी कविताःकालचा पाऊस

■ बाबुराव बागूल

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२७ साली महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह केला आणि पहिला सामाजिक अन्याय-अत्याचाराविरुद्ध उठाव केला. म्हणजे या देशात आधुनिक काळात सामाजिक क्रांतीचे पहिले जन्मदाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर ठरतात. १९३० ते १९३५ या कालावधीत त्यांनी नाशिकचा काळाराम मंदिरप्रवेशाचा सत्याग्रह केला आणि भारतीय सांस्कृतिक क्रांतीला जन्म दिला. नंतर १९४५ ते १९४७ दरम्यान State and Minority हा प्रबंध लिहिला. त्यात जमिनीचे राष्ट्रीयीकरण, उद्योगधंद्यांचे, संपत्तीचे व वित्तीय संस्थांचे राष्ट्रीयीकरण हा लेनिनने रशियामध्ये कृतीत आणलेला विचार भारतात बाबासाहेबांनी ब्रिटिश सत्तेला न घाबरता जाहीरपणे प्रकट केला. १९४७ ला स्वातंत्र्यानंतर मनू, हिंदू धर्म-संस्कृती यांना न घाबरता बाबासाहेबांनी लोकशाही संविधान मांडले. मंजूर करून घेतले. भारताचे राज्य सामाजिक, सांस्कृतिक वास्तव केले म्हणजे सामाजिक क्रांतीचे, सांस्कृतिक क्रांतीचे, राजकीय क्रांतीचे प्रवक्ते बाबासाहेब झाले.

बाबासाहेबांना लोक पहिले दलित विचारवंत, परमपूजनीय म्हणतात. आपण मात्र बाबासाहेबांना पहिले समग्र क्रांतीचे नेते म्हणू या. या बाबासाहेबांना, समग्र क्रांतीचे नेते असलेल्या बाबासाहेबांना समाजाने आणि साहित्याने आदर्श मानले त्या समाजाची वाटचाल कशी असेल, ते साहित्य कसा आकार घेईल? कविता कशी होईल? कथा, कादंबरी, नाटक कसे होईल? या कलाकृती डोस्टोव्हस्की, तुर्कोनोव्ह, चेकॉव्ह, मॅक्झिम गोर्की, टॉलस्टॉय, मायकोव्हस्की यांच्या वाङ्मयाशी, पाब्लो नेरुदा, नाझीम हिकमत, ब्रेख्त, लोर्का, जेम्स बॉल्डवीन, रिचर्ड राईट यांच्या वाङ्मयाची आठवण करून देणारे वाङ्मय भारतात कुणी निर्माण केले? भारतात असे साहित्य, असे वाङ्मय आंबेडकरवादी लेखकांनी निर्माण केले. म्हणजे डॉ. आंबेडकरांचा विचार मान्य करून निर्माण होणारे साहित्य हे जागतिक दर्जाच्या कलाकृतींची आठवण करून देणारेच होते. म्हणून बाबुराव बागूलांची कथा, नामदेव ढसाळची कविता आणि यशवंत मनोहरांची कविता ही जागतिक दर्जाच्या वाङ्मयाचा आशय व विषय व्यक्त करणारी होते.

यशवंत मनोहरांच्या 'कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही' या कवितेच्या संदर्भात विचार करताना आपणास बहिष्कृत भारतातील बहिष्कृत गाव म्हणजे एकाच गावात गावकुसाबाहेरचं दुसरं गाव लक्षात ठेवावं लागतं. इथली विषमतेची परंपरा आणि समतेची परंपरा, वर्णवर्चस्ववाद, जातीव्यवस्था व त्या व्यवस्थेने कर्मविपाकाचा सिद्धान्त मांडून इथे एका मोठ्या समूहाचे हजारो वर्षे शोषण केले. त्यांना दीन, दलित, दास बनवले व पशूहून हीन जीवन त्यांना जगायला भाग पाडले हे लक्षात ठेवावे लागते. कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही, कारण मनूने अशी रचना केली आहे की, अतिशूद्राकडे सुखे, संपत्ती, सन्मान आणि ज्ञान-विज्ञान अशी भौतिक सामर्थ्ये येऊच नयेत, तो कायम वंचित राहावा, दीनदुबळा राहावा, गुलाम राहावा. या व्यवस्थेचे पालन आणि संगोपन हिंदूधर्म आणि संस्कृती करीत होते. खरे म्हणजे धर्माने नेहमी विश्वात्मक व्हावे, सार्वजनिक व्हावे परंतु हिंदूधर्म कधीच विश्वात्मक व सार्वजनिक झाला नाही व तो नेहमीच वर्णवर्चस्ववादी राहिलेला आहे. त्यामुळे देशाचे, समाजाचे काही भले झाले नाही. देश नेहमी पारतंत्र्यात राहिला. समाज नेहमी विभक्त राहिला आणि माणूस दुर्बल, दुभंगलेला आणि दलित राहिला.

हिंदू धर्माने समाजाचे, देशाचे आणि माणसाचे काहीही हित केलेले नाही. या अहितकारी वास्तवाचे वर्णन तुम्ही कसे करणार? किंवा प्रतिसाद कसा देणार? एकतर तुम्ही धर्मांतर करून ख्रिस्ती किंवा मुसलमान होणार आणि जे काही ख्रिस्ती झाले, मुसलमान झाले, त्याचे कारण ते देशद्रोही, समाजद्रोही किंवा माथेफिरू होते असे आपल्याला म्हणता येणार नाही. कारण इथली माणसाचा अवमान करणारी जी सामाजिक, सांस्कृतिक, अर्थव्यवस्था होती तिला मिटवून, माणसांनी तिचा त्याग केला. तो त्याग म्हणजे धर्मांतर. तो त्याग म्हणजे धम्मस्वीकार.

या एकूण व्यवहाराचे वर्णन करताना, एकूण व्यवहाराची पक्षपाती प्रवृत्ती वर्णन करताना एकही सुख, एकही सन्मान माझ्याकडे आला नाही. ते म्हणतात-

> ''कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही
> सदरहू पीक आम्ही आसवांवर काढले आहे
> कालपर्यंत पावलांनी रस्त्यांपाशी तक्रारी मांडल्या नाहीत
> झाडे करपली, माथी हरपली
> नदीच्या काठाने मरण शोधित फिरलो
> आयुष्याच्या काठाने सरण नेसून भिरभिरलो
> ...कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही.''

आता ही कविता बघा, केवळ सहा-सात ओळी आहेत. सरळ, सुबोध भाषेत आणि काहीही तांत्रिक करामत नाही, तरीही ही लोकभाषेत गेली. सुभाषित, अभंगासारख्या ह्या कवितेच्या पहिल्या दोन ओळी लोकांना माहीत झाल्यात, पाठ झाल्यात, अभिजात साहित्याचे हे लक्षण आहे.

तर माझी ही स्थिती कुठल्या कारणामुळे झाली होती, ते म्हणजे मी हिंदू धर्म, हिंदू जातीव्यवस्थेत जन्मलेलो होतो. म्हणून एकही पाऊस माझ्याकडे आला नाही. तो पाऊस यावा अशी हजारो वर्षांपासूनची तहान आहे. चोखोबाच्या प्रार्थनांना विठोबा पावला नाही. रोहिदासाची प्रार्थना वाया गेली. सन्मान, सुख आणि संपत्ती डॉ. आंबेडकरांमुळे येऊ लागली. धर्मांतर हे वर्गांतर होऊ लागलं. हे वर्गांतर अधिक मोठं व्हावं अशी अपेक्षा कुठलाही दलित मनुष्य युगानुयुगापासून करीत आलेला आहे. यशवंत मनोहरांची कविता माणसांचा शतकानुशतकांचा अनन्य उद्‌गार आहे. या उपेक्षित, वंचित माणसांची हजारो वर्षांची तहान भागवली जावी, त्यांचा जीव शांत व्हावा, थंड व्हावा, या माणसांची बरड आयुष्ये हिरवी व्हावीत, सुजलाम, सुफलाम व्हावीत म्हणून ही कविता मागणी करते आहे. हजारो वर्षांचा या लोकांच्या रेताड दुष्काळी आयुष्यांचा पाण्याअभावी साचलेला अनुशेष भरून निघावा, त्यांच्या हक्कांची, अधिकारांची भरपाई व्हावी व त्यांना नैसर्गिक न्याय मिळावा अशी मागणी ही कविता करते आहे.

निसर्गात सर्व प्राणीमात्रांची जगण्याची तजवीज आहे. माणसांच्याही जगण्याची तजवीज आहे. इतर प्राणी दुसऱ्यांच्या विभागात आक्रमण करीत नाहीत. याउलट माणसाने निसर्गातील समान वाटपाची योजना बळजबरीने आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला आहे आणि हा जो कालचा पाऊस आमच्या गावात आला नाही म्हणजे ही एक प्रतीकात्मक तक्रार आहे. हा मानवनिर्मित व्यवस्थेने सुखाचा शिडकावा आमच्यावर होऊ दिला नाही तरी आम्ही निर्माते आहोत. इथे एक समृद्ध संस्कृती आम्ही निर्माण केली होती. आम्ही ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात मोठी कामगिरी केली असून आम्ही जगन्नियंते आहोत. आम्ही भाकड म्हणून इतिहासात समाविष्ट नाही. आम्ही आमचे पीक करपू दिलेले नाही. त्यासाठी आम्ही आमचे रक्त, घाम शिंपला आहे. आम्ही आमच्या आसवांवर हे पीक काढले असून त्यासाठी अनंत दुःखे सहन करून कष्टाने हे पीक काढले आहे.

हे आमचे अस्मितेचे पीक आहे. हे आमच्या लढाऊ बियाण्यांचे पीक आहे. हे आमचे बंधूभावाचे पीक आहे. हे आमचे विद्रोहाचे, नकाराचे पीक आहे. हे आमचे ज्ञानाचे पीक आहे. हे आमचे विज्ञानाचे पीक आहे. हे आमचे साहित्य आणि कलेचे पीक आहे. हे आमचे माणसाला प्रचंड ऊर्जा देणारे पीक आहे.

ये पावसा ये! आणि ह्या ओसाडात हे पीक निघू दे. हे ओसाड सफल आणि सुंदर कर. कुठलाही मनुष्य अशीच अपेक्षा करील. अशीच अपेक्षा धर्मोपदेशक येशूने, धर्मोपदेशक महंमद पैगंबराने केली आणि अशीच अपेक्षा प्रथम महाकारुणिक भ. बुद्धाने केली. या महापुरुषांच्या अपेक्षा एक आंबेडकरवादी कवी करतो आहे. ही अपेक्षा, ही प्रार्थना क्रांतीची प्रार्थना आहे. ती क्रांती भारतात म. फुल्यांपासून, केशवसुतांपासून कुसुमाग्रजांपर्यंत मानवतेवर प्रेम करणाऱ्या प्रत्येक कवीने केली आहे. यशवंत मनोहरही मानवतेवर प्रेम करणारे कवी आहेत. दीन-दलितांची बाजू घेणारे कवी आहेत. कालपर्यंत त्यांचा समाज झोपलेला होता. अंधारात होता. कालपर्यंत त्यांची माणसे मुकी, बहिरी, आंधळी होती. कालपर्यंत गुलामांना गुलामीची जाणीव नव्हती. कालपर्यंत पावलांनी रस्त्यांपाशी तक्रारी मांडल्या नाहीत. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाने या परिस्थितीशरण, गतानुगतिक समूहात जाणीव जागृती घडवली. त्यांना क्रांतीप्रवण केले. अन्यथा आंबेडकरी कवितेत सूर्य ह्या प्रतिमेनंतर 'झाड' ही प्रतिमा आंबेडकरी कवींनी मोठ्या प्रमाणात वापरली आहे. ही प्रतिमा माणसासाठी वापरली गेली आहे. निसर्गातील समानता, निरपेक्षवृत्ती, अनाक्रमकता आदिसाठी वापरली गेली आहे. म्हणजे झाडं करपली याचा अर्थ इथली उपेक्षित माणसांची आयुष्ये करपली व म. फुल्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांची गती थांबली व मती गेली आणि त्यांची माथी हरपली. अशी जगण्या-मरण्याला रोज भिडण्याची पाळी आली. ससेहोलपट झाली.

आंबेडकरी कवी लोकांचा कवी असतो. त्याच्या कवितेतील 'मी'सुद्धा अंतिमतः लोकांसाठी बोलतो. लोकांचा प्रतिनिधी असतो. इथे तर आमच्या गावात पाऊस आला नाही असे कवी म्हणतो. म्हणजे ही समूहाची भाषा आहे.

यशवंत मनोहर यांची कविता चारित्र्यसंपन्न आहे. लिहिण्यात व जगण्यात ती एक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखी ती सर्व आघाड्यांवर डौलाने वावरते. त्यांची कविता जडवादी क्रांतीचे रुद्रसुंदर लेणे आहे असे मी या आधीच म्हटले आहे. त्या लेण्यांच्या समूहातील ही 'कालचा पाऊस' कविताही एक रुद्रसुंदर लेणे आहे. मनोहरांची ही कविता जगातील कुणालाही कळेल, कारण परिवर्तन, क्रांती ह्या विश्वजाणिवा आहेत. मी पुन्हा पुन्हा म्हणेन की ही कविता इतर पुरोगामी क्रांतिकारी कवींच्या कवितेपेक्षा अधिक युगसमांतर आहे. काळाला पुरून उरणारी आहे.

शब्दांकन : कवी अरुण काळे, नाशिक

# २

# 'यशवंत' झालेले यशवंत मनोहर

## ▪ प्रा. अविनाश वरोकर

अठ्ठावन्न-एकोणसाठ साल. दिवस नक्की आठवत नाही. पण बहुधा गुरुवार किंवा शुक्रवार असावा. बी.आर. हायस्कूलमध्ये मी अध्यापक होतो. पहिला तास आणि तोही मराठीचा. हातात कविता होती. वर्गात नीरव शांतता. अकस्मात झाडावरून गळलेल्या पानाच्या सळसळीनेसुद्धा शांततेला तडा जावा, इतकी नीरव शांतता. इतक्यात वर्गाच्या समोरून आवाज आला, ''सर मी आत येऊ का?'' मी 'यस' म्हणालो आणि तो वर्गात आला. शाळा गणवेशाची पँट आणि पांढराशुभ्र हाफ शर्ट. त्याने वर्गात पाऊल ठेवल्याबरोबर वर्गातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींच्या नजरा त्याच्यावर स्थिर झाल्या. तो शांतपणे मागच्या बाकावर बसला. थोडा लाजल्यासारखा वाटला. त्याची उंच शरीरयष्टी, भऱ्हार गोरा वर्ण, बोलके डोळे, उंच विशाल भाल आणि नाक डोळे अगदी चित्र्यासारखे. सुंदर आणि देखणा, काहीसा अबोल. मी त्याला नाव विचारले. तेव्हा त्याने अगदी हळुवार आवाजात सांगितले. ''सर, माझे नाव यशवंत राजाराम मनोहर. आणि माझे गाव येरला.''

वर्गात पहिल्या तासाला तो जरा उशिरा यायचा आणि नेमका वर्गशिक्षक असल्याने पहिला तास माझाच असायचा. मी त्याला सहज एकदा विचारले. अर्थात वर्गात नाही, बाहेर. ''तू दररोज उशिरा का येतो?'' आणि त्याने सांगितलेल्या अडचणीने माझ्या हृदयाचा बांध फुटला आणि नकळतच पापण्यांचा पावसाळा झाला. तो शांतपणे सांगत होता आणि मी ऐकत होतो. ''सर माझे गाव येथून सहा किंवा सात मैल आहे. मी पेठ बुधवारमध्ये दोन रुपयांची खोली करून राहतो. स्वतःच स्वयंपाक करतो. हे सर्व करताना वेळ होऊन जातो. शिवाय अनवाणी पायांनीच यावे लागते.'' आणि खरेच त्याच्या पायाकडे माझे लक्ष गेले. त्यामुळे मी अधिकच अस्वस्थ झालो. मनात विचार आला की एकदातरी त्याच्यासोबत त्याच्या गावाला जावे पण इतक्या लवकर जुळण्यासारखे नव्हते. वर्गात तो हुशार विद्यार्थी म्हणून नावारूपास आला आणि चमकला. वर्गात सर्व विद्यार्थ्यांत त्याचा पहिला, दुसरा क्रमांक असावा. अक्षर अतिशय सुंदर. त्याचे तिमाही. सहामाहीचे पेपर मी वर्गात वाचून घेत

असे. कारण त्याने लिहिलेली उत्तरे ऐकण्यासाठी मुलांचा आग्रह असायचा. नमुनेदार उत्तरे म्हणून त्याची उत्तरे अनेक विद्यार्थी स्वतः लिहून घेत. यशवंत हा जितका यशवंत होता तितकाच तो मनोहरही होता. हे त्याच्या वर्गातील वागण्यावरून सहजासहजी स्पष्ट होत गेले. मराठी विषयात त्याला अभिरुची होती आणि तो माझा आवडता विषय होता. दोघांचे सूर जुळले आणि आम्ही गुरु-शिष्य म्हणून अधिक जवळ आलो. पुढे पुढे तर तो मला माझ्या लहान भावासारखा वाटायला लागला. घरी-दारी कुठेही परकेपणा नाही. वर्गात लाजराबुजरा असला तरी घरी माझ्याकडे तो मोकळेपणाने वागायचा.

नंतरच्या वर्षी मी 'उमाजी नाईक' ऐतिहासिक नाटक बसवायला घेतले आणि अनायसे ते दहावीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट होते. त्या नाटकात कॅप्टन मॅकिन्टॉशच्या भूमिकेत मी यशवंत मनोहरला घेतले. उंच शरीरयष्टी आणि रेखीव धारदार चेहरा, बोलके डोळे. यामुळे इंग्रज ऑफिसरच वाटायचा. रंगमंचावर त्याची पहिली एंट्री झाली आणि प्रेक्षकांमध्ये एकदम टाळ्यांचा कडकडाट झाला. प्रेक्षांमधून सर्व मुला-मुलींच्या नजरा त्याच्यावरती स्थिर झाल्या. त्या नाटकाचा दिग्दर्शक या नात्याने मला खूप आनंद झाला. स्टेजवरून बाहेर आल्यानंतर 'विंग'मध्ये त्याच्या पाठीवर थाप मारली. सहजच माझ्या ओठातून शब्द बाहेर पडले, ''यशवंत, तू खरा यशवंत आहेस. आजही तू यशवंत आहेस आणि पुढेही यशवंतच राहणार आहेस.''

त्याच्या विषयीची माझी आत्मीयता वाढतच गेली आणि आम्ही अधिकाधिक जवळ आलो. त्याच्या बुद्धिमत्तेवर मला गर्व होता. सातत्याने मला वाटायचे हा खूप मोठा माणूस व्हावा आणि नेमके झालेही तसेच. त्याच्या कीर्तीची प्रदीप्तवेल पाहता पाहता गगनाला भिडली. नंतर १० वीत असताना मी त्याला म्हणालो, ''यशवंत मला तुझ्या गावाला यायचं आहे. येशील माझ्याबरोबर?'' तो जरा अडखळतच कसाबसा 'हो' म्हणाला. कारण कदाचित त्याचं घर, एकंदर राहणीमान सरांना कसे वाटेल? म्हणूनही कदाचित तो अडखळतच 'हो' म्हणाला असावा आणि मग एक दिवस मी यशवंतबरोबरच अगदी पायी गेलो. तेही रेल्वेलाईनच्या काठा-काठाने. गिट्टीचे खडे पायाला रुतले तरीही सहा-सात मैल चालत त्याच्या गावाला गेलो. रेल्वेलाईन ओलांडून गावात प्रवेश केला. यशवंताचे प्राथमिक शिक्षण येथेच झाले. हे त्याने मला सांगितले. पण त्यापेक्षा मला उत्सुकता होती त्याच्या आई-वडिलांना भेटण्याची. मी त्याच्यासोबत गेलो. त्याच्या घरासमोर गेल्यावर मी एकदम उद्ध्वस्त झालो. यशवंताचे घर म्हणजे मध्ये एक मयाल आणि दोन पाखे.

समोरून घरात जाताना मला कंबरेइतके वाकावे लागले. आत गेल्यावर न्हाणी आणि बाजूला स्वयंपाकघर आणि मागच्या बाजूला इंधन ठेवण्याची जागा. तिथेच जेवण झाले की तिथेच झोपावे. चार भांडीकुंडी एवढाच त्यांचा संसार. हे सगळे पाहिले तेव्हा मनात विचाराचे एकदम वादळ उठले. इथे हा पोरगा जन्माला आला. इथे त्याने अभ्यास कसा केला असेल? कसा राहिला असेल? कसा झोपला असेल? यशवंताच्या आईशी भेटलो. यशवंताची आई दिसायला अप्रतिम सुंदर होती. एकदम गव्हाळ वर्ण आणि नाकीडोळी रेखीव. यशवंत आईचा मुखवटा घेऊनच जन्माला आला. वडील अतिशय धिप्पाड आणि उंच, पण आई मात्र कमालीची नाजूक. वडिलांचा धिप्पाड देह आणि आईचा मुखवटा ही यशवंताला मिळालेली देणगी. मी सहज चौकशी केली. थोडा गावात फिरलो. या गावाची ठेवण मोठी विचित्र. गाव तसे चांगले पण वेशिला टांगले म्हणतात. एका बाजूला नदी. पावसाळ्यात ती भरून वाहते. म्हणून जाण्या-येण्याचा रस्ता बंद आणि दुसऱ्या बाजूला रेल्वेलाईन. मुंबईकडून दिल्लीकडे जाणारी. रात्रभर शंभर-दीडशे वेळा गेट बंद आणि मधोमध हे गाव. गावात काही दोन मजली इमारतीही दिसल्या पण त्याच गावात दुसऱ्या बाजूला अगदी कंबरीतून झुकलेल्या आणि कोसळण्याच्या बेतात असलेल्या झोपड्या दिसल्या. सहज चौकशी केल्यानंतर असे कळले की या गावात गरिबांच्या झोपड्यांची उंची ही अतिशय कमी असावी आणि त्याकरिता मालगुजाराची परवानगी घ्यावी लागते. आपले घर किती उंच असावे हे मालगुजार ठरविणार. मला तर आश्चर्य वाटले पण पर्याय नव्हता आणि उपायही नव्हता. कारण प्रथमच मी त्या गावात आलो होतो.

यशवंताच्या आईने मला जेवायला वाढले आणि मी अगदी पोटभर जेवलो. अनेक विचारांचे वादळ डोक्यात घेऊनच मी काटोलला परतलो. काटोलपर्यंत यशवंत माझ्यासोबत होता. अधून-मधून डोक्यात विचार यायचा. ज्या गावात हा 'कोहिनूर' जन्माला आला, ते गाव, तिथले रस्ते, तिथला धुळीचा कणन्‌कण, तिथली माणसे, हाडाची काडे आणि रक्ताचे पाणी करून काळ्या मातीला मातृत्व देणारे येथील शेतकरी, मजूर, त्यांचे दैनंदिन जीवन अगदी जवळून पाहावे असे पुन्हा पुन्हा वाटायचे. कारण ज्याने आज आपल्या लेखनाने संपूर्ण महाराष्ट्रच आपल्या कवेत घेतला त्या प्रख्यात लेखकाचे हे जन्मगाव. नंतर यशवंत शालांत परीक्षा वरच्या श्रेणीत उत्तीर्ण होऊन औरंगाबादच्या मिलिंद महाविद्यालयात गेला. मराठीत एम.ए. मेरीट घेऊन उत्तीर्ण झाला आणि पुढे नागपूरला विद्यापीठात प्राध्यापक म्हणून रुजू झाला. कधी वाटायचे यशवंत

आता फार मोठा झाला. तो आपल्याला विसरेल. पण नाही.

मधल्या काळात यशवंताची आई वारली आणि तिच्या स्मृतिदिनाच्या कार्यक्रमाला यशवंताने मला सोबत नेले. परत येरल्याला त्याच घरी. पण आता ते घर बरेच बदललेले होते. काळाच्या प्रवाहात त्याने आपला आकार अधिक आकर्षक केला होता. समोरच्या अंगणात शोकसभा झाली. सभेचा अध्यक्ष मी होतो. सौ. पुष्पाने एक कविता सादर केली. हृदय हेलावणारी. तिने आपल्या कवितेतून यशवंताची आई माझ्यासमोर उभी केली. यशवंत अतिशय भावविवश झाला होता. त्याचे पाणावलेले डोळे न बोलताही बरेच काही बोलून गेले. तशातही यशवंताने स्वतःला सावरले. मीही त्याला धीर दिला. मधल्या काळात लोकमतचे प्रमुख संपादक श्री बाबा दळवी यांच्यासोबतसुद्धा मी येरल्याला यशवंतकडे जाऊन आलो. त्याचे वडीलबंधू वारले, तेव्हाही मी जाऊन आलो. यशवंताच्या त्या जुन्या वास्तूने माझ्या मनात एकप्रकारचे वेगळेच विचारचक्र निर्माण केले. त्या वास्तूवर आपण काहीतरी लिहावे असे आजही वाटते. जेव्हा जेव्हा यशवंताची भेट होते, तेव्हा तेव्हा डोक्यात विचार येतात. जवळ जवळ पंचाहत्तर पुस्तकांचा लेखक, महाराष्ट्रातील प्रथमश्रेणींच्या लेखकांमध्ये ज्याचा शासनाकडून आणि रसिकांकडून गौरव केला जातो असा प्रख्यात लेखक ज्या वास्तूने आणि ज्या गावाने या देशाला दिला ती पवित्र वास्तू आणि छोटे असले तरी अनेक अर्थाने मोठे असलेले हे गाव. आजही माझ्या मनात कायमचे घर करून बसले आहे. पाला-पाचोळ्याच्या घरट्यात एखाद्या पिलाने दडून बसावे तसे!

# ३

# यशवंत मनोहर:असामान्य कादंबरीकार

## ▪ यशोधरा गायकवाड

डॉ. यशवंत मनोहर एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेले साहित्यिक, चौरांगी चिराच. त्यांच्या हातून कोणताही वाङ्मयप्रकार शिल्लक राहिलेला नाही. असे चौफेर लेखन करणारे हाताच्या बोटावर मोजण्याइतके. त्यात मनोहर मात्र अग्रेसर. म्हणून ते साहित्यशिरोमणीच आहेत. उभ्या महाराष्ट्राला हे विदित आहे.

एक साहित्यप्रकार त्यांची वाट पाहतो आहे. तो म्हणजे नाटक. तेही ते सवडीने पुरा करतील याबद्दल शंका नाही आणि तो असामान्य असेल याचीही खात्री वाटते.

सुमारे ४५ ते ५० वर्षे ते लेखन करीत आहेत आणि तेही अतिशय अव्वल दर्जाचे. ते आंबेडकरी विचारांचे खंदे पुरस्कर्ते आहेत आणि त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य त्यातच व्यतीत केले आहे.

निर्भीड व्यक्तिमत्त्व हे त्यांच्या साहित्यकृतीतून निदर्शनास येते. मोडेन पण वाकणार नाही हा बाणा अंगी बाणलेला. विषयाची गुंफण तर अतिशय उच्च दर्जाची. वाचकाला कायमस्वरूपी खिळवून ठेवणारी आणि वाक्यागणिक अंतर्मुख करणारी.

कैक आंबेडकरी पिढ्यांना ते लिखाण मार्गदर्शन करणारे व प्रोत्साहित करणारे आहे. अशावेळी प्रामुख्याने एक आठवण होते. बाबासाहेब म्हणायचे ''माझ्या रक्ताच्या थेंबामधून एकेक आंबेडकर निर्माण होईल.'' त्याचा डॉ. मनोहर यांच्या संदर्भात प्रत्यय येतो.

डॉ. यशवंत मनोहर आंबेडकरी शतकातील शेकडो ग्रंथांचे जनक. गाढे धम्म अभ्यासक, प्रचंड बुद्धिवादी ताकदीचे प्रकांड पंडित. अशाच पंडितांची आंबेडकरी साहित्यनिर्मितीला खऱ्या अर्थाने गरज आहे. धम्माची धुरा सांभाळणारे आंबेडकरी अनुयायी निर्माण व्हावेत हेच बाबासाहेबांना अपेक्षित होते आणि तेच डॉ. मनोहरांकडून पूर्ण होत आहे. बाबासाहेबांनी पेरलेले उगवल्याची खचितच खात्री पटते.

डॉ. मनोहरांची चरित्रात्मक असलेली 'रमाई' कादंबरी. ही त्यांची पहिली वहिली कादंबरी. ती त्यांच्या इतर कादंबऱ्यांत वरचे स्थान पटकावते. ही एक असामान्य, 'न भूतो न भविष्यती' अशी कलाकृती. रमाईमधील चरित्रनायिका हे एक धाडस आहे. ते एक संघर्षमय दुःखाचे काव्य आहे.

रमाची रमाई होईपर्यंत जिवघेणे दुःख तर होतेच पण रमाई झाल्यावरसुद्धा संघर्षामुळे, कष्ट, धडपड यांचे हेलकावे आकाशाला भिडणारे. सतत आंदोलन चालूच. त्या हेलकाव्यातून, आंदोलनातून टोक गाठणारी जिद्द मात्र त्यात सरस ठरली. त्यामुळेच ती बाबासाहेबांसारख्या महामानवाला साथ करून यशस्वी करू शकली. त्यात रमाईचा सिंहाचा वाटा. संसार हा फक्त रमाईचा होता. बाबासाहेबांना वेळच कुठे होता. चारी जुपला रमाईच्याच खांद्यावर होती. म्हणूनच बाबासाहेब इतकी मोठी झेप घेऊ शकले. आंबेडकरी संस्कृती, परिवर्तन याचा रमाई पाया आहे.

काळीज फाटणारे दुःख सोसणारी चिमुरडी रमा. दुःख हातोडा होऊन रमाला ठेचून काढत होते. काहीवेळा असे म्हणतात माणसाला पाठचे दुःख काही अंशी सोसवते पण पोटचे दुःख अजिबात सोसवत नाही. त्याचप्रमाणे पोटच्यांनाही जन्मदात्यांचे दुःख सोसणे, सहन करणे म्हणजे हृदय फाटून जाणे.

रमाचे आई-वडील रुक्मिणी भिकू धोत्रे. परंपरागत सोबत करणारे, दारिद्र्य काढीत, सहन करीत मोलमजुरी करणारे. अतिशय अब्रूने जगणारे. तेच संस्कार रमा व तिच्या भावंडांना मिळाले.

रमा पाच-सहा वर्षांची असताना तिचे आईवडील दिवंगत झाले. रमाला आभाळच फाटल्यासारखे वाटते. तिला मोठ्या मुलीसारखी समज आली होती. अशावेळी आई-वडिलांची शिकवण तिची पाठराखण करीत होती.

आई-वडिलांच्या जाण्याने तिला खूप रडावेसे वाटे. ती सुन्न झाली होती. याचे कारण अतीव दुःख झाल्याने माणसाला रडूच येत नाही. ते नुसते अवाक होऊन बसते. पोरकी रमा अशा अवस्थेत म्हणाली, 'लहानपणी कोणाचेही आईबाबा मरू नयेत.'

हे दुःख वर्णन करताना डॉ. मनोहर जणू रमाच्याच भूमिकेत जाऊन आपले दुःख व्यक्त करतात. ही असमान्य कल्पनाशक्ती 'जाई त्याच्या वंशा तेव्हा कळे' अशीच आहे.

रमाचे भोळेभाबडे व प्रामाणिक मन बोलते करताना तो मनाचा आक्रोश, दुःखावेग फारच मार्मिकपणे मांडताना लिहितात -

''आई, तू का गं आम्हाला सोडून गेलीस?''

''माझ्या लग्नाला तर खूप दिवस होते. मग घाई का केलीस? माझे काही चुकले का?'' बालमनातील भावना रेखाटणे अतिशय कठीण. पण त्यात डॉ. मनोहर खूपच पारंगत आहेतसे वाटते.

आपला गुलमोहोर ठिणग्यांनी फुलतो आहे.

गांजलेला जीव आहे आमच्या रमाचा!

रमाच्या डोळ्यातील कारुण्याला चांदण्याची किनार लावली जात होती.

एक सुंदर इतिहास घडत होता.

समाज कूस बदलत होता.

चबुतऱ्याखालून वाहणाऱ्या गटारातील घाण पाणीही लाजले होते.

तिच्या काळजाचे संगीतच मुके झाले होते.

जखमी मोराने फुलवलेला पिसारा असावा तसे ते तिचे नवरीचे सजलेले रूप होते.

तिच्या पदराची गाठ एका तुफानाशी बांधली होती.

नवऱ्याचे कौतुक ऐकताना व पाहताना रमाचे भावविश्व फुलत होते.

आनंदाचे चांदणे तिच्या वृत्तीच्या ताटव्यात फुलत होते.

रमा तर पराक्रमाची सावलीच होती.

वादळाच्या सावलीला आता पर्याय नव्हता.

डॉ. मनोहरांचे उपरोक्त वक्तव्य म्हणजे प्रत्येक वाक्य, एकेक वाक्य एक लघुनिबंध होईल इतके ते अर्थपूर्ण आहे. हे त्यांचे वैशिष्ट्य सगळ्याच वाङ्मय प्रकारात ओतप्रोत भरलेले आहे. कारुण्यातही त्यांनी भाषेचे चांदणे फुलविले आहे.

रामजी गेले. रमाने अनेक मरणे पाहिली. प्रत्येक मरणाबरोबर तीही थोडी थोडी मरत होती. आई-बापानंतर १९१३ पर्यंत कोणीही गेले नव्हते. नंतर चैनच पडू दिली नाही मरणाने. एक झड संपत नाही अश्रूंची तर दुसरी सुरू. उघाड अशी नाहीच. सासूच्या वेड्या मायेसाठी कधी कधी ती हळवी होई. एकटेपणात ती पोरकेपणाची जखम वाहू लागे. सासरा म्हणजे पहाडच कोसळला.

भीमराव अमेरिकेला निघाले. मुंबई बंदरातून बोट सुटली. तसे रमाचे काळीज थरारले. पण सुख फुलवणाऱ्या यातनांची तिला सवय करायची होती. काळजाला तशी शिकवण देऊन कठोर करायचे होते.

अस्वस्थता आणि एकाकीपण या गोष्टी तिला सोडणार नव्हत्या. त्यांची सवय करणे भाग होते.

भीमरावाने पहिल्याच पत्रातून रमाला बराच उपदेश केला. रमा बोट सुटताना तुझी आसवे पाहिली. रमा, विरह आणि दुःख आपल्याला मोठी करणारी आहेत. या वणव्यातून धावण्याची प्रतिज्ञा केली आहे. जिंकलो तर आपल्या देशाला उजेडात उभे करीन. तिथल्या गुलामीची कबर बांधीन. हरणार नाही यासाठी तू पाठीशी हवीस. रमा मला पोलादी पंख येत आहेत.

डॉ. मनोहरांनी रमाईला एक वीरस्त्री निर्माण करून योध्याचे मन निर्माण केले आहे.

रमाने पत्र वाचले. पती प्रत्यक्षात बोलत असल्याचा आनंद झाला. त्यावर रमा दृढविश्वासाने म्हणते, ''साहेब, मी सांभाळते सगळे.'' रमाला पहाडासारखी भीमाच्या पाठीशी उभी करण्यात डॉ. मनोहर यशस्वी ठरले आहेत. मी खूप कष्ट करीन. पण मागे हटणार नाही.

भीमराव अमेरिकेत गेल्यानंतर १९१३ ते १९१७ या चार वर्षांत रमाचे खूप हाल झाले. संसारासाठी शेण थापावे लागले.

सासरा नसल्याने एकटीलाच कामाचा डोंगर उपसावा लागे. एकप्रकारे हिरवळीतील संसार वाळवंटात गेला. निराधारामुळे गरिबी अधिकच छळू लागली. तिला वाटे आपण पूर्वी पोरके होतोच. मृत्यूने आणखी पोरके केले आहे. तिला खूप रडू येई. अश्रूंचे झरे बुजवून परिस्थिती वाकवायला ती बळ गोळा करी. मात्र परिस्थितीने सूड घ्यायचे ठरविले होते. भीमराव अमेरिकेला गेल्यानंतर वर्षाच्या आत दुसरा मुलगा गेला. ही गोष्ट पत्रातून न कळवल्याबद्दल पतीची माफी मागते. अभ्यासात व्यत्यय येऊ नये म्हणून रमाने कळविले नव्हते. इतके सोसले आहे त्यावर हा आघात. परंतु हे दुःख माझ्यावर सोपवा. यात मनोहरांचे या नायिकेचे व्यक्तिमत्त्व किती प्रगल्भ करून दलितोद्धारासाठीच ती पतीला मोकळे करीत आहे. फारच ताकदीचे लिखाण करून रमाईला सामाजिक आणि सांस्कृतिक माता म्हणून भीमरावांची पत्नी आयुष्य संपेपर्यंत साथ करणारी, किंबहुना समाजासाठीच संघर्षमय जीवन जगणारी निर्धारनायिका उभी केली आहे.

एवढा आदर्श महिलांना आणखी कुठेही सापडणार नाही. ही 'क्रांतिशिखा' निर्माण करताना डॉ. मनोहरांचे चिंतन, दीर्घचिंतन कामी आले आहे.

पोटच्या गोळ्याचा विरह अतिशय धिरोदात्तपणे व्यक्त केला आहे. ''अरे,

तुझ्या या बापाला न भेटताच गेलास बाळा.'' हे काळीज चिरीत जाणारे उद्‌गार. हे यशवंत असण्याचे लक्षण आहे डॉ. मनोहरांचे.

हे काळीज पिळवटणारे लिखाण डॉ.मनोहरच करू जाणे. संपूर्ण कादंबरीचा विचार करता भाषेचे भांडारच उघडे केले आहे.

प्रगल्भ विचारांना भाषेने हवे तसे वळवले आहे. डॉ. मनोहर म्हणजे एक भाषासम्राटच आहेत.

इतक्या मोठ्या प्रज्ञावंताला आर्थिक सहकार्याबरोबर विचारांचेही प्रसंगी सहकार्य करते ही गोष्ट डॉ. मनोहरांनी नेमकेपणाने व भान राखून हाताळली आहे. उदा. तुफानाच्या पायात बेडी टाकू नये. आता तुफानाची सावली व्हायचे आहे. हे तुफान अजिंक्य आहे. निव्वळ औषधाला पैसे नाहीत म्हणून मुलगा मृत्यू पावला. ही मृत्यूंची मालिका गळा सतत आवळीत होती.

हे सगळे वाचताना डोळ्यांना सारखी झड लागते अश्रूंची. त्यानंतर मुलगा राजरत्न गेला तेव्हा रमा जमिनीवर गडबडा लोळत होती.

रमाचे काळीज दुभंगून गेले होते. वीज पडून कोसळावे तशी ती कोसळली. छाती फुटेपर्यंत पिटत होती.

वाचकाचा एक उमाळा पुरा होत नाही तो दुसरा पूर येतो. छाती फुटेलसे वाटते. रमाईच्या ह्या अनंत मरणांनी वाचकाच्या मनात सरणच पेटते.

आतापर्यंत चार लाडक्यांना मूठमाती दिली. मातृत्वाचा बुरूज कोसळत असतानाही नवऱ्याला धीर देते. रमा मरणावरही मात करते.

भीमरावांचे रमावर अपार प्रेम होते. ते म्हणत रमा ममताळू, सुशील आहे. माझ्यासाठी ती सर्वस्वी आदरणीय आहे. रमाईने एका लुगड्यावर दिवस काढले. कमालीचे दारिद्र्य झेलले. नवऱ्यासाठी उपास करी. यश मिळावे हा उद्देश.

अनेक दिवस रमाने भिजलेली उडदाची डाळ खाल्ली. कधी दिवसातून एकदा जेवली. तर कधी उपाशी राहिली. कधी तिघींनी एक भाकरी खाल्ली. नवरा बॅरिस्टर. त्याच्या नावाला उणे येऊ नये म्हणून, कोणाला दिसू नये म्हणून पहाटे गोवऱ्या थापायला जायची आणि सूर्यादयापूर्वी घरी यायची. भाजी म्हणजे चटणी, कांदा, मीठ. रमाई जळत होती.

भीमराव बॅरिस्टर होऊन आले तेव्हा त्यांच्या स्वागताला जायला रमाईला लुगडे नव्हते. रमाला आठवले. कुठल्याशा सत्काराला भीमरावांना जरीचा पटका दिला होता. तो ती नेसली आणि स्वागताला गेली. भीमराव घरी

आले. अशावेळी रमाईने फक्त साहेब म्हणून पायावर डोके ठेवले. बूट आनंदाश्रुंनी भिजले. रमाईचे अंतःकरण आसवातून ओसंडत होते. ती आसवांनी आक्रंदत होती. कष्टांचे डोंगर नि दुःखांचे पर्वत दूर केले होते. रमाईचे मन हलके झाले होते.

तिच्यापुढे ज्ञानाचे लावण्य, युगंधर प्रज्ञासूर्य तळपत होता. रमाई त्याच्या अपूर्व तेजाने दिपून गेली होती.

भीमरावाने विचारले, "कसे सांभाळले तू घर?" साहेब रमाईसाठी हमसून हमसून रडले. इतके उत्कट प्रेम. भीमराव रडतात आणि ते व्यक्त करण्याची पद्धत डॉ. मनोहरांची अतिशय संयमाची आहे. तिच्यातून उत्तमप्रकारे चित्रसामर्थ्य दिसून येते.

हे संपूर्ण संघर्षमय जीवन जगता जगता मनाने शेवटपर्यंत खंबीर असलेली रमाई शरीराने खंगून जर्जर झाली आणि २७ मे १९३५ साली रमाई भीमरावांनाच नाही तर ज्यांच्यासाठी कष्ट सोसले त्या जनसागराला सोडून गेली.

पत्र लिहिताना भीमरावांच्या डोळ्यात अश्रू जमत. वाचताना रमाईचे डोळे भरून येत. असे प्रेम. अशी ही साथ.

'रमाई' ही कादंबरी वाचताना डोळ्यांत पावसासारखी संततधार लागलेली असते. ती थांबतच नाही. रमाईसारखेच या दुःखवेगाने जमिनीवर गडबडा लोळावे असे वाटते. तो वास्तवातला ताजेपणा क्षणभरही विश्रांती घेऊ देत नाही.

पोटचे एक दुःख संपत नाही तोच दुसरे तयार. त्यामुळे दुःखाचा डोंगर सतत उभाच. एक दुःख मनाआड करीत नाही तोच दुसरे दुःख हजर. त्यात आर्थिक परिस्थितीने जर्जर. त्या दुःखावर जणू डागण्या म्हणून की काय पतीचा विरह. अशा तिहेरी दुःखाने 'रमाई' अक्षरशः गर्भगळीत झालेली. तरी सगळ्याच परिस्थितीचा विचार करून, भान ठेवून हा खडतर मार्ग आक्रमित होती. त्यावर सतत मात करीत होती. सतत लांब नजर टाकीत होती. निव्वळ पतीचे प्रेम व सामाजिक कर्तव्य पार पाडण्यासाठी. समाजाचे उद्धारकर्ते फक्त भीमरावच आहेत याची पूर्ण जाणीव होती. आपण धीर सोडून चालणार नाही. भीमरावांना सामाजिक उत्थानासाठी आपणच सर्वार्थांनी सहकार्य करू शकतो.

या प्रजाजनांचा राजा आपला पतीच आहे. त्यांचा सर्वस्वी आधार भीमरावच आहेत. हे ह्या सांस्कृतिक महामातेला माहीत होते. हे मातृरूप अभ्यासताना माणूस अतिशय व्याकूळ होतो.

या कादंबरीतील मलपृष्ठावर लेखकाचा जो फोटो टाकला आहे तो त्या

विषयाला अनुसरून असाच आहे. जणू लेखक त्या दुःखाने अवाक होऊन पाहाताहेत. सगळ्याच अर्थाने समर्पक अशीच कादंबरीच्या निर्मितीचे उद्दिष्ट साध्य झाले आहे. अशी असामान्य कलाकृती विरळाच.

लेखकाचे आणखी एक सामाजिक वैशिष्ट्य प्रकर्षाने जाणवते ते म्हणजे स्वतःचे लग्न कोणताही खर्च न करता केलेले आहे. विशेष म्हणजे लग्न जुन्याच कपड्यांवर लावले आहे. इथे हा विशाल दृष्टिकोन सामाजिक परिवर्तनाचा आहे. आदर्शाचा आहे. अनावश्यक बाबींना गौणत्व देऊन समाजाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले आहे. अनावश्यक बाबींना फाटा दिला आहे.

आणखी असे, डॉ. मनोहरांची पत्नी लग्नात फक्त प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेली होती. लग्नानंतर आपल्या पुतण्यांच्या बरोबर शाळेत घालून तिचे शिक्षण आपल्या बरोबरीला आणले. त्या आज स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. प्रा. डॉ. पुष्पलता मनोहर. केवढे हे प्रयत्न. आदर्श कुटुंबाचा; नवसमाज रचनेचा हा पाया आहे. इथे जोतीबा फुलेंची व सावित्रीमाईच्या शिक्षणाची आठवण होते.

असा आदर्श समाज निर्माण करायचा असेल तर घराघरातून जोतीबा फुले निर्माण झाले तर स्त्रीस्वातंत्र्याच्या आद्यप्रणेत्या सावित्रीबाई निर्माण व्हायला वेळ लागणार नाही.

डॉ. मनोहरांच्या साहित्याचा पाया आंबेडकरी क्रांती आहे. ते मनुवादी संस्कृतीला सुरुंग लावीत आहेत. तिची पाळेमुळे उखडून काढीत आहेत. तो स्फोट जग हादरवणारा आहे. म्हणून ते सर्व भाषेतून प्रसिद्ध व्हायला हवे आहे. कारण, ते भारतीयच नाही तर जागतिक संपत्ती आहेत. या साहित्यात प्रचंड आत्मविश्वास आहे. म्हणूनच ते म्हणतात -

मला पाहून आता तुमचा सर्वकर्ता करविता परमात्माही
माझ्या संतप्त पायावर डोके ठेवून माझी क्षमा मागणार आहे.
माझा नारा इन्किलाब मी आता आभाळ मुठीत ठेवणार आहे.

आंबेडकरांच्या ओठावर उगवलेला मी प्रलयंकारी सूर्य आहे. डॉ. मनोहर नव्या पिढ्यांचे मार्गदर्शक आहेत. ते स्फूर्तीचे बलदंड शक्तिस्थान आहेत. नवसमाजनिर्मितीसाठी सक्षम आणि निर्भीड जगण्यासाठी हे साहित्य अभ्यासण्याची नितांत गरज आहे. तेव्हाच पुढे काय? या जटिल प्रश्नाचे उत्तर सापडेल.

डॉ. मनोहरांनी भविष्यासाठी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर जगातील एकमेव क्रांतिकारक' उभे केले आहेत. कारण ते फक्त आंबेडकर जगत आहेत. ते

द्रष्टे विचारवंत आहेत. त्यांचे उर्वरित जहाल विचार म्हणजे त्यांचे स्वकथन 'युद्ध संपलेले नाही' हे दीर्घ क्रांतीचे निदर्शक आहे. अहर्निश युद्ध चालू असल्याचेच चिन्ह दिसत आहे. म्हणूनच हे नाव सर्वार्थाने सार्थ असेच आहे.

भविष्यातील धम्म धोक्यांची जाण आहे म्हणूनच ते धम्मसंरक्षक आहेत. क्रांतिकारी साहित्यात मनोहर अग्रणी असतील. त्यांचे नाव अमर असेल. हे योगदान अद्वितीय असे आहे. ते खैराचा इंगळ आहेत. ठणका लावणारा बाभळीचा तीक्ष्ण काटा की जो आरपार ठाव घेऊनच रक्तबंबाळ होऊन बाहेर येतो. मातीतील हाडांना बोलते करणारे संशोधक आहेत. नवसंस्कृतीच्या गळ्यातील सहस्रपैलूंचा कंठमणी आहेत. त्यांना सूर्यकुळातील वारसाहक्काचे बंडखोर अपत्य संबोधण्यास काहीच हरकत नाही.

डॉ. मनोहर संतापून देशाला जाब विचारतात -

संस्कृतीच्या पायाखालील मुक्या अश्रूंचा देश कुठे आहे?
मृत्यूला मुक्ती मागणाऱ्या माउल्यांचा देश कुठे आहे?
लज्जेच्या आगीत जळणाऱ्या आकांतांचा देश कुठे आहे?
संस्कृतीच्या मुक्या अश्रूंचा देश कुठे आहे?

हे साहित्य अभ्यासून पुढील पँथरने डरकाळी फोडली नाही तरच नवल. हे लढाईसाठीचे प्रभावी जीवनसत्व आहे.

या ज्वालामुखीचा तप्त लाव्हा उसळून उद्रेकाचे सातत्य कायम. कारण तो जागृत आहे.

डॉ. मनोहरांच्या चिंतनाचा विषय आहे, शंबूक, एकलव्य, म.फुले, छत्रपती शाहू, सावित्री, रमाई आणि यशोधरा. डॉ. आंबेडकर हे तर स्वतंत्र चिंतनकाव्यच आहेत.

संपूर्ण मराठी साहित्याला त्यांनी समृद्ध केले आहे. साहित्यविश्वाला ते एक फार मोठे भूषण आहेत. प्रत्येक विषयात त्यांनी आपला ठसा उमटविला आहे. जो अतुलनीय ठरावा. ते इतके आंबेडकरवादी आहेत की पूर्वापार टाकावू संस्कृतीतील एखादा शब्दही त्यांच्या लिखाणात येऊ शकत नाही. संपूर्ण सांस्कृतिक नवीन जगणे. नास्तिकतेचा उच्चांक.

क्रांतीसाठी अहर्निष सज्ज. शब्दांची धार भयानक तीक्ष्ण. अशक्य काहीच नाही. 'फक्त शब्दांनो मागू ते द्या.' इतकेच.

४

# कवी यशवंत मनोहर यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक चिंतनकाव्य

■ ना.रा.शेंडे

१९८६ हे वर्ष जमेस धरून गेल्या अडीच तपाच्या इतिहासाचा सापेक्ष दृष्टीने पण जरा चिकित्सेने विचार केला तर, तळागाळातील अत्यंत दाहक जीवन जगणाऱ्या आणि दलित व बौद्ध वर्गातील तीव्रतर दुःखे सोसणाऱ्या जनतेचा एक जळजळता आलेख नजरेपुढे तरळतो आणि हृदय व मन हे दोन्ही विव्हळू लागतात. माणसाची माणुसकी नसलेल्या या भयाण चित्राला पुण्यश्लोक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १० ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धम्मचक्रप्रवर्तन करताच एका वेगळ्या विद्रोही विचारक्रांतीने कसलीही पर्वा न करता अस्पृश्यता साफ नष्ट करण्याचा दलित व बौद्ध विचारवंतांनी विडा उचलला आणि करुणा, शील व प्रज्ञा यांच्या आविष्कारार्थ दुःखितांची दुःखे विमोचनार्थ आणि मानवतेच्या पुरस्कारार्थ आपली प्रतापी पावले वेगाने पुढे टाकली. त्याचे प्रभावी पडसाद दलितांच्या साहित्यात प्रकर्षाने उमटू लागले. त्या दलित साहित्याद्वारे दलित बौद्धांचे एक वैशिष्ट्यपूर्ण जग गेल्या अडीच तपापासून निर्माण होऊ लागले. इतरेजनांनी कितीही टीका टिप्पणी केली अथवा कोणता कसाही रोष व्यक्त केला तरी त्याला न जुमानता, दलित-बौद्ध विचारवंत समता, न्याय व बंधुत्व या त्रयींवर असामान्य विचारक्रांतीची जळजळती मशाल घेऊन आपले तेजस्वी व प्रभावी अस्तित्व सिद्ध करून आपला प्रेरणादायी व कल्याणकारी स्वयंभू इतिहास सिद्ध करण्यास नव्या जोषाने व नव्या जोमाने उद्युक्त झाल्याचे प्रत्ययास येते. डॉ. आंबेडकरांच्या प्रगाढ विद्वत्ता, बुद्धिमत्ता, कर्तृत्वता आणि प्रगाढ प्रज्ञाशक्तीपासून विशेष प्रेरणा घेऊन दलित व बौद्धधर्म अस्मितादर्श चित्र निर्माण करीत आहेत.

अशा सुलक्षणी शौर्यतेजाच्या विचारक्रांतीतून दलित बौद्ध वर्गातील ज्वलंत समाजक्रांती उफाळू लागली. तिने पूर्वीच्या जुनाट, बुरसट, कर्मठ व अमानुष रूढींना आणि प्राचीन परंपरांना व तत्सम धर्म व सिद्धान्तांना साफ झुगारून दिले आणि मानवतावादी नवविचारांची, तत्त्वज्ञानाची व सिद्धान्ताची उद्धारक

प्रणाली अनुसरून, खालचा थर उन्नत आणि प्रगत करण्यासाठी नवी वाट व नवी दिशा निर्माण केली. त्याचे आगळ्या तेजाने लकलकणारे प्रतिबिंब आजच्या समाजजीवनात काय अथवा दलित साहित्यात काय उमटू लागले. दलितांत नवक्रांतीचा नवपराक्रम शिपाई निर्माण झाला. आवरता आवरेना अशी गती त्याने निर्माण केली.

विचारक्रांती आणि समाजक्रांती या दोन्ही दृष्टीने दलित साहित्याच्या प्रवर्तकांनी, मग तो लेखक असो, कवी असो, नाटककार असो, संशोधक असो वा भाष्यकार असो. आपल्या अमिट लिखाणाचे ठसे उमटविण्याचा व त्याची व्याप्ती आणि दीप्ती वृद्धिंगत करण्याचा एका जिद्दीने एका ध्यासाने प्रारंभ करून, गेल्या अडीच तपाच्या अल्पशा काळात आपल्या वीर वृत्तीची घडण प्रत्ययास आणून दिली. हे कुणा अन्य दुक्षाचार्यालाही अमान्य करता येणार नाही. ज्या संदर्भात, महाराष्ट्राचे एक सव्यसाची नावाजलेले कवी प्रा. डॉ. यशवंत मनोहर यांचा उत्थानगुंफा ह्या उद्रेकातून आर्द्रता आणि आर्द्रतेतून दुःखितांच्या दुःखाचा यथेच्छ परामर्श घेणाऱ्या पहिल्या उत्कृष्ट पारितोषिक प्राप्त काव्यसंग्रहानंतर १९८२ मध्ये 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक चिंतन काव्य' निर्माण केले आणि बाबासाहेबांना क्रांतीमंता असे उद्देशून हृदयस्पर्शी अशा अत्यंत उत्कट भावनांची, विचारांना गती देऊन उद्धारक अशा हितैषी कर्तव्याची जी कठोर पण सत्यदर्शी जाणीव करून दिली ते चिंतन निःसंशय स्पृहणीय आहे. चिंतनात चिंतन आहे.

गेल्या ६० वर्षांपूर्वीच्या अस्पृश्यतेच्या अत्यंत तप्त ज्वालांनी पोळल्या जाणाऱ्या परिस्थितीत 'दिसामाजी काहीतरी' अत्यअल्पसे लेखन करणारा त्या अमानुषतेच्या दाहक काळातील मी एकटा एक खेडूत लेखक, माझ्या लिखाणाला काहीच अर्थ नाही. सारे शून्यवत. माझी पहिली कविता जून इ.स. १९२२ साली निर्माण झाली. पण दुर्गादर्शन आणि काही कविता हा माझा पहिला कवितासंग्रह मात्र ३० वर्षांपूर्वी म्हणजे १९५६ साली प्रकाशित झाला. केराच्या टोपलीत टाकला जाणारा परंतु गेल्या अडीच तपात जे अनेक दलितबौद्ध साहित्यिक निर्माण झाले त्यांना मी कधीतरी एक खेडूत कवीही होतो याची अजूनही काहीच कल्पना नाही. ही मात्र समाधानाची गोष्ट होय. मी एक खेडूत वाचक आहे. अंधत्वात अंधत्व असलेला, त्यामुळे गेल्या अडीच तपात जे दमदार व भरदार दलित साहित्य निर्माण झाले त्याच्याशी मी अपरिचित आहे हे खरे. तरीसुद्धा डॉ. यशवंत मनोहरांसारख्या नामवंत कवीच्या काव्यसंग्रहावर प्रस्तुत छोट्याशा अभिप्रायाचे प्रयोजन.

हृदयस्पर्शी भावनांना आणि सुप्त मनाला चेतवणाऱ्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर:एक चिंतनकाव्य' या काव्यसंग्रहातील -

''तू चवदार तळे आणलेस ताळ्यावर
त्यातील पाण्याला शिकवलीस तू माणुसकीची बाराखडी
आणि सोडवलेस तू पाण्याला जातियतेच्या शापातून

या मानवी मूल्याचे दर्शन घडविणाऱ्या काव्यपंक्तींनी माझ्या मनातील अंधत्वाला एक प्रकाशकिरण दर्शविले आणि -

मनुष्यतेची माय खरी तू
स्वप्ने लेवून नटली माती
खड्ग होऊनी तळपून उठली
इथे दीन गवताची पाती

या अर्थपूर्ण अमृतबोलांनी उदात्त हृदयसौंदर्याची महत्ता वर्णिली.

विश्ववंद्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या उद्धारक उत्तुंग व्यक्तिमत्त्वाला आम्ही अजूनही पुरते ओळखू शकलो नाही. त्यांच्या लोकोत्तर तेजस्वी पिंडाची पुरती जाण अजून आम्हाला झाली नाही. दुःखितांच्या दुःखाने न्हालेल्या आणि दलितांसवे राष्ट्रकल्याणार्थ दुःखाचे, व्यथांचे, क्लेशांचे स्वतः जराजर्जर होत जाऊन एकप्रकारे विषप्राशन केले आणि दलितांनाच नव्हे तर संपूर्ण राष्ट्रासाठी अमृताचा कलश प्रदान केला. एवढे असामान्य थोरत्व अन्य विविध राष्ट्रलाही कधी लाभू शकले नाही. करुणा, शील व प्रज्ञा आणि समता, न्याय व बंधुत्व या अत्युच्च अलंकारांनी मंडित झालेले बाबासाहेब आंबेडकर हे दलित व बौद्धजनांचेच प्राणवायू नव्हते तर संपूर्ण स्त्रीजातीचे व अखिल भारताचे ते तारक प्राणवायू होते. कवी यशवंत मनोहरांनी बाबासाहेबांच्या अथांग सागरी व्यक्तिमत्त्वाचा आपल्या चिंतनशील प्रकृतीने, शोध व वेध घेत निर्दिष्ट काव्यसंग्रहात बाबासाहेबांच्या पावन मूर्तीचे अगदी वेचक व बोधक व प्रेरक शब्दमंजुषेने यथार्थ दर्शन घडविण्याचा स्तुत्य व स्पृहनीय प्रयत्न आपल्या ध्यास व ध्यानमग्नतेत केला आहे. तारुण्य आणि दारुण्य यातील अंतर दर्शविणाऱ्या बाबासाहेबांच्या नावावर, आता काय घडविले जात आहे, याचा अत्यंत प्रखर पण अगदी सत्यदर्शी शब्दात जो कडक परामर्श घेतला आहे तो मोठा चिंतनीय आहे.

''क्रांतीमन्ता,
तुझी माणुसकी आभाळाहून विराट
तुझे हृदय सागराहुनही अफाट

आणि ह्या डबक्यांनी चालवला रे तुझा संकोच
तुला फसवताहेत रे हे जातीच्या चिखलात
हे दिवाळखोर रे क्रांतीमन्ता
हे चोरावर मोर.''

बाबासाहेबांच्या हयातीत वैभव होते ते कोणते आणि मग त्यांच्या महानिर्वाणानंतर स्वार्थासाठी बडेजावासाठी, अहंकाराने अलमस्त होण्यासाठी नेतेपणाच्या अभिलाषेसाठी, कालच्या देदीप्यमान वैभवाची पातळी आज गर्तेत कशी कोसळली याचे अत्यंत दारुण चित्रण कवीने, डॉ. आंबेडकर या प्रदीर्घ खंडकाव्यात मोठ्या कुशलतेने करून, इतिहासाची कालची सुवर्ण आणि आजची बेगडी दोन पृष्ठे अभ्यसनीय अशी स्वच्छ व स्पष्ट अशी उभी केली आहेत.

'जे घडले ते कबूल आहे' अशी प्रामाणिक ग्वाही देऊन कवी तळतळून उद्‌गारतो -

''खूप प्रकारची नाटके राबताहेत तुझ्या नावाने
चोर होताहेत शिरजोर''

किंवा

''हे नव्हेत नेते रे क्रांतीमन्ता
ह्यांचा चालला आहे रे टोप्या बदलण्याचा खेळ
खिशासाठी
बदलत आहेत रंग त्यांची काळी काळिजे
कुंटणखाना रे ह्यांच्या संवेदना...''

दोन हृदये आणि दोन मने यांचा तारतम्यभाव आंदोलने घेत कसा गरगरत आहे. याचे भावनात्मक चित्रण कवीने शब्दांचा अचूक फेर करून केल्याचे आढळून येते. कवी बाबासाहेबांच्या विविध तेजस्वी पैलूचे सम्यकज्ञान राखून आविष्कार घडवितात. ते जेवढे मनोज्ञ तेवढेच परिस्थितीनुरूप प्रक्षोभक वाटतात. ते नमूद करतात -

''मी तुला पाहिले नाही
पण तुझ्या मायेचे प्रताप पाहिले
व्यथेला पालवी फुटताना पाहिले
हाडांचे ढीग तुझ्याखातर अग्निकल्लोळ होताना पाहिले
पाहिले दुःखाचे भविष्याशी लागलेले लग्न.''

भूतकाळ व भविष्यकाळ यांचा बाबासाहेबांच्या रेशमी हृदयांच्या तंतूशी जोडताना कवी क्षणभर थबकतो आणि तो वर्तमानकाळाच्या खुणा शोधण्याच्या एका जाणिवेने प्रयत्न करतो. कालचा क्षण लोपला. उद्याच्या क्षणाची कोण व कशी ग्वाही देणार म्हणून की काय कवी हृदयातील वर्तमानकाळाचा सत्यकारी क्षण धर्मकाट्यावर तोलून पाहण्याचा यत्न करतो.

"आयुष्यांना लागली आहे रे क्रांतीमन्ता
ही आग तू भडकलीस
ही भूक तू चेतविलीस
आणि युद्धात उतरवलेस आमच्या उपासा-तापासांना
खपाटी मनांना
तूच या अग्नीचा शिल्पकार क्रांतीमन्ता
हे क्रांतीमन्ता
तुझे आयुष्य हे तर जगातले एवढे आणि असे पहिलेच महायुद्ध"

प्रस्तुत ७२ पृष्ठांच्या काव्यसंग्रहात ४८ पृष्ठांचे बाबासाहेबांसंबंधी बोलके खंडकाव्य आहे आणि तुझ्या स्मृतीच्या जवळ, 'युगंधरास', 'जयजयकार', 'भीमराव रामजी आंबेडकर', "आत्म'र्थी प्रेतासंबंधी', 'त्याच्या आठवणीशी डोळे भिडवताना' आणि 'उजेडाचा दिवस' अशा विचारप्रेरक ७ काव्यांचे परिशिष्ट जोडले आहे. त्यात अंतरीच्या वेदनांचा मागोवा घेऊन कल्याणप्रद ध्येयनिष्ठेचा परिमल दळणवळणाचा यशस्वी माध्यम आविष्कृत करण्यात आला आहे. त्यात वस्तुस्थितीनिष्ठ प्रतिमा व प्रतीके यांचे सकृतदर्शनी आकार प्रतीत झाल्याचे आढळते. त्याचा उकल करण्यास मी अनभिज्ञ आहे. पण त्यांची लकाकी मनाला स्पर्शून जाते व एका वेगळ्या प्रवाहाचे दर्शन मात्र घडते.

"जयजयकार करताना
मानवतेच्या अपंग अवयव प्रदेशाला
लक्ष कळ्यांचे भार येतात
जेव्हा एका महामातेची कूस उजवते
एक विद्रोहाची घटना"

असे दर्शवून कवी विकल अवस्थेत बाबासाहेबांना अनुनय करीत पृच्छा करतो -

"आमची लक्तरलेली आयुष्ये शिवलीस
तो सुईदोरा कुठे ठेवलास?"

हा यक्षप्रश्न सामंजस्याने विचारात घेण्यासारखा खास आहे आणि दमदारपणे आव्हान देत तो उद्‌गारतो -

''क्रांतीची अग्निगंगा झेलणारे आजचे वास्तववंत भगिरथ
शोधतोय मी या अवसानघातकी दावेदार अंधारात
सागराची उलथापालथ करणारी खवळती
वादळे धांडोळतो मी रौरवाच्या अमानुष शापात.
त्या पराक्रमी कल्लोळाची दाहक अवलाद
शोधतोय मी.''

विद्रोहाच्या शिखरावरून मानवतेचा शोधक कवी न डगमगता म्हणतो -

''माझेच बळ माझ्या मनगटाला
समर्थ करीत आहे''

डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक चिंतन काव्य ही उच्चतम भावविलोकी आणि माणुसकीने मंतरलेली व वास्तव्याच्या कल्पतरुने आविष्कृत झालेली प्रक्षोभक नव्हे विद्रोहीपणाच्या कवेत प्रक्षोभ या हृदयस्पर्शी रसाने वेढलेली काव्यगाथा. युक्तिवादाला व बुद्धिवादाला झुगारून, बुद्धिप्रामाण्यवादासह निश्चित दर्जेदार आहे. काव्यगुणासह प्रेरणादायी आहे यात संदेह नाही. कवी डॉ. यशवंत मनोहर या नावानुसार त्यांचा काव्यसंग्रह मनोहारी तर आहेच पण यशवंतही आहे.

५

# हे गावःएक आस्वाद

▪ दिलीप वि.चित्रे

(लॅन्हम, एम.डी.)

हे गाव

हे गाव मरणाने आता दत्तक घेतले आहे,
रस्त्यांना नासवीत आहे आंधळ्या दिव्यांची बेबंदशाही,
उलट्या काळजाभोवती सजताहेत सोन्याची तोरणे,
मारलेली माणसेही आपल्या मरणांची देत नाहीत ग्वाही;
... हे गाव मरणाने आता दत्तक घेतले आहे.

गावाच्या कक्षेत येणाऱ्या चांदण्यालाही होतो महारोग,
इथल्या झाडांवर फुलत नाही माणसांमधील सुगंधी नाते,
सकाळ होत नाही इथे, क्षितिजातून रोज उगवते वाळवंट,
कोणत्याही उजेडाची इथे हकनाक नाकेबंदी केली जाते;
... हे गाव मरणाने आता दत्तक घेतले आहे.

इथे गळे कापले जातात स्वरान्तर करणाऱ्या पाखरांचे,
इथे पंख छाटले जातात दिशान्तर करणाऱ्या वाऱ्याचे,
प्रश्नांचे उगम केले जातात इथे बेबंदपणे बंद,
माणूस बिचारा इथून आता हद्दपारच झाला आहे;
... हे गाव मरणाने आता दत्तक घेतले आहे.

भारतातून परतताना बरोबर जी पुस्तके आणली त्यात 'यशवंत मनोहर' ह्यांचा अलीकडेच मौज प्रकाशनने प्रसिद्ध केलेला 'जीवनायन' हा कवितासंग्रह होता. उपरोक्त कविता ही त्या संग्रहातली.

गेल्या चार दशकात मराठी कवितांचा तोंडवळा पार बदलून गेला आहे. वृत्तबद्ध, छंदबद्ध कवितांपेक्षा स्वतंत्र लय असलेल्या मुक्तछंदातील कविता अधिक रूढ होत गेल्या. परंतु नुसत्या मुक्तछंदापेक्षाही कवितेतून येणाऱ्या कल्पनाविलास, हळुवारपणा, गोजिरवाणेपणा, गुळगुळीतपणा या गोष्टींपेक्षा प्रखर जीवनानुभवाचा आकांत मांडणाऱ्या, नागडे-उघडे सत्य विदारकपणे समोर मांडून भेलकावून टाकणाऱ्या कविता स्थिरावत चालल्या. विशेषतः दलित साहित्य मराठीत रुळत चालल्यानंतर दलितांची दुःखे कलात्मक अभिव्यक्तीने, पण धडधडते आगडोंग उसळणारे शब्द लेवून आपल्यासमोर यायला लागली आणि संवेदनशील वाचक त्या धडधडणाऱ्या धगीने अंतर्मुख बनू लागला.

अशा दलित कवींचे प्रतिनिधीत्व करणारे कवी यशवंत मनोहर. हे नुसते दलित कवींचेच प्रतिनिधी नसून त्या एकंदर समाजाचेच प्रतिनिधी आहेत. त्यांची जीवघेणी वेदना, त्यांच्यावर लादलेला जीवनाचा ओंगळपणा, नपुंसकत्वाची जाणीव मनोहरांच्या शब्दांतून पेट घेऊन उठते आणि त्या ज्वालेत पांढरपेशा समाजाची तथाकथित मूल्ये आणि संस्कृती बेचिराख होऊन जाते.

कविता अनेक प्रकारची असते. ती स्वयंकेंद्रित/आत्मकेंद्रित असते. बाह्यकेंद्रित असते. कृती अथवा वृत्ती-केंद्रित असते आणि मनोहरांची कविता ही समूहकेंद्रित आहे. त्यांच्या कवितेतून येणारी बंडखोरी, आक्रोश, आकांत हा त्यांचा वैयक्तिक नसून ते प्रतिनिधित्व करीत असलेल्या एकूण समूहाचा, समाजाचा आहे. कवीच्या मनोवस्थेचे स्थितीशील स्वरूप त्यांच्या कवितेत पाहायला मिळते.

विचारवंत वाचकाला अंतर्मुख करणारे प्रश्न आणि दलित समाजाची दुःखे यांचे द्वंद्व मनोहरांच्या कविता वाचताना मनात उभे राहते. त्या प्रश्नांना उत्तरे असली तरी त्यांना सामोरे जाण्याची अथवा ते नाकारण्याची हिंमत अंगात उरत नाही. 'जीवनायन' हा कवितासंग्रह वाचत असताना मनोहरांचे यापूर्वीचे 'उत्थानगुंफा' आणि 'मूर्तिभंजन' हे कवितासंग्रह आठवले; म्हणून तेही पुन्हा काढून वाचले. एखादीच कविता वाचून कवीची स्थिती आणि वृत्ती तोलण्यापेक्षा समग्र कवी वाचणे केव्हाही लक्षणीय.

बाह्यजीवनातला अनुभव जेव्हा स्व-जीवनाशी एकरूप होऊन कवितेच्या माध्यमातून समोर येतो तेव्हा त्या कवितेचे स्वरूप अनुभवाच्या सच्चेपणाशी तादात्म्य पावलेले असते. हे तादात्म्य होणे कधी बंडखोरीचे असेल, कधी उद्रेकाचे, तर कधी विद्रोहाचे. 'उत्थानगुंफा'मधून जाणवणाऱ्या विद्रोहाचे

स्वरूप हे उसळणाऱ्या आगीसारखे असेल तर 'जीवनायन'मध्ये ते धुमसणाऱ्या निखाऱ्यासारखे वाटते. वंचित समाजाच्या दुःखांना वाचा फोडता फोडता हतबलपणाच तेवढा हाताशी उरतो. हताशपणाची जाणीव मूळ धरू लागते आणि भडकलेला आगडोंब विझता विझता राखेच्या आत धुमसणारा निखाराच तेवढा उरावा, पण त्याचीही तीव्र धग जाणवल्यावाचून राहू नये, ही भावना 'जीवनायन' वाचताना होत रहाते.

''शब्दांची पूजा करीत नाही मी माणसांसाठी आरती गातो
ज्यांच्या गावात सूर्य नाही त्यांच्या हातात उजेड देतो...''

अशा शब्दात दलितांचे प्रतिनिधित्व करीत मनोहरांची कविता 'उत्थानगुंफा'मधून येते.

''जीवनाची नग्नता झेंड्यासारखी हाती घेऊन
आजवरचे वंदनीय हिशेब नाकारावे लागतील
भारतीय परमात्म्याने डिक्लेअर केलेल्या गुलामीसारखी
जीवनाची सर्व षंढ तत्त्वज्ञाने पुसावी लागतील...''

अशा कडकडीत घोषणा देत बेबंदपणे त्यांची कविता आव्हान देत येते. मनोहरांच्या शब्दांना प्रतिमांचा सोस असला तरी त्या प्रतिमा सहजस्फूर्त आणि चपखल असतात. त्यामुळे त्या कवितेच्या सौंदर्याला मारक ठरत नाहीत.

''दोस्त हो
क्रांतीची अग्निगंगा झेलणारे आजचे वास्तववंत भगीरथ
शोधतोय मी या अवसानघातकी दावेदार अंधारात.''

अशा ओळींपाशी क्षण, दोन क्षण थांबल्याशिवाय पुढे वाचणेच अशक्य ठरावे इतक्या काळीज चिरत जाणाऱ्या प्रतिमा.

''माझ्या अश्रूंवर रक्ताच्या अश्रूंची सही आहे...''

अशी आपल्या वेदनांची प्रांजळ कबुली देत जरी त्यांचे शब्द आले तरी मधूनच त्यांच्या कवी-हृदयाने जपून ठेवलेला एखादा हिरवा अंकुर ''माझ्या मनात आहे सुगंध आणि हातात कवितांची वही...'' यासारख्या शब्दांमधून पाहायला मिळतो.

'हे गाव' या उपरोक्त कवितेत विफलतेची, विद्रोह पूर्ण संपल्याची,

आग विझून राखच तेवढी उरल्याची खंत प्रकर्षाने जाणवते. 'हे गाव!' कुठले गाव? या कवितेतील गाव म्हणजे पिढ्यान्‌पिढ्या अन्यायाने पिचलेला, दारिद्र्याशी झुंजता झुंजता खचलेला शोषित, दलित समाज. गाव ही त्या दलित समाजासाठी वापरलेली प्रतिमा. त्या गावातील माणसे मरणप्राय आयुष्य जगताहेत. तो गावच मरणाने दत्तक घेतलाय. त्या गावाच्या रस्त्यांवर अंधारच आहे. तिथले दिवेही आंधळेच आहेत.

'उलट्या काळजाभोवती...'' कुणाचे उलटे काळीज? तर ते संस्कृतीचे पोवाडे गाणाऱ्या, पण माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नाकारणाऱ्या पांढरपेशा समाजाचे. उलट्या काळजाला सोन्याची तोरणे लावून सजवणाऱ्या, म्हणजे ऐहिक सुखाने, समृद्धीने संपृक्त असलेल्या, मटिरिअलिस्टिक वर्ल्डमध्ये बुडालेल्या समाजाचे. या गावातील माणसांना मरण आलेलेही कळत नाही. कारण संपूर्ण गावच मरणाने दत्तक घेतलेय.

या गावावर पसरणारे चांदणेही महारोग झाल्यासारखे असते. झाडांवर फुले नाहीतच; पण माणसा-माणसांमधल्या नात्याचा सुगंधही नाही. तिथे सकाळ उजाडत नाही. तिथे आशेची पहाटकिरणे नसतात. क्षितिजातून उगवतो तो जीवन जाळून टाकणारा वैराण वाळवंटाचा रखरखीतपणा. पण त्या रखरखीतपणातूनसुद्धा उजेडाची तिरीप गावात येणार नाही याची खबरदारी घेऊन गावात मरणप्राय झालेल्यांची हकनाक नाकेबंदी केली जाते. संपूर्ण गाव मरणाने दत्तक घेतलेले असते.

'स्वरांतर' करणाऱ्या पाखरांचे गळे कापले जातात. दिशांतर करणाऱ्या वाऱ्याचे पंख छाटले जातात. कारण प्रवाहाविरुद्ध पोहायचे नसते त्यांनी. त्यांनी बंड करायचे नसते. त्यांनी निमूटपणे जे आहे ते, आणि आहे तसेच सोसायचे असते. डोळ्याला डोळा भिडवण्याचे पाप करायचे नसते. वेदना निमूट गिळायची असते. प्रश्न विचारायचे नसतात, कारण ओठांवर प्रश्न येण्यापूर्वीच त्यांना गळा घोटलेला असतो आणि माणसाचे माणूसपणच हद्दपार करून त्याला जनावरापेक्षाही दुर्लक्षित, वंचित जीवन आंदण दिलेले असते. ते जीवन जगणारा जो समाज, ते हे 'गाव' मरणाने दत्तक घेतलेले.

बकाल जीवन जगणाऱ्या शोषितांच्या थिजलेपणाचा हा मरणविश्वास आहे. ही कविता म्हणजे बाह्यात्कारी अनुभव आत्म्याच्या मुशीत ओतून तयार केलेल्या रसायनाचे धगधगते शिल्प आहे. शब्दांची सर्कस करून चमत्कृतीपूर्ण प्रतिमा योजून टाळी मिळवण्यासाठी केलेली ही कविता नाही.

या कवितेतील शब्दांमधली धग आपल्याला जाळून राख करते. हे शब्दनृत्य नाही. ते अग्निनृत्य आहे.

या कवितेत एका समूहाच्या, गावाच्या, मरणाचा म्हणजे त्यांच्या मरणप्राय, प्रेतवत जीवनाचा आकांत आहे. त्या मरणगुंफेतून माणूस आपले प्रेतपण सोडून, जीवनाची ज्योत हाती धरून बाहेर पडावा यासाठी मांडलेले तांडव आहे, पण 'हे गाव आता मरणाने दत्तक घेतले आहे' प्रत्येक कडव्याच्या शेवटी आलेल्या या पुनरुक्तीने मन घायाळ होते. ही पुनरुक्ती मनावर आभाळातून कोसळणाऱ्या उल्केप्रमाणे आघात करते. जखम करते. पण त्या जखमेतून रक्त ठिबकत नाही. नुसती वेदनाच पसरत जाऊन मन बधीर करून टाकते. उरतो तो फक्त मनोहरांच्या नैराश्यातून उसळलेला, मन विदीर्ण करणारा मूक आक्रोश.

एकता:एप्रिल २००२

६

# उत्थानगुंफा:अध्यात्मवादी प्रवाहाचा दंभस्फोट करणारी क्रांतिकारी युगप्रवर्तक कविता!

■ प्रा. विठ्ठल शिंदे

'उत्थानगुंफा'तील कवितेविषयी मत मांडताना वि.वा. शिरवाडकर यांनी म्हटले आहे की, "उत्थानगुंफा म्हणजे जळजळीत ज्योतींचा एक थवा आहे... दलितांचे दुःख नैसर्गिक नाही. ते सामाजिक अन्यायातून निर्माण झालेले आहे." कुसुमाग्रजांचे डॉ. यशवंत मनोहरांच्या कवितेबाबतचे मत अनेक अर्थांनी महत्त्वाचे ठरते. मानवनिर्मित दुःख गेल्या कित्येक पिढ्यांपासून उपेक्षित समाजावर लादले गेले होते. कवी यशवंत मनोहर आपल्या कवितेतून कालचे व आजचे वास्तव उत्थानगुंफेत मांडतात. 'प्रारंभ' कवितेत ते म्हणतात -

"भीक म्हणून वाढलेले श्वास घेतले उदासवाणे
संस्कृतीभर तगमगलो तुरुंगवाणे
आणि कितीही घासला परीस तरी लोखंडाचे नाही झाले सोने."
(प्रारंभ-१)

भूतकाळातील अंधारात चाचपडणाऱ्या अभावग्रस्त समूहांना स्वतःचे 'श्वास' ही 'भीक' म्हणून मिळवून घ्यावे लागले; संस्कृतीचा तुरुंग सहन करावा लागला आणि तरीही 'मातीच्या आयुष्याला' आकार आला नाही; लोखंडाचे सोनेही झाले नाही. एक अखंड 'दुःखयात्रा' सुरू झाली ती पुढेही सुरू राहिली तेव्हा कवी म्हणतो -

"आत कोसळणाऱ्या उन्हात मी करपत राहिलो
त्यांच्या सुखाच्या भर श्रावणात." (एक दुःखयात्रा-५)

सुखाचे 'श्रावण' आणि जवळपास सर्वच ऋतू खरेतर 'त्यांच्याच'साठी या व्यवस्थेचे 'राखून' ठेवलेले होते. यातनांचा 'पाऊस' कोसळत होता; मात्र कवी मनोहर नमूद करतात तसा -

"कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही
सदरहू पीक आम्ही आसवांवर काढले आहे."
(परिशिष्टातील बारा कविता-५-९१)

दुःखाचा वर्षाव उपेक्षितांच्या वाट्याला आला मात्र योजनांचा, विकासाचा सुधारणा, शिक्षण, आरोग्य, ज्ञान, विज्ञान-तंत्रज्ञानाचा पाऊस त्यांच्या गावात आला नाही. जे काही मिळविले, जगण्यासाठी टिकविले ते स्वतःच्या कष्टाचेच फळ होते अशाप्रकारचे जळजळीत वास्तव कवीने मांडले आहे. कालचा दुःखभरा आक्रोश कवीने 'उत्थानासाठी', 'काढिला खणुनी काळोख', 'विद्रोहाची नौबत', 'मी इथल्या दिशांच्या', 'कैसा हा उन्हाळा', 'उगवलो आम्ही', 'मला पाहून आता', 'काय आठवावे', 'हा जन्म भोगतो मी' इ. कवितांतील मोजक्या ओळीतून व्यक्त केला आहे. या कवितेतून कालचे व आजचे वास्तव वाचकांच्या समोर येत राहते. कालची व आजची दलित जीवनाची स्थिती लक्षात येते. हा दुर्लक्षित समाज जन्म एखाद्या ओझ्यासारखा वागवून काळोख खणून काढायला निघाला असता त्याला साधा दिलासाही कोणी दिला नाही. कवी प्रा. मनोहर लिहितात -

''दुनियेत चंद्रसूर्याच्या
मज कुणीच घेतले नाही
या जन्माची कधी माझ्या
कुणी आई झाले नाही.''

(१५. काढिला खणुनि काळोख-१८)

हा समाज जळण जळावे तसे मुकाट्याने सहन करीत होता. हकनाक लुबाडला जात होता. इथल्या द्रष्ट्या आचार्यांच्या पुण्यवान नगरात व काळ्या बाजारी गावात मरणाच्या वेदना सहन करीत होता. त्याला हा जन्म 'बंदिशाळा' वाटत होता. ही त्याची भावना व्यक्त होते की -

''कैसा हा उन्हाळा। कैसी बंदिशाळा
उभा जन्म काळा। झाला येथे.''

(२५. कैसा हा उन्हाळा-४९)

दलितांचे अस्तित्वच प्रस्थापित समाजाला मान्य नव्हते. त्यांनी हरतऱ्हेने दलितांचा छळ केला. स्त्रीची विटंबना केली. या उच्चवर्णीय व्यवस्थेला सर्व पातळ्यांवरचे पाठीराखे मिळाले; मात्र दलित जगण्याला पारखे झाले. सवर्णीयांच्या या प्रवृत्तीचे दर्शन कवी घडवतो -

''न साहुनी भले। पेटविता गाव
अब्रूचा लिलाव। स्त्रियांचीया॥

मातले म्हणता। धर्म बाटविला
थुंकता आम्हाला। पाहूनिया॥''

(३२. उगवलो आम्ही - ५२)

अशी सामाजिक अन्यायाची चित्रे डॉ. मनोहरांनी रेखाटली आहेत. हा 'भोगावा' लागलेला जन्म भूतकाळात जातो तेव्हा साहजिकच आठवणी जाग्या हेतात; तेव्हा कवी स्वतःलाच प्रश्न विचारतो. हा प्रश्न खरे तर सरळ समाजालाच विचारलेला असतो. काय आठवावे? असा प्रश्न करून कवी उत्तर देत आहे-

''काय आठवावे?
सगळेच तर आयुष्य मुकाट गुदमरलेले कोंडलेले आहे
...
आठवांनीही तर सर्व आयुष्यभर निखारेच पसरले आहेत.''

(३६. काय आठवावे-५५)

कवी यशवंत मनोहर यांनी 'उत्थानगुंफा'तून जाणीवपूर्वक दुर्लक्षित ठेवलेल्या जगाची व्यथा मांडली आहे. त्याला सतावणारा भूतकाळ चितारला आहे व वर्तमानकालीन दुःस्थितीचे दर्शन घडविले आहे.

'काय आठवावे?' म्हणत कवीचा स्वशोध सुरू होतो. वस्तूतः हा मी, मी न राहता आम्ही होतो. स्वचा शोध हा आम्हीचा शोध ठरतो. मीचा आवाज समाजाचा आवाज ठरतो. समाजाचा शोध घेताना किंवा यातनांचे दर्शन घडविताना कवी मनोहर भूतकाळात फारसे रमत नाहीत हे ठळकपणे लक्षात घ्यावे लागते. 'उत्थानगुंफा'तील कविता भूतकाळात न रमता, गतकाळाचे दुःख उगाळीत न बसता भविष्याचा वेध घेते हे तिचे मोठे सामर्थ्य आहे. उत्थानगुंफातील मी विद्रोही परंपरेशी नाते जोडतो. त्यामुळे उपेक्षित समाजमनातील नकार, निषेध, आत्मभान या बाबी जाग्या होतात. जाग आलेल्या समाजाचा प्रेरणानायक आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर! जो मुका, भुकेला, कंगाल, स्वत्व अन् सत्व गमावलेला समाज होता तो एखाद्या तांबड्या समुद्रासारखा खवळला; सैनिकासारखा उभा राहिला. यशवंत मनोहरांच्या कवितेत जाग आलेला योद्धा विविध रूपात दिसू लागतो. मनोहरांच्या कवितेतला मी हा नव्या युगाचा प्रतिनिधी आहे. निर्भय, बेडर, लढायला तयार असलेला विज्ञानवादी व विवेकनिष्ठ मी त्यांनी उभा केला आहे. अस्मिता जागृत झालेल्या माणसाची विविध रूपे खालील काही ओळींतून स्पष्ट होतात. 'खवळलेला तांबडा समुद्र'मधील हा सर्जक मानव म्हणतो -

''आणि माझ्याही कवितेच्या मनगटातून आता
सूर्य उगवू लागला आहे
सर्वहारा क्षितिजांच्या पिंड प्रदेशात
प्रखरता पेरू लागला आहे.''

(४. खवळलेला समुद्र-६)

आगच झालो आहे, निर्भय मानव, दयेची उबग आलेला स्वाभिमानी मानव, राग आणि आग झालेला मानव व्यक्त होताना म्हणतो -

''मी काळोखाचे उकळते अंतराळ पितो आहे
क्षण क्षण विजेच्या पावलांनी येतो
...
माझ्यात मुकाट मावेनासा झालो आहे
माझ्यातही अवघडू लागलो आहे.''

(७. आगच झालो आहे-९)

भूतकाळातील आपले एक रूप न्याहाळताना जाणवते ते नमूद करताना कवी म्हणतो -

''मी इथल्या दिशांच्या सूडबुद्धीची थुंकी तिरस्कृत
आणि निषिद्ध भ्रमनिरास
त्यांच्या लाडक्या परंपरांचा.''

(२४. मी इथल्या दिशांचा-४१)

मात्र 'मला पाहून आता'मधील मानवाचे रूप विद्रोही आहे. क्रांतिसन्मुख अशा मानवाचे आहे. या कवितेतला पराकोटीचा आत्मविश्वास आणि जग उलथून टाकण्याचे आश्वासक सामर्थ्य डोळे दिपवून टाकतात. ओळी अशा-

''मला पाहून आता तुमचा सर्वकर्ता करविता परमात्माही
माझ्या संतप्त पायावर नम्र डोके ठेवून मला क्षमा मागणार आहे
माझा वारा इन्किलाब मी आता आभाळ मुठीत घेणार आहे.
मी आंबेडकरांच्या ओठावर उगवलेला प्रलयंकारी सूर्य आहे.''

(४७. मला पाहून आता - ७७)

या कवितेत कवी चार्वाक, मक्खली, गोशाल, अजित केशकंबली, गौतम बुद्ध, फुले, मार्क्स, आगरकर, मानवेंद्रनाथ रॉय, केशवसुत यांची वादळी परंपरा

मांडतो. युगांपासून फाटलेला मानव आता अपरंपार पेटला आहे असे कवी नमूद करतो. कवीने सर्वश्रेष्ठ जगनियंत्यालाच आव्हान दिले आहे. इतकेच नव्हे तर सत्यवादी व वादळी परंपरेच्या मानवापुढे हा परमात्मा शरण येईल असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे. ही वृत्ती ही घटनाच अपूर्व मानावी लागते. मराठी साहित्यात अशी विद्रोही कविता पहिल्यांदाच आल्याचे अनेकांनी नमूद केले आहे. विशेषत्वाने दलित साहित्याचे क्रांतिविज्ञान मांडणारे बाबुराव बागूल आणि डॉ. भालचंद्र फडके यांची मनोहरांच्या कवितेबाबतची प्रतिक्रिया येथे नोंदविणे महत्त्वाचे ठरते. बाबुराव बागूल प्रस्तावनेत लिहितात की, ''तिच्या हातात वादळ आणि वणवे आहेत. लोकांना संघटित करणारी, कार्यक्रम देणारी ही कविता आहे... ही विद्रोही वणव्यासारखी अग्निबंबाळ कविता विज्ञानाचा उद्गार आहे.'' तर डॉ. भालचंद्र फडके म्हणतात की ''उत्थानगुंफा हा काव्यसंग्रह म्हणजे विद्रोहाचा आगडोंब आहे, एक धगधगता ज्वालामुखी आहे.''

डॉ. मनोहरांच्या कवितेत स्वशोधनाच्या प्रक्रियेतून जागृती जन्म पावताना दिसते. उत्थानगुंफामधील कवितेतून एक बेपर्वा मन, बुलंद मन जन्म घेताना दिसते. या बुलंद मनाने विषमव्यवस्थेला नकार दिला आहे. अनेक विकासविन्मुख व मानवविरोधी घटकांचा निषेध केला आहे. 'यापुढे', 'नाकारावे लागतील', 'वैरी', 'निषेधनामा', 'माणसासाठी आरती' या कवितेतून हा जळजळीत निषेध व्यक्त होतो. कवीने सनातन्यांची दया, उसने श्वास, ढोंगी आईपण, नाते नकारले आहे आणि अटळ युद्धभूमीचा स्वीकार करून संस्कृती, परमात्मा, अध्यात्म, मंदिरे ही शस्त्रभांडारे व त्यांचे लाडके आईबाप यांना उद्ध्वस्त करण्याचा चंग बांधला आहे. कवीने नमूद केलेल्या शस्त्रागारांनीच उपेक्षित वर्गातील व तमाम दारिद्र्य लाभलेल्या वर्गातील समाजाला गुलाम केले होते. या संस्कृतीच्या ठेकेदारांशी कवीने युद्ध पुकारले आहे. कवी यशवंत मनोहर यांच्या कवितेत अनेकदा युद्धसंदर्भ येतो. म्हणून उत्थानगुंफामधील कविता युद्धासाठी सज्ज राहायला शिकविणारी व युद्धसैन्य निर्मिणारी रणांगणातील कविता आहे असे म्हणता येते. हे युद्ध षडयंत्रांच्या विरुद्धचे युद्ध आहे. मानसिक, शारीरिक गुलामगिरीच्या विरुद्धचे युद्ध आहे. या युद्धाविरुद्ध खंबीर मानसिकता 'उत्थानगुंफा'तील कविता निर्माण करते. 'वैरी' कवितेतून कवी मांडतो -

''ज्यांनी माणूसपण इथे शब्दातच सडवले
ज्या नियमांनी सृष्टीचा हा विद्रूप विकास सिद्ध झाला
-त्यांचा मी जळजळीत निषेध करतो.
... ते शब्दप्रामाण्यवादी सगुण निर्गुण वैरी आहेत माझे.''

(१२. वैरी-१५)

कवीने पुढे जीवनातील सर्व षंढ तत्त्वज्ञाने, जीवनाचे आध्यात्मिक आजार नाकारले आहेत. निषेधनामात कवी नोंदवितो -

''छळतात सारी शास्त्रे पुराणे वेदान्त
गळा आवळणारे नाना धर्मपंथ
...
तुम्ही लिहा साहित्यशास्त्रे
लिहा तत्त्वज्ञाने सोईची
परंतु इथे मिरासदारी आहे काहींची
हे मी ओरडून आकांतून सांगत जाईन.''

हे सर्व ओरडून आकांतून सांगण्याचे कारण हेच की -

''शब्दांची पूजा करीत नाही मी माणसांसाठी आरती गातो
ज्यांच्या गावात सूर्य नाही त्यांच्या हातात उजेड देतो.''
(२२. माणसांसाठी आरती-३५)

माणसांसाठी आरती गाणारी मनोहरांची कविता मानवतावादी कविता आहे. मानवमुक्तीचा ध्यास घेतलेली ही सूर्य बहाल करणारी कविता क्रांतिकारक सूर्यकुलातील कविता आहे. मानवाच्या हातात उजेड देऊन अंधाराला हरवणारी मनोहरांची कविता खरीखुरी प्रकाजपूजक व प्रकाशदायी कविता आहे.

कवी यशवंत मनोहरांचा दृष्टिकोन क्रांतिकारक दृष्टिकोन आहे. व्यक्ती, त्याचे मन, समाज या घटकांना घडविण्याचे काम कवीचा दृष्टिकोन करीत असतो. मनोहरांची कविता व्यक्तीची, समाजाची मानसिकता बदलण्याचा प्रयत्न करीत राहते. क्रांतीचे विचार व्यक्तीच्या मनात रुजवून तिला परिवर्तनास, बदलास तयार करण्याचे मौलिक कार्य करते. 'जग बदल घालुनी घाव' असे म्हणणाऱ्या अण्णा भाऊ साठे यांच्या उक्तीचे कार्य ही कविता करताना दिसते. घाव लागून, चौफेर हल्ला चढवून इतक्या वर्षांची मानवी मनावरील जळमटे खरडवून टाकण्याचे काम ही कविता करते. मनोहरांची कविता ही सर्व पातळ्यांवरील अखंड हल्ला चढविणारी कविता ठरते. यशवंत मनोहरांची कविता ही लढ्यातली कविता आहे. ती चळवळीची कविता आहे. लढा अथवा चळवळ यशस्वी करण्यासाठी मनाने तयार झालेला मानव उभा करण्याचे काम करते. चळवळीत उमटणाऱ्या सर्व तऱ्हेच्या भावछटा कळकळीने त्यांच्या कवितेतून प्रकट होतात. भारतीय समाज हा पूर्वग्रहदूषित भावना जपणारा समाज आहे. या समाजाच्या मनात अनेक समज-गैरसमज साचलेले असतात.

मनोहरांची कविता एक सकस व स्पष्ट दृष्टी घेऊन आलेली कविता असल्यामुळे माणसाच्या मनातील समज ती पक्के करते आणि गैरसमज दूर करते. व्यवस्थेचे ठेकेदार त्यांच्या कवितेच्या आवाजाने भेदरतात. हल्ल्याने दुखावतात. पण त्याची पर्वा कवी करीत नाही. कारण प्रस्थापितांना खूश करणारी कविता मनोहरांची कविता नाही. ती प्रस्थापितांवर तुटून पडणारी कविता आहे. बऱ्याचदा जाणवत राहते की नुसते दुःख मांडून किंवा वास्तव मांडून हा कवी थांबत नाही तर काय करायला हवे याचे दिग्दर्शन करताना दिसतो. मनोहरांची कविता भविष्यातली प्रकाशवाट दाखविणारी मार्गदर्शक कविता ठरते. या भूमीवरती, येऊन पुढे, मी मागितली, धाकली इ. कवितेतून व काव्यसंग्रहातील अन्य कवितांतूनही कवी यशवंत मनोहर माणसाला लढ्यासाठी तयार करण्याचे कार्य करतात. संस्कृतीची चिकित्सा करता करता भयमुक्त गाणे आणि निरोगी अंबराची मागणी करतात.

'त्यांच्या आठवणींशी डोळे भिडवताना' या कवितेत कवी अंतर्मुख होताना दिसतो. ही अंतर्मुखता म्हणजे दोस्तांशी साधललेला संवाद आहे. एकाचवेळेला कवी अवघ्या उपेक्षित विश्वाला आपल्या पूर्वजांच्या धवल परंपरेशी भिडण्याचे आवाहन करतो तर त्याचवेळेला समग्र समाजातील मानवाच्या लढावू प्रवृत्तीशीही भिडण्याचे आवाहन करतो. माणसाने स्वार्थापोटी माणसाला गुलाम केले असले तरी गुलामीच्या विरोधातील परंपरेचा एक महत्त्वाचा असा इतिहास आहे. त्याला बहुजनांचा इतिहास मानता येईल. पण अल्पजनांच्या कुटिल नीतीने येथील समाज विकृत करून टाकला. आपण युद्ध नाकारले. परंपरांच्या पताका फडकावल्या, झेपावणारे हात व्हायचे टाळले इतकेच काय पण -

> ''अब्रूचे लचके तोडणाऱ्या वर्तमानाला
> आपण शब्दानेही हटकले नाही दोस्तहो!''

समाजाच्या दृष्टीने महत्त्वाची व मूलभूत बाब म्हणजे वेळच्यावेळी अन्यायाच्याविरुद्ध उभे राहणे. हे आपण केले नाही. त्यामुळे भूतकाळातील काही लढाऊवृत्तीशी, त्यांच्या आठवणींशी आता डोळे भिडवता येत नाही. आपल्या गलितगात्रतेमुळे, भित्रेपणामुळे आपण अज्ञानाच्या गर्तेत सापडलो आहोत याचे भान आणून देण्याचे काम यशवंत मनोहर करीत आहेत. वर्तमानाचे भान ठेवून वर्तमानाला भिडण्याचे सामर्थ्य ठेवले नाही तर भविष्यात नामुश्कीची वेळ येते हे त्रिकालाबाधित सत्य कवी येथे मांडताना दिसतो. चळवळीतला माणूस उभा करताना व चळवळीचे दोस्त जोडताना ही भावना अत्यंत महत्त्वाची ठरते. 'धाकली, 'मारुती कांबळे', 'उगवलो आम्ही', 'बांगलादेश' अशा काही कवितांमधून चळवळीचे, सामाजिकतेचे संदर्भ येतात. या संदर्भांकडे

जागरूकतेने पाहायला यशवंत मनोहरांची कविता प्रवृत्त करते.

मनोहरांची कविता लोकलढ्याशी जोडली गेली असल्यामुळे ती या लढ्याशी संबंधित घटकांचे प्रबोधन करते. लढ्यातील घटकांच्या समजुती काढून त्यांना सोबत घेताना दिसते. मनोहरांची 'उत्थानगुंफा'तील कविता एकत्रित येण्याचे आवाहन करताना दिसते. एकजुटीच्या ताकदीवरच सांस्कृतिक दहशतवाद, आर्थिक, मानसिक विषमता हटविता येईल याचे भान कवीला आहे. समग्र उपेक्षितांच्या कल्याणाचा व परिवर्तनाचा ध्यास घ्यायचा असेल व प्रत्यक्षात समता, बंधुता, न्यायाची लोकशाहीव्यवस्था आणायची असेल तर साऱ्या कष्टकऱ्यांची दुबळ्यांची एकजूट व्हायला हवी; त्यांचे जनलढे उभे राहायला हवेत. याप्रकारची भावना मनोहरांची कविता व्यक्त करते. कवीने 'पावसाळी मोसमांनो', 'नागड्यांनी साऱ्या', 'यारे वादळुनी' या व अन्य कवितांतून ही भावना व्यक्त केली आहे. 'यारे वादळोनी। पेटवा या भिंती' असे म्हणताना 'रक्ताने रेखाटा। स्वप्न उजेडाचे' असेही नमूद केले आहे. 'बेहिशेबी वन्ही' या कवितेत कवी म्हणतो-

> ''पोळल्या झाडांनी। एक व्हावे झणी''

तर 'दुःखरात्र' कवितेत आवाहन केले आहे की -

> ''पीडितांना साऱ्या। माझी विनवणी
> पेटली धरणी। झोप फेडा
>
> ... ... ...
>
> मागू नका कुणा। यातनांची दवा
> तुम्हीच पेटवा। दुःखरात्र॥''

'अखंडाच्या धर्तीवर' लिहिलेल्या या रचना अल्पअक्षर सामर्थ्य घेऊन आल्या आहेत. खोट्या कवींचे रूप त्यांनी उलगडून दाखविले आहे.

> ''राजकवी ऐसे। पोकळ कण्यांचे
> वांझोट्या गाण्यांचे। नटरंगी.'' (३४. आम्ही जाळू-४३)

या ओळी खूप बोलक्या व अर्थपूर्ण आहेत. 'पावसाळी मोसमांनो' या कवितेतून एक समंजस व आपुलकीचा संवाद दिसतो. कवी म्हणतो -

> ''क्रांतिसाठी आरती जुळविणाऱ्या पावसाळी मोसमांनो।
> आभाळातून पडत नसतात उजेडाची सार्वभौम युगे।
>
> ... ... ...

आपले शब्द बुद्ध होतील आणि युगप्रवर्तक युद्धही होतील
आपले शब्द सुरुंग होतील मनूच्या अवलादीसाठी तुरुंग होतील.''

अशावेळेस -

''नागड्यांनी साऱ्या। मशालुनी यावे
युद्धात ओढावे। माजोऱ्यांशी॥''

असे आवाहन कवी करतो. बुद्धाने स्वयंप्रकाशित व्हा असा संदेश दिला. त्याचा प्रत्यय कवी मनोहरांच्या कवितेतून येत राहतो. मनोहरांची कविता स्वतःची वाट स्वतः चोखाळून नवा उजेड आणा असे सांगणारी कविता आहे. त्यामुळेच -

''पाखंड्यांनो आता। नका मारू थापा।
आम्ही झालो गुंफा। उत्थानाच्या॥'' अशी जाणीव या कवितेत येते.

मनोहरांची कविता क्रांतिकारक सामाजिक जाणिवेची कविता असल्यामुळे ती विद्रोही परंपरेशी आपल्याला जोडून येते. मनोहरांची कविता काय किंवा एकूणच विद्रोही जाणिवेची कविता ही आंबेडकरी प्रेरणा मानते. आंबेडकरी प्रेरणेचा पूर्वसुरीचा धागा फुले विचारांशी जोडला गेलेला आहे. आंबेडकर-फुलेंच्या विचारांनी एक व्यापक दृष्टी येते. त्यातून या चळवळीचे सहप्रवासी पूर्वज शोधण्याचा यत्न सुरू होतो. दुःख जाणीव हा प्रमुख घटक मानून जागतिक पातळीवरील दुःखितांशी आपल्या दुःखाची नाळ जोडण्याचा प्रयत्न होतो. उपेक्षित विद्रोही वर्गाची कविता काळे, ज्यू, स्त्रिया यांच्याशी व महाभारत, रामायणातील अन्यायग्रस्त नायकांशी नाते जोडत आलेली दिसते. विचारांच्या पक्केपणासाठी, लढण्यातील चिवटपणा जोपासण्यासाठी मनोहरांची कविता आपल्याला आदर्श पुरुषांशी जोडून घेताना दिसते. आदर्श पुरुषांशी जोडून घेण्यातून कवी यशवंत मनोहरांची या आदर्श पुरुषांकडे पाहण्याचे एक निरोगी व नेमका दृष्टिकोनही स्पष्ट होतो. महापुरुषांकडे पाहण्याचा, त्यांचे विचार स्वीकारण्याचे निरनिराळे दृष्टिकोन व स्तर समाजात अस्तित्वात आहेत. त्या दृष्टीने मनोहरांच्या या व्यक्तिचित्रणात्मक कविता अतिशय महत्त्वाच्या ठरतात. त्यातून व्यक्त होणारा दृष्टिकोन अनेक अर्थांनी लक्षणीय ठरतो. व्यक्तिदर्शनात्मक कवितेत 'चार्वाक', 'सिद्धार्थ गौतम', 'जोतीबा गोविंदराव फुले', 'कार्ल मार्क्स', 'केशवसुत', 'भीमराव रामजी आंबेडकर' यांचा समावेश होतो. समतेच्या या प्रवाहाचाच परिचय कवी करून देत आहेत असे वाटते. आदर्शांना वंदन करतानाच कवीचा एक विनम्र भावही या कवितेतून न्याहाळता येतो.

कवी सर्वप्रथम चार्वाकाला वंदन करतो. चार्वाक आदिविद्रोही पण त्यांचा पराभव झाला. चार्वाक विजयी झाले असते तर विद्रोहाची परंपरा सकस होऊन आजचा मानव केव्हाच मुक्त झाला असता असे कवीला वाटते. सिद्धार्थ गौतम बुद्ध यांनी कवीच्या वाणीत शब्दांचा जाळ दिल्याचे कवी नमूद करतो. सिद्धार्थ गौतम एक क्रांतिकारक तत्त्ववेत्ता, मार्गदर्शक म्हणून कवीला मान्य आहे. मोक्षदाता, भगवान, महात्मा अशी बिरुदे लावणे कवीला मान्य नाही. स्वतःला बौद्ध म्हणवून घेणारेही बुद्धाच्या मूळ विचारापासून दूर जात असल्याची खंत कवीने व्यक्त केली आहे. या शब्दप्रामाण्यांनी बुद्धाचे क्रांतिकारक रूप नष्ट होऊ नये असे कवी मनोहर यांना वाटते हा दृष्टिकोन खराखुरा आंबेडकरवादी दृष्टिकोन आहे. बुद्ध धम्मसंस्थापक म्हणून, शांतीचा दूत म्हणून काहींना मान्य पण क्रांतिकारक जीवनप्रणाली जगण्याचा मार्ग दाखविणारा बुद्ध म्हणून मान्य नसतो. म्हणून मनोहरांच्या कवितेतील बुद्धाकडे पाहणारी ही जीवन व चिंतनदृष्टी अतिशय मौलिक ठरते. जोतीबांना त्यांनी मोठ्या काळजाचा, पराक्रमाच्या विजा मनगटात पेरणारा महामानव म्हटले आहे. कार्लमार्क्सचे या जगावरील ऋण त्यांनी मान्य केले आहे. केशवसुतांच्या स्वप्नांचे शिल्प कोरायला कवी निघाला आहे. कवितेचा कुळारंभ व आदिविद्रोही कवी म्हणून केशवसुतांचा सन्मान मनोहरांनी केला आहे. भीमराव रामजी आंबेडकरांना कवीने अभिवादन केले आहे; मात्र ही कविता प्रश्न उपस्थित करण्याच्या तंत्रात अडकल्यामुळे या कवितेतील भावना शबलीत झाली आहे. तिच्या तीव्रतेचे रंग उडाल्याचे जाणवत राहते. कार्ल मार्क्स या कवितेतही तुझ्या शब्दांनी मनू अर्धमेला झाला ही ओळ मनाला पटत नाही.

केशवसुतांच्या काही कवितेतही दैवशरणता आहे. केशवसुतांच्या कवितेला जोतीबांचा विचार व नारायण मेघाजी लोखंडे यांची कामगार चळवळ प्रेरणास्थानी असल्याचे दिसते. यामुळे याबाबतची स्पष्टता नसणे हे न्यून या कवितेत दिसते. मात्र या कविता हिंदुत्ववादी, साम्यवादी, समता समाजवादी यांचा दृष्टिकोन बदलायला कारणीभूत ठरतात हे या कवितांचे मोठेच सामर्थ्य ठरते.

'उत्थानगुंफा'मधील कविता ही अध्यात्माचा दंभस्फोट करणारी कविता आहे. मनोहरांची कविता ईश्वरशाहीविरुद्ध नागड्यांना उठविणारी कविता आहे. आजवर अध्यात्माने मानवाची फसवणूक केली. त्याची झडती मनोहर घेताना दिसतात. ईश्वरशाहीवरील हल्ला हा उत्थानगुंफामधील कवितांचा मुख्य गाभा राहिलाय. उत्थानगुंफेतील पहिल्या कवितेपासून अध्यात्मावर हल्ला सुरू होतो. अध्यात्माने केलेली फसवणूक कवी 'फसवणूक' या कवितेत नोंदवितो.

''तुमच्या अध्यात्माने भीतीचा गाळ थापला माझ्या डोळ्यांवर
आणि स्वतःलाही मी पाहू शकलो नाही कधी
आणि अध्यात्मासकट तुमच्या सर्वंकष मयसभेने
फसवीत फसवीत मला लोळागोळा केले.''

स्वतःला जाणणे ही अतिशय महान बाब आहे. मात्र ती अध्यात्माने होऊ दिली नाही. स्वतःला, मानवाला न जाणू देणे व त्याला, त्याच्या प्रतिष्ठेला, बुद्धीला नाकारणे ही महाभयंकर गोष्ट अध्यात्माने केली आहे. आपल्या परंपरेत सतत मानव विरुद्ध ईश्वर असा संघर्ष चालत आला आहे. खरे तर या पृथ्वीचा केंद्रबिंदूच मानव आहे. त्यानेच स्वरही घडवलाय. बाबुराव बागूलांच्या कवितेत अतिशय सुंदर रीतीने हा विषय आला आहे. वेदाआधी तू होतास असे नमूद करून तुझ्यामुळेच हे जग सुंदर झाले असे त्यांनी नमूद केले आहे. मात्र परंपरागत व्यवस्थेने माणूस दुय्यम स्थानावर ठेवला. ईश्वर प्रथमस्थानावर. मानवाची बुद्धिमत्ता, त्याचे श्रेष्ठत्व नाकारणाऱ्या अध्यात्मवादी परंपरेवर यशवंत मनोहर कडाडून हल्ला चवतात कारण भारतीय संस्कृतीचे मूळ, तिचे सामर्थ्य कशात आहे याची त्यांना मूलभूत कल्पना आहे. ''मी मूर्तिपूजक नाही मी मूर्तिभंजक आहे.'' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रसिद्ध वचन आहे. या वचनाशी जवळीक साधणारी कविता 'उत्थानगुंफा' या कवितासंग्रहात आहे. याचा सतत प्रत्यय येत राहतो. 'उत्थानगुंफा'मधील अनेक कवितेत दैववादावर त्यांनी हल्ला चढविला आहे.

''पाय ठेवू ऐसी। भूमी नाही कोठे
जे जे भूत भेटे। ते ते ढोंगी

...                ...

देवाचीच इथे। अवघी संतान
तिथे बोंबलून। काय मोक्ष॥''

'चोरपुरुषांनो' या कवितेत कवी म्हणतो -

''तुम्हा पाठीराखे। देवांचे कळप
आम्हालाच पाप। पुण्य तुम्हा॥''

तर 'नागड्यांनी साऱ्या' कवितेत कवीची चीड व्यक्त होते -

''देवाच्या गळ्याचा। घेईन मी घोट
चितारीन पाठ। खेटराने

जाळा ते अध्यात्म। भांडवली एक्का
चुलीमध्ये फेका। कर्मयोग॥''

'आम्ही झालो गुंफा'त कवी म्हणतो -

''नका दावू आम्हा। देवाजीचा धाक
तोही आम्हा साप। ठेचू तया॥''

ज्यांच्या मनावर परंपरेने देवाचा धाक बसविलाय त्यांना निर्भय बनविण्याचे काम मनोहरांची कविता करते. धर्मपंथांनी देव पोसला. त्यांनाही कवी नाकारतो.

''नको धर्म पंथ। खूळ मध्ये''
''लुटारूंनी देश। खिशात घातला॥''

साहित्यिकांच्या ढोंगावरही कवी प्रहार करतो -

'आम्ही जाळू' या कवितेत -

''आम्ही जाळू ऐसा। ढोंगांची बिऱ्हाडे
आम्हीच नागडे। होऊ जाणे॥''

साहित्यिकांनी धर्म, देवभावना आपल्या साहित्यातून वाढविली. लोकांपर्यंत पोहचविली असे हे साहित्यिक पोकळ कण्याचे आहेत. त्यांनी वांझ व नटवी गाणी गायिली. साजरे दिसणारे हे लोक हुजरे, दलाल आहेत. अत्यंत संकुचित वृत्तीचे, जीवनाला सोडून कलेच्या नादी लागलेले आहेत अशी त्यांची ओळख कवी यशवंत मनोहर यांनी करून दिली आहे.

अखेरीस यशवंत मनोहरांची कविता एक इशारा देते व भविष्यासाठी आशावाद जोपासते ती अशी -

''येथोनी वादळे। रोखू नका कोणी
ही युद्धपर्वणी। नागड्यांची॥''

'उत्थानगुंफा'मधील मनोहरांची कविता सामाजिक उद्रेकाची कविता आहे. ती अध्यात्माचा दंभस्फोट करणारी कविता आहे. 'धाकली', 'मारुती कांबळे', 'बांगलादेश', 'बेलछी', 'ब्राह्मणगाव' यांचा संदर्भ घेणारी आंबेडकर चळवळीची बांधिलकी मानणारी कविता आहे.

डॉ. यशवंत मनोहर यांना शब्दांची कमतरता भासत नाही. त्यांची कविता कोणाला शब्दाची कसरत वाटत असेल तर त्याचा अर्थ एवढाच की मनोहर

हे भाषासम्राट आहेत. या शब्दसामर्थ्याने त्यांच्या कवितेतला विचार बाधीत होत नाही. मरत नाही. शब्दांची अनेक लयबद्ध रूपे त्यांच्या कवितेत पाहायला मिळतात. त्यांच्या कवितेने अनेक नवी मिथके तयार केली आहेत. मनोहरांची कविता म्हणजे पल्लेदार वक्तृत्वशैलीतील, क्रांतिकारी जाणीव, हळुवार रुजविणारी धगधगती कविता होय! मनोहरांच्या शब्दकळेला वैदर्भीय भाषेचा व लोकभाषेचा स्पर्श आहे. प्रा. दामोदर मोरेंनी कवितेची तीन सामर्थ्ये सांगितली आहेत. कविता ही Ballot Power (मतपत्रिका), Bullet Power (शस्त्रांची ताकद), Bulletin Power (पत्रकांची ताकद) ही सर्व लक्षणे या कवितेत आहेत. पण जास्त प्रमाणात मनोहरांची कविता Bullet Power वाटते. कारण ती शब्दांचा वापर शस्त्रासारखा, बंदुकीच्या गोळीसारखा करते.

# डॉ. यशवंत मनोहर
# प्रज्ञाशील प्रतिभा आणि कारुण्यमय व्यक्तिमत्त्व!

## ▪ गंगाधर वाघ

आंबेडकरवादी साहित्यिक आणि सांस्कृतिक चळवळीत आपली स्वतंत्र मुद्रा उमटविणाऱ्या डॉ. यशवंत मनोहरांच्या नावावर आतापर्यंत प्रकाशित ६५-७० लहान मोठ्या ग्रंथसंपदेचा समावेश आहे. या साहित्यसंपदेत कवितासंग्रह-७, साहित्यसमीक्षा-२१, प्रवासवर्णन-१, वैचारिक वाङ्मय-३१, कादंबरी ३, पत्रसंग्रह-४, ललितनिबंध-२. आंबेडकरी वाङ्मयीन चळवळीचे मूळपुरुष डॉ. म.ना. वानखडे यांच्या लेखांचे संपादन; अभिनव बौद्ध विवाह पद्धती आणि इतर क्रिया या प्रमुख ग्रंथांचा समावेश आहे. तसेच विविध साहित्य संमेलनात केलेली अध्यक्षीय भाषणे, उद्घाटकीय भाषणे महाराष्ट्रातील कवी आणि लेखकांच्या पुस्तकांना लिहिलेल्या प्रस्तावनांचा समावेश आहे. पाच मोठी पुस्तके इतक्यातच प्रकाशित होत आहेत. 'समुचित' या वाङ्मयीन त्रैमासिकाचे एक तपाहून अधिक काळ संपादन. हे सर्व ग्रंथरूपाने उपलब्ध आहे. विविध प्रसंगी दिलेल्या मुलाखती तसेच बुद्धजयंती, भीमजयंती, सारख्या सार्वजनिक कार्यक्रमानिमित्ताने दिलेली भाषणे या सर्व प्रकारच्या चळवळीतील उपक्रमात डॉ. यशवंत मनोहरांनी बुद्ध, फुले, आंबेडकर तत्त्वज्ञानाला साहित्यात उतरविण्याच्या लोकोत्तर कार्यात कार्यरत राहून लिखाणाचा डोंगर उभा केला आहे. या तत्त्वविचारांना शब्दशिल्पातून चितारून आपली अंगभूत विशेषता प्रस्थापित केली आहे.

यशवंत मनोहरांची वाङ्मयीन जडणघडण औरंगाबादच्या मिलिंद महाविद्यालयात झाली. प्राचार्य म.ना. वानखडे, प्रा. रा.ग. जाधव, प्रा. भालचंद्र फडके, डॉ. श्री.म. पिंगे, प्रा. गजमल माळी यांचा सहवास व मार्गदर्शन त्यांना लाभले. प्रा. सुखराम हिवराळे, नरेश इंगळे हे त्यांचे सहअध्यायी होते. तत्कालीन महाविद्यालयातील वाङ्मयीन घडामोडीत मनोहरांचा सहभाग होता. असे असले तरी यशवंत मनोहरांनी माध्यमिक शाळेपासूनच अभिव्यक्तीच्या विविध माध्यम असलेल्या कलाक्षेत्रात संचार केलेला दिसून येतो. गीतलेखन, कवितालेखन, गायन-वादन, चित्रकला, नाट्यअभिनय यात विशेष प्रावीण्य मिळविल्याचे त्यांच्या जीवनकालक्रमावरून दिसून येते.

रुईया हायस्कूलच्या वार्षिक संमेलनातील चित्रकला प्रदर्शनातील त्यांनी काढलेल्या चित्राला प्रथम क्रमांकाच्या पुरस्काराने पुरस्कारित करण्यात आले होते. पुढच्या वर्षाच्या संमेलनातसुद्धा चित्रकलेचा प्रथम पुरस्कार (जलरंग) प्राप्त झाला होता. टॉपला असायला हवे हे येथेच रुजलेले दिसते. यशवंत मनोहरांच्या घरात गायन-वादनाचे अंग होते. वडील राजाराम मनोहर हे एकतारीवर भजन गात असत. ते चांगले ढोलकीवादकही होते. प्रसंगी तमासगिरीही त्यांनी केली. यशवंत मनोहरांनी आठवी-नववीत असताना बाबासाहेबांवर गीतलेखन केले. मोठे बंधू सदाशिवराव व केशवराव शाहिरी करीत. त्या भागात ते त्या वेळी प्रख्यात शाहीर होते. आंबेडकरी गीतगायनाच्या कार्यक्रमात मनोहर हार्मोनियम वाजवीत असत. म्हणजे मनोहर कुटुंबाचा आंबेडकरी जलसा होता. हे सर्व आकंठ १९८९ च्या दिवाळी अंकात तसेच यशवंत मनोहरांच्या समाज आणि साहित्यसमीक्षा या त्यांच्या ग्रंथातील मुलाखतींमधून दिसून येते. खरे तर हा सर्व भाग स्वतंत्र लेखाचा विषय आहे. एस.एससी.ला असताना रुईया हायस्कूलच्या वार्षिक संमेलनातील 'उमाजी नाईक' या नाटकात कॅप्टन मॅक्टिन्टॉशची भूमिका त्यांनी साकारली होती. हाच वारसा मिलिंद महाविद्यालयातील संमेलनात 'प्रेमा तुझा रंग कसा' या नाटकातील नायकाची भूमिका त्यांनी साकारून जपला. कॉलेजचा सर्वोत्कृष्ट कवी म्हणूनही विशेष कार्यक्रमात कवी वा.रा.कांत यांचे हस्ते सन्मानित केले गेले होते. उपरोक्त सर्व गोष्टींवरून यशवंत मनोहरांनी विद्यार्थीदशेतील विविध कलाप्रकारात केलेला कलाजीवन प्रवास दिसून येतो.

आंबेडकरी चळवळीचा वाङ्मयीन आरंभ बिंदू असलेल्या प्राचार्य डॉ. म.ना. वानखडे यांच्या वाङ्मयीन कार्य व कर्तृत्वाचा साद्यंत इतिहास संक्षिप्त स्वरूपात देणे अगत्याचे आहे. कारण याचा संबंध यशवंत मनोहरांच्या वाङ्मयीन वाटचालीशी विशेष आहे.

१. 'दलितांनो विद्रोही वाङ्मय लिहा' या मथळ्याचा लेख प्राचार्य डॉ. म.ना. वानखडे यांनी प्रबुद्ध भारतात १९६६ साली लिहिला. या ऐतिहासिक लेखात डॉ. वानखड्यांनी निग्रोंवरील अत्याचाराची प्रथम नोंद घेतली. निग्रोंच्या जीवनावरील लिखाण करणाऱ्या लेखकांच्या खळबळ माजविणाऱ्या साहित्याचा विचार करून मराठीत विद्रोही वाङ्मय लिहिले पाहिजे अशी भूमिका सदर लेखात मांडली. या लेखात डॉ. वानखडे लिहितात, 'मराठी साहित्यात आपल्या अनुभूतीशी प्रामाणिक राहून आपले वेगळेपण दाखविले पाहिजे. त्याशिवाय त्याला स्वतंत्र लेखन करता येणार नाही.' पुढे याच लेखात त्यांनी लिहिले होते की आम्ही दुसऱ्यांसाठी लिहिण्याची प्रवृत्ती सोडली पाहिजे. कोणाला

बरे वाटते किंवा कोणाच्या दृष्टीने यात वाङ्मयीन कस आहे किंवा नाही याचा विचार करीत बसण्यापेक्षा बहुजन समाजाची अस्मिता जागी करणारे लिखाण लिहिले गेले पाहिजे.

२. पुढे डॉ. वानखडे यांची ३० व ३१ जानेवारी १९६७ आणि १ फेब्रुवारीला मिलिंद महाविद्यालयात पहिली व्याख्यानमाला आयोजित केली गेली. या व्याख्यानमालेत यशवंत मनोहरांचा सहभाग होता. व्याख्यानमाला आयोजनाचा पायंडा महाविद्यालयात पाडला गेला.

३. साहित्यविषयक महत्त्वाची घटना म्हणजे भुसावळ येथील ९व्या बौद्ध साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून डॉ.म.ना. वानखडेंची झालेली निवड. या संमलेनाच्या अध्यक्षीय भाषणात आपल्या भावी साहित्याविषयीची डॉ. वानखड्यांनी मांडलेले मूलगामी स्वरूपाचे विचार प्रेरक ठरले. ३०-४-१९६७ च्या अ़ध्यक्षीय भाषणात आपली नवसमाज निर्मितीची क्रांती केवळ आपल्यापुरतीच नाही तर सबंध देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि सर्वांगीण अभिवृद्धीसाठी आहे. नवभारताच्या निर्मितीची आहे. अशी व्यापक व सर्वसमावेशक भूमिका त्यांनी मांडली.

४. पुन्हा एका ऐतिहासिक घटनेचा उल्लेख करणे आवश्यक आहे. ती महत्त्वाची घटना म्हणजे डॉ. म.ना. वानखडेंच्या प्रेरणेने एका चर्चासत्राचे आयोजन औरंगाबादमध्ये १९ व २४ नोव्हेंबर १९६७ ला करण्यात आले. या आद्य चर्चासत्रात डॉ. म.ना. वानखडे, प्रा. रा.ग. जाधव, प्रा.वा.ल. कुलकर्णी, मे.पुं. रेगे व म.भि. चिटणीस हे सहभागी होते. या चर्चासत्रात आपल्या नवसाहित्याविषयी चर्चा झाली. हे चर्चासत्र 'महाराष्ट्रातील आज उद्याचा सांस्कृतिक संघर्ष आणि वाङ्मयीन समस्या' या मथळ्याखाली प्रसिद्ध झाले.

५. नोव्हेंबरच्या चर्चासत्रानंतर लागलीच डिसेंबर ६७ ला डॉ.म.ना. वानखडेंच्या प्रेरणेने आपले स्वतःचे वाङ्मयीन मुखपत्र असावे अशा स्वरूपाच्या भावनेतून अस्मिता या वाङ्मयीन मुखपत्राचा जन्म झाला. अस्मिताच्या पहिल्या अंकात वर उल्लेखलेल्या चर्चासत्रात संपन्न सर्व तपशील अस्मिताच्या डिसेंबर १९६७ च्या अंकात प्रकाशित झाला. अस्मिताचे प्रकाशक-संपादक डॉ. म.ना. वानखडे होते तर कार्यकारी संपादक प्रा. रा.ग. जाधव हे होते. अस्मिताचे प्रेरक, सल्लागार, सूत्रधार डॉ. वानखडेच होते. शासनाने अस्मिता नावाला मंजुरी न दिल्याने दुसऱ्या अंकापासून अस्मिता हे 'अस्मितादर्श' झाले.

वरील सर्व घडामोडींच्या उल्लेखाचा उद्देश हाच की आज डॉ. यशवंत मनोहरांनी आंबेडकरी साहित्यात जी हिमालयाची उंची गाठली आहे त्याची पूर्वपीठिका उपरोक्त 'बीजस्वरूप' घडामोडीत आहे. डॉ. वानखडेंचे मुंबईत

महाराष्ट्र लोकसेवा आयोगात सदस्य होणे आणि पुढे आयोगाचे अध्यक्ष होणे तसेच साहित्य अकादमी दिल्ली, साहित्य संस्कृती मंडळ इ. ठिकाणी सदस्य म्हणून कार्य करीत असताना ऐन उमेदीच्या वयात झालेला डॉ. वानखडेंचा अनाकलनीय मृत्यू ही आंबेडकरी वाङ्मयीन चळवळीत भरून न येणारी पोकळी डॉ. यशवंत मनोहरांनी लेखाच्या सुरुवातीला उल्लेखलेल्या ग्रंथांचे लिखाण करून भरून काढली आहे. डॉ. म.ना. वानखडेंनी आखलेल्या व्यापक वाङ्मयीन चौकटीत मनोहरांनी आंबेडकरवादी कविता, कादंबरी, पत्रलेखन, निबंधलिखाण, प्रवासवर्णन, समीक्षा, वैचारिक वाङ्मय अशा विविध लेखनाचा विकास आणि विस्तार केला आहे. त्यांच्या लिखाणातील बहरलेला वसंत ऋतू त्यांच्या कार्याची साक्ष देतो. शिशिर त्यांना स्पर्शही करू शकत नाही. उदार व उदात्त वृत्ती तसेच उत्तम सर्जक असलेले मनोहर सर्जनशील मनही जाणतात. यशवंत मनोहरांशी वेगाचे आणि प्रगतीचे नाते आहे. त्यांच्या शब्दातून व्यक्त झालेल्या भावनांत नुसती दाहकता नाही तर त्यांना विचारसौंदर्याचे पंखही लाभले आहेत.

बाबासाहेबांनी म्हटले आहे, ''प्रगतीचे माप करणारी व इतिहास वर्तवणारी दोन प्रभावी अस्त्रे आहेत, एक लेखणी व दुसरी वाणी.'' या दोन्ही अस्त्रांवर डॉ. मनोहरांची हुकमत आहे. जीवित कार्यक्षेत्र म्हणून निवडलेल्या साहित्य-सांस्कृतिक क्षेत्रात ते आज परमोच्च बिंदूवर स्थिरावरले आहेत. आंबेडकरवादी साहित्याचा विकास आणि विस्तारासाठी त्यांची तळमळ सुरू असते. रमाई कादंबरीसारख्या त्यांच्या रचना मनात रुतून बसतात. रमाई तळापर्यंत पोहचलेली आहे. प्रज्ञावान आणि प्रतिभावंत असलेल्या मनोहरांच्या वाणी आणि लेखणीतले माधुर्य, विषयप्रतिपादनातील त्यांची कळकळ आणि विचारांची तर्कशुद्धता मनात खोल रुजते. श्रोत्यांचे विविध भाव जागे होतात. ते जे बोलतात ते सरळ हृदयाला जाऊन भिडते याचे एक कारण त्यांचा गाढा व्यासंग हे आहे. पण त्यापेक्षा महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांची समाजपरिवर्तनाची कारुण्यमय कळकळ व तळमळ हे आहे. यशवंत मनोहरांचे साहित्य म्हणजे आंबेडकरी तत्त्वज्ञान व संस्कृतीचे भाष्यप्रतीक आहे. त्यांचे शब्दशिल्प वाचकांच्या अंतःकरणात कोरले जाते. माणसाच्या मनाला जिवंत करते. त्यांच्या गद्य लेखनाला काव्याचा स्पर्श आहे. मनोहर हे तर साहित्यिकांचे नेते आहेत.

मनोहरांनी देव, दैववादी, कलावादी मराठी साहित्यावर आसूड ओढून समाजात विज्ञानवादी दृष्टिकोण निर्माण करणाऱ्या जीवनवादी साहित्याचा प्रवाह निर्माण केला. मनोहरांचे साहित्य समाज जोडण्याचे कार्य करते. वाचकांच्या जीवनाला उंच करते, समृद्ध करते, सामर्थ्य देते किंबहुना जीवनाकडे पाहण्याची दृष्टीही देते. आपल्या वाचकाला ज्ञानाची आणि माणुसकीची जाणीव करून

देते. त्याला इहवादी करणे, देव आणि दैववादाच्या पाशातून त्यांची मुक्तता करणे ह्या ध्येय आणि उद्दिष्टांसाठी त्यंची लेखणी आणि वाणी तळमळते. आंबेडकरी तत्त्वज्ञान आणि मानवी मूल्यांचे प्रतिपादन हे त्यांच्या लेखनाचे प्रधानसूत्र आहे.

डॉ. मनोहरांना मराठी भाषेवरील असामान्य प्रभुत्व, अभिजात अभिरुची मृदूभाषिता, सभ्यता व सुसंस्कृत, मनमोकळ्या निगर्वी, नितळ आणि पारदर्शी विनम्र व्यक्तिमत्त्वामुळे आणि सार्वजनिक जीवनातील सौजन्यशील व सदाचारयुक्त साधेपणा यामुळे समाजात आदराचे स्थान आहे. बाबासाहेबांच्या विचारांच्या अभिरुद्धीसाठी झिजत राहण्याची कृतीशीलता असलेले; समाजासाठी काहीतरी केले पाहिजे याचा ध्यास असलेले; निष्कलंक वैचारिक एकनिष्ठता असलेले अभ्यासू, चिंतनशील विचारवंत म्हणजे यशवंत मनोहर!

मॅझिनीने म्हटले आहे की "विचार अमर असतात." या विधानावर बाबासाहेब म्हणतात, "विचारसुद्धा मर्त्य आहेत. ज्याप्रमाणे रोपट्याला पाण्याची आवश्यकता असते अन्यथा त्याच्याविना ते करपून जाते. त्याप्रमाणे विचारांच्यासुद्धा प्रचार व प्रसाराची नितांत आवश्यकता आहे. अन्यथा प्रचार-प्रसाराअभावी ते नष्ट होतील. अशा स्वरूपाच्या संभाव्य धोक्याचा इशारा बाबासाहेबांनी देऊन ठेवला आहे. बाबासाहेबांनी बुद्धिजीवी वर्गाविषयी म्हटले आहे की "बुद्धिजीवीवर्ग त्याला म्हणता येईल जो दूरदर्शी आहे. जो समाजाला चांगला सल्ला देऊ शकतो व समाजाला चांगले नेतृत्व प्रदान करू शकतो.' अशा पार्श्वभूमीतून यशवंत मनोहरांच्या साहित्याकडे पाहिले असता हे साहित्य उपरोक्त कसोटीला उतरते. कारण मनोहरांनी जाणीवपूर्वक साहित्याची निर्मिती केलेली आहे. साहित्य क्रांतीला प्रेरक ठरू शकते याचे उदाहरण म्हणजे रुसो आणि व्हॉल्टेअर यांच्या वाङ्मयाने फ्रेंच राज्यक्रांतीला हातभार लावला आहे. रशियन क्रांतीलादेखील टॉलस्टॉय आणि गोर्कीच्या वाङ्मयाने हातभार लावला आहे.

डॉ. यशवंत मनोहरांच्या साहित्याचा महाराष्ट्रातील, महाराष्ट्राबाहेरीलही विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात सन्मानाने समावेश झाला आहे. डॉ. आंबेडकर मराठवाडा, शिवाजी, पुणे, रामनंदतीर्थ मराठवाडा, एस.एन.डी.टी. नागपूर, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव अशा सर्वच विद्यापीठांच्या वरिष्ठ महाविद्यालयांच्या आणि एम.ए.च्या अभ्यासक्रमात कविता, लेखांचा आणि ग्रंथांचा समावेश केला गेला आहे. 'उत्थानगुंफा' हा बहुचर्चित काव्यसंग्रह अमरावती, नागपूर, मुंबई, डॉ. आंबेडकर, मराठवाडा या विद्यापीठात एम.ए. मराठीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट केला गेला आहे.

'जीवनायन' हा काव्यसंग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या एम.ए.च्या अभ्यासक्रमात समाविष्ट झालेला आहे. नेटच्या अभ्यासक्रमातही त्यांच्या साहित्याचा समावेश आहे. 'रमाई' ही कादंबरी गुलबर्गा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट झाली आहे. रमाईने खपाचा उच्चांक गाठला आहे.

करुणामय अंतःकरण असलेल्या यशवंत मनोहरांची 'रमाई' कादंबरी म्हणजे कारुण्याचे अजोड शिल्प होय. रमाईने इतिहास घडविला आहे. वाचकांनी पुनःपुन्हा ही कादंबरी वाचली. या कादंबरीने डॉ. मनोहरांवर अपार प्रेम करणारी नवी वाचनसंस्कृती घडविली. मनोहरांच्या अनेक कविता हिंदी आणि इंग्रजीत अनुवादीत झाल्या आहेत. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या विद्यापीठांमधून त्यांच्या साहित्यावर संशोधक पीएच.डी. साठी संशोधन करीत आहेत. त्यातील तिघांना पीएच.डी. पदवीही मिळाली आहे.

आंबेडकरवादी साहित्याची चळवळ ही मुख्यतः सांस्कृतिक परिवर्तनाची चळवळ आहे. भारतीय नवसमाज आणि आधुनिक भारताच्या निर्मितीस या साहित्याचे मोठे योगदान आहे. डॉ. मनोहरांच्या साहित्याने भारतीय समाजाचे आधुनिकीकरण करण्याच्या कार्यात मोठा हातभार लावला आहे.

'महान गीतकार:वामनदादा कर्डक' या समीक्षा ग्रंथातून डॉ. मनोहरांनी युगप्रवर्तक प्रतिभेच्या वामनदादा कर्डकांच्या गीतांची सूक्ष्मतेने मीमांसा केली असून दादांच्या गीतांना न्याय देणारा हा पहिला समीक्षा ग्रंथ आहे. सदर पुस्तकात डॉ. मनोहरांनी वामनदादांना लिहिलेल्या पत्रातून बुद्ध तत्त्वज्ञानातील अनित्यता हा मूलगामी तत्त्वविचार सहज, सोप्या पद्धतीने चितारलेला आहे. मला १४ मे २००५ ला लिहिलेल्या पत्रात याच सिद्धांताची मांडणी वेगळ्या पद्धतीने त्यांनी केली आहे. ते लिहितात - ''जगण्याच्या केवढ्याही गर्दीत आपण मिसळत असलो तरी मृत्यूच्या जाणिवेची शहनाई अत्यंत सूक्ष्म पद्धतीने का होईना आपणाला सतत ऐकू येत राहिली पाहिजे. याचा अर्थ जगणे विसरून मरणाच्या स्मरणांचा खेळ मांडून बसावे असा नाही. खेळ जीवनाचाच मांडावा तो मनःपूर्वकच खेळला जावा यातही वाद नाही. पण मनात सुरू असलेल्या मृत्यूच्या या बारीक सुरावटीने खेळातील जबाबदारी वाढते. खेळाला नैतिकतेचे पंख आणि करुणेचे उड्डाण प्राप्त होते.'' डॉ. मनोहरांनी आत्मा संस्कृतीला दिलेले हे उत्तर आहे. अत्यंत मार्मिक पद्धतीने तत्त्वज्ञानाला ललित लेखनातून मांडण्याची अनोखी पद्धत डॉ. मनोहर अवलंबितात. येथेच त्यांच्या लेखणीचा कस लागतो.

डॉ. मनोहरांची लेखणी आणि वाणी मानवी जीवनात हानिकारक असणाऱ्या

आणि अधोगतीकडे नेणाऱ्या राग, द्वेष, लोभ, मोह, तृष्णा अशा गोष्टींवर आसूड ओढते. डॉ. मनोहरांची धम्मवाणी, साहित्यसरिता सहजतेने भीमसागराकडे धावते. त्यांची शब्दरचना डोंगरातून वाहणाऱ्या निखळ पाण्यासारखी आहे. ओंजळी भरभरून प्यावे असे त्यांचे संस्कारवाङ्मय आहे. त्यात पाण्याचा नितळपणा आहे. निर्मळपणा आहे. धम्मप्रवाह हा आचारप्रवाह आहे. तो मध्यमार्गी आहे. धम्मसरिता प्रवाहाच्या डाव्या-उजव्या कडा या डोंगरदऱ्यांप्रमाणे स्थितीशील आहेत.

विचारवंतांनी आचारवंत व्हावे! असे मनोहर सर सतत बजावत असतात. आचारवंत नसलेल्या विचारवंतांच्या बोलण्यात आणि वागण्यात महद् अंतर पाहावयास मिळते. विचार फक्त व्यक्त करण्यासाठी असतात. आचार इतरांनी करावा अशी अपेक्षा विचारवंतांनी करून घेतली असावी. काही विचारवंत किरकोळ कामासाठी सतत भूमिका बदलतात आणि जीवनाचे मातेरे करून घेतात. करुणेपोटीच मनोहरांनी विचारवंतांनी आचारवंत व्हा असे संबोधले आहे. विचाराला आचाराची जोड हा संस्कार मोठ्या प्रमाणात रुजलाच नाही. आचार ही कृती आहे. जीवनमार्ग आहे. सदाचारी वर्तन हे आंबेडकरी संस्कृतीचे सौंदर्यशास्त्र होय! हाच वारसा मनोहर सरांनी जपला आहे.

लोककवी वामनदादा कर्डकांनी दिलेला संदेश विचारवंतांनी विचारात घेण्यासारखा आहे.

''थोर संदेश बाबांचा विसरू नको
पायरी चढ पुन्हा खाली घसरू नको
गेला थकला तो वामन फोडून घसा
नको भटकू आता''

एखादी व्यक्ती कितीही विद्वान, प्रतिभावंत असेल परंतु चारित्र्यसंपन्न नसेल तर अशी व्यक्ती कालबाह्य होते. कारण चारित्र्य हे प्रतिभेपेक्षाही श्रेष्ठ असते.

भदन्त एन. बोधिरत्न 'स्थविर' 'यशवंत मनोहर' या कवितेत कमीत कमी शब्दात सरांनी अंगिकारलेल्या वाङ्मयीन कार्याचा मोठा उचित सन्मान कल्पकतेने करतात. स्वतः भन्ते प्रतिभावंत कवी आहेत.

''तळपत्या क्रांतीसूर्याचे अस्तित्व घेऊन
आंबेडकरी विश्वाच्या निळ्या निळ्या ज्ञानक्षितिजावर
फुलला आहेस ज्ञानसौंदर्या...
सूर्योदय होण्यापूर्वीची लाली घेऊन भूतलावर

आमच्या विश्वाची मलिनता दूर करणारा
पुंडरिक! एक विकसित मनोहर तू...''

सूर्योदयापूर्वीची लाली, काळरात्रीचा अज्ञानरूपी गडद अंधःकार आमच्या विश्वाची मलीनता हळुवार दूर करणारा, सूर्योदयापूर्वीच्या लालीतून उगवणारा सूर्यगोल. त्याची दलदल, चिखलातून उदय पावणाऱ्या कमळाशी तुलना प्रतिभावंत कल्पक कवीच करू शकतो. भूतलावर संधीप्रकाश, लाली दोनवेळा येते. सूर्योदयापूर्वीची लाली तर दुसरी सूर्यास्तावेळीची. येथे कवी जाणीवपूर्वक सूर्योदयापूर्वीची लाली तरलपणे सुचवितात. 'यशवंत मनोहर' या कवितेत समग्र यशवंत मनोहरांच्या व्यक्तिमत्त्वाचा समावेश आहे. एका कवितेत एका मोठ्या प्रतिभेचा समावेश होणे ही सहजसाध्य गोष्ट नाही.

ज्येष्ठ समाजसेविका डॉ. सीमा साखरे डॉ. मनोहरांना 'सामाजिक जाणिवांचा एक महावृक्ष' असे संबोधतात. विशेषतः त्यांची ध्यानधारणेविषयीची आणि विपश्यनेबाबतची मते ही माझीही मते आहेत. त्यांचा कलावादाला विरोध आहे. सौंदर्यशास्त्राविषयीच्या वेगळ्या कल्पना या त्यांनीच मूर्त रूपात मांडलेल्या आहेत. 'प्रस्थापित सौंदर्यशास्त्राला आव्हान करून ते स्वतःचे सौंदर्यशास्त्र समाजापुढे ताकदीने मांडतात.' डॉ. साखरेंचे प्रतिपादन वास्तवाला धरून आहे.

डॉ. मनोहरांचे प्रत्येक पुस्तक हे डॉ. बाबासाहबांच्या वैचारिक वारशाचेच अपत्य आहे. डॉ. बाबासाहेबांच्या वैचारिक वारशाचा वंशवेल डॉ. यशवंतदादांनी वाढवला आणि तो पुढे चालविला आहे असे पार्थ पोळके नोंदवतात.

डी.वाय. हाडेकर म्हणतात - शब्दाला नवे आयाम देणाऱ्या डॉ. मनोहरांनी भाषेला नवनवीन शब्दांचा अभिषेक चढवून शब्दार्थाला लांबी, रुंदी आणि खोली बहाल केली आहे. परंपरागत शब्द वापरून खूपच गुळगुळीत आणि अर्थहीन बनत गेले होते. अर्थाचे गांभीर्य गमावून बसलेल्या अशा अनेक शब्दांना डॉ. मनोहरांनी नवनवीन आकार देऊन अर्थगर्भ बनविले आहे. डॉ. मनोहर ज्याप्रमाणे टाकसाळीतून नाणी पाडली जातात, त्याप्रमाणे शब्द पाडतात. नवनवीन शब्द, नवनवीन अर्थात पेश केले जातात. शब्द जर आपला मूळ अर्थच गमावून बसले तर काय करणार? यापुढे हाडेकर असे लिहितात की जे.पी. सार्त्र अन्य एका ठिकाणी म्हणतात - If the words are sick, it is upto us to cure them. आजारी शब्दावर उपचार करण्याची डॉ. मनोहरांची शैली अगदी वाखाणण्यासारखी आहे. हाडेकरांनी केलेले शब्दांविषयीचे विवेचन वास्तववादी आहे. शब्द हे मनोहरांच्या पुढे हात जोडून उभे राहतात. निर्जीव शब्दांना डॉ. मनोहर सजीव करतात.

निव्वळ वृत्तपत्रीय लिखाणावर गुजराण करणारी तथाकथित स्वतःला समीक्षक म्हणून मिरवणारी खुज्या वृत्तीची व प्रकृतीची मंडळी यशवंत मनोहरांच्या मूळ लिखाणाला न वाचताच त्यावर मौखिक स्वरूपात अपप्रचार करतात आणि समाजात संभ्रम निर्माण करतात. मौखिक अपप्रचारात आध्यात्मिक विदेशी गुरूंचे भक्तगणही आहेत. रजनीश या आध्यात्मिक बदफैलीने तर बाबासाहेबांच्या धम्म स्वीकाराविषयी मांडलेले मत किती अज्ञानमूलक आणि हीन दर्जाचे आहे? रजनीशांनी लिहिलेल्या एस.धम्मो सनन्तनो (पान ५४२) मध्ये ते म्हणतात, ''सिर्फ बदला लेने के लिये अम्बेडकर बौद्ध हुआ और हरिजनों के एक समूह को बौद्ध कर लिया। यह राजनीती थी। बुद्ध धर्म लौटा भी तो न लौटने जैसा लौटा; गलत आदमी के हाथों लौटा। वैसे ही बुद्ध धर्म को भारी नुकसान हुआ और अम्बेडकर उसे वापस लाया तो और नुकसान हो गया। अब उसके लौटने के सब द्वार ही बंद हो गये।'' रजनीश संप्रदायात असलेल्या आमच्या मंडळींनी रजनीशांनी तोडलेले उपरोक्त तारे वाचले आहेत किंवा नाही समजण्यास मार्ग नाही. गोयंका गुरुजी तर बुद्धांना नववा अवतार मानतात. बाबासाहेबांनी अवतार संकल्पना नाकारलेली आहे. हे ध्यानी संप्रदायाच्या मंडळींनी समजून घेतले पाहिजे.

प्रा.रा.ग. जाधव आपल्या प्रिय विद्यार्थ्यांविषयी म्हणतात - ''येरल्याच्या मातीत नागसेन वनातील चिमूटभर माती मिसळली आणि त्या वाफ्यातून एक सदाबहार सृजनवेल वाढून गगनावरी गेली तिचे नाव यशवंत मनोहर!'' मोठ्या मार्मिकतेने प्रा. जाधव सरांनी मनोहरांचा गौरव केला आहे. सृजनवेल गगनात गेली, याचे श्रेय प्रथमतः वडील राजाराम मनोहर व आई यांना द्यावे लागेल. शाळेची, अभ्यासाची आवड नसलेल्या यशवंत मनोहरांना अभ्यासासाठी पोलिसी थर्ड डिग्री पद्धतीचा वडिलांकडून मार बसलेला आहे. डॉ. पुष्पलताताईंचा वाटा अनमोल आहे. विविध प्रकाशन संस्था, विशेषतः युगसाक्षी प्रकाशनचे प्रकाशक नितीन धनराज हनवते यांनी सरांच्या पुस्तकांची सांभाळलेली जबाबदारी नक्कीच कौतुकास्पद व ऐतिहासिक आहे. डॉ. यशवंत मनोहर हे आंबेडकरी क्षितिजावर उगवलेले कविता, कादंबरी, वैचारिक लेखन, समीक्षा, प्रवासवर्णन, पत्रलेखन, निबंधलेखन या वाङ्मयीन कर्तृत्वाने नटलेले विलोभनीय शिखर होय!

८

# उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचा उत्थानगुंफाकार : डॉ.यशवंत मनोहर

## ▪ डॉ. प्रदीप आगलावे

कुणीही व्यक्ती महान म्हणून जन्मास येत नाही. व्यक्तीचे विचार, कर्तृत्व आणि आचरण हे व्यक्तीस महान बनवितात. महान व्यक्ती घडत असते. महान व्यक्तीची जडण-घडण होत असते. खरे तर प्रत्येक व्यक्तीला महान बनण्याचा मार्ग मोकळा असतो. परंतु प्रत्येक व्यक्ती महान बनू शकत नाही हे देखील सत्य आहे. प्रत्येक व्यक्तीच्या काही मर्यादा असतात. त्या मर्यादाच व्यक्तीला महान बनविण्यापासून थांबवतात. जे आपल्या मर्यादांवर आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करतात, तेच विजयाच्या दिशेने वाटचाल करतात. सर्वांनाच अनुकूल परिस्थिती उपलब्ध असते असे नाही. शिवाय अनुकूल परिस्थितीच्या भरवशावर पुढे जाणाऱ्या व्यक्तीचे कर्तृत्व पणाला लागत नाही. प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करीत करीत स्वतःचे कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व घडविले ते डॉ. यशवंत मनोहर सरांनी! आज डॉ. यशवंत मनोहर या नावाचे एक मोठे वलय साहित्यवर्तुळात आहे. डॉ. मनोहर हे सुप्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक, विचारवंत आणि वक्ता म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहेत.

डॉ. यशवंत मनोहर हे जसे साहित्य क्षेत्रातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची उत्थानगुंफा आहेत, तसेच ते एक अतिशय श्रेष्ठ असे वक्ते आहेत. डॉ. मनोहर खूप चांगले भाषण देतात. बोलावे ते केवळ मनोहर सरांनीच! त्यांच्या मनात असलेल्या शब्दसागरातील एक एक शब्द हळुवारपणे त्यांच्या मुखातून बाहेर पडतात आणि ते शब्द श्रोत्यांच्या अंतःकरणात अलगद प्रवेश करतात आणि ते शब्द! छे! केवळ शब्दच नव्हेत! तर शब्दांच्या माध्यमातून विचारांची पेरणी श्रोत्यांच्या मनरूपी शेतीत करतात. श्रोत्यांना अगदी गदगदा हलवून त्यांना भानावर आणणारा श्रेष्ठ असा वक्ता म्हणजे डॉ. मनोहर! त्यांचे भाषण म्हणजे एक वैचारिक मेजवानी असते. त्यांच्या शब्दातून ते श्रोत्यांशी वैचारिक संवाद साधतात. त्यांच्याजवळ वक्तृत्व आहे. वक्तृत्व ही एक कला आहे. ही कला सहज त्यांना प्राप्त झाली नाही. वक्ता बनण्यासाठी त्यांनी प्रचंड परिश्रम घेतलेत. या परिश्रमातून त्यांची वक्तृत्वकला बहरत गेली आणि आज ते मराठी भाषेतील एक महान वक्ते आहेत. त्यांचे उच्चार स्पष्ट आहेत. ते बोलत

असताना, अनेक नवनवे शब्द ऐकायला मिळतात. कोणत्याही विषयावर ते उत्कृष्ट बोलतात. त्यांचा एक एक शब्द नवा अर्थ घेऊन येतो. शब्द कसे वाकवावे, शब्दांना नवा अर्थ कसा द्यावा, हे शिकावे ते केवळ त्यांच्याकडूनच!

डॉ. मनोहर सरांच्या भाषणांवर मी मनापासून प्रेम करतो. विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर विचारधारा विभागातील विद्यार्थ्यांच्या कानावर त्यांचे शब्द पडावे म्हणून विभागात अधून-मधून त्यांना व्याख्यानासाठी बोलवत असतो. डॉ. मनोहर सर देखील आढेवेढे न घेता विभागातील बहुआयामी असलेल्या विद्यार्थ्यांना आपल्या भाषणाद्वारे विचारांची जीवनसत्वे देत असतात. त्यांची अप्रतिम वक्तृत्वकला बघून माझ्या मनात एक प्रश्न निर्माण झाला. डॉ. मनोहर सर इतके सुंदर भाषण कसे करू शकतात? म्हणून मी त्यांना तो प्रश्न विचारला. तेव्हा त्यांनी स्मित केले.

''सर, खरेच मला तुमच्या भाषणाचा हेवा वाटतो! आपल्या भाषणकलेचे गुपित काय आहे?''

तेव्हा सर म्हणाले, ''आगलावे, त्यामागे माझी अनेक वर्षांची खडतर मेहनत आहे.''

''सर, तेच तर मला ऐकायचे आहे.''

त्यानंतर सर बोलू लागले आणि ते आपल्या भूतकाळातील विद्यार्थी जीवनात शिरले. आपल्या भाषणकौशल्याच्या संदर्भात त्यांनी जे सांगितले, ते खरेच अद्‌भुत असे आहे.

सरांचे मूळ गाव काटोल तालुक्यातील येरला, लहानसे गाव. गावात चौथीपर्यंतच शाळा होती. कुटुंबातील कुणी शिकलेच नव्हते. गावात चौथीपर्यंतच शिक्षण होते. त्यामुळे पाचवीनंतरचे शिक्षण काटोलमध्ये झाले. पाचवी ते आठवीपर्यंत रोज गावावरून आठ किलोमीटर चालत जायचे आणि पुन्हा तितकेच अंतर चालत गावाकडे परतायचे. पायात चप्पल नसायची. नवव्या वर्गापासून काटोलला त्यांनी खोली केली होती. त्यामुळे रोज पायी जाण्या-येण्याचा त्यांचा त्रास वाचला. लहानपणापासून भाषेचा न्यूनगंड त्यांच्या मनात होता. शहरातल्या लोकांसारखे आपल्याला बोलता येत नाही. आपण काही बोललो आणि आपले उच्चार चुकले तर विद्यार्थी आपली टिंगल उडवतील, अशी भीती त्यांना वाटायची. ते खूप लाजरे होते.

शाळेत किंवा महाविद्यालयात कधी त्यांनी भाषण दिले नाही. डॉ. मनोहर सरांनी सांगितले की 'मी एम.ए.होईपर्यंत बोललोच नाही. कारण आपला

उच्चार चुकेल, असे सतत वाटायचे.'

आपली भाषा सुधारावी, आपल्याला चांगले शब्द बोलता यावेत म्हणून हायस्कूल आणि कॉलेजमध्ये मोठ्या लेखकांच्या पुस्तकातील उतारेच्या उतारे त्यांनी लिहून काढलेत. अनेक वह्या या उताऱ्यांनी लिहून काढल्यात. काही उतारे पाठ केलेत. महाविद्यालयीन जीवनात भरपूर वाचन केले. विविध लेखकांची पुस्तके वाचलीत. आपली भाषा आणि भाषाशैली समृद्ध करण्यासाठी त्यांनी असे खूप परिश्रम घेतलेत.

सर बोलत होते. चांगली भाषा बोलता यावी म्हणून त्यांनी किती मेहनत घेतली याचे ते जिवंत उदाहरण आहे. विशेष म्हणजे एम.ए. होईपर्यंत ते बोललेच नाहीत आणि नंतर बोलायला लागले तर बोलणे केवळ अद्वितीय ठरले. सरांच्या वक्तृत्वकलेचे खरे गुपित मला कळले. ते गुपित म्हणजे भाषा कमविण्यासाठी त्यांनी केलेले खडतर परिश्रम होय.

सरांनी बोलता बोलता एक अनुभव सांगितला तो अनुभवसुद्धा अतिशय बोलका आहे.

सन १९९१ मध्ये डॉ. यशवंत मनोहर सर हे महाराष्ट्र शासनाच्या साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष झाले. त्यांचे वेगवेगळ्या शहरात सत्कार सोहळे होऊ लागलेत. त्याची भाषणं वृत्तपत्रातून छापून येऊ लागली. त्या दरम्यान त्यांना मिलिंद महाविद्यालयात सोबत शिकणाऱ्या एका मित्राचे पत्र आले.

त्या पत्रात त्या मित्राने लिहिले होते की, 'यशवंता, विद्यार्थी जीवनात तू किती लाजरा होतास. तू कधी बोलायचाच नाहीस. आम्ही खूप बोलायचो आणि तू फक्त ऐकायची भूमिका पार पाडायचा. आता उलट झाले. तू महाराष्ट्रभर बोलतोस आणि आम्ही आता तुला ऐकत असतो.'

डॉ. मनोहर सरांच्या मित्रांचे हे पत्र खूप बोलके आहे. मित्रांसोबत जास्त न बोलणारा, तो लाजरा-बुजरा मित्र फक्त ऐकत राहायचा. विद्यार्थीजीवनात लाजरा आणि न बोलणारा यशवंत आता मोठमोठ्या विद्वतसभा गाजवतो. त्यांच्या बोलण्यातून विचारांच्या ठिणग्या पेटतात. केवळ चांगलेच नाही तर खूप चांगले बोलता यावे. आपण बोलावे आणि इतरांनी ऐकत रहावे. यासाठी खडतर साधना डॉ. मनोहर सरांनी केली. डॉ. आंबेडकरांच्या क्रांतीविचारांचा वारसा त्यांना लाभला. प्रत्यक्ष डॉ. आंबेडकरांचे वास्तव्य लाभलेल्या नागसेन वनाच्या परिसरातील भारावलेले वातावरण! आंबेडकरांच्या विचारांचा प्रचंड प्रभाव नागसेन वनाच्या परिसरातील वातावरणावर होता. अशा या वातावरणात

डॉ. मनोहर सरांचे व्यक्तिमत्त्व घडले होते.

बार्शी येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. गं.बा. सरदार हे होते. या संमेलनात प्रसिद्ध समीक्षक डॉ. भालचंद्र फडके यांच्या अध्यक्षतेखाली आंबेडकरी साहित्यावर एक परिसंवाद झाला. त्यात डॉ. मनोहर, प्रसिद्ध साहित्यिक बाबुराव बागूल, बाळकृष्ण कवठेकर हे प्रमुख वक्ते होते. त्यावेळी मंत्री असलेल्या भाई वैद्यांनी डॉ. मनोहरांच्या भाषणशैलीची खूप प्रशंसा केली.

बार्शीलाच पुढे संतसाहित्यावर एक पंडित चर्चा होती. त्या चर्चेत डॉ. मनोहरांचे अप्रतिम भाषण झाले. मा. सरदार समारोपीय भाषणात म्हणाले की, इतके रोखठोक प्रखर बोलावे ते केवळ डॉ. यशवंत मनोहरांनीच.

चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती येथे १०, ११ डिसेंबर १९७९ मध्ये पहिले आदिवासी साहित्य संमेलन झाले होते. त्या संमेलनाचे उद्‌घाटक डॉ. यशवंत मनोहर तर अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर होते. डॉ. मनोहर सरांचे उद्‌घाटकीय भाषण झाले. अध्यक्षीय भाषण देताना प्राचार्य राम शेवाळकर म्हणाले की, ‘‘मनोहरांचे अप्रतिम भाषण तुमच्या मनात ठसावे. कायम रहावे म्हणून मी बोलत नाही.’’ एवढे बोलून ते खाली बसले. तेव्हा मनोहर सर प्राचार्य शेवाळकरांना म्हणाले की, ‘‘रामभाऊ, तुम्ही माझा फार मोठा सन्मान केला.’’

डॉ. मनोहर सरांच्या अध्यापनाची सुरुवात पैठण येथील महाविद्यालयात १९६७ पासून झाली. दोन वर्षे तेथे अध्यापन केल्यानंतर ते हिंगोली येथील महाविद्यालयात रुजू झालेत. तेथे ते केवळ तीन महिनेच राहिले. कारण त्यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने अधिव्याख्याता म्हणून १९६९ मध्ये निवड झाली. त्यामुळे ते हिंगोलीवरून नागपूरच्या मॉरिस महाविद्यालयात ऑक्टोबर १९६९ मध्ये रुजू झालेत. मॉरिस महाविद्यालयात जवळपास दहा वर्षे मराठीचे अध्यापन केले. नंतर त्यांची निवड नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर मराठी विभागात १९७९ मध्ये झाली. विद्यापीठाच्या मराठी विभागात आतापर्यंत सर्व प्राध्यापक ब्राह्मणच होते. डॉ. मनोहर हे विभागात गेलेले बहुजन समाजातील पहिले प्राध्यापक होते. मराठी भाषा केवळ ब्राह्मणच चांगली शिकवू शकतात, अशी सर्वसाधारण समजूत होती. मराठी विभागातील अध्यात्मवादी प्राध्यापकांपेक्षा आपण कमी नाही. आपण आंबेडकरी विचारांचे प्राध्यापक, कवी आहोत. त्यामुळे या अध्यात्मवाद्यांचा पराभव विचारांनी करायचा. आपण इतके चांगले शिकवायचे की, ज्यामुळे आपणच मराठी भाषा चांगली शिकवू शकतो, हे अध्यात्मवाद्यांना पटवून द्यावे यासाठी डॉ. मनोहर सरांनी मागील १२ वर्षांच्या

अध्यापनाच्या काळात मराठी भाषेवर चांगले प्रभुत्व कमावलेले होते. त्यांनी मराठीत प्रचंड वाचन केले होते. स्नातकोत्तर मराठी विभागात आल्यानंतर त्यांच्या वक्तृत्वकलेचा परिचय विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना झाला.

डॉ. मनोहरांचा आवाज भारदस्त आहे. त्यांची शिकविण्याची एक वेगळी शैली आहे. त्यांचा तास सुरू झाला की, विद्यार्थी चिडीचूप बसायचे. मन लावून सरांचे व्याख्यान ऐकायचे. वर्गाचे दार बंद असले तरी बाहेर त्यांचा आवाज ऐकू यायचा. या संदर्भातील एक घटना सांगण्याचा मोह मला आवरत नाही. ही घटना ऑगस्ट १९८१ ची आहे. त्यावेळी मी नागपूरच्या स्नातकोत्तर समाजशास्त्र विभागात एम.ए. प्रथम मध्ये शिकत होतो. समाजशास्त्र विभाग विद्यापीठातील मानव्यशास्त्रे विभागाच्या बिल्डींगमध्ये पहिल्या मजल्यावर आहे. मराठी विभाग खाली असला तरी एका वर्गाचे तास पहिल्या मजल्यावरील समाजशास्त्र विभागाच्या बाजूच्या खोलीत व्हायचे. आमचा पिरेड नसल्यामुळे मी व्हरांड्यातून जात होतो. तेवढ्यात माझ्या कानावर काही शब्द पडले. ते शब्द ऐकावे असे वाटले. म्हणून मी तेथे थांबलो आणि जवळपास पंधरा ते वीस मिनिटे मी ते व्याख्यान व्हरांड्यात थांबून ऐकले. ते व्याख्यान होते डॉ. मनोहर सरांचे!

एम.ए. प्रथम वर्षाला असताना मी विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालयाजवळील विद्यार्थी वसतिगृहात रहात होतो. विद्यापीठात एम.ए., एम.एससी., विधी इत्यादी शिक्षण घेणारे विद्यार्थी वसतिगृहात रहायचे. हे विद्यार्थी विदर्भातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील असायचे. आंबेडकरी विद्यार्थ्यांना संघटित करून एक विद्यार्थी संघटना स्थापन करायची. त्या संघटनेतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करायचे. असा विचार मी करू लागलो. त्या संदर्भात विद्यार्थ्यांची एक बैठक ऑगस्ट १९८१ मध्ये माझ्या रूममध्ये बोलाविली होती. विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे डॉ. आंबेडकर पोस्ट ग्रॅज्युएट स्टुडंट्स् असोसिएशनची स्थापना करण्यात आली. या असोसिएशनच्या उद्‌घाटनाचा कार्यक्रम घ्यायचा होता. त्याकरिता एक चांगला मोठा पाहुणा बोलवायचा असा विचार करू लागलो.

एका रविवारच्या दिवशी सकाळी ९-३० च्या सुमारास वसतिगृहाच्या समोरील अमरावती रोडच्या पलीकडे चहाच्या टपरीवर चहा घेत होतो. तितक्यात डॉ. यशवंत मनोहर सर आपल्या स्कुटरवरून जाताना दिसले. त्यावेळी ते अमरावती रोडवरील विद्यापीठाच्या शिक्षकांच्या निवासस्थानात रहात होते. मी त्यांना आवाज दिला. तेव्हा त्यांच्याशी माझा विशेष परिचय नव्हता. डॉ. मनोहर हे एक मोठे

साहित्यिक आहेत. हे मला माहीत होते. फेब्रुवारी १९८१ च्या लोकमतच्या अंकात 'दलित साहित्यःमानवतावादी साहित्य' हा लेख मी लिहिला होता. त्या लेखात मी डॉ. मनोहरांचा आवर्जून उल्लेख केला होता.

सरांनी आपली स्कूटर थांबवली. मी सरांना असोसिएशनविषयी माहिती दिली आणि या असोसिएशनच्या उद्‌घाटन कार्यक्रमाचे उद्‌घाटक म्हणून आपण यावे अशी त्यांना विनंती केली. सरांनी कोणतेही आढेवेढे न घेता होकार दिला. सरांचा होकार मिळताच मला खूप आनंद झाला. वसतिगृहात गेल्यानंतर माझ्या सहकाऱ्यांना डॉ. मनोहर सर उद्‌घाटक म्हणून येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही विद्यार्थी उद्‌घाटनाच्या तयारीला जोमाने लागलो. उद्‌घाटनाचा कार्यक्रम विद्यापीठ वसतिगृहाच्या सभागृहात झाला. डॉ. मनोहर सर पत्रिकेतील वेळेनुसार कार्यक्रमाला आले. त्यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले. त्यानंतर वेळोवेळी असोसिएशनच्या कामानिमित्त आम्ही विद्यार्थी डॉ. मनोहर सरांच्या घरी जायचो. सरदेखील आम्हाला योग्य ते मार्गदर्शन करीत.

डॉ. मनोहर सर लेखनकला आणि वक्तृत्वकलेमध्ये निष्णात आहेत. हे सांगण्याची आवश्यकता नाही. त्यांना कलेचा वारसा लाभला. कधी सर मुडमध्ये असले की, ही गोष्ट डॉ. मनोहर आवर्जुन सांगतात. त्यांचे वडील चांगले ढोलकीवादक होते. त्यांचे दोन भाऊ शाहीर होते. एक भाऊ ढोलकीवादक होते, तर दुसरे भाऊ गायन करायचे. डॉ. मनोहर सरसुद्धा पेटी चांगली वाजवितात. काटोलमध्ये नववी आणि दहावीपासून त्यांनी गाणी लिहायला सुरुवात केली होती. पुढे औरंगाबादच्या मिलिंद महाविद्यालयातील आंबेडकरी विचारांनी भारावलेल्या वातावरणात ते कविता लिहू लागले. त्यांच्यातील कवीमन प्रगट झाले ते मिलिंद महाविद्यालयाच्या परिसरात.

डॉ. यशवंत मनोहर सरांचे लेखन आणि भाषण हे अप्रतिम आहे. त्याला पर्याय नाही. ते जे लिहितात ते अगदी बेंबीच्या देठापासून आणि बोलतातही तेदेखील मनाच्या गाभाऱ्यातूनच! एका मुलाखतीत त्यांना विचारले होते की, "तुम्ही का लिहिता?" या प्रश्नाचे उत्तर देताना डॉ. मनोहर म्हणाले की, "मनापासून लिहावेसे वाटते म्हणून." ते जे लिहितात ते अगदी मनाच्या गाभाऱ्यातूनच आणि बोलतात तेदेखील मनाच्या गाभाऱ्यातूनच! असा हा एक श्रेष्ठ प्रतिभावंत साहित्यिक आणि वक्ता आहे. त्यांचे साहित्य जेवढे देखणे आणि सुंदर आहे. तेवढेच त्यांची शरीरयष्टी आणि रूपदेखील सुंदर आहे. डॉ. मनोहर हे निवृत्त झालेत. म्हणून ते जीवन निवृत्तीच्या मार्गाकडे झुकले असे मी मानत नाही. प्रतिभासंपन्न आणि कर्तृत्ववान माणसे कधीच निवृत्त होत नाहीत.

९

# 'यशवंत' प्राध्यापक

## ▪ डॉ. किशोर महाबळ

प्रा. यशवंत मनोहर हे कवी, लेखक, विचारवंत म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात सुपरिचित आहेत. आपल्या विद्वत्तेने, व्यासंगाने व अखंड ज्ञानसाधनेने त्यांनी मराठी साहित्यविश्वात लक्षणीय स्थान प्राप्त केलेले आहे. आधुनिक मराठी साहित्याचा अभ्यास ज्या साहित्यिकांच्या साहित्याचा अभ्यास केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही असे प्रा. मनोहरांचे दर्जेदार वाङ्मय आहे. कवी, साहित्यिक म्हणून त्यांच्या योगदानाची चर्चा करण्याची माझी योग्यता नाही. प्रस्तुत लेखात त्यांच्या अध्यापनाच्या क्षेत्रातील एका वेगळ्याच पैलूचा मला आलेला साक्षात् अनुभव मांडण्याचा विचार आहे.

पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात विद्यार्थी असताना विविध पदव्युत्तर विभागातील नामवंत प्राध्यापकांची व्याख्याने ऐकण्याचा छंद मला होता. डॉ. मनोहर सरांच्या साहित्यक्षेत्रातील योगदानाबद्दल बरेच ऐकून होतो. उत्सुकतेने एक दिवस त्यांच्या परवानगीने त्यांच्या वर्गात जाऊन बसलो. ते केशवसुतांची कोणतीतरी कविता शिकवित होते. कवितेतील कोणत्यातरी शब्दाचे विवेचन करता करता त्यांनी सामाजिक वास्तवाची चर्चा सुरू केली. समाजजीवनातील दाहक वास्तव, शोषण, क्रौर्य आणि वेदना ते मांडू लागले. स्थळकाळाचे भान विसरून ते बोलत होते. जीवनात आलेले दाहक अनुभव, विद्रोहाच्या तत्त्वज्ञानाचे संदर्भ देत ज्वलज्जहाल शब्दकळेसह व्यक्त होऊ लागले. प्रस्थापित व्यवस्थेतील विषमतेचे वर्णन करतानाच हे सारे बदलायचे आहे, एक नवा समताधिष्ठित समाज आपल्याला निर्माण करायचा आहे अशी प्रेरणाही ते देत होते. नैराश्य व आशा, वेदना व करुणा, दुःख व नवसमाजनिर्मितीचे स्वप्न बघण्यातून होणारे सुख अशा सर्व भावभावनांचा कल्लोळ मी अनुभवत होतो. मला वारंवार आफ्रिकेतील वंचित गुलामांचे जीवन व्यक्त करणारे थिंकर हे शिल्प आठवू लागले. त्यातील तो बलदंड शरीरयष्टी असलेला गुलाम गुडघ्यावर कोपर टेकवून व हाताच्या तळव्यात हनुवटी टेकवून विचारमग्न झालेला दाखविण्यात आला आहे. इतरांसारखेच आपल्याजवळ सर्व काही असतानाही आपली ही स्थिती का झाली? कोणी केली, का केली ही स्थिती कशी बदलता येईल,

काय केले पाहिजे? असा विचार करण्यात मग्न झालेला तो गुलाम त्या शिल्पात दाखविलेला आहे. तो गुलाम आपल्यासारख्याच भारतीय समाजजीवनातील वंचितांच्या वेदनेचे प्रत्ययकारी निवेदन डॉ. मनोहरांच्या द्वारे करतो आहे असे वाटू लागले. आपल्या सर्व सामर्थ्यानिशी या व्यवस्थेच्या विरुद्ध एल्गार करण्याची प्रेरणा घेऊन जागृत होऊ लागलेला समाज आमच्यासमोर प्रकट झालेला आहे असे वाटू लागले. विषमतेच्या तत्त्वज्ञानाचे वैयर्थ्य व्यक्त करण्यासाठी अचूक शब्दयोजना करीत करीत एखाद्या झंझावातासारखे विद्यार्थ्यांच्या मनातील जुन्या कालबाह्य विचारांचे बुरूज उद्ध्वस्त करण्याचा ते प्रयत्न करीत होते. तो एक विलक्षण अनुभव होता. या अनुभवात मीही स्थळकाळाचे भान विसरलो. वर्ग सुटण्याची वेळ कधी झाली ते कळलेच नाही. सुट्टी झाली व म्हणून वाटणारा तारुण्यसुलभ आनंद त्या दिवशी वाटेनासा झाला. अनेक प्रश्न विचलित करू लागले. त्या प्रश्नांची तातडीने उत्तरे शोधली पाहिजेत असे वाटू लागले. हातातील व ग्रंथालयातील ग्रंथात ही उत्तरे सापडतात का हे शोधण्याचा विचार सुरू झाला. समाजजीवनाकडे बघण्याची एक नवी दृष्टी मिळाली. शेकडो वर्षे समाजातील एक मोठ्ठा वर्ग सर्व प्रकारच्या विकासाच्या संधींपासून वंचित राहिला. निसर्गदत्त अधिकारांपासून उपेक्षित राहिला. हे वास्तव डॉ. मनोहरांच्या व्याख्यानातून प्रभावीपणे मांडले गेले. त्याकाळी मी एका झोपडपट्टीतील गरीब मुलांसाठी शैक्षणिक उपक्रम राबवित असल्याने लहान मुलांच्या जीवनातील दारिद्र्याचे चटके जवळून अनुभवत होतो. मात्र संपूर्ण समाजातील विषमता, ती विषमता जोपासणारे तत्त्वज्ञान व समाजव्यवस्थेचे व्यापक आकलन झालेले नव्हते. समाज व्यवस्थेची मूळातूनच पुनर्बांधणी केली पाहिजे याची एवढ्या तीव्रतेने जाणीव झाली नव्हती. विविध समाजघटकांच्या आर्थिक हितसंबंधातील संघर्ष हे विषमतेचे एक प्रबळ कारण आहे याचे एवढ्या तीव्रतेने प्रत्यंतर आलेले नव्हते. नवा समाज, नवी मूल्ये, नवे विचार, नवे तत्त्वज्ञान व नवी सभ्यता ही जुन्या कालबाह्य व्यवस्थेवर आधुनिकतेचे कलम लावून निर्माण करता येणार नाही. उलट ही जुनी व्यवस्था पूर्णतः संपुष्टात आणून पूर्णतः नव्या व्यवस्थेची उभारणी करावी लागणार आहे याचे भान या व्याख्यानातून आले. माझ्या वैचारिक प्रगतीच्या दृष्टीने ते व्याख्यान क्रांतिकारकच ठरले. त्या दिवसानंतर डॉ. मनोहरांची व्याख्याने ऐकण्याची संधी मी गमावली नाही. त्यांचे लेख, त्यांची पुस्तके वाचत गेलो. प्रभावी अध्यापनाद्वारे एखादा प्राध्यापक काय साध्य करू शकतो याचा विद्यार्थी म्हणून आलेला अनुभव मला अध्यापनाकडे नव्याने बघायला शिकविणारा ठरला. नंतर मी घडविलेल्या माझ्या अध्यापनशैलीची दिशा ठरविण्यात डॉ. मनोहरांचे विचार निश्चितच उपकारक ठरले.

पदव्युत्तर पातळीवर विद्यापीठाच्या विभागात प्राध्यापक होणे, विविध नियतकालिकांत संशोधनपर लेखन करणे, विभागप्रमुख होणे, विद्यापीठातील मोठमोठ्या प्रशासकीय पदांवर नेमणूक होणे, विविध चर्चासत्रे, परिसंवादात प्रमुख वक्ते म्हणून आमंत्रित केले जाणे, अनेक विद्यार्थ्यांना पीएच.डी.साठी मार्गदर्शन करणे, हळूहळू मानधनाची रक्कम वाढवत वाढवत महागडा वक्ता होणे एवढीच ही सद्यःस्थितीत यशस्वी प्राध्यापकाची लक्षणे मानली जातात. देशभर प्रबोधन करत फिरायचे मात्र जिथून आपल्याला पगार मिळतो तिथे मात्र क्वचितच अध्यापन करायचे, विद्यार्थ्यांशी संवाद, चर्चा करणे जेवढे टाळता येईल तेवढे टाळायचे व आपल्याच गुर्मीत जगायचे ही अव्यक्त यशस्वी प्राध्यापकाची लक्षणे आहेत असे अनेक प्राध्यापक मानू लागले आहेत. डॉ. मनोहर या अर्थाने यशस्वी प्राध्यापक नाहीत. ते त्यांच्या यशाचे गमक नाही. म्हणजे संशोधन, मार्गदर्शन, अध्यापन ही प्राध्यापकांची कर्तव्ये त्यांनी चोखपणे पार पाडली. पण त्यापेक्षाही वेगळ्या कारणांसाठी मला त्यांना यशवंत प्राध्यापक म्हणायचे आहे.

सामाजिक वास्तवाचे भान विद्यार्थ्यांना यावे, त्यांनी सामाजिक प्रश्नांचा सखोल अभ्यास करावा, त्या प्रश्नांचा इतिहास अभ्यासावा, हे सारे बदलण्यासाठी, नव्या समाजनिर्मितीची स्वप्ने पहावीत व कृतिशील व्हावे हा आग्रह डॉ. मनोहरांच्या अध्यापनातून सातत्याने व्यक्त झालेला आहे. असा आग्रह धरणारे, आपल्या अध्यापनाला आवर्जून त्या दृष्टीने विकसित करणारे प्राध्यापक आता दुर्मीळ झालेले आहेत. सामाजिक भान व सामाजिक उत्तरदायित्व विसरलेल्या, हजारो प्राध्यापकांची फौज आज शिक्षणक्षेत्रात आहे. आपल्या वैयक्तिक सुखात, पैसे कमविण्यात गुंग झालेले आणि चैनीचे व व्यसनांना प्राधान्य असणारे जीवन जगण्यात कालापव्यय करणारे प्राध्यापक भरपूर आहेत. या जीवनशैलीचा सखोल परिणाम प्राध्यापकांच्या अध्यापनावर झालेला आहे. त्यामुळे पदवी व पदव्युत्तर स्तरावरील अध्यापन आशयशून्य व अर्थशून्य होऊ लागले आहे. समाजजीवनावर याचे दाहक परिणाम होताना दिसत आहेत. डॉ. मनोहर या परिस्थितीस अपवाद राहिलेले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी व सामाजिक जाण विकसित करण्याचा वसा त्यांनी जोपासला व वाढवला.

डॉ. मनोहरांच्या प्रभावी अध्यापनशैलीचा मुख्य आधार म्हणजे त्यांची एवढी वर्षे अखंड चाललेली ज्ञानसाधना होय. डॉ. आंबेडकर, मार्क्स, म. फुले यांच्या विचारांचा, डाव्या चळवळीतील ग्रंथाकारांच्या ग्रंथांचा आणि जागतिक पातळीवर वंचितांच्या वेदना मांडणाऱ्या लेखकांच्या साहित्याचा उत्तम अभ्यास केल्याने त्यांचे विचार व लेखन अर्थपूर्ण, आशयघन व त्याचबरोबर

प्रेरणादायी झालेले आहे. विद्रोहाचे तत्त्वज्ञान व सौंदर्यशास्त्र मांडण्याचे आव्हान ते म्हणूनच पेलू शकले. उथळ, शब्दबंबाळ, शिवराळ व प्रचारकी थाटाचे भावना भडकविणारे लेखन म्हणजे पुरोगामी लेखन असा अत्यंत चुकीचा समज अनेक प्राध्यापकांमध्ये पसरलेला आहे. आपला विचार हा विवेकाने, गंभीरपणे, जबाबदारीने व सर्व साधकबाधक पुराव्यांचे सखोल आलोडन करून मांडला पाहिजे ही शिस्त डॉ. मनोहरांच्या लेखनातून जागोजागी दिसून येते. 'समुचित' या त्यांनी चालविलेल्या नियतकालिकाचे अंक या त्यांच्या शिस्तीचा प्रत्यय घडवितात. आपले विचार अध्ययनाने, व्यासंगाने सातत्याने तपासले पाहिजेत, ते मांडताना आपण सूर्यकुलातील असलो तरी बुद्धाच्या करुणेचा विसर पडू द्यायचा नाही याचा दुर्मीळ असलेला विवेक त्यांच्या लेखनात आढळतो. कुठल्यातरी पुस्तकातली, वर्तमानपत्रातील, कुठलीतरी माहिती, अवतरण एकामागोमाग एक लिहीत जाणे म्हणजे शोधनिबंध अशी सोपी व्याख्या केली गेल्याने शेकडो शोधनिबंध परिषदांच्या वेळी तयार केले जातात व वाचलेही जातात. डॉ. मनोहरांचे लेखन, त्यांचे प्रबंध हे त्यांच्या सखोल अभ्यासाची परिणती आहेत.

डॉ. मनोहरांचे शिक्षण हे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत झाले. ज्या समाजघटकातून ते आले आहेत, त्या समाजघटकाला ज्ञानापासून, सुखसुविधांपासून आणि सर्व न्याय्य मानवी अधिकारांपासून पिढ्यानुपिढ्या वंचित ठेवले गेले. सर्वप्रकारची प्रतिकूलता असूनही नैराश्यांतही व्यथित होत निष्क्रिय न होता प्रतिकूलता हेच आव्हान मानून तिच्यावर मात करण्याची अद्‌भुत ऊर्जा व ध्येयवाद त्यांनी जोपासला आहे. सर्व अनुकूलता असूनही आपल्या खऱ्याखोट्या तक्रारी करीत राहणे; सतत रडगाणे गात राहणे ही अनेक सुशिक्षितांची प्रकृती झालेली आहे. परिस्थिती बदलावी म्हणून परिस्थितीच्या विरुद्ध आपल्या लेखणीने व वाणीने संघर्ष करीत असतानाच नवसर्जनाच्या, नवनिर्मितीच्या, परिवर्तनाच्या, प्रगतीच्या, विकासाच्या ज्या ज्या व जेवढ्या शक्यता आढळतील त्या उपयोगात आणण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. वेदना, दुःख यांना कुरवाळत बसण्यातून काहीच साध्य होत नाही. दुःख हे सर्वच मानवांच्या जीवनाचा अविभाज्य भाग असते. त्या दुःखाची तीव्रता कमी जास्त असणे हाच काय तो फरक. अशा स्थितीत दुःखावर मात करण्याची तयारी करणे डॉ. मनोहरांना महत्त्वाचे वाटते. आपल्या आयुष्यात त्यांनी हेच करण्याचा प्रयत्न केला म्हणूनच त्यांना अनुभवास आलेला अन्याय व दुःख त्यांनी साहित्य निर्मितीच्या माध्यमातून भविष्यातील समाजात नसेल यादृष्टीने प्रयत्न सुरू केला. हे त्यांचे यश अनेक प्राध्यापकांच्या आयुष्यात दुर्मीळ झालेले आहे.

डॉ. मनोहर उत्तम वक्ते आहेत. आधुनिक मूल्यांवर नवसमाजनिर्मितीच्या

आवश्यकतेवर भर देत ते बोलतात. जे जे म्हणून विषमतेला, अन्यायाला पोषक असेल त्या त्या विचारांच्या, कृतीच्या, विरोधात त्यांचा विद्रोह असतो. हा विद्रोह ते ज्वलज्जहाल भाषेतून व्यक्त करतात. शब्दांची योजना नेमकी असते. संदर्भ विपुल असतात. भाषा ओघवती असते, एकामागून एक तर्क मांडलेले असतात. आधुनिक मूल्यांची पाठराखण असते. परंपरेवर, रूढीप्रामाण्य, शब्दप्रामाण्यावर कठोर टीका असते. बुद्धिप्रामाण्याचा, विवेकाचा स्वीकार करा असे आवाहनही असते. कवीची प्रतिभा, विद्वानाची विद्वत्ता, कार्यकर्त्यांची तळमळ आणि नवसमाजाचे स्वप्न पाहणाऱ्या युवकाचा उत्साह असतो. 'जुने जाऊ द्या मरणालागूनी' असे सांगत सांगत 'प्राप्तकाळ हा विशाल भूधर सुंदर लेणी तयात खोदा' असे आवाहनही असते. प्रभावी वक्तृत्वासाठी आवश्यक असा हा गुणसमुच्चय प्राध्यापकांमध्ये आजकाल क्वचितच आढळतो.

अनेक प्राध्यापक वक्तृत्व विकसितच करीत नाहीत. त्यासाठी आवश्यक तो अभ्यास, व्यासंगच करीत नाहीत. आणि ज्यांनी आपली वक्तृत्वशैली विकसित केली आहे त्यांच्यापैकी अनेकांचा अभ्यास व्यासंग कधीचाच संपलेला असतो हे त्यांच्या बोलण्यातून जाणकारांच्या लगेच लक्षात येते. अनेक प्राध्यापकांचे वक्तृत्व व्यासंग, अभ्यास व चिंतनाच्या अभावाने 'शब्द बापुडे केवळ वारा' या दर्जाचे झालेले आहे. त्यातही आक्रस्ताळेपणाने, शब्दबंबाळ बोलणे, खालच्या पातळीवरची टीका करणे, असंसदीय शब्दांचा वापर करणे, विविध समाजघटकांवर टीका करताना सरसकट विधाने करणे, होता होईतो त्यांमध्ये द्वेष व सूडाची भावना कशी निर्माण करता येईल ते बघणे व तासन्तास वेळकाळाचे भान न ठेवता बोलणे म्हणजे प्रबोधन असा अनेकांचा गैरसमज असतो. त्यामुळे भांडणे लावण्यात, सार्वजनिक संपत्तीचे नुकसान करण्यास प्रोत्साहन देण्यात वक्तृत्वकलेचा उपयोग होताना दिसतो. डॉ. मनोहर याबाबतीत अत्यंत सावध आहेत. एखाद्या कुशल शल्यचिकित्सकासारखे समाजजीवनातील सडलेला भाग तर काढून टाकायचा पण जो चांगला आहे तो टिकवायचा याची ते आवर्जून काळजी घेतात. खैरलांजी इथे दलित भगिनींवर जो अन्याय झाला त्याविरोधातील एका सभेतील डॉ. मनोहर यांच्या भाषणाचा मला इथे संदर्भ देणे आवश्यक वाटते. 'आम्ही समाजाच्या अन्यायाला वर्षानुवर्षे बळी पडलो व आमच्या आया-बहिणी आजही बळी पडताहेत. हा अन्याय दूर झालाच पाहिजे. अन्याय करणाऱ्याला शिक्षा झालीच पाहिजे. या देशात कोणावरही अन्याय होऊ नये, कोणाचेही शोषण होऊ नये असे आमचे म्हणणे आहे' हे त्यांचे वाक्य अत्यंत अर्थपूर्ण आहे. अन्याय करणाऱ्या समाजातील सर्वच जणांना शत्रू मानण्याचा विचार भले भले विचारवंत मांडताना आपल्या अनुभवास येते. यातूनच जातीय

दंगलींना खतपाणी घातले जाते. ज्या समाजघटकाने समाजाच्या अन्य सर्व समाजघटकांकडून केवळ अपमान, अन्याय, छळ व शोषणच अनुभवले अशा समाजघटकातील डॉ. मनोहर मात्र आम्ही जे अनुभवले ते कोणालाही अनुभवू लागू नये असे म्हणतात. त्यांचा हा विवेक केवळ अतुलनीय आहे. सर्व सूडाचा अनुभव घेऊनही सूडाची भावना न ठेवता, सूड घेणारा कसा बदलेल असा विचार करणे हे अत्यंत कठीण आहे. अमानुषतेचा अनुभव घेतलेल्या व्यक्तीने मानुषतेचा घोष करणे, मानुषतेचाच संस्कार आपल्या उक्तीद्वारे करणे हे अलौकिक, अद्भुत, विलक्षण आहे. रागद्वेषाच्या पल्याड जाणारी बुद्धाची करुणा, ही डॉ. मनोहरांच्या व्यक्तिमत्त्वातून अनुभवास येते. त्यांचे ज्ञान, व्यासंग, चिंतन, मनन या गोष्टींची परिणती त्यांच्या या असामान्य भूमिकेत झाली आहे. छळ सोसणाऱ्या बाबासाहेबांनी प्रतिशोध घेण्याची भूमिका घेण्याऐवजी जो अन्याय करतो तोच चुकीच्या कल्पनांचा, विचारांचा गुलाम झालेला आहे असे मानून त्याच्याही मनाची नव्या मूल्यांनी मशागत करण्याचे जे अतुलनीय कार्य आपल्या जीवनात केले तेच पाथेय डॉ. मनोहरांनी जीवापाड जपले आहे. त्याचा ते सांभाळ करीत आहेत व आपल्या उक्तीने समाजातील अंधार दूर करण्यासाठी कटिबद्ध आहेत असे सॉक्रेटिसचे शहाणपण डॉ. मनोहरांनी आपल्या अंगी बाणवले आहे. खऱ्या मानवत्वाची काय भूमिका असेल ते आपल्या उदाहरणाने ते आपल्यासमोर ठेवीत आहेत.

या देशातील दीनदलितांच्या वेदनांना, समस्यांना, जोरकसपणे समाजासमोर मांडण्यात पुढाकार घेणे हे खरेतर सर्व सुशिक्षितांचे, प्राध्यापकांचे आद्य कर्तव्य आहे. त्यादृष्टीने अविकसित देशातील प्राध्यापकांची भूमिका असायला हवी. डॉ. मनोहर हे अशा सर्व उपेक्षितांचे दुःख मांडण्याचे कार्य कर्तव्य म्हणून करतात. मूकनायक सुरू करण्यामागे डॉ. बाबासाहेबांची हीच भूमिका होती. त्याच भूमिकेतून डॉ. मनोहर वंचितांच्या वेदनांना शब्दबद्ध करतात.

प्रा. मनोहर हे विद्रोहाचे समर्थक आहेत. प्रचलित शोषणावर आधारित समाजव्यवस्था नष्ट करून समताधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी प्रचलित शोषणास पोषक असलेली व्यवस्था, तत्त्वज्ञान, आचार विचार या सर्व गोष्टींच्या विरोधात भूमिका घेतली पाहिजे. विद्रोह केला पाहिजे असे ते आवर्जून सांगतात. परंपरेने आलेली मूल्यव्यवस्था व जीवनाकडे बघण्याची दृष्टी ही त्यांना अत्यंत आक्षेपार्ह वाटते व त्यामुळे तिच्याविरुद्ध त्यांचे आंदोलन सुरू आहे. अर्थात विद्रोहाबरोबरच नवनिर्मिती, नवसर्जन याही गोष्टी त्यांच्या जीवनात केंद्रस्थानी आहेत. विद्रोहाचे तत्त्वज्ञान, सौंदर्यशास्त्र, विकसित करण्यात डॉ. मनोहरांचे लक्षणीय योगदान राहिलेले आहे.

सर्व परिवर्तनवादी चळवळीत डॉ. मनोहर सक्रिय सहभागी होतात. अभ्यास, संशोधन यात गुंग होऊन समाजवास्तवाकडे दुर्लक्ष करणारे अनेक प्राध्यापक असतात. मात्र हे समाजवास्तव बदलण्यासाठी कृतिशील होण्याची डॉ. मनोहर इतरांना प्रेरणा देतात व स्वतःही कृतिशील राहतात.

एकूणच समाजभिमुख अध्ययन, अध्यापन व संशोधन करण्यात डॉ. मनोहर गेली अनेक वर्षे सातत्याने कृतिशील राहिले आहेत. हे सारे त्यांच्या ध्येयवादामुळेच शक्य झाले. त्यांचा ध्येयवाद, कृतिशीलता, विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित व्हावी यासाठी गेली ४० वर्षे कृतिशील राहिलेले प्राध्यापक म्हणून डॉ. मनोहर यांनी लक्षणीय कार्य केलेले आहे.

विद्यार्थ्यांसाठी समाजभिमुख अध्यापन करणारे प्राध्यापक म्हणून ते 'यशवंत' प्राध्यापक आहेत. त्यांचे हे यश मौलिक महत्त्वाचे व एकूणच समाजजीवनाला उन्नत व समृद्ध करणारे ठरले आहे. म्हणूनच त्यांना उदंड आयुरारोग्य लाभो हीच सदिच्छा!

१०

# सर, मी तुमचा एकलव्य!

## ▪ डॉ. प्रवीण जोशी

१९८० मध्ये मी एम.ए. प्रथम वर्षाला नागपूर युनिव्हर्सिटी कॅम्पसमधील इंग्रजी विभागाला प्रवेश घेतला. इंग्रजी विभागाच्या अगदी बाजूलाच होता मराठी विभाग. कॉलेजमधील जीवन. मौज मस्तीने भरपूर. खोडकरपणा मुळातच अंगात भरलेला. कॅम्पसमध्ये इकडे तिकडे भटकायचे; घोळका करून उभे राहायचे. नको त्या गोष्टीवर हसायचे. व्यंग करायचे. जाणाऱ्या-येणाऱ्या व्यक्तीवर मजेदार अभिप्राय व्यक्त करायचे आणि हसण्याचे भरपूर सुख लुटायचे! स्वर्ग फक्त दोन बोटावर आहे या भावनेमधील सुखाचा आनंद घ्यायचा. वर्गात अनुपस्थित राहण्यात अभिमान वाटायचा आणि स्वतःचा वर्ग सोडून दुसऱ्या विभागाच्या वर्गात जाऊन बसण्यात भूषण वाटायचे. सर्व काही केवळ मौज म्हणून. अभ्यासाचे गांभीर्य तेव्हा तरी कळत नव्हते.

असाच एक दिवस मराठी विभागाच्या द्वितीय वर्षाच्या वर्गात एका खोडकर मित्राच्या निमंत्रणावर जाऊन बसलो. फक्त मौज म्हणून! अचानक एक प्राध्यापक आतमध्ये शिरले. सर्व विद्यार्थी उभे राहिले. उंच बांधा, भरीव शरीरयष्टी, तेजःपुंज चेहरा, डोळे ज्ञानसूर्याच्या तेजाने चमकणारे. चेहऱ्यावर अद्‌भुत उदात्तपणा. कणखर पण प्रेमळ आवाज. एकंदरीत कुणालाही प्रभावित करेल असे महान व्यक्तिमत्त्व. एक हाताने काखेत असलेली पुस्तके पकडलेली आणि दुसऱ्या हातात कदाचित विद्यार्थ्यांची हजेरी असेल. एक दृष्टिक्षेप विद्यार्थ्यांवर आणि विद्यार्थी स्तब्ध. इतके स्तब्ध की 'हे कोण सर आहेत? हे दुसऱ्या कुणाला विचारण्यासाठी मला वावच नव्हता. कुठून बाहेर जाणे तर फार दूरचे. माझ्यातला भ्याड खोडकरपणा तर जागीच त्या तेजाने विरघळून गेला आणि राहिलो फक्त मी. चुपचाप बसलो. मराठीचा गंध नाही. इंग्रजी विषयाचा विद्यार्थी. पण हो माझी मातृभाषा मराठी. शेक्सपियरचा हॅमलेट मी वाचला होता. हेमिंग्वेची 'दि ओल्ड मॅन अँड दि सी' ही कादंबरी मी वाचली होती. ''तर मुलांनो आपण बघत आहोत धग. उद्धव शेकळेंनी जी कौतिक निर्माण केली आहेत तिची आणि तिच्या संघर्षाची आपण तुलना करू शकतो ती हेमिंग्वेच्या कादंबरीमधील नायकासोबत.'' माझे कान टवकारले. मराठीच्या वर्गात इंग्रजी!

आणि त्या वर्गात त्या सरांनी जे व्याख्यान दिले, मी तर मंत्रमुग्ध झालो. अचानकच 'धग' ही कादंबरी वाचण्याची प्रबळ इच्छा निर्माण झाली. ग्रंथालयात जाऊन कादंबरी मिळविली. वाचणे सुरू केले. तब्बल दोन दिवसांपर्यंत. नंतर परत वर्गात गेलो. त्याच कादंबरीवर सरांची चर्चा सुरू होती. समोरच्या रांगेत मी बसलो होतो. ''सर, कौतिक आणि हॅमलेटमध्ये कशी तुलना केली जाऊ शकते?'' मी विचारले. सरांनी ओळखले. मी त्यांचा विद्यार्थी नाही. प्रश्नार्थक नजरेने बघितले. पण कदाचित माझ्या चेहऱ्यावरील प्रश्न विचारण्याचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी हॅमलेट आणि कौतिक दोघांच्या मानसिक संघर्षाची तुलना करून दाखविली. 'टू बी ऑर नॉट टू बी' ही कौतिकची कशी अवस्था असते हे समजावून सांगितले. असे जाणवत होते. जणू मी ज्ञानगंगेत आंघोळ करीत आहे. वेळ इथेच थांबावा. काळाने आपले पाऊल पुढे सरकूच नये आणि हा तेजःपुंज सूर्य असाच तळपत रहावा. मी इंग्रजी विभागाचा विद्यार्थी हॅमलेट वाचलेला. परंतु त्या दिवशी खऱ्या अर्थाने मला खरा हॅमलेट कळला. भारावून गेलो. सरांना धन्यवाद द्यायचा, पण मी चोरटा विद्यार्थी. चोरून मराठी विभागात बसलेला. चोरी पकडली जाईल ही काळजात भीती. म्हणून बोललो नाही. पण मनातल्या मनात सरांना लाखो धन्यवाद दिले. हे महान शिक्षक म्हणजे डॉ. यशवंत मनोहर. मनाच्या गाभाऱ्यात आदराने हे नाव कोरले गेले. शाश्वत अक्षरांमध्ये.

त्यानंतर मी नेहमीच त्यांच्या वर्गात बसायला लागलो. मराठी साहित्यात रुची वाढली. सरांच्या ओजस्वी वाणीच्या प्रवाहात मराठी साहित्याकडे कळत न कळत वाहून जात होतो. वि.स. खांडेकराची 'ययाती', उद्धव शेळकेंची 'धग', ह.ना. आपटेंची 'उषःकाल', 'सूर्योदय', 'पण लक्षात कोण घेतो' या कादंबऱ्या आणि पु.ल. देशपांडेंची 'बटाट्याची चाळ', 'तीन पैशाचा तमाशा', विभावरी शिरुरकरांची 'बळी', श्री.ना. पेंडसे यांची 'गारंबीचा बापू' अशा एका मागोमाग मराठी साहित्यातील साहित्यकृतींची खरेदी करून त्यांचे वाचन केले.

प्रा. यशवंत मनोहर शिकविताना त्या विषयाशी इतके एकजीव व्हायचे की असे वाटायचे हा माय-लेकरांचा जिव्हाळा आहे. स्वतःच्या आईबद्दल बोलताना कुणीही व्यक्ती जितक्या जिव्हाळ्याने बोलतात तितकाच जिव्हाळा त्यांच्या विषयाबद्दल त्यांच्या शिकवण्यामधून दिसून यायचा. जगाचे भान नसायचे. पण सोबतच विद्यार्थ्यांमध्ये देखील तीच समरसता निर्माण करण्याची अदम्य क्षमता आणि उल्हास त्यांच्यात असायचा. कवी कुसुमाग्रजांच्या विशाखा काव्यसंग्रहातील हिमलाट ही कविता शिकविताना एक क्षण असा यायचा

की प्रा. यशवंत मनोहर व कवी कुसुमाग्रजांचे व्यक्तित्व व भावना एकमेकांमध्ये बेमालूम मिसळून जायच्या आणि असे वाटायचे जणू काही स्वतः कवीच आपल्यासमोर उभे राहून अंतर्मन व्यक्त करीत आहेत. वर्गात शिक्षक, विद्यार्थी आणि विषय यांच्यातील अस्तित्वाच्या भिंती गळून पडायच्या आणि एक आगळेवेगळे भावविश्व भावबंधांनी निर्माण व्हायचे. या भौतिक विश्वापासून एका वेगळ्या आनंदाच्या विश्वाकडे घेऊन जाण्याची प्रा. यशवंत मनोहरांची बेजोड कला मी दुसऱ्या कुठल्याही शिक्षकात अजून तरी अनुभवलेली नाही. मराठी साहित्यात अशाप्रकारे माझी उंची वाढली व अल्पशा प्रमाणात का होईना पण मी त्यांनी माझ्यात निर्माण केलेल्या उंचीमुळे मराठी वाङ्मयाचा अभ्यास केला. मराठीत अनेक लेख लिहिले व टीकात्मक भाष्य देखील केले. हे सर्व त्यांच्या नकळत. त्यांना गुरू मानून.

अनेक वर्षांनंतर अचानक माझी त्यांची एका कार्यक्रमात भेट झाली. मी त्यांना ओळखायचा. त्यांच्याजवळ गेलो. खूप बोलणे झाले. मराठी साहित्याबद्दल. शेवटी ते मला म्हणाले, आपण कोण? माझ्या तोंडातून अचानक उद्गार बाहेर पडले, ''सर मी तुमचा एकलव्य!'' मी त्यांना सर्व काही सांगितले. माझे मन भारावून आले.

सर म्हणाले, ''प्रवीण घाबरू नकोस. मी तुला अंगठा मागणार नाही. हा द्रोणाचार्य काही मागत नाही. फक्त देतो आणि भरपूर देतो.'' माझ्या डोक्यावर प्रेमाने हात ठेवून त्यांनी मला भरघोस आशीर्वाद दिला. माझे डोळे डबडबले. हे अश्रूच गुरू-शिष्य नात्याचे पवित्र रूप. जे मी अनुभवले. मी प्रा. यशवंत मनोहरांचा सदैव ऋणी आहे आणि राहीन. ''लॉंग लीव्ह, माय द्रोणाचार्य!''

# ११
# सम्यक दृष्टी देणारा प्राज्ञ विचारवंत डॉ. यशवंत मनोहर

■ भदन्त एन. बोधिरत्न नायक थेरो

दुल्लभो पुरिसाजञ्ञो, न सो सब्बत्थ जायति।
यत्थ सो जायति धीरो, तं कुलं सुखमेधति॥

धम्मपदातील या गाथेच्या अन्वयार्थाप्रमाणे म्हणायचे झाल्यास असे म्हणता येईल की, आंबेडकरवादी साहित्याच्या महासागरात यशवंत मनोहर सरांचा जन्म ही एक दुर्लभ अशी घटना आहे. डॉ. यशवंत मनोहर या आंबेडकरी साहित्य नायकाला अभ्यासण्याची संधी मला मिळाली आहे. आंबेडकरी विश्वात बौद्धिक क्रांतीचे प्रतिनिधी कुणीतरी प्रज्ञास्रोत असले पाहिजे. बुद्धमयतेच्या विचारमंथनाची प्रतीत्य समुत्पन्न मीमांसा करणारे महान कर्तृत्वशाली दूरबोधदर्शी डॉ. यशवंत मनोहर द्रष्टाभाव धारण करणारे दूरगामी आंबेडकरी विचाराचे पाठीराखे चिरंतन चिंतनशील प्रतिभेचे एक सशक्त धम्मानुगामी आहेत.

आधुनिक युगाला पूज्य बाबासाहेबांच्या धम्मराज्याची संकल्पना समजावून सांगणारे; समाजमनात बाबासाहेबांच्या बुद्धाची परिभाषा ओजस्वी प्रवाहात आंबेडकरवादाच्या पार्श्वभूमीसह समजावून सांगणारे आणि 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' एक सारतत्त्व या ग्रंथात धम्माचे तत्त्वज्ञान आंबेडकरी जनतेच्या अंतःकरणात कोरणारे महान साहित्यिक ते आहेत. धम्मातील सौंदर्यशास्त्राचा दूरगामी परिणाम मांडणारे सब्बे सत्ताचा आधुनिक पद्धतीने नवा आविष्कार प्रतिपादन करणारे बोधिचित्त आणि विचारवंत म्हणजे डॉ. यशवंत मनोहर.

बौद्ध युगाचा प्रारंभ प्रज्ञा, शील आणि करुणेमुळे होतो. यास्तव या तीन तत्त्वांची सांगड घालणाऱ्या सिद्धांताशी आपण सर्वतोपरी एकनिष्ठ राहिले पाहिजे. हा २२ प्रतिज्ञांमधील धम्म निकष सर्वप्रथम डॉ. यशवंत मनोहरांनी बाबासाहेबांच्या बुद्धधम्मात सांगताना मांडलेला आहे. 'परिवर्तनाचा विचार सांगणाऱ्या बौद्ध भिक्खुला पारंपरिक पोशाखाची गरज काय?' असा प्रश्न मनोहरांनी उपस्थित केला होता. तेव्हा विचारमग्न करणाऱ्या या प्रश्नावर निरुत्तर झाल्यासारखे वाटत होते. पण यात एक धम्मप्रचारक-प्रसारक निर्माण करण्याचा संदेश होता.

१९८९ च्या दरम्यान डॉ. आंबेडकरांच्या बुद्धधम्माचे सारतत्त्व लिहून झाले

होते. यशवंत मनोहरांच्या लेखणीचे तेज त्यातही झळाळतच होते. डॉ. मनोहर जे गुंतागुंतीच्या प्रश्नाचे आकलन करून देत आहेत ते धम्मलिपीचे नवे शोध आहेत. त्यातून उदयास येणारी बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाची शोधज्योत तेवत ठेवण्यासाठी नव्या जाणिवेने आंबेडकरवादाची मांडणी करणारे नवे आयाम म्हणजे प्रज्ञानी कार्यकर्तृत्व होय. आंबेडकरांची आवेशपूर्ण दृष्टी या सृष्टीला धम्मराज्य साकार करू इच्छिते. धम्मक्रांतीच्या दालनात मनोवेधक शैलीचा आविष्कार करताना ते कुणाची अजिबात पर्वा करीत नाहीत. कारण आंबेडकरवादाला दडपणशाहीचे सडा-सारवण नको. तर आधुनिक जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत बाबासाहेबांचा विज्ञाननिष्ठ बुद्धधम्मच जागतिकीकरणाच्या संबंधात जगातील समस्येचे एकमेव उत्तर आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर आंबेडकर चिंतनशीलतेची ज्वलंत प्रक्रिया घडून यावी. या हेतूने त्यांची लेखणी त्यांच्या इतकीच देखणी ठरलेली आहे. ''आम्ही मानतो विष्ठेला विष्ठा, दगडाला दगड, सडक्याला सडके, पशूला पशू, देवाला दगड, आम्ही घाणीला सौंदर्य मानीत नाही.'' किती ओघवती भाषा! या आवेशपूर्ण काव्य भीमायनात त्यांच्या शुद्ध चारित्र्याची मनोहारिता उजागर झाली आहे.

सर्व चकाकणाऱ्या वस्तूंना सोने म्हणत नसतात. सोने हे सोनेच असते. आंबेडकरी चळवळीचे सोने झाले पाहिजे. बौद्ध भिक्खू म्हणून काही धम्म दायाद सन्माननीय असले तरी मला हे सांगितले पाहिजे. भीमशक्तीबरोबर बेइमानी करून शिवशक्तीच्या नशेत तर काही समरसतेच्या कुशीत सुस्तावत चाललेले प्रवाह प्रज्ञानी माणसे सोडून कुठेही उभे ठाकतात. त्यांना बुद्धाच्या भग्नावशेषाबरोबर उद्याच्या आंबेडकरप्रणीत बुद्धाच्या भग्नावशेषाचे गंभीर परिणाम होण्याचे चिंतन का करता येत नाही? त्या चिंतनशील प्रक्रियेतून आपल्या प्रश्नांना वाचा का फोडता येत नाही? चळवळीला निरुत्तर करणारे दायित्व बेजबाबदार झाल्यावर चळवळ विकली जाते. स्वार्थाच्या बाजारात बुद्धाच्या प्रतीत्यसमुत्पादाचे अवमूल्यांकन का होते. या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची गरज आहे. त्यासाठी कार्यकारण स्वीकारणारे यशवंत मनोहर भिक्खू संघाला जवळचे वाटले पाहिजेत.

आपल्या मनाचा स्तर आणि मनात सामावून घेण्यासाठी प्रज्ञेचा स्तर सर्वांनी तपासून पाहिला पाहिजे. चळवळीला पूरक अशा वातावरणाची निर्मिती यशवंत मनोहर करीत आहेत. तेव्हा लौकिक मानसन्मानाची हाव न धरता आपण आपले विवेकज्ञान दृढ केले पाहिजे कारण विद्वानांची संगती शिस्तीसह हिताची शिकवण देते व असभ्य आचरणापासून परावृत्त करते. ती सज्जनात प्रिय होते व दुर्जनात अप्रिय होते असे बुद्ध म्हणतात.

डॉ. मनोहरांच्या मनावर बुद्धाच्या मनोविज्ञानाची जबरदस्त पकड आहे. ते त्यांच्या भोवतालचे नवे प्रज्ञावलय आहे. त्यांचा श्रोतृवर्गावर जबरदस्त प्रभाव आहे. याला त्यांची अखंड ज्ञानसाधना कारणीभूत आहे. एकेक ज्ञानकण एकत्रित करून उपचार साधणारी एकाग्रताच त्यांचा स्थितप्रज्ञ भाव व सद्गुणाचा कळस गाठणारी आहे. पुढच्या येणाऱ्या पिढीला मार्गदर्शक ठरणारी आहे.

दीक्षाभूमीचे स्वप्न मनोहरांना चिंतित करते. तेव्हा भावविभोर होऊन दीक्षाभूमीचे गाणे त्यांच्या हृदयाची क्रांतीज्वाला होऊन ओसंडून वाहू लागते. आणि मनातून हे काव्यभीमायन साकार होते. तेव्हा हा महाकवी म्हणतो-

लेक तू आंबेडकरांची; क्रांतीची तू पाठशाळा
तू विजांचा शस्त्रसाठा; चांदणे तूच; तूच ज्वाळा
तू भीमाईचा कलिजा; संगराचे पत्र तू
तू फुलांची मातृभाषा; नागवंशी आग तू.

अशा चिंतनशील कृतीतून उद्याच्या कार्यशाळेचे गांभीर्य निर्माण व्हावे आणि धम्मक्रांतीची लिपी जनमानसाच्या चित्ती लिहिली जावी असे बहुश्रुत वाणीभूषण कौशल्य डॉ. मनोहर सरांच्या महातेजाचे भांडार ठरले आहे. समता, स्वातंत्र्य व बंधुत्वाचे तेजोमय परिणाम देणारी दिव्य धार सम्यक दृष्टीच्या वाटा निर्माण करते आहे. डॉ. मनोहरांच्या विचारातली समताधिष्ठ पोषकता आंबेडकरी वाटचाल जिवंत ठेवणारी वहिवाट आहे.

डॉ. यशवंत मनोहर हे मराठी साहित्यातील आंबेडकरी अधिष्ठान घेऊन जगणारे; स्वाभिमानी प्रगल्भतेच्या अभिनव प्रज्ञातरूचे बोधिवृक्ष देशभर साकार करण्याची अभिलाषा जोपासणारे साहित्यिक आहेत. बोधिवृक्ष हिरवेकंच व्हावेत; त्याच्या शाखेतून प्रज्ञाफुले पल्लवीत व्हावीत हे यशवंत मनोहरांचे स्वप्न आहे.

डॉ. बाबासाहेबांच्या दूरदृष्टीने आम्ही बुद्धधम्माकडे पाहताना सम्यक दृष्टीचा निकष लावून पाहायला शिकले पाहिजे. सम्यक दृष्टी परिवर्तनाच्या चळवळीची परिभाषा आहे. बुद्धाची चळवळ सम्यक दृष्टीवर आधारलेली आहे. त्यामुळे अमरत्वाला ती नाकारते. आत्मा, परमात्म्याशी मानवी सुख-दुःखाचे संबंध नाकारते. 'बुद्धधम्माचा सार' सांगणारे बुद्धधम्माचे अभ्यासक डॉ. मनोहर बुद्धाच्या धम्माशी जोडले गेलेले जातियवादी नाते नाकारतात. 'अप्पमादेण सम्पादेय' या बुद्धाच्या अंतिम विचारावर अप्रमादी बनून विचरण करा असा बहुमोल संदेश ते देतात. शीलवंताचे प्रमादर होत आचरण करणारा शीलवंत आणि प्रज्ञावंत डॉ. यशवंत मनोहर प्रत्यक्षात तत्त्वज्ञान जगणारा सम्यकदृष्टीचा

परिपाठ आहे असे मला वाटते.

डॉ. बाबासाहेबांच्या दृष्टीसारखी डॉ. मनोहरांची दृष्टी भव्य आहे. जीवनमूल्यांची जीवनदृष्टी असली पाहिजे या तत्त्वशील स्वभावाचे ते पुरस्कर्ते आहेत. निवृत्ती शब्दाला त्यांनी अद्याप स्वीकारलेले नाही. त्यामुळे विद्यापीठातला उत्साह त्यांनी निवृत्तीनंतरही मावळू दिला नाही. त्यांचे मार्गदर्शन अविरतपणे सुरू आहे. त्यांची कार्यशाळा आमच्यासारख्या नवोदितांना उदंड प्रेरणा देणारी अभेद्य कार्यकुशलता ठरावी अशी आहे. साहित्यक्षेत्रातली माणसे घडविण्यामागे त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या स्वयंप्रकाशित कृतीला प्रचंड आदर सन्मान लाभतो आहे. अशा विज्ञपुरुषाचे सान्निध्य उत्कट प्रेरणास्रोत आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

वाङ्मयीन आणि साहित्यसृष्टीतील आदानप्रदान आयुष्यातील दुर्मीळ कमाई आहे. आंबेडकरी विश्वाचे दिग्गज प्रतिभावंत, कवी, साहित्यिक आणि विद्वान बौद्ध भिक्खूंचे आवागमन तर नित्य नेमाने होतच असते.त्यांच्या मार्गदर्शनामुळे धम्मक्रांतीच्या नव्या जाणिवा नव्या वाटेकडे प्रस्थान करतात. प्रा. प्रकाश राठोडांपासून तर अक्रम पठाणांपर्यंत एकापेक्षा एक चारित्र्यवान साहित्यिक ज्ञानवारसा जोपासण्याचे अधिष्ठान पूर्ण करतात. डॉ. मनोहरांचे घर एक कार्यशाळाच ठरलेली आहे. त्यांच्या घरातील वातावरण सामाजिक जाणिवेने ओथंबून वाहणारे नव्हे तर बुद्धमयतेचा वारसा जपणारी माणसे घरातही विहाराचे स्वप्न घेऊन धम्म जगतात. ज्या घरात भिक्खू संघाच्या योग्यतेचा सन्मान मोठ्या डोळसपणे होतो अशा उपलब्धता चांगल्या चित्तप्रवृत्तीमधूनच घडून येतात. डॉ. मनोहर आणि भार्या डॉ. पुष्पलता मनोहर हे दोघेही खरे सौंदर्यशास्त्र जगतात. या मनमोहक अभिव्यक्तीमुळे 'सब्बे सत्ता' सौंदर्यशास्त्र त्यांच्या घरी खऱ्या अर्थाने साकार झालेले आहे. बाबासाहेब आणि माईसाहेब आंबेडकरांची आठवण ओथंबून प्रवाहित होते. डॉ. यशवंत मनोहर व्यासंगी सदाचरणी धमचरणी तसेच भीमाचरणी विचाराचे एक स्मृतिसंपन्न महातेज आहेत. त्यांचा गौरवर्ण, तेजस्वीमुद्रा, धिप्पाड बांधा, सुस्वभावी बैठक, सुभाषितमय वाचा या आगळ्या व्यक्तिमत्त्वाने शोभून दिसणारे सर अत्यंत देखणे लोभस वाटतात. त्याहीपेक्षा प्रचूर प्रमाणात त्यांची वाङ्मयीन जीवनसाधना, मोठ्या प्रमाणात केलेले वाचन आणि लिखाण या चिंतनशील प्रवृत्तीमुळे त्यांच्या जिभेवर वाङ्मयाचे बल धारण करणारे शब्द खेळतात. त्यांना श्रवण करताना लोकही शब्दांची फुले झेलतात. असे हे साहित्यमेरू उभ्या महाराष्ट्राचे भूषण आहेत. असे असताना त्यांना पद्मभूषण अथवा पद्मविभुषण का मिळू नये? त्यांच्या वाङ्मयीन

योगदानामुळे आंबेडकरी साहित्य समृद्धतेच्या सर्वोच्च शिखरावर पोहचले आहे. अखिल भारतीय स्तरावर डॉ. यशवंत मनोहर यांना योग्य तो सन्मान व्हावा; भारत सरकारच्या वतीने राष्ट्राने आणि आंबेडकरी जनतेनेही जीवनगौरव करावा. त्यांच्या कर्तृत्वाचा सर्वोच्च सन्मान देऊन गौरव झाला पाहिजे.

२१ वे शतक आंबेडकरी युगाचे सुवर्णमय शतक आहे. तसेच हे शतक आंबेडकरी साहित्याच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण आहे. कारण या साहित्यातील महत्त्वपूर्ण बौद्धिक लिखाणात डॉ. यशवंत मनोहरांनी डॉ. बाबासाहेबांच्या प्राज्ज्वल्य अशा 'अत्त दीप भव'च्या विद्वत्तेला महाबुद्धाचा नवा आविष्कार दिलेला आहे. हिमालयीन उंचीच्या प्रज्ञासूर्य बाबासाहेबांना बुद्ध घोषित करण्याचे आणि ते सिद्ध करण्याचे अपूर्व प्रयत्न आतापर्यंत कुणीही केलेले नाही. बुद्धाने माराशी झुंज देऊन बुद्धत्व मिळविले. तसेच बुद्धानंतरचे नैष्कर्म, वीर्य आणि शौर्य, शील, सदाचार, नीतिमूल्य, शांतीचे सौंदर्य, प्रज्ञाबल, मैत्रीमूल्य, समता व बंधुत्व केवळ बाबासाहेबांच्या ठायी असल्यामुळे बुद्धानंतरचा महाबुद्ध आणखी कोण असू शकतो?

डॉ. यशवंत मनोहरांच्या बुद्धिप्रामाण्यवादी प्रचूर अभ्यासात आंबेडकरी साहित्य विज्ञाननिष्ठ तर झालेच शिवाय या साहित्यातील नवे उच्चांक गाठणाऱ्या अलीकडच्या नव्या घडामोडींना नवे अभ्यासक्रमही प्राप्त झाले आहे. बुद्ध दाखविण्यासाठी जगाचे डोळे उघडणारा डॉ. आंबेडकर जर नसता तर हरविलेली बुद्धमयता भारताला परत मिळाली नसती. हे सांगताना डॉ. मनोहरांनी न्यायशास्त्र, तर्कशास्त्र आणि माणूसशास्त्राचा अभ्यास आंबेडकरी समाजाच्या पुढ्यात ठेवलेला आहे. प्रबोधनाच्या नव्या दिशेत उत्स्फूर्तपणे संचार करणारे हे धम्मदान आहे. आणि बुद्धाची निर्भयता घेऊन बुद्धमय भारताला अभयदान ठरणार आहे. त्यामुळे तथागत बुद्धासोबत डॉ. आंबेडकर काय म्हणून असावे त्याचेही उत्तर गवसले आहे. या तात्त्विक दृष्टीनेही बुद्धानंतरचा बुद्ध म्हणून आता 'पूजाच पुणनियानं ऐतं मंगल मुत्तमं' पूज्यनियांची पूजा, आदर, सत्कार आणि अभिवादन हृदयाची भाषा झालेली आहे.

देशातली व्यवस्था डॉ. आंबेडकरांना महाबुद्ध घोषित करणारी व्यवस्था झाली पाहिजे. म्हणून महाकवी डॉ. यशवंत मनोहर बाबासाहेबांना महाबुद्ध ठरवतात. या देशातील ब्राह्मणी वर्णव्यवस्था डॉ. आंबेडकरांना बुद्ध बनू देणार नाही. बुद्ध त्याला बनू देतात जो क्षत्रिय आहे. जो कुलीन ब्राह्मण आहे. अशा ब्राह्मणांचा उदो उदो करणाऱ्या जातक कथा बुद्धाला त्याच्या बुद्धत्वापासून कोसो दूर ठेवणारी व्यवस्था आहे. वर्णसूचक विषमता बुद्धविरोधी आहे.

तशीच ती डॉ. आंबेडकरविरोधी आहे. बुद्धत्वाचा अधिकृत अधिकारी तो आहे जो पूर्ण महामानव आहे. इतर नानाविध प्राणी बोधिसत्त्व होतात त्यात मोर, माकड, हत्ती, बैल किंवा हरीण वगैरे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्याविभूषित आधुनिक युगाचे महाज्ञानी आहेत. गौरवशाली कर्तृत्वाचे दुर्लभ तत्त्वज्ञानी आहेत आणि त्यांचे महान तत्त्वज्ञान सांगणारे डॉ. यशवंत मनोहर सम्यक दृष्टीचे पुरस्कर्ते थोर आंबेडकरी प्रतिभेचे नव परिवर्तनवादी ज्ञानपिपासू संशोधक आहेत. त्यांनी केलेले सम्यक स्पष्टीकरणच डॉ. आंबेडकरांचा बुद्धधम्म वाचवू शकेल. महासागराच्या तोडीच्या या विद्यमान ज्ञानालाही गौरव वाटेल असे दुःखमुक्तीचे धम्मदान देणारे बुद्धानंतरचे बुद्ध डॉ. आंबेडकर आहेत; ही उच्चकोटीची ज्ञानमीमांसा डॉ. मनोहरांशिवाय कुणालाही करता आली नसती. डॉ. मनोहरांनी बहुश्रुत प्रज्ञानी सौंदर्याचा वारसा सांभाळलेला आहे.

शाश्वतमूल्यांची जोपासना करणाऱ्या व्यापक जीवनदृष्टीचा संवेदनशील विचार म्हणजे बुद्ध! वितर्क विचाराचे प्रवाह कधीच शांत होत नाहीत. बुद्ध शांती, सत्य याचा आग्रह धरतात आणि जगण्याचे तत्त्व नाकारणाऱ्या आधारभूत व्यवस्थेला नाकारतात. त्यात मानवतेची भलाई शोधतात. चरित्र सुचितेची धम्मनीती काया सुचरित असते. वाचा सुचरित असते. तशीच ती मानस सुचरित असते. डॉ. यशवंत मनोहर कायिक, वाचिक आणि मानसिक शीलाचाराचे नाव आहे.

बुद्धाची करुणा जगाला वाचवेल. पण केव्हा? जेव्हा जग बुद्धाची करुणा पचवेल. जगाच्या अस्थिरतेने मनाला स्थैर्य प्राप्त होत नाही. त्यामुळे आंतरमुख व्हायचे साधन जसे आंतरिक प्रवासाला घेऊन जाते तसेच बाह्य अवडंबराचा बुरूजही बांधावा लागतो. समाजाची एक व्यवस्था असते आणि त्याचे व्यवस्थापनदेखील असते. त्यासाठी धम्म आणि समाज या दृष्टीने काही दायित्व प्रतिपादन करण्याचे कुणीतरी प्रज्ञानी मानस केले पाहिजे. अशा प्रज्ञानी दूरदृष्टीचा सम्यक दृष्टीपूर्ण विचार देणारा वैचारिक लेखक म्हणजे डॉ. यशवंत मनोहर.

बुद्धाची आचारविचार पद्धती समजून घेण्यासाठी आम्हाला वर्णाश्रमात जगणाऱ्या ब्राह्मण आणि बनियागिरीच्या फंदात पडावे लागते हे धम्मक्रांतीच्या पन्नासाव्या वर्षाचे दुःख आहे. आणि ते गिळूनही न पचण्यासारखे आहे. बुद्धाला शरण जातो म्हणणारी ही व्यवस्था बदलविण्याच्या मानसिकतेत समाज भावविमुख झाला पाहिजे असे डॉ. मनोहरांना वाटते. मी बुद्धाला अनुसरतो हे जीवनमान जगणारा तो आंबेडकरी अधिष्ठाता आहे आणि त्या कारणमीमांसेमागे बाबासाहेबांना अभिप्रेत असा बुद्धधम्म जगणारा आणि जगता जगता इतरांना

तो तशाच आचारपद्धतीने सांगणारा धम्मदूत यशवंत मनोहरच आहे. मनोहरांचे व्यक्तिमत्त्व बुद्धाचे मानसशास्त्र फुलविणारे आहे. त्यामुळे मन घेऊन जगणाऱ्या डॉ. मनोहरांना आत्मवादी, ईश्वरवादी, प्रवाहातून वाहणारे इतरही आध्यात्मिक प्रवाह त्यातल्या त्यात आंतरमुख घेऊन वाहणारे काही पोटप्रवाह आध्यात्मिक होण्याचा आग्रह धरीत कधी नकारात्मक अनुगामी असल्याचा तिरस्कार करू शकतील पण डॉ. मनोहरांचे त्रिसरणागमन कदापि विचलित करू शकणार नाहीत. अशा दृढ अधिष्ठानाने स्वाभिमानाचे स्वाभाविक पडसाद त्यांच्या साहित्यनिर्मितीच्या सौंदर्यप्रक्रियेत अधिकच भर टाकणारी त्यांची परखड लेखणी आंबेडकरी विश्वाच्या ज्ञानक्षितिजावर पूज्य बाबासाहेबांच्या अस्मितेचा क्रांतिकारी बुद्ध साहित्यात उभा करण्याची जिज्ञासा घेऊन दूर दूरवर जाणारी सम्यक दृष्टीच ठरणार आहे. जेव्हा बुद्धाने आत्मा नाकारला तेव्हा आत्म्याचे अस्तित्वही नाकारले अन् त्याचवेळी आत्म्याचे अध्यात्महीं नाकारले. ईश्वरवादी निष्ठा घेऊन जगणारे माणसांचे लोंढे बुद्धाकडे आले. आत्मवादी मार्चेही बुद्धाकडे आले. त्यांच्या सामर्थ्यात ते सरणागमनातून फुटले नाहीत. पण आज विपश्यना करणारे फुटीरवादी बुद्धाकडून परत तिथेच येत आहेत. ही सम्यकदृष्टी इथे घायाळ होत असताना यशवंत मनोहर या अस्थिर जगात एकटाच कसा स्थिर होऊ शकतो?

जगाचे वाईटपण त्यांनी कुणाच्या बचावासाठी द्यायचे? स्वतःसाठी ते बोलत नाहीत. ते चळवळीला मारक ठरणाऱ्या अंधार प्रवृत्तीवर बोलतात. या बोलण्यामागचा हेतू प्रकाशधम्माचे राज्य जगात पसरविण्याच्या शुद्ध संकल्पनेचा नवा कार्यकारण आहे. बुद्ध म्हणतात -

> ''यो परिच्चसमुप्पादं पस्सति, सो धम्मं पस्सति
> यो धम्मंपस्साति, सो पटिच्चसमुप्पादं पस्सति''

कारण आज प्रतित्यसमुत्पादाचे अवमूल्यांकन होत आहे. कोण आहेत हे जगाच्या नजरेत सामावून जाणारे अकलेचे तारे? अज्ञानाच्या ताऱ्यांच्या उल्का आंबेडकरी आकाशातून तुटून पडतील एवढे नैसर्गिक सामर्थ्य धम्माला आहे. धम्माचे केंद्रबिंदू मन आहे. मनाचे चित्त विज्ञान सांगणारा विज्ञानवादी प्रतीत्यसमुत्पाद हा कार्यकारण सिद्धान्त आत्मा आणि ईश्वर समाप्त करणारा आहे आणि तेच नेमके पृथकजनांना घडवून आणायचे आहे. यास्तव ही अवमूल्यांकनाची धडपड सुरू आहे. अशा अनिष्टवेळी सम्यक दृष्टी होवून जगणाऱ्या डॉ. मनोहरांची लेखणी आंबेडकरी तेजाच्या ज्वाला घेऊन सळसळत आहे. बुद्धाच्या धम्माला लोक धम्म म्हणून बघू शकतील. धम्म म्हणून जगू शकतील. कारण सांप्रदायिक

प्रवृत्तीचे लोक धम्माचा आग्रह धरणार नाहीत. ते शुद्ध धर्माचा दिंडोरा पिटणाऱ्यांपैकी आहेत. त्या संदर्भात बुद्धमय भारताला उद्याचा धोका संभवतो त्या दृष्टीने सम्यक दृष्टीपूर्ण वक्तव्य करणे तसेच चळवळीचे संगोपन करण्याच्या कार्यपद्धतीचा पुरस्कार करून अप्रामाणिक षडयंत्र चालविणारे चालकमालक स्वार्थलोलुपतेच्या प्रवाहात स्वतः वाहत आहेत. भांडवलदार बनत आहेत. त्यांना आंबेडकरी इंटरनेटची घरफोडी आवडेल. पण डॉ. यशवंत मनोहर सम्यकदृष्टीची कस लावून आहेत. तेव्हा घरच्या महाचोरांना सध्यातरी मूल्यांकनाचे घोटाळे करण्याची किंवा कार्यकारणाच्या सिद्धान्ताविषयीचे अवमूल्यांकन ठरविण्याची प्रत्ययश्रुंखला भारी पडत राहणार आहे. असे हे आंबेडकरी चळवळीचे भूषणावह साहित्यरत्न बुद्धाच्या सम्यकदृष्टीचे नुसते पुरस्कर्ता नाहीत तर ते एक अंतर्मुख अभिव्यक्तीच्या रूपात आंबेडकरी द्रष्टा आहेत. कारण त्यांच्या आंबेडकरी निष्ठेला विपश्यनेचे ढोंग चालत नाही. विपश्यनेचा बाऊ करून जगणारे पलायनवादी विभाजनात्मक बहिर्मुखी प्रतिभेचे तसेच समाजबाह्य सहिष्णुतेचे सर्वधर्मसमभाव पसरविणारे आस्था चॅनेलवाले विशुद्ध ज्ञानाला अज्ञानाशी जोडणारे कुटिल कारस्थानी होऊ नये या शुद्ध हेतूने बुद्धाच्या धम्माला धम्मच म्हणा असा आंबेडकरी विज्ञाननिष्ठ संदेश देणारे आंबेडकरी विचाराचे पाठीराखे डॉ. यशवंत मनोहर आपल्या आंबेडकरी प्रामाणिक निष्ठा जपत आहेत. इतरांनी मात्र आपल्या निष्ठा कुठपर्यंत प्रामाणिक आहेत याचे परिशिलन करण्याची गरज आहे. म्हणून या निष्ठावंत आंबेडकरी अनुगामियाचा मैत्रीबंध नव्या आंबेडकरी जाणिवा विस्तारित करण्याचे आमचे ध्येय पूर्णत्वाच्या अवस्थेला घेऊन जाओ अशा असीम अभिलाषेने ही सम्यक दृष्टी चिरस्थायी होवो अशी मनोमय प्रज्ञादृष्टी चिंतितो.

# १२

# युगसाक्षी साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर

## ▪ डॉ. शैलेंद्र लेंडे

प्रा. डॉ. यशवंत मनोहर हे महाराष्ट्रातील सर्वपरिचित असे नाव आहे. एक प्रखर आंबेडकरवादी कवी आणि विचारवंत या नात्याने ते सर्वज्ञात आहेत. त्यांनी दलित साहित्याला आंबेडकरवादाची सैद्धान्तिक भूमिका आपल्या तत्त्वशुद्ध जडवादी लेखणीद्वारे प्राप्त करून दिली. आंबेडकरवादी मराठी साहित्याची त्यांनी नवमूल्यांच्या साहाय्याने जडणघडण केली. आंबेडकरवादी मराठी साहित्याला मनोहर यांच्या वाङ्मयीन कार्यकर्तृत्वाने अनेक नवे आयाम दिले आहेत. आंबेडकरवादी विचारसरणीला वर्धिष्णू करणारे विचारवंत व नव्या बुद्धिवादी साहित्यशास्त्राची मांडणी करणारे साहित्यसमीक्षक म्हणूनही ते अखिल महाराष्ट्राला ज्ञात आहेत.

आंबेडकरी इहनिष्ठ विचारसूत्रांच्या पायावर त्यांची साहित्यसमीक्षा आकारास आली आहे. आंबेडकरी तत्त्वज्ञानाच्या मूल्यसरणीमुळे त्यांचे वैचारिक लेखन आगळेवेगळे ठरते. एक झंझावाती कवी म्हणून त्यांनी अग्निशिखांचे श्वास हुंकारत मराठी वाङ्मयसृष्टीत प्रवेश केला. कवितेबरोबरच त्यांनी कादंबरी, प्रवासवर्णन, वैचारिक निबंध, समीक्षा हे विविध वाङ्मयप्रकार यशस्वीपणे हाताळले आहेत. या सर्वच वाङ्मयप्रकारांवर त्यांनी स्वतःचा अनोखा ठसा स्वयंभूपणे उमटविला आहे.

यशवंत मनोहर यांचे वाङ्मयीन कार्यकर्तृत्व हे सर्वव्यापक व सर्वस्पर्शी स्वरूपाचे आहे. त्यांनी आंबेडकरी साहित्यपरंपरेला समृद्ध केले असे नव्हे तर अखिल मराठी साहित्यविश्वास नवे तेजोभान प्राप्त करून दिले आहे. मराठी वाङ्मयाच्या मध्यप्रवाहास दिग्दर्शन करण्याचे सामर्थ्य मनोहरांच्या लेखणीत ओतप्रोत भरलेले आहे. मानवी समाजजीवनाशी संबंधित असणाऱ्या सर्वच विषयांना त्यांनी स्पर्श केला आहे. त्या त्या विषयांच्या अंगोपांगांचे सत्वसत्यही अभिव्यक्त केले आहे. मनोहरांचे हे सत्वसत्य प्रगट करणारे वाङ्मयलेखन अत्यंत आकर्षक स्वरूपाचे आहे. या वाङ्मयलेखनातून त्यांचे नितळ अंतरंग सर्व सामर्थ्यानिशी प्रगट होते. मनोहर यांच्या ध्येयवादी व सर्वांगसुंदर व्यक्तिमत्त्वाचे दर्शन या वाङ्मयलेखनामधून तितक्याच मूल्यभावाने अभिव्यक्त होते.

प्रज्ञा आणि प्रतिभा यांचा अनोखा संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला आहे. या सर्वस्पर्शी प्रज्ञा-प्रतिभेच्या बळावर त्यांनी मराठी वाङ्मयालाच नव्हे

तर महाराष्ट्रीय वैचारिकतेलाही अन्वर्थक वळण दिले. त्यांनी आपल्या लेखनामधून मराठी समाजाचे अव्याहतपणे प्रबोधन केले. त्यांनी केलेले हे समाजप्रबोधन अनन्यसाधारण स्वरूपाचे मानावे लागते. आज यशवंत मनोहरांना वगळून मराठी वाङ्मयसृष्टीचा तसेच महाराष्ट्रीय समाजविकासाचा इतिहास परिपूर्ण होऊ शकत नाही. हे स्वच्छपणे नमूद करावे लागते. त्यांनी ज्या ज्या विषयाला स्पर्श केला, त्या त्या विषयातील आशय नव्या जीवनजाणिवांनी झळाळून निघाला. त्यांच्या व्यक्तित्वाची व कार्यकर्तृत्वाची विविध अंगोपांगे म्हणजे ऊर्जस्वल चिंतन-मननाची स्वतंत्र अभ्यासक्षेत्रे ठरतात.

यशवंत मनोहर हे मराठीतील युगसाक्षी साहित्यिक आहेत. ते अभिनव युगाची निर्मिती करणारे साहित्यिक आहेत. मराठीतील प्रकाशपूजक साहित्याचा वारसा त्यांनी अधिकाधिक नित्यनूतन आणि तेजःपुंज केलेला आहे. मनोहर हे मराठीतील चिरतरुण व चिरंजीवी लेखक आहेत. मागील चाळीस-पन्नास वर्षांपासून ते सतत लेखन करीत आहेत. हे लेखन कालपरत्वे क्षीण न होता दिवसेंदिवस अधिकाधिकपणे फुलारून येत आहे. मनोहरांनी ज्या काळात वाङ्मयलेखन सुरू केले, त्या पिढीतील बहुतेक लेखकमंडळी पुढे थांबली. त्या काळातील बरेचसे लेखक आज जागेवरच थबकलेले आहेत. तर काही विस्मृतीच्या पडद्याआडही गेले आहेत. यशवंत मनोहर मात्र वाङ्मयलेखनामध्ये उत्तरोत्तर पुढे जात आहेत व आंबेडकरवादी समाजासही पुढे पुढेच नेत आहेत. मनोहरांचे हे वाङ्मयीन कर्तृत्व जितके यशवंत आणि मनःपूत तितकेच मनोहारीही आहे.

यशवंत मनोहरांनी विपुल वाङ्मयलेखन केले आहे. त्यांचे हे वाङ्मयलेखन वैविध्यपूर्ण तसेच विविध विषयस्पर्शी स्वरूपाचे आहे. त्यांनी आजमितीस चाळीस एक ग्रंथाचे लेखन केले आहे. तसेच त्यांची पंधरा पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. मनोहरांची ही मुबलक प्रमाणातील ग्रंथसंख्या केवळ संख्यात्मक दृष्टीने महत्त्वाची नाही. तर गुणात्मक दृष्टीनेही ती तितकीच महत्त्वाची आहे. त्यांचे हे लेखन विविध वाङ्मयप्रकार लीलया हाताळणारे आहे. कविता, वैचारिक, निबंध, समीक्षा, प्रवासवर्णन, कादंबरी, पत्रलेखन असे विविधांगी लेखन करून या लेखनास त्यांनी जीवननिष्ठ प्रतिमा प्राप्त करून दिली. त्यांचे समग्र वाङ्मयलेखन समकालीन समाजवास्तवाला जिवंतपणे भिडते व वास्तवाला आदर्श समाजरचनेमध्ये परिवर्तीत करण्याचा निकराने प्रयत्न करते.

मनोहरांचे समग्र वाङ्मयलेखन महाराष्ट्राच्या वाङ्मयीन व सामाजिक इतिहासात विशेष मौलिक ठरले आहे. या मौलिकतेचे कारण त्यांच्या अनन्यसाधारण स्वरूपाच्या वैचारिक ध्येयदृष्टीत दडलेले आहे. मनोहरांनी वैचारिक ध्येयदृष्टी ही शास्त्रशुद्ध व तत्त्वनिष्ठ स्वरूपाची आहे. ते जीवनवादी विचारवंत आहेत. आंबेडकरवादी

तत्त्वज्ञ आहेत. आंबेडकरी तत्त्वज्ञानावर त्यांचे भरणपोषण झाले आहे. व या आंबेडकरवादाचेही त्यांनी आपल्या सिद्धहस्त लेखणीद्वारे भरणपोषण केले आहे. साहित्यातील लालित्याकडे आणि वैचारिकतेकडे ते आंबेडकरी मूलदृष्टीतून पाहतात. आधुनिक विचारांच्या आधारे समाजात नवमूल्ये संक्रांत करता येतात यावर त्यांचा अपार विश्वास आहे. हा विश्वास भावनात्मक स्वरूपाचा नाही तर त्यामागे त्यांची निश्चित व सुसंगत अशी इहवादी, लोकशाहीनिष्ठ जीवनदृष्टी आहे. ही वैचारिक जीवनदृष्टी त्यांच्या अथक अखंड अभ्यासातून तसेच अव्याहत चिंतन मननातून स्फुरलेली आहे. या नवविचारदृष्टीवर त्यांचे वाङ्मयलेखन नवयुगांच्या निर्मितीची प्रक्रिया सर्वांगसुंदरपणे अभिव्यक्त करू शकते.

मनोहरांनी अनेकानेक वाङ्मयप्रकार समर्थपणे हाताळले असले तरी त्यांचा मूळ पिंड हा कवीचा आहे. 'उत्थानगुंफा' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह होय. त्यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक चिंतनकाव्य' व 'मूर्तिभंजन' हे काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले. अलीकडेच त्यांचे 'जीवनायन', 'प्रतीक्षायन', 'अग्नीचा आदिबंध' आणि 'स्वप्नसंहिता' हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'उत्थानगुंफा' ते 'प्रतीक्षायन' असा हा मनोहरांचा मागील पंचवीस तीस वर्षातील सहा संग्रहांचा काव्यप्रवास आहे. हा काव्यप्रवास त्यांच्या उत्तरोत्तर प्रगल्भ परिणतप्रज्ञ होत जाणाऱ्या वादळी व्यक्तिमत्त्वाचा प्रवास होय. येथून पुढे मी सूर्यकुलाची लागवड करणार आहे आणि तुमच्या नांगरलेल्या ओठातून, ज्वालांचे जळते पीक घेणार आहे. अशी ज्वलज्जहाल गर्जना करीत या कवीने सत्तरीच्या दशकातील मराठी कवितेवर आपली अमीट नाममुद्रा उठवली.

'जीवनायन' या काव्यसंग्रहाच्या रूपातून त्यांची काव्यविषयक कामगिरी यशोशिखरावर पोहोचल्याचे दिसून येते. 'सूर्य पेरतो काव्य महीवर', 'हवेस देतो फुले स्वरांची', 'सूर्य जन्मतो माझ्या पोटी', 'अशी संतती मी सूर्याची' ही सूर्यसाक्षी जाणीव प्रगट करीत ते व्यापक, विस्तीर्ण समाजजीवनायन आविष्कृत करतात. मनोहरांची ही एकूणच कविता नवकाव्योत्तर कवितेला नवीन अन्वर्थक दिशा देणारी आहे. 'यशवंत मनोहर' मराठीतील नवकाव्योत्तर कवितेतील निःसंशय महत्त्वाचे कवी आहेत. हा वसंत आबाजी डहाके यांचा अभिप्राय मनोहरांचे नवकाव्योत्तर सामर्थ्य अधोरेखित करतो.

मनोहरांचे समीक्षालेखन त्यांचा कवितेइतकेच अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांचे समीक्षालेखन, आंबेडकरी साहित्याबरोबरच संपूर्ण मराठी साहित्यसमीक्षेला समृद्ध करणारे ठरले आहे. त्यांनी एकूण पंधरा समीक्षाग्रंथांचे लेखन केले आहे. 'दलित साहित्य : सिद्धान्त आणि स्वरूप', 'स्वाद आणि चिकित्सा' यासारख्या ग्रंथापासून त्यांनी समीक्षाविचारास सुरुवात केली. त्यांचा हा समीक्षाप्रवास

आंबेडकरवादी मराठी साहित्य, युगसाक्षी या साहित्यासारख्या ग्रंथापर्यंत नित्यनूतन स्वरूपात येऊन पोहोचला आहे. मनोहरांची साहित्यसमीक्षा एकूणच मराठी समीक्षेमध्ये टप्प्याची मानावी लागते. त्यांनी पारंपरिक व प्रस्थापित समीक्षाविचारांचे सडेतोड व साक्षेपी मूल्यांकन केले. पारंपरिक व गतानुगतिक साहित्यशास्त्रास ते नकार देतात व पर्यायी नव्या साहित्यशास्त्राची मांडणी 'नवे साहित्यशास्त्र' आणि 'बुद्धिवादी सौंदर्यशास्त्र' या ग्रंथांमधून करतात.

मनोहरांनी नव्या साहित्यशास्त्राची केलेली निर्मिती ही समीक्षाक्षेत्रातील लक्षणीय व महनीय घटनाकृती मानावी लागते. त्यांचे नवे साहित्यशास्त्र हे बुद्धिवादी व इहवादी साहित्यशास्त्र आहे. इहवाद, सामाजिक न्याय व बुद्धिवाद यांच्या पायावर ते जीवनवादी सौंदर्यशास्त्राची उभारणी करतात. आंबेडकरी जीवनमूल्यामधून ते अभिनव सौंदर्यमूल्यांच्या नव्या युगसाक्षी साहित्यसमीक्षेची निर्मिती करतात. मनोहरांचे हे समीक्षालेखन महाराष्ट्रीय समीक्षाप्रांतात अनन्यसाधारण व अपवादभूत स्वरूपाचे मानावे लागते.

मनोहरांनी समीक्षेबरोबरच महत्त्वपूर्ण विचारग्रंथाचे लेखन केले आहे. त्यांचे वैचारिक निबंधलेखन अत्यंत मूल्यगर्भ स्वरूपाचे मानावे लागते. त्यांनी आजमितीस एकवीस वैचारिक निबंधग्रंथाचे लेखन केले आहे. डॉ. आंबेडकरांचा बुद्धधम्म, प्रबोधनविचार, डॉ. आंबेडकर एक शक्तिवेध, बुद्ध आणि त्याचा धम्मःसारतत्त्व यासारखे मौलिक निबंधग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. मनोहरांनी आपल्या वैचारिक निबंधामधून नवविचारांच्या अनेकविध छटा त्यांच्या विविधांगी ताणतणावासह विश्लेषित केलेल्या आहेत. ते आपल्या निबंधलेखनामधून अभूतपूर्व स्वरूपाचे मूल्यमंथन आकारास आणतात. विचारसंघर्ष हा त्यांच्या निबंधलेखनाचा गाभा होय. त्यांचे हे विचारचिंतन कधी धर्मचिंतनाच्या, कधी समाजचिंतनाच्या, कधी राजकीयचिंतनाच्या, तर कधी शिक्षणचिंतनाच्या रूपातून मुखर होते.

समकालीन मराठी विचारविश्वामध्ये मनोहरांचा वैचारिक निबंध ऐतिहासिक स्वरूपाचा ठरतो. आशय आणि आकृती या दोन्ही दृष्टींनी हा वैचारिक निबंध आगळावेगळा आहे. या निबंधाचे आशयत्व परिवर्तनशील जीवनजाणिवांनी व समाजक्रांतीच्या विचारसूत्रांनी मुसमुसलेले आहे. या निबंधामधून त्यांचे अपार बुद्धिवैभव, चतुरस्र चिंतनशीलता, तर्कशुद्ध अभ्यासपूर्णता व भावना आणि विचार यांच्यातील तादात्म्यता सुरेखपणे साक्षांकित होते. मनोहरांचा हा वैचारिक निबंध लोकहितवादी, फुले, आगरकर, आंबेडकर या बुद्धिप्रामाण्यवादी विचारधारेस समृद्ध व नित्यनूतन करणारा निबंध आहे. महाराष्ट्रीय प्रबोधनाचा इतिहास लिहिणाऱ्या कोणत्याही अभ्यासकाला या वैचारिक निबंधास टाळून पुढे जाता येणे शक्य नाही.

यशवंत मनोहरांचे ललित लेखन त्यांच्या वैचारिक लेखनाइतकेच वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांनी 'रमाई' या नितांत रमणीय कादंबरीचे लेखन केले आहे. त्यांची ही कादंबरी समग्र कादंबरीविश्वातील एक आकर्षक व लोकप्रिय कादंबरी मानावी लागते. मातृहृदयी अंतःकरणातून ते रमाईचे कारुण्याने थबथबलेले जीवनचरित्र रेखाटतात. आसवांच्या पायघड्या अंथरणारी ही कादंबरी वाचकांस काळजाच्या कोपऱ्यापासून हलवून सोडते. आंबेडकरी कादंबरी विश्वात ही कादंबरी अजोड स्वरूपाची मानावी लागते. मनोहरांनी 'स्मरणांची कारंजी' हे बेमिसाल प्रवासवर्णन लिहिले आहे. त्यांचे हे समिधारूपी प्रवासवर्णन विलक्षण पारदर्शक व भावकोमल स्वरूपाचे आहे. सुमधुर साहित्याचा व तरल भावकाव्यात्मतेचा हा स्मरणथवा वाचकांना त्यामध्ये आर्द्र आर्द्र करून सोडतात. 'पत्रप्राजक्त' हा मनोहरांचा पत्रसंग्रह मराठी पत्रसाहित्यातील अत्यंत आकर्षक व वाचनीय आविष्कार मानावा लागतो. त्यांची पत्रे ही नावाप्रमाणेच पत्रप्राजक्तच आहेत. भावकोमलतेच्या दंवाने आणि नवविचारांच्या दीप्तीने मुसमुसलेला हा पत्रप्राजक्त अवर्णनीय स्वरूपाचा ठरतो. मनोहरांचा हा भावनाशील व विचारपरिपूर्ण स्वरूपाचा जागरूक, जागृत हृदयसंवाद मराठी वाङ्मयसृष्टीत अनन्यसाधारण ठरतो.

यशवंत मनोहर यांचे समग्र वाङ्मयलेखन विलक्षण प्रबोधनकारी आहे. त्यांचे वाङ्मयलेखन म्हणजे आंबेडकरी विचारक्षमतेचा महाराष्ट्रातील सर्वोत्तम नमुना होय. जडवादी, विज्ञानवादी, समताधिष्ठीत प्रगतीत्वाचा त्यांनी निःसंदिग्धपणे केलेला आविष्कार आजच्या कालखंडात मोठा अन्वर्थक ठरतो. समकालीन मराठी विचारशीलतेमध्ये त्यांच्यासारखी सुसंपन्न, सुसंघटित व सुसंगत वैचारिक जीवननिष्ठा अपवादानेच दिसून येते. त्यांची ही जीवननिष्ठा अत्याधुनिकच नव्हे तर उत्तर आधुनिकतेच्या मूल्यांनाही कवेत घेणारी आहे. नवसाहित्याच्या पुढील टप्प्याचे ते समर्थ व प्रभावी भाष्यकार ठरतात. मनोहरांच्या वाङ्मयीन लेखनाने नवीन आदर्श समाजरचनेचे प्रारूप महाराष्ट्रीय वाचकांसमोर ठेवले. त्यांच्या लेखनाने मराठी समाजाला प्रगतीशील गती दिली व समताधिष्ठित नीतीही दिली. त्यांचे समग्र लेखन महाराष्ट्रीय समाजजीवनास परिवर्तनशीलतेची नवी दिशा व दीक्षा देणारे लेखन आहे. आजच्या या मूल्यऱ्हासाच्या व तत्त्वच्युतीच्या कालखंडात दीपस्तंभाप्रमाणे प्रकाशमान असणारे मनोहरांचे वाङ्मयलेखन अधिकच मौलिक ठरते. मनोहरांच्या या प्रबोधनकारी वाङ्मयलेखनामधून नवीन युगाचे समताधिष्ठित महन्मंगल स्वप्न सुरेखपणे साक्षांकित होते.

सम्राट, २६ मार्च २००४

१३

# डॉ. यशवंत मनोहरांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व

## ■ डॉ. वासुदेव डहाके

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्म परिवर्तनाने महाराष्ट्रीय जीवनात एका अभूतपूर्व क्रांतीपर्वाला सुरुवात झाली. केवळ बौद्ध धम्माचेच नव्हे तर भारतीय जीवनाचेच चक्र या निमित्ताने प्रवर्तित झाले. धर्मांधतेने स्थिरपद झालेले समाजघटक अंतर्मुख बनून जीवन समृद्धीच्या नव्या वाटांचा अवलंब करू लागले. जुनी जळमटे दूर सारून मानवी मूल्यांच्या स्वागतार्थ प्रत्येक जण सिद्ध झाला. या निमित्ताने दलित, शोषितांना, विमुक्त, आदिवासी व भटक्यांना जीवनाचे नवे तत्त्वज्ञान गवसले. समता स्वातंत्र्यादी मूल्यांचे आणि स्वत्वाचे त्यांना भान आले. एका नव्या अस्मितेला बाबांनी जन्म दिला आणि कालपर्यंतची मूक मने शब्दांची धनी बनली. धर्मसत्ता, जुलूमशाही, सामाजिक गुलामगिरी, अन्याय अस्पृश्यता कर्मविपाक, अध्यात्म या पारंपरिक शोषणाच्याविरुद्ध त्यांनी तुंबळ युद्ध आरंभिले. तमाम दलित समूहात मुक्तीचे मन्वंतर घडले.

साहित्यक्षेत्रीही याचे दूरगामी परिणाम झाले. समता, स्वातंत्र्य, बंधुता, विज्ञाननिष्ठा व न्याय यांना शिरोधार्य मानणारे दलित साहित्य याच प्रेरणेचे फळ. नवबौद्धांपासून भटक्या, आदिवासीपर्यंतच्या उपेक्षित माणसाला या साहित्याने प्रेमाने कवेत घेतले. आंबेडकरी विचारांशी बांधिलकी पत्करून दलितांचा हा काफिला प्रबोधनाचा वाटसरू झाला. नव्या मन्वंराची ही नांदी ठरली. आजवरच्या मराठी साहित्याला अनोळखी असलेले अफाट जग साहित्यात प्रकटू लागले आणि सर्वच जुन्या मूल्यांना मूठमाती मिळू लागली. युगायुगाची अंधारवाहके प्रकाशाची धनी बनली. जडवादाच्या नौबती झडू लागल्या. यापुढे परलोकवादी व अध्यात्मविचार पराभूत होऊ लागला. विशिष्टांच्या भोवती रिंगण घेत सुटलेले मराठी साहित्य परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करू लागले.

फुले-आंबेडकरी विचारांचा वसा घेतलेल्या या साहित्यामुळे प्रबोधन, परिवर्तन, बुद्धिवाद, जडवाद, नास्तिक्य, मानवता, विज्ञाननिष्ठा, लोकशाही आदि मूल्यांना बहर येऊ लागला. जे साहित्य स्वतःला परिवर्तनवादी समजते, त्या विचारसरणीचे सहचर बनले. व त्या परंपरेचा वसा परिवर्तनवादी विचारांनी व विचारवंतांनी सातत्याने जपला. म्हणूनच महात्मा फुले, प्राचार्य आगरकर, छत्रपती शाहू

महाराज, डॉ. आंबेडकर आदी जडवाद्यांची विचारपताका हा परिवर्तनवादी विचारवंत स्वाभिमानाने खांद्यावर वागवीत असतो. त्यासाठी पंपरेच्या प्रेतावर त्याचे तांडव चालते. प्रतिगाम्यांच्या कबरी बांधत वांझोट्या संस्कृतीचे बुरखे तो बेदरकारपणे फाडत असतो. तृप्त पोटाने 'गालावरचा चंद्र' न्याहाळण्यात मश्गूल झालेल्या कलावाद्यांना त्यांचा विरोध असतो. स्वत्व विसरून जीवनातल्या दुःखांशी काडीमोड घेऊ पाहणाऱ्या अस्तित्ववाद्यांशी त्यांचे वैर असते. देव, दैवाच्या, अध्यात्म, बुवाबाजीच्या भंपक विचारांना त्यांनी कायम तिलांजली दिलेली असते. असा विचारवंत प्रबोधनाचा पुत असतो. नव्या युगाचा शिल्पकार असतो. याच विचारांचा वसा घेऊन डॉ. यशवंत मनोहर साहित्याच्या बिऱ्हाडी रुजू झाले. गर्भदारिद्र्याच्या हिडीस जखमांनी मन चिंधीचोळा झालेले. अस्पृश्यतेच्या अनुभवांनी विदीर्ण झालेले. विषमतेच्या झंझावातात अस्तित्वच पणाला लागलेले आणि या साऱ्यांवर मात करून आंबेडकरी विचारांची लूकाठी (मशाल) हाती घेऊन अंधार खोदायला आसुसलेले त्यांचे अतीव संवेदनशील तेवढेच विद्रोही मन. जुनी जळमटं भिरकावून अंधाराच्या गावात प्रबोधनाचे घर बांधणारे त्यांचे सर्जनशील मन आणि प्रलयंकारी विद्रोहाने पेटता पेटता नव्या समाजासाठी, उमंग भरल्या मनाने उत्थानाच्या गुंफा खोदण्याचे त्यांनी घेतलेले सतीचे वाण. सारेच या व्यक्तिमत्त्वाशी निगडित. पूर्वानुभवांच्या भळभळत्या जखमांवर निषेधांच्या फुल्या मारीत त्यांचे वाङ्मयीन व्यक्तित्व साकारले आहे. त्याला विद्रोहाची सूर्यफुले लागली आहेत. प्रगती, परिवर्तन, विज्ञाननिष्ठा, लोकशाही या मूल्यांनी ते समृद्ध बनले आहेत. इहवादाचा त्याला सदासर्वकाळ बहर येतो आणि समष्टीच्या मुक्तीची गीते ते गात सुटतात. या पार्श्वभूमीवर डॉ. यशवंत मनोहरांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व वटवृक्षासारखे विशाल होऊ पहाते आहे. काळाच्या उदरात आपल्या पारंब्या खोलवर रुजविण्याची त्यांची ताकद, त्यासाठी उभारलेली झुंज आणि विजयाची शाश्वती यामुळे त्यांच्या वाङ्मयाला आगळी नजाकत प्राप्त झाली आहे. साहित्याच्या विविध प्रांतात त्यांचे आज चाललेले तांडव म्हणजे मानवतेच्या मुक्तीची अनेकरूपी नौबत आहे. यात शंका नाही. त्या दृष्टीने 'उत्थानगुंफा' ते 'प्रबोधन विचार' या प्रवासातील यशवंत मनोहरांची बहुमुखी प्रतिभा आपणास साद घालत राहते.

## विद्रोही कवी

उपरोल्लेखित विचारांचे डॉ. मनोहर खंदे पुरस्कर्ते आहेत. त्यांचे पडसाद त्यांच्या साऱ्याच साहित्यकृतीत उमटलेले दिसतात. जीवनवादाच्या भक्कम पायावर त्यांचे साहित्य उभे आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व विज्ञाननिष्ठा

हा त्या साहित्याचा आत्मा. धर्मपरंपरेतील वर्णव्यवस्था, कर्मविपाक आणि तथाकथित स्थितीशीलता या विरुद्ध लढण्यासाठी विद्रोहाचे धारदार शस्त्र त्यांनी हाताळले. मनोहरांसारखा विद्रोही कवी मराठी साहित्यात दुसरा सांगता येणार नाही. विद्रोही परंपरेत केशवसुतांनंतर यशवंत मनोहर या नावाचा विशेष दबदबा मराठी काव्यविश्वात निर्माण झाला. १९७६ साली प्रसिद्ध झालेला 'उत्थानगुंफा' हा कवितासंग्रह त्याचा साक्षीदार आहे. 'कालच्या पावसाने' अवर्षणाने ज्यांच्या जीवनाची होळी झाली त्या कंगाल उपेक्षितांचा दुःखी हुंकार म्हणजे 'उत्थानगुंफा'. लुटल्या गेलेल्या उद्ध्वस्त मनाचा रक्तलांच्छित इतिहास म्हणजे उत्थानगुंफा. उत्थानगुंफा म्हणजे दलित, शोषित, पीडितांचा पिढ्यानूपिढ्यांच्या गुलामीचा दुःखपट. आसवांच्या अग्निफुलांनी लिहिलेला. ही अग्निफुलेच त्यांच्या विद्रोहाचा आद्याविष्कार आहे. त्या आविष्काराला फुले आंबेडकरांच्या विचारांचे तेजस्वी अधिष्ठान आहे. त्याचमुळे त्यांच्या कवितेत टिपेला पोचलेल्या दुःखी मनाचा प्रत्यय येत असला तरी दुःख चिवडणे त्यांना अमान्य असते. कारण मनावरील राखेइतकेच मनातील ठिणगीचेही भान या कवीने जपले आहे आणि ही ठिणगी दावानलात कधी परिवर्तीत होते हे कदाचित त्यांच्याही ध्यानात येत नसेल. तो एकदाचा भडकला की त्याला प्रत्यक्ष मनोहरही थोपवू शकणार नाहीत एवढा तो प्रलयंकारी असतो. विद्रोहाची अग्निवस्त्रे परिधान केलेला त्यांच्यातला कवी सनातनी विचारांशी, कर्मविपाक, अध्यात्म, परलोक, परमेश्वर, कलावाद, दैववाद, अलौकिकवाद, स्थितीवाद यांच्याशी निकराची झुंज देतो. परंपरेवर नकारफुल्या मारीत बुद्धिवादावर आधारित, समताधिष्ठित विज्ञाननिष्ठ समाजनिर्मितीची रम्य स्वप्ने तो पाहतो. 'जुने जाऊ द्या मरणालागुनी' म्हणत म्हणत 'नवे येऊ द्या जन्मा लागुनी'चे तो स्वागत करतो. मनोहरांतला कवी बेभान होऊन संगर गाजवीत असला तरी त्याचे विवेकभान लोपत नाही. आपल्या पूर्वसुरींनी टाकलेली जबाबदारी शांत माथ्याने तो पार पाडतो. प्रबोधनाच्या पायथ्याशी प्रतिगाम्यांनी पेरलेल्या सुरुंगाचीही तो चाहूल घेतो. पुढील प्रदेश काबीज करताना मागील भाग शत्रुंनी गिळंकृत करू नये याचीही नाकेबंदी या कवीलाच करावी लागते. हे पाहत असताना कवी मनोहर आणि माणूस यशवंत मनोहर याचा सांधा जुळतच नाही. मोकळ्या गप्पा मारताना उत्स्फूर्त विनोदांची कारंजी सोडणारे मनोहर, पूर्वानुभवात शिरल्यानंतर अधूनमधून डोळे टिपणारे मनोहर, अपार मायेने विद्यार्थ्यांवर प्रेम करणारे मनोहर, पुष्पाताईंवर एखादी कोटी करून हसणारे-हसवून सोडणारे नेहमीचे डॉ. यशवंत मनोहर कवितेच्या युद्धभूमीवर कुठेच दिसत नाहीत. इथे त्यांच्यातला कवी त्यांच्यावर सतत

मात करीत राहतो. त्यामुळेच 'आम्ही झालो गुंफा उत्थानाच्या' असा कृतार्थ सूर उमटत असतानाच 'भणंगांनो आता काढू नका गळा' हे निर्वाणीचे बोलही त्यातूनच उमटतात. मनोहरांच्या कवितेचे हे रूप मोठे मनोहारी आहे. वादळ पचवून लाटांचे सौम्य स्मित करणाऱ्या धीर गंभीर सागराचा तो मनस्वी प्रत्यय वाटतो. इथे आक्रस्ताळेपणा नाही, वखवख नाही, कुणाचा तिरस्कार नाही की ताबा सुटलेला पराकोटीचा राग नाही. त्यांच्या चिंतनशील मनाचे ते प्रत्यंतर असते. 'मूर्तिभंजन'मधील काही कविता व मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या काही कविता मनोहरांच्या विद्रोहाला नवे आयाम प्राप्त करून देतील असे वाटते. असे झाले तर मराठी कवितेची कोंडी पुन्हा एकदा मनोहरच फोडतील यात शंका नाही.

कवी यशवंत मनोहरांनी मराठी कवितेला अभिनव विद्रोहाची देणगी दिली. पुरोगामित्वाचे अनोखे आयाम प्राप्त करून दिले. फुले-आंबेडकरी विचारांची बांधिलकी मानणाऱ्या कवींची उमंगभरली पिढी उत्थानगुंफेने निर्माण केली. पहिल्या पिढीतील काही मान्यवर दलित कवी आज तडजोडवादी बनून आपल्या बांधिलकीपासून ढळत असल्याचा प्रत्यय येतो. डॉ. मनोहरांचेबाबत अजूनतरी तसे आढळले नाही. मराठीला वैचारिक कवितेची समृद्धता मनोहरांनी पहिल्यांदा प्राप्त करून दिली. हे सत्य कोणताही जाणकार नाकारू शकणार नाही.

## समीक्षक मनोहर

'दलित साहित्य : सिद्धान्त आणि स्वरूप', 'स्वाद आणि चिकित्सा', 'साहित्य आणि बांधिलकी' या ग्रंथांनी महाराष्ट्राला मनोहरांची समीक्षक म्हणून ओळख झाली. तर 'बाळ सीताराम मर्ढेकर', 'साहित्य बांधिलकी आणि विद्रोह', 'दलित साहित्य चिंतन' या ग्रंथांनी त्यांच्यातल्या प्रबोधनवादी जीवननिष्ठ समीक्षकाला मानाचे पान मिळाले. विद्रोही कवी म्हणून गौरव पावलेल्या मनोहरांनी समीक्षाक्षेत्रातही आपले स्वतंत्र दालन उभारले. त्यांची समीक्षा परंपरावादी, कलावादी नि चिद्विलासवादी समीक्षेला मूठमाती देणारी ठरली. मराठी साहित्यातील भोंगळ कल्पनांशी, हिंदू तत्त्वज्ञानातील मायावी विचारांशी तसेच चातुर्वर्ण्य व प्रतिगामित्व यांच्याशी निकराची झुंज देऊन त्यांनी मराठीला बुद्धिवादी समीक्षा दिली.

मनोहर कमालीचे नास्तिक आहेत. आपल्या नास्तिक्याशी त्यांनी आजवरतरी तडजोड केली नाही. हेही त्यांच्या समीक्षेचे एक परिमाण ठरते. शास्त्रकाट्याच्या कसोटीवर आपल्या सखोल चिंतनातून आणि उदंड व्यासंगातून त्यांची समीक्षा भक्कमपणे उभी आहे. फुले, आंबेडकर, बुद्ध, मार्क्स, कामू हे त्यांच्या

समीक्षाविचारांचे आद्य उद्‌गाते आहेत. परंपरावादी समीक्षेला मनोहर हे एक आव्हान आहे. साहित्याच्या बाजारपेठेत जाती व वर्णश्रेष्ठत्वाचे जोरावर ज्यांनी आजवर फड जिंकले नि आपली मिरासदारी प्रस्थापित केली, अशा मर्ढेकरादिक कवी व विचारवंतांचा त्यांनी परखड समाचार घेऊन त्यांच्या साहित्यातील सत्य समाजापुढे मांडले. मनोहरांनी विद्रोहाची मीमांसा मांडली. विद्रोहाची आवश्यकता कथन केली. एवढेच नव्हे तर समाज परिवर्तनासाठी व दलित-शोषितांच्या सर्वांगीण मुक्तीसाठी विद्रोहाचे महत्त्व त्यांनी मराठी माणसाला पहिल्यांदा समजावून सांगितले. त्यामुळे आंबेडकरवादी समीक्षेच्याच नव्हे तर मराठी जीवनवादी तसेच प्रबोधनवादी साहित्य समीक्षेच्या इतिहासात डॉ. यशवंत मनोहरांचे स्वतंत्र स्थान राहील यात शंका नाही.

## सर्जनशील संशोधक

संशोधनाचे क्षेत्रातही मनोहर मागे नाहीत. त्यांची समीक्षा हे पुढल्या प्रबंधाचे लघुरूप असते. 'दलित साहित्य : सिद्धान्त आणि स्वरूप', 'बाळ सीताराम मर्ढेकर' आणि विद्वत सभेपुढे वेळोवेळी त्यांनी सादर केलेले शोधनिबंध व विविध व्यासपीठावरील भाषणे म्हणजे संशोधनपूर्ण चिंतन व व्यासंगाचाच अनुभव असतो. 'केशवसुत आणि मर्ढेकर' हा त्यांचा पीएच.डी.चा प्रबंध. प्रस्तुत प्रबंधातून केशवसुत आणि मर्ढेकर यांच्या कवितेचा वेगळ्या दृष्टिकोनातून त्यांनी तौलनिक अभ्यास केला आहे. त्यांच्या संशोधनाचे वैशिष्ट्य असे की, इथे स्वतंत्र चिंतन असते. त्या चिंतनातून प्रबोधनाची अपार जाणीव व्यक्त होते. हे प्रबोधन परिस्थितीपरत्वे विविधरूपी असते. साहित्य, समाज, धर्म, नीतीमूल्ये, जडवाद, कर्मविपाक, अध्यात्म या साऱ्यांच्या तळाशी पोचून आपल्या विचारांचे रोपण ते करीत असतात. भाराभर तळटीपा नि वारेमाप संदर्भ देऊन प्रबंधाचा गलेलठ्ठपणा वाढविण्यात मनोहरांना स्वारस्य दिसत नाही. त्यापेक्षा मोजक्या पण कसदार विचारांचा व अधिकारी व्यक्तिमत्त्वाचा ते सतत शोध घेतात नि शास्त्रकाट्याच्या कसोटीवर आपल्या स्वतंत्र विचारसरणीची ते मांडणी करतात आणि एकेक संशोधन सार्थ ठरते.

या चिकित्सक, चिंतनपूर्ण, व्यासंगी आणि सर्जनशील वृत्तीतूनच 'दलित सौंदर्यशास्त्राने' त्यांना हैराण केले आहे. दलित साहित्याची स्वतंत्र सौंदर्य-मीमांसा असावी. प्रस्थापितांची सौंदर्यमीमांसा दलित साहित्यासाठी निरुपयोगी आहे. त्यासाठी स्वातंत्र्य समतेवर अधिष्ठित जीवनवादी मूल्ये जोपासणारी सौंदर्यमीमांसा हवी आहे आणि ते दलित सौंदर्यशास्त्रच देऊ शकते. असा त्यांचा ठाम विचार आहे. 'दलित साहित्य : सिद्धान्त आणि स्वरूप' व

'दलित साहित्य चिंतन' या ग्रंथातून याची चिकित्सा झाली आहे. या निमित्ताने दलित सौंदर्यशास्त्राची रूपरेखा त्यांनी मांडली. असे असले तरी हे संशोधन अद्याप अपुरे आहे. वेगळी सौंदर्यमीमांसासुद्धा डॉ. मनोहरच दलित साहित्याला देतील यात शंका नाही. अलीकडच्या 'नवे साहित्यशास्त्र' व 'बुद्धिवादी सौंदर्यशास्त्र' या पुस्तकांमधून हे सौंदर्यशास्त्र त्यांनी मांडले आहे.

## ललित लेखक

मनोहर हाडाचे कवी आहेत. जीवनात जे भोगले जे साहिले त्याचा शब्दरूप आविष्कार म्हणजे त्यांची कविता. या उद्‌ध्वस्त अंतरानेच त्यांनी संपन्न अंबर तयार केले नि रसिकांनी कविता म्हणून त्याचे भरघोस स्वागत केले. वाढत्या वयाने, अनुभवाने, व्यासंग व विद्वत्तेने त्यांना समीक्षक संशोधक बनविले. मनोहर विचारवंत, समीक्षक झाले. पण त्यांच्यातला कवी संपला नाही. प्रत्येक क्षणी आपला धुंद आविष्कार ते घडवीतच राहिले. समीक्षेतही आपला समीक्षकाचा चष्मा बाजूला केला की मनोहरांतला कवी ओळीओळीवर आपले डेरे टाकून बसलेला आढळेल. तिथे मोहक शब्दांची सुरेख संगती दिसेल. कल्पनेचा अमर्याद आविष्कार दिसेल. शब्दांच्या कुतुहलजनक लकबी दिसतील. शब्दपांडित्य जाणवेल. भाषाप्रभुत्वाची ओळख पटेल आणि ही समीक्षा की काव्य असा संभ्रम मनात निर्माण होईल. समीक्षेतील हे दोष म्हणावे लागतील. कारण अशावेळी समीक्षक शब्दांच्या मागे लागतो आणि सूर मात्र गमावून बसतो. मनोहरांच्या बाबतीत मात्र हे घडत नाही. कारण शब्दांसाठी त्यांना आटापिटा करावा लागत नाही. सारे सहज नि लीलया घडते. 'ओव्हरफ्लो ऑफ पावरफूल फिलींग्स' सारखे घडते.

यशवंत मनोहरांच्या या कविवृत्तीतूनच ललित लेखनही घडले. साहित्य अकादमीने दिलेल्या अनुदानातून त्यांनी दक्षिण भारताचा प्रवास केला. त्या प्रवासात आलेल्या अनुभवांतून 'स्मरणांची कारंजी' या नावाचे शिल्प अवतरले. जीवनवाद, जडवाद, नास्तिक्य, बुद्धिवाद, लोकशाही, विज्ञाननिष्ठा यांचा सतत प्रत्यय इथेही घडतो. डॉ. मनोहरांतल्या मनोहर व्यक्तिमत्त्वाचा इथला प्रत्यय खरेच मनोहारी आहे.

वैचारिक व ललित असा निबंध प्रकारांचा भेद मान्य केला तर फार कमी ललित निबंधांना जीवनवादाचा स्पर्श झाला. ही बाब आपणास मान्य करावी लागेल. अनंत काणेकरांसारख्या श्रेष्ठ ललित लेखकांनी ललित निबंधाची खानदान उज्ज्वल केली. दुर्गाबाई प्रभृतींनी त्यात भर घातली. पण ललित निबंधकारांचे सारेच वारस जीवनवादाशी इमान राखू शकले नाहीत. कुणी अध्यात्माच्या

आहारी गेले. कुणी कल्पनारंजकतेलाच सर्वस्व मानले. कुणी ललित निबंधाच्या या राजवाड्यातच श्रृंगारचाळे सुरू केले. परिणाम असा झाला की या राजवैभवी वाङ्मयप्रकाराचे हाती भिक्षापात्र आले.

'स्मरणांची कारंजी' या ललित लेखनाने ललित निबंधास नवी मूल्ये प्रदान केली. पत्रात्मक स्वरूपाचे एखादे आत्मकथन असावे असा त्याचा बाज आहे. जगाच्या दृष्टीने असामान्य, अलौकिक वगैरे बाबी लेखकांना मात्र तिरस्कृत वाटतात. जनजीवनासाठी जे निरुपयोगी असेल असे सारेच मनोहर निषिद्ध मानतात. यातून देव-देवालयेही सुटत नाहीत. त्या देवालयांच्या खोल पायात त्यांना आपल्याच माणसांचे सांगाडे दिसतात. आपल्याच माणसांच्या रक्तमांसाचा चिखल या भव्य देवायतनांच्या उभारणीस कामी आला. सामान्य माणसांच्या शोषणातूनच वरिष्ठांची संस्कृती साकार झाली. अशा परिस्थितीत हे राजवाडे आणि ही मंदिरेही अनंत युगाच्या शोषणाचीच प्रतीके ठरतात. ही त्यांची मुख्य भूमिका त्यामुळे प्रत्येक वास्तुकृती पाहून मनोहरांच्या मनात आपला आदीम इतिहास जागा होतो आणि लाल, निळ्या रंगाची ही समरणकारंजी उडू लागतात. एक आगळ्या धाटणीची ललित कृती जन्मास येते. ही ललित कृती आगामी ललित निबंधांना 'कोंभाची लवलव' प्राप्त करून देईलसे वाटते.

## पुरोगामी विचारवंत

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानावर मनोहरांचा वैचारिक पिंड पोसला गेला. त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची जडणघडणही याच विचाराने केली. फुले-आंबेडकरांनी त्यांना पुरोगामित्व व सामाजिकतेचे बाळकडू दिले. त्यामुळेच मनोहर आपल्या विचारांशी तडजोड करू शकले नाहीत. त्यांच्या पुरोगामित्वाचा प्रत्यय त्यांच्या सर्वच वाङ्मयात येतो. कधी तो प्रतिमांच्या आडोशाने तर कधी उघड. मनोहरांची कविताही एक विचारच असतो. त्यामुळे कविता वाचताना कवीवर विचारवंत सतत कुरघोडी करीत आहेसं वाटते. परंतु स्वतंत्रपणे लिहिलेल्या विचारात किंवा विचारपीठांवरील भाषणात हे पुरोगामित्व उघड उघड आपल्याशी मैत्री साधते.

समाजाच्या दूरवस्थेविषयी, त्यांच्या अज्ञान, दारिद्र्य आणि अंधश्रद्धेविषयी मनोहरांच्या मनात कमालीची चीड आहे. चातुर्वर्ण्य, देव, दैव, अध्यात्म, विषमता या बाबी त्यांना शत्रूवत वाटतात. त्यामुळेच ते प्रतिगामी शक्तींवर विजेप्रमाणे कोसळतात. दलित, सर्वहारांपासून संपूर्ण बहुजन समाजात समता, स्वातंत्र्य, बंधुता, विज्ञाननिष्ठा, न्याय प्रस्थापित व्हावा यासाठी त्यांनी हा शब्दप्रपंच मांडला आहे. वरील तत्त्वांचा विरोधक कुणीही असो, मनोहरांच्या

दृष्टीने तो आपला शत्रू आहे. त्यामुळेच नवबौद्धांमध्ये दिसून येणाऱ्या अंधश्रद्धा व पारंपरिकतेवर त्यांनी टीकास्त्र उगारले. त्यासाठी दीक्षाभूमीचे महत्त्व प्रतिपादन केले. तेथे चालणाऱ्या निरर्थकतेचा कठोर शब्दात समाचार घेतला. त्यामुळे जवळचेही काही लोक दुखावले गेले. पण मनोहरांनी त्याची पर्वा केली नाही. आपले पुरोगामित्व हे एक सतीचे वाण समजून आल्या परिस्थितीला ते तोंड देत राहिले.

आपल्या पुरोगामी दृष्टीतूनच त्यांनी बुद्ध-आंबेडकरांचा विचार केला. या निमित्ताने या महामानवांच्या विचारावर प्रकाश पडून मनोहरांची त्यांच्यावरील निष्ठा सिद्ध झाली. 'निबंधकार डॉ. आंबेडकर', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बुद्धधम्म', 'प्रबोधन विचार', 'मूल्यमंथन' आदि ग्रंथातून त्याचे पुरोगामित्व व्यक्त झाले आहे.

सुरुवातीपासूनच ते आंबेडकरी चळवळीचे पुरस्कर्ते आणि प्रसारक आहेत. दलित साहित्य संमेलने व इतरही विचारपीठांवरून आपली भूमिका त्यांनी विशद केली. लोकशाही वाचविण्यासाठी आणि समताधिष्ठित, विज्ञाननिष्ठ जीवनाच्या प्रस्थापनेसाठी मनोहर कटिबद्ध आहेत. त्यासाठी आपली लेखणी त्यांनी पणास लावली आणि नव्या मन्वंतराची आस बाळगून ते मार्गरत झाले आहेत.

असे हे बहुमुखी प्रतिभेचे व्यक्तिमत्त्व जीवनातील 'मनोहरता' पिऊन 'विद्रोही यशवंत' झालेले. त्यांच्या हातून उदंड साहित्यसेवा घडून समाजप्रबोधनास त्यांचा लाभ होवो व त्यासाठी त्यांना दीर्घायू लाभो ही सदिच्छा!

१४

# कलासक्त डॉ. यशवंत मनोहर

## ▪ डॉ. प्रा. चंद्रकांत नगराळे

कवी, लेखक, विचारवंत, समीक्षक म्हणून यशवंत मनोहर सर विख्यात आहेतच. पण या महान व्यक्तिमत्त्वाचे इतरही अनेक कलापैलू आहेत. विविधांगी कलागुणांच्या सुगंधी पाकळ्यांनी त्यांचे व्यक्तित्व फुलारले आहे. मराठी वाचकाला मुख्यत्वे कवी, लेखक, विचारवंत, समीक्षक म्हणून माहीत असलेले मनोहर सर चित्र-नाट्य आणि संगीत या कलांचेही दिवाने आहेत. या कलाक्षेत्रासंबंधीची त्यांची जाण सखोल असून अभिरुची अत्यंत संपन्न आहे. प्रस्तुत लेखात मनोहर सरांच्या चित्र-नाट्य आणि संगीत या कलांविषयक अभिरुचीचा थोडक्यात परिचय करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सरांना विद्यालयीन जीवनापासूनच चित्रकला, नाट्य, अभिनय या कलांबद्दल विशेष आवड आणि आदर आहे. शालेय जीवनात असताना ते रात्र रात्र चित्र काढीत बसायचे. १९५९ मध्ये त्यांनी इंटरमिजिएट ग्रेड ड्राईंग परीक्षा उत्तीर्ण केली. १९६० मध्ये रुईया हायस्कुल, काटोलच्या संमेलनातील चित्रकला प्रदर्शनातील त्यांच्या चित्राला प्रथम पुरस्कारही मिळाला होता. १९६१ मध्ये पुन्हा त्यांनी चित्रकलेचा (जलरंग) प्रथम पुरस्कार प्राप्त केला. १९६१ मध्ये झालेल्या याच हायस्कूलच्या संमेलनात त्यांनी 'उमाजी नाईक' या नाटकात कॅप्टन मॅक्टिन्टॉशची भूमिका केली होती. त्यांनी केलेल्या या भूमिकेचे आणि त्यांच्या अभिनयाचे त्यावेळी फार मोठे कौतुकही झाले होते. मिलिंदमध्ये शिकताना 'प्रेमा तुझा रंग कसा' या नाटकात त्यांनी नायकाची भूमिका केली होती. सरांनी अनेक नाटके बघितली आहेत. वाचली आहेत. अजूनही बघतात-वाचतात. त्यांना आवडलेले एखादे नाटक वाचायला मिळाले नाही तर ते अस्वस्थ होतात आणि जीवाचा आटापिटा करून ते कुठूनही मिळवितात. त्याकरिता वाटेल ते कष्ट घेतात. सरांनी डॉ. श्रीराम लागू यांना पत्र पाठवून 'सूर्य पाहिलेला माणूस' हे नाटक मागवून घेतले होते. दि. २ फेब्रु. २००१ ला पुन्हा पत्र पाठवून नाटक पाठविल्याबद्दल त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावरून मनोहर सरांना कोणत्या स्वरूपाची नाटके आवडत असावी हे लक्षात येते.

सरांनी अनेक लेखकांच्या नाटकांना प्रस्तावना लिहिल्या आहेत. अनेक नाटकांची परीक्षणे केली आहेत. 'स्वातंत्र्य हवे आम्हाला' या नाटकाला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना मुळातून वाचण्यासारखी आहे. 'आंबेडकरवादी मराठी साहित्य' या ग्रंथातून 'युगयात्रा', 'जिवंत झाल्या साऊल्या' (म.भि. चिटणीस), 'काळोखाच्या गर्भात', 'भूमिपुत्र' (भि.शि.शिंदे), 'खेळिया', 'वाटा-पळवाटा', 'अश्मक' (दत्ता भगत), 'तनमाजोरी', 'देवनवरी', 'जय जय रघुवीर समर्थ', 'किरवंत' (प्रेमानंद गज्वी), 'थांबा रामराज्य येतंय' (प्रकाश त्रिभुवन), 'प्रकाशपुत्र' (लक्ष्मण माने), 'प्रतिबिंब' (रा.का. क्षीरसागर), 'आंबेडकर आणि गांधीजी' (भालचंद्र फडके), 'इथे माणसाला स्थान नाही' (बाजीराव रामटेके), 'कारान' (तुषार भद्रे), 'कॉम्रेड जोशी' (अमर रामटेके), 'कोण म्हणतो टक्का दिला' (संजय पवार), 'सूर्योदय' (संजय जीवने), 'हत्याकांड' (कमलाकर डहाट), 'बेंडवा', 'बुद्धं सरणं गच्छामी', 'टेंभ्याची वरात' (जॉनी मेश्राम), 'सावित्रीच्या पोरी' (वासुदेव डहाके) इत्यादी नाटकांवर केलेले भाष्य मोठे मौलिक आहे. प्रबोधनाची चळवळ घरोघरी पोहचविण्याचे सामर्थ्य फक्त या कलाप्रकारांमध्येच आहे. म्हणून आंबेडकरी समाजातील लेखकांनी फार मोठ्या प्रमाणात नाट्य-लेखनाकडे वळावे. नाटकाचे प्रबोधन सामर्थ्य समाजासाठी वापरावे अशी एक अपेक्षा मनोहर सरांनी या नाटकांच्या प्रस्तावनांमधून, अभिप्राय, परीक्षणांमधून केली आहे. शिवाय आंबेडकरी रंगभूमीची आवश्यकता, आंबेडकरी रंगभूमीची सद्यःस्थिती आणि तिच्यापुढे असणाऱ्या आव्हानांचे भानही त्यामधून सरांनी आंबेडकरी नाट्यकलावंतांना करून दिले आहे.

मनोहर सरांना संगीतकलेविषयी तर अतोनात आदर आहे. शब्दकलेचे धनी असलेले सर सुरांच्या सान्निध्यात व साधनेतही मस्तपैकी रंगून जातात हे अनेकांना माहीत नसेल. आजारावर औषध ठरू शकणाऱ्या या छंदाने त्यांचे तन-मन भारून टाकलेले आहे. जुन्या नाटकातील काही पदे, क्रांतिगीते आणि नव्या पिढीतील काही गाणीही त्यांना मुखोद्गत आहेत.

एकदा चंद्रपूरवरून भगवान पाटील यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन आटोपून येताना गाडीत सोबत असलेल्या रूपाताई कुलकर्णी सुरेल स्वरात जुनी गाणी गायला लागल्या तेव्हा मनोहर सरांनीही क्षणाचा विलंब न लावता रूपाताईंच्या सुरात सूर मिसळवून गायनाच्या मनोज्ञ आविष्काराचे दर्शन घडविले होते. रूपाताई जुन्या गाण्यातील काही शब्द जेव्हा विसरून जायच्या तेव्हा सर त्या गाण्यातील अचूक शब्दाची आठवण करून द्यायचे. संगीत कलेविषयीची ही आवड सरांना बालपणापासूनच आहे. प्र.श्री. नेरुरकर यांना दिलेल्या

एका मुलाखतीत त्यांनी म्हटले, ''आठवी-नववीत असताना प्रथम मी बाबासाहेबांवर गीते लिहिली. घरात तसे वातावरण पूर्वीपासून होते. १९५६ पूर्वीच्या काळात भाऊ सदाशिवराव व केशवराव शाहिरी करीत. त्या भागात ते त्यावेळी प्रख्यात शाहीर होते. दुसरे असे की घरात भजनेही होत. भाऊ व वडील गावोगावी भजनालाही जात. मीही जात असे. भजने म्हणत असे. ५६ नंतर हे थांबले आणि बाबासाहेबांच्या चळवळीसंबंधी आम्ही गाणी गाऊ लागलो. त्यात नागोराव कव्वाल, गोविंद म्हशीलकर, राजानंद गडपायले इत्यादी गीतकारांची गाणी असत. मी हार्मोनियम वाजवीत असे. एक भाऊ तबला वाजवी. एक भाऊ गायन करीत असे. आम्ही त्यावेळी गावोगावी कार्यक्रम करीत असू. हे सर्व सातवी ते दहावीमध्ये शिकत असताना झाले. यावेळी आपणही गाणी लिहावी आणि गावी असे त्या कार्यक्रमांच्या तंद्रीत मनाला वाटले आणि मी तशी गाणी लिहिली. ती गाणीही आम्ही कार्यक्रमांमधून गायिली.''[१]

विद्यालयीन-महाविद्यालयीन जीवनानंतर मात्र त्यांना हा छंद पुढे नेता आला नाही. परंतु संगीताविषयीची आवड मात्र त्यांची तसूभरही कमी झाली नाही. ''संगीत ऐकताना, गायन ऐकताना माझ्या अंगावर रोमांच उभे राहतात. माझे काळीज थरारून जाते. मी स्वरांच्या करामती ऐकतो. तबला, ताल वाजविणाऱ्या बोटातून निथळणारी जादू पाहतो. मी गळ्यागळ्यातून घमघमत बाहेर येणारे कलांवतांच्या काळजाचे सर्जन पाहतो आणि मी गदगदून येतो.''[२] असे ते हिंगणघाट येथे आयोजित देशभक्तीपर गीतगायन स्पर्धेतील कलांवतांचे गायन ऐकून या समारंभाच्या समारोपीय कार्यक्रमात म्हणाले होते. ''संगीताने आपल्या व्यक्तित्वाला एक समतोल आकार सहज प्राप्त होत जातो. आपल्या बोलण्याला एक लय प्राप्त होते. आपल्या चालण्याला आणि वागण्याला एक लय प्राप्त होते. हा ताल समताल असतो. मग एकमेकांना भेटणारी माणसे म्हणजे एकमेकांना भेटणारे समताल असे होते. हा एका अर्थाने सांस्कृतिक समाजवादाचा आणि नैतिक विकासवादाचाच समारंभ असतो. संगीत या कलेबद्दल मला आदर वाटतो त्याचे हे कारण आहे.''[३] या शब्दात त्यांनी संगीतकलेबद्दलचा आदरभाव व्यक्त केला आहे. याच भाषणात संगीतादी कलांच्या कार्याचे मोल विशद करताना सर म्हणतात,

''कला माणसांना केवळ एकत्र आणत नाहीत तर माणसांना समाजातील त्यांच्या वर्गीकरणातून त्या मुक्त करतात. भेदांच्या पल्याड असलेल्या, वर्गीकरणाच्या अतीत असलेल्या एका माणुसकीच्या एकसंध प्रदेशात घेऊन जातात. अनेक तुकड्यांची वाकळ असावी असा इथला समाज आहे. खूप जातींचे तुकडे या

वाकळीत आहेत. खूप धर्मांचे तुकडे या वाकळीत आहेत. प्रांतीय आणि भाषिक अस्मितांचे तुकडे या वाकळीत आहेत. हे तुकडे एकत्र आले असले तरी वाकळीत त्यांची स्वतंत्र अस्तित्वे आहेतच. ही स्वतंत्र अस्तित्वे केवळच आहेत असे नाही तर हे तुकडे आपली ही अस्तित्वे अहंकारपूर्वक जपताना दिसतात. हे अहंकार या तुकड्यांना एक हृदय, एक चित्त होऊच देत नाहीत. त्यांना एकजीव होऊच देत नाहीत. त्यांना सेंद्रियत्व, त्यांना एकजीवबंधत्व लाभूच देत नाहीत.

वाकळीतील या तुकड्यांनी आपापले रंग जपलेले आहेत. हे रंग उडणार नाहीत याची काळजी सर्व ताकद एकवटून ते घेत असतात आणि या तुकड्यांनी आपापले वेगवेगळे आकारही काळजीपूर्वक जपलेले आहेत. जपत आहेत. या तुकड्यांमध्ये विविधता आहे आणि त्यांच्यात विरोधही आहे. जीवनात विविधता असतेच. पण या विविधतेत जेव्हा विरोध निर्माण होतो तेव्हा तो मोठा तापदायक असतो. झाडांमध्ये विविधता असते. पण या झाडांमध्ये विरोध नसतो. भांडणे नसतात. अहंकाराचे जहर नसते. एक झाड दुसऱ्या झाडाशी जातीच्या मोठेपणावरून भांडत आहे असे आपणाला दिसत नाही. एक झाड आपला धर्म तेवढा महत्त्वाचा म्हणून दुसऱ्या झाडांशी भांडताना आपणाला दिसत नाही. तसेच फुलांचे आहे. अशाच कोणत्यातरी अहंकाराने पेटून एका फुलाने दुसऱ्या फुलाचा चावा घेतला असे दिसत नाही. रंगविविधता आणि आकारविविधता त्यांच्यातही असतेच. पण निळ्या रंगाच्या फुलावर लाल फुल तुटून पडत नाही. हिरव्या रंगांच्या फुलांना भगव्या रंगांची फुले कापत व जाळत सुटत नाहीत. झाडांमध्ये, फुलांमध्ये अशी विविधता आहे पण विरोध नाही. झाडे, फुले ही सृष्टीचीच लेकरे आहेत. ती आपल्याही आधी होती. त्यांच्यापासून आपण विरोधविहीन विविधतेचे तत्त्व का शिकलो नाही असा मला प्रश्न पडलेला आहे. मग आपण विरोध शिकलो कुठून? पण आपल्या या विरोधवैशिष्ट्याचा आपणाला अहंकार वाटत असला तरी या विरोधविहीन विविधतेच्या जगातील अनेक पाईकांना राग येतो. आपल्या या अहंकाराचे नवल वाटते आणि त्यांना आपला संतापही येतो.

या पार्श्वभूमीवर मला संगीतादी कलांच्या कार्याचे मोल विशेषच वाटते. या कला समाजातील माणसांना विरोधविहीन विविधतेपाशी घेऊन जातात. त्या माणसांना झाडांची हृदये देतात. त्या झाडांना फुलांची मने देतात. आपापले रंग असू द्या. विरोध वर्ज्य करून जगा. आपापले आकार असू द्या, पण विरोधाचे विसर्जन करूनच जगा. असे झाले नाही तर विविधता ही वरदान ठरणार नाही. ती मारक ठरेल. ती मरणदायिनी ठरेल. असेच या कला आपणाला

सांगतात आणि आपल्या मनात हे नवे भान जन्माला घालतात. त्यामुळे आपण विरोधांच्या भिंती ओलांडून, विरोधांची कुंपणे ओलांडून आणि आपापल्या अस्मितांचे खोटे अहंकार उल्लंघून एका विविधतामय संवादप्रदेशात प्रवेशतो. हा प्रदेश म्हणजे बंधुत्वाचा प्रदेश होय. जावे तिथे, पाहावे तिथे निरामय भावंडत्वाचा प्रत्यय देणारा तो प्रदेश असतो.''[४]

वरील विवेचनातून संगीतादी कलांबद्दलची मनोहर सरांची जाण किती सखोल आहे हे लक्षात येते.

संदर्भ :


१. यशवंत मनोहर, समाज आणि साहित्य समीक्षा, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९२, पृ. २२८-२९
२. यशवंत मनोहर, विचारसंघर्ष, युगंधरा प्रकाशन, यवतमाळ, २००४, पृ. ९४
३. तत्रैव पृ. ९४
४. तत्रैव पृ. ९२, ९३

१५

# डॉ.यशवंत मनोहर:एक विद्यापीठ

## ■ प्रा.डॉ.प्रभंजन चव्हाण

डॉ. यशवंत मनोहर हे नाव महाराष्ट्रात 'आंबेडकरवादी विचारवंत' म्हणून परिचित आहे. मुळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे 'मूकनायक' होते. त्याच नात्याने 'आंबेडकरवादी विचारवंत'देखील 'मूकनायक'च ठरतात. या 'मूकनायका'त डॉ. यशवंत मनोहरांचे नाव आवर्जून उल्लेख करण्यासारखे आहे.

आंबेडकरवादी व्यक्तिमत्त्वात एक प्रकारची वैचारिक शुद्धता लागते. ही शुद्धता नसेल तर ते व्यक्तिमत्त्व आंबेडकरवादी व्यक्तिमत्त्व होऊ शकत नाही. 'दलित साहित्य' आणि 'आंबेडकरवादी साहित्य' या साहित्यविश्वातील एकमेकींना पर्यायी म्हणून वापरल्या जाणाऱ्या संकल्पना एकमेकींपासून वैचारिकतेच्या बाबतीत भिन्न भिन्न आहेत, कारण 'आंबेडकरवादी साहित्य' संकल्पनेतील जी वैचारिक शुद्धता आहे ती 'दलित साहित्य' संकल्पनेत असेलच असे नाही. हे जसे सत्य, त्याप्रमाणेच व्यक्तिमत्त्वाचेही असते. डॉ. यशवंत मनोहरांच्या व्यक्तिमत्त्वात ही वैचारिक शुद्धता अधिकत्वाने जाणवते. याला कारण आहे त्यांची जीवननिष्ठा. यामुळेच ते 'ब्राह्मण नाही, हिंदुही नाही, न मी एक पंथाचा' असे म्हणणाऱ्या केशवसुतांच्या 'नव्या शिपाया'सारखे आहेत.

हजारो वर्षांच्या अंधारमय गुहेत डांबून ठेवल्या गेलेल्या प्रतिभांना उजेडाच्या सन्मानोत्सवात सामील करण्याचा पराक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. हाच वारसा अचूकपणे डॉ. यशवंत मनोहरांनी सांभाळला आहे. म्हणूनच ते स्वतःला-

'मी आंबेडकरांच्या ओठांवर उगवलेला
प्रलयंकारी सूर्य आहे.'

असे मानतात. येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी त्यांचे असलेले नाते स्पष्ट होते. हे नाते त्यांच्या भूमिकेतूनही व्यक्त होते.

स्वतःच्या 'श्वासाचे दावे' अजमावून पाहणारा हा 'माणूस' आपल्या तत्त्वापासून तसूभरही ढळत नाही, विचलित होत नाही. अनेक प्रकारची सुखे त्यांच्या पायाशी लोळण्यास तयार होती. वैभव, ऐश्वर्य हे त्यांचे दास होण्यास सज्ज होते. परंतु या साऱ्यांना ठोकरून -

'कबिरा खडा बाजार में
लिये लुकाठी हाथ
जो घर फुँके अपना
वो चले हमारे साथ।'

या कबीरोक्तीनुसार केवळ तत्त्वासाठी या माणसाने सारेच 'मोह' वळकटीप्रमाणे गुंडाळून ठेवले आणि आपले तत्त्व, जीवननिष्ठा यावर प्रियकराप्रमाणे प्रेम केले. तत्त्व आणि निष्ठेनेदेखील त्यांच्याशी बेइमानी केली नाही हे तेवढेच खरे. परंतु याच तत्त्वासाठी आणि निष्ठेसाठी सामाजिक पातळीवर त्यांना असह्य वेदना सहन कराव्या लागतात. त्यांना याची जाणीव आहे, की ज्यामुळे या वेदना सहन कराव्या लागत आहेत तो मार्ग 'हेमलॉक' पचविणाऱ्या सॉक्रिटिसाचा आहे. ही जाणीव असूनही ते अँथेन्स'वर रागावत नाहीत अन् प्रहारही करत नाहीत; उलट -

'ज्यांच्या गावात सूर्य नाही
त्यांच्या हातात उजेड देतो'

अशी भूमिका स्वीकारून ते वाटचाल करत आहेत; हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मोठेपण आहे.

खुळचट रूढी, प्रथा, परंपरांमुळे मानवी जीवनातील सौंदर्यच नष्ट झाले. या सौंदर्याचा शोध घेण्यासाठी आक्रंदन करणारा हा 'माणूस'. इथल्या समाजव्यवस्थेमध्ये 'माणूस'च ज्ञानाअभावी नागवला गेला हे सांगतानाच-

'कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही
सदरहू पीक आम्ही आसवांवरच काढले आहे
कालपर्यंत पावलांनी रस्त्यांपाशी तक्रारी मांडल्या नाहीत
झाडे करपली, माथी हरपली
नदीच्या काठाने मरण शोधीत फिरलो
आयुष्याच्या काठाने सरण नेसून भिरभिरलो
...कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही.'

संपूर्ण शोषणाचा आलेखच जणू मांडण्याचा असा प्रयत्न केला आहे.

स्वतःला 'मानवाचा पुत्र' मानणाऱ्या बुद्धाला अवतारात बसवून संपवण्याचे षडयंत्र याच भूमीत रचले गेले. हा बुद्ध नास्तिक होता; माणूस होता. त्याने ईश्वर नाकारला. तरीही धूर्त आणि लबाड लोकांनी त्याला 'भगवान' करून टाकले. बुद्धाला 'भगवान' ही उपाधी लावणे म्हणजेच त्या करुणेच्या महानायकाला एक शिवी देण्यासारखे

आहे, असे त्यांना वाटते. कारण त्यांच्या डोळ्यातील जखमांना बुद्ध हे माणसासारखे निरंतर बेचैन आणि धगधगताना दिसले आहेत. म्हणूनच-

'पण माफ कर सिद्धार्था
तुला भगवान ही शिवी मी देऊ शकत नाही.'

असे ते म्हणतात. यातून त्यांची व्यक्तीपेक्षा त्यांच्या विचाराला महान मानण्याची वृत्ती स्पष्ट होते.

बुद्ध, चार्वाक, फुले, आगरकर, केशवसुत, कार्ल मार्क्स, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही व्यक्तिमत्त्वे म्हणजे जगाच्या इतिहासात विचारवंतांच्या परिघात 'सुवर्णाक्षरां'नी झळाळणारी व्यक्तिमत्त्वे आहेत. या साऱ्याच व्यक्तिमत्त्वांविषयी त्यांना सन्माननीय आदर आहे हे त्यांच्या लेखनातून सतत जाणवते.

समाज हा स्मशानवत आहे. या समाजात माणसे राहतात. ही माणसे अनेक प्रकारच्या वाकड्या-तिकड्या वाटा-वळणांनी वाटचाल करतात. कित्येकदा अंधारग्रस्त परंपरांना रूढी म्हणून स्वीकारतात आणि स्वतःचे 'माणूसपण' गमावून बसतात. माणसांनी 'माणूस' म्हणून माणसासारखे जीवन जगायचे असेल तर -

'जीवनासाठी जीवनाचे आजार नाकारावे लागतील -
साऱ्याच जिवंतांना मेलेल्यांचे शेजार नाकारावे लागतील.'

असे म्हणताना ते माणसाला सावध करतात, माणूस खुळचट रूढी, प्रथा, परंपरांचा 'सावज' होऊ नये म्हणून ते हे करतात.

डॉ. यशवंत मनोहरांची साहित्यसंपदा विपुल आहे. त्यात एकसूत्रता आणि जीवननिष्ठा यासारख्या गोष्टी प्रामुख्याने प्रत्ययास येतात.

'उत्थानगुंफा', 'डॉ. आंबेडकर : एक चिंतनकाव्य', 'मूर्तिभंजन', 'जीवनायन' इत्यादी त्यांचे काव्यसंग्रह म्हणजे प्रा. रा.ग. जाधव म्हणतात त्याप्रमाणे 'सर्वंकष विद्रोहाचा युटोपिया' ठरावे. मराठी काव्यविश्वातील उजेड जपणाऱ्या लेण्या म्हणून काव्यास्वादक त्या काव्यसंग्रहांकडे पाहतात.

'डॉ. आंबेडकरांचा बुद्धधम्म', 'प्रबोधनविचार', 'मंडल आयोग : भ्रम आणि सत्य', 'आपले महाकाव्यातील नायक : शंबूक-कर्ण-एकलव्य', 'आपल्या क्रांतीचे शिल्पकार : आंबेडकर, फुले, बुद्ध', 'डॉ. आंबेडकर : एक शक्तिवेध', 'बुद्ध आणि त्याचा धम्मःसारतत्त्व', 'आंबेडकर संस्कृती', 'आंबेडकरवादी विद्रोही निबंध', 'आंबेडकरी चळवळीतील अंतर्विरोध', 'डॉ. आंबेडकरांचा

बुद्ध कोणता?', 'बहुजन क्रांतीचे महानायक जोतीबा फुले', इत्यादी त्यांचे वैचारिक निबंधलेखन हे आंबेडकरवादी विज्ञाननिष्ठ विचारवंताचे लेखन ठरते. या लेखनातून त्यांची सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि वैचारिक भूमिका स्पष्ट होते. 'एक आंबेडकरवादी विचारवंत' म्हणून त्यांच्याकडे या लेखनामुळेच पाहिले जाते.

'दलित साहित्य : सिद्धान्त आणि स्वरूप', 'स्वाद आणि चिकित्सा', 'बाळ सीताराम मर्ढेकर', 'निबंधकार डॉ. आंबेडकर', 'दलित साहित्य चिंतन', 'आंबेडकरवादी आस्वादक समीक्षा', 'समाज आणि साहित्य समीक्षा', 'शरच्चंद्र मुक्तिबोधांची कविता', 'मराठी कविता आणि आधुनिकता', 'आंबेडकरी चळवळ आणि साहित्य', 'परिवर्तनवादी जीवनमूल्ये आणि वाङ्मयीन मूल्ये', 'आंबेडकरवादी मराठी साहित्य', 'युगसाक्षी साहित्य', 'नवे साहित्यशास्त्र' इत्यादी समीक्षापर लेखनातून मराठी साहित्य समीक्षेला नवी सैद्धांतिक बैठक देऊन नव्या दृष्टिकोनातून 'साहित्यशास्त्रा'ची मांडणी करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. 'साहित्यमूल्ये आणि जीवनमूल्ये' यातील अभिन्नता दर्शवून साहित्यमूल्ये हीच जीवनमूल्ये किंवा जीवनमूल्ये हीच साहित्यमूल्ये असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले आहे.

याशिवाय 'स्मरणांची कारंजी' यासारखे लेखन करून प्रवासवर्णनपर लेखनात एक नवी अभिरुची निर्माण केली. 'रमाई' ही चरित्रपर कादंबरी लिहून कादंबरी लेखनाचा एक नवा आदर्श त्यांनी घालून दिला आहे. त्याचबरोबर आपल्या 'ललित निबंध' लेखनातून मराठी साहित्यविश्वाला 'गद्यातले भावकाव्य' त्यांनी दिले आहे.

अशा या विविधांगी व्यक्तिमत्त्वाच्या सान्निध्यात अनेकांच्या व्यक्तिमत्त्वाची 'मूस' तयार झाली आहे. ते एक हाडाचे शिक्षक आहेत. अनेक विद्यार्थ्यांच्या वैचारिक घडणीचे ते शिल्पकार आहेत. विचार, तत्त्व, जीवन, तत्त्वज्ञान, माणूस, सत्य-असत्य इत्यादी संकल्पनांचा परिचय त्यांच्यामुळेच त्यांच्या विद्यार्थ्यांना झाला. बुद्ध, चार्वाक, सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, फुले, मार्क्स, आंबेडकर इत्यादी विचारवंतांची ओळख त्यांच्यामुळे त्यांच्या विद्यार्थ्यांना झाली. साहित्यप्रकारापासून तर थेट जागतिक पातळीवरच्या साहित्यिकांच्या जडण-घडणीचा परिचय विद्यार्थ्यांना करून देण्याचा प्रयत्न ते सतत करतात. त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांपैकीच मी एक आहे.

वाचन आणि लेखन या दोहोंचा अनंत काळापासून अभाव असलेल्या संस्कृतीतून मी या उजेडसंस्कृतीत आलो, यालाही तेच कारणीभूत आहेत. माणसाला योग्य वेळेला योग्य मार्गदर्शक लाभला तर त्याच्या आयुष्याला एक युगप्रवर्तक दिशा मिळते. अन्यथा -

'ठेविले अनंते तैसेचि राहावे
चित्ती असो द्यावे समाधान'

या उक्तीप्रमाणे समाजव्यवस्थेने लादलेल्या नरकयातना अलंकार म्हणून मिरवाव्या लागतात. स्वतःच्या अस्तित्वाचा परिचय नसणारी माणसे वरील 'उक्ती'ला बळी पडतात. देव, दैव, अध्यात्म, नशीब, उपास-तापास, कर्मकांड, पूर्वजन्म, पुनर्जन्म, स्वर्ग-नरक इत्यादी माणूस नाकारणाऱ्या संकल्पनांच्या जाळ्यात ती अडकतात. ती जन्माला येतात; वाढतात आणि शेवटी आली तशीच नष्ट होतात. ही माणसे निष्क्रिय असतात. त्यांच्यातील क्षमतेचा ऱ्हासशील प्रवास त्यांच्या जन्मापासूनच अखंडित सुरू झालेला असतो. अशा माणसांचा एक कळप असतो. जात, धर्म, पंथ इत्यादींच्या नावाने तो कळप ओळखला जातो. काही जण 'समाज' ही संकल्पना त्या कळपाला उद्देशून वापरतात. कारण ते उदारमतवादी असतात. त्यातीलच ते एक असतात. 'समाज' ही संकल्पना जात, धर्म, पंथ विरहित 'विचारशील माणसाच्या समुदायाला' उद्देशून वापरली जावी असे मला वाटते. परंतु कळपातील माणसे ही 'माणसे' असतात का? 'ठेविले अनंते' असे मानून जीवन कंठणारी ही माणसे जातिधर्माच्या पिंजऱ्यात अडकून पडलेली आहेत. हा पिंजरा या माणसांना सुरक्षित वाटतो. या पिंजऱ्याचाच त्यांना आदर असतो. येथे हा पिंजराच माणसापेक्षा सन्माननीय ठरतो आणि माणसाला परंपरेच्या स्वर्ग-नरकाच्या गटारात सडत ठेवतो. यामुळेच माणूस हा विचारापासून कोसो दूर गेला याचे भान अनेकांना नसते. असो. परंतु डॉ. यशवंत मनोहरांच्या लेखणीतून आणि भूमिकेतून समाजशील, विचारशील 'माणसा'चे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित होते हे वेगळे सांगणे नलगे!

'सत्याचे प्रतिपादन' हे त्यांच्या जगण्याचे वैशिष्ट्य आहे. त्यांनी आपल्या जीवनाद्वारे आणि कार्याद्वारे सत्याचीच मांडणी केली आहे. सामाजिक पातळीवर हे सत्य नेताना समाजाने त्यांना 'अपमान', 'द्वेष', 'तिरस्कार' यासारखे पुरस्कार दिले. अनेक प्रकारच्या 'धमक्या' त्यांना बक्षिस म्हणून मिळाल्या. ते समाजाचे 'गुन्हेगार' ठरले. नरकाचा आकंठ आस्वाद घेणाऱ्या समाजाला त्यांनी नरकाची जाणीव करून दिली; त्यातून बाहेर पडायला सांगितले, किंबहुना मदतीचा हातही पुढे केला. परंतु नरकप्रिय समाजाने त्यांचा हातच कलम करण्याचा डाव रचला. तो डाव आपोआप उधळला गेला असला तरी त्याचा मानसिक आघात, अल्प का होईना पण, होतोच. अशा या परिस्थितीत त्यांची आंबेडकरवादी जीवननिष्ठा महत्त्वाची ठरली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या हाताने अनेक 'युगंधर' घडविले त्या युगंधरांपैकी काहींनी तो वारसा

जपला. त्यापैकी डॉ. यशवंत मनोहर हे एक होत.

ज्यांचे हात केवळ अंधाराच्या ताब्यात होते, त्या हाताला त्यांनी स्वातंत्र्याची पहाट आणि उजेडाची वाट दाखविली. ते हात आता 'उजेडाच्या लेण्या' कोरू लागले आहेत. 'मूक' असलेल्या वाचा 'विद्युल्लता' होऊन कडाडत आहेत. यासाठीच ते झटत आहेत. लेखनातून, भाषणातून आणि आचरणातून ते आपल्या विद्यार्थ्यांवर संस्कार करत आहेत.

जो 'माणूस' माणूस म्हणून जीवन जगतो तो 'माणसा'पासून दूर कसा जाईल? एकंदरीत या वास्तवाच्या परिघात 'माणसा'च्या महानतेची 'भैरवी'च त्यांनी स्वतःबरोबर विद्यार्थ्यांना गायला लावली आहे. त्यांच्या लेखणीतून आणि शिकवण्यातून 'माणूस'केंद्री विश्व त्यांनी निर्माण केले आहे. आम्हा विद्यार्थ्यांमध्ये जगण्याचे एक नवे सामर्थ्य त्यांनी निर्माण केले आहे.

डॉ. यशवंत मनोहर हे 'लुम्बिनी'त राहतात. 'लुम्बिनी' हे त्यांच्या घराचे नाव. आम्ही अनेक विद्यार्थी या 'लुम्बिनी'चीच अपत्ये आहोत. 'लुम्बिनी' आम्हाला माणूस म्हणून जन्माला घालणारी पाठशाळा आहे. तिथेच आम्ही अनेक आव्हानांना तोंड देण्याचे बळ प्राप्त करून घेतले. अनेक अडचणींना आम्हीच अडचण झालो. आम्ही संकटासाठी संकट, भीतीसाठी भीती झालो. आम्ही 'गतिनायक' झालो. परिवर्तनाचे रसायन पचवण्याची क्षमता आमच्यात तिथेच निर्माण झाली. आम्ही विषाला सहज पचविणारे विद्रोहाचे छावे झालो. इथेच आम्ही देव, दैववाद, अध्यात्म, कर्मकांड, उपास-तापास, पूर्वजन्म, पुनर्जन्म इत्यादी अविचारी संकल्पनांना मूठमाती देऊन सूर्यकुलाचे वारसदार झालो. आम्ही परिवर्तनाचे दायाद झालो.

> 'नाही भीती आम्हा अमावस्येची आम्ही लाडके दिवसाचे
> पौर्णिमेशी जरी मैत्री आमची आमचे कूळ सूर्याचे'

असा आम्ही आमचा परिचय करून घेतला. अंधाराच्या उरात उजेडाचे शिल्प कोरण्याची ऊर्मी इथेच निर्माण झाली. अशा या 'माणूस' निर्माण करणाऱ्या विद्यापीठाचे कुलगुरू आहेत डॉ. यशवंत मनोहर. नव्हे नव्हे, ते स्वतःच आम्हा विद्यार्थ्यांचे विद्यापीठ आहेत.

या विद्यापीठाची 'पदवी' जो संपादन करील तो वाघिणीच्या बच्च्यासारखा गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. शोषण, विषमता, अन्याय इत्यादींचा तो 'कर्दनकाळ' ठरतो. असे या पदवीधराचे वैशिष्ट्य आहे.

'लुम्बिनी' हे ठिकाणच नैतिकतेचे अधिष्ठान आहे. तेथे लोकहितवादी, फुले, आगरकर, आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, गाडगेबाबा या महानायकांविषयी आणि सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीविषयी विचारविनिमय होतो. या विचार-विनिमयाचा संस्कार आपोआपच आमच्यावर झालेला आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विश्वातून आम्ही आलेलो असलो तरी आमचा आमच्यावर पूर्ण विश्वास आहे. ही ताकद 'लुम्बिनी'नी पुरवलेली आहे.

डॉ. यशवंत मनोहरांनी सर्जनशील विद्यार्थ्यांप्रमाणेच सर्जनशील साहित्याचीही निर्मिती केली आहे. या निर्मितीद्वारे एका ग्रामीण भागात जन्माला आलेला एक पोरगा 'मराठी शब्दांचा बादशहा' होतो, ही लहान-सहान गोष्ट नव्हे. अनेक जणांवर भाषेचे प्रभुत्व असते, परंतु भाषेवर प्रभुत्व असणारे व्यक्तिमत्त्व दुर्मिळच. या अनुषंगाने विचार करता गोविंदाग्रजांपासून सुरू झालेली भाषा कुसुमाग्रजांच्या लेखणीतून वेगळ्याच रूपात अवतीर्ण झाली. हीच भाषा डॉ. यशवंत मनोहरांनी अचूक हेरली आणि हा भाषेचा अंतिम टप्पा गाठला. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास 'गोविंदाग्रजांची भाषा ही आकाशाची वीज, कुसुमाग्रजांची भाषा ही लखलखते खड्गाचे पाते, तर यशवंत मनोहरांची भाषा म्हणजे ज्वालामुखीतील तप्तरसच होय'. अशा या तीन टप्प्यांत मराठी भाषेची मांडणी करावी लागते.

असा हा मराठी शब्दाचा बादशहा, अंधार ठोकरून उजेडाचे पीक घेणारा कवी, झंझावाती व्यक्तिमत्त्वे निर्माण करणारा शिक्षक, आंबेडकरवाद हेच जीवन मानणारा कलावंत, विद्यार्थ्यांच्या वैचारिक घडणीचा शिल्पकार, अनेकांसाठी उत्थानगुंफा उभारून जीवनायनाशी जोडणारा मार्गदर्शक, विज्ञाननिष्ठा, बुद्धिप्रामाण्य, इहवाद, समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय इत्यादी जीवनमूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रूजविणारा एक विचारवंत ३१ मार्च २००३ ला लौकिकार्थाने अध्यापकीय सेवेतून मुक्त झाला असला तरी त्यांचे अध्यापनाचे कार्य थंडावणार नाही याची मनोमन खात्री आहे. कारण विद्यापीठ हे कधीही निवृत्त होत नसते. ते आम्हाला नेहमीच बजावीत आहेत -

''पायाखाली सुरुंग आणि माथ्यावर आगीचा ढग ओथंबून आहे.
जपून रे माझ्या फिनिक्स पक्ष्यांनो, खूपदा इथे आपला वध झाला आहे.''

म्हणून आम्हा सर्व फिनिक्स पक्ष्यांकडून त्यांना हार्दिक शुभेच्छा !

......................

सुगावा पुणे, मे २००३

१६

# 'यशवंत' होण्यासाठी झालेला मनोहर प्रवास

■ सुनिल शिनखेडे

प्रसिद्ध दलित कवी, समीक्षक प्रा. डॉ. यशवंत मनोहर यांची महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदी झालेली निवड अनपेक्षित असली तरी नंतरच्या बऱ्यावाईट प्रतिक्रिया अपेक्षेनुसारच उमटल्या, उमटत आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ज्या साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष होते त्या मंडळाच्या अध्यक्षपदापर्यंत पोहोचणे हा मनोहर यांचा गौरवच आहे. विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागात अध्यापन करणाऱ्या डॉ. मनोहर यांचा पिंड आहे कवी व समीक्षकाचा. नवे कार्यक्षेत्र एकदम भिन्न व व्यापक. गेले वर्षभर रिक्त असलेल्या या पदाला वादाची पार्श्वभूमीही लाभलेली. अशा स्थितीत मनोहरांची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी नियुक्तीनंतरच्या दुसऱ्या दिवशी जेव्हा त्यांना भेटलो तेव्हा आनंदापेक्षाही जबाबदारीच्या ओझ्याची जाणीव त्यांना अधिक असल्याचे जाणवले.

साहित्य संस्कृती मंडळ हे पूर्णतः सरकारी असल्यामुळे अध्यक्ष आपल्या कल्पना, योजना तडीस नेण्यात कितपत यशस्वी होतात हा प्रश्नच आहे. तथापि, त्या योजनांच्या दिशेने प्रवास मात्र सुरू होऊ शकतो. पूर्वाध्यक्ष डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांनी नवलेखक अनुदान योजना सुरू केली आणि तिच्यावर टीकेचे मोहोळ उठले. टीकेच्या भडिमाराला तोंड देत, बऱ्यावाईट परिणामांसह ही योजना सुरू आहे. डॉ. मनोहर यांना या योजनेबाबत विचारले तेव्हा ते म्हणाले, अनुदान योजनेची नीट अंमलबजावणीच झाली नाही. जी तत्त्वं समोर ठेवली गेली त्या तत्त्वांनुसार अंमलबजावणी सोपी नसली तरी योजना उपकारक आहे. ही योजना निर्दोष करणे अधिक महत्त्वाचे. मात्र स्नेहबंधांना, आग्रहांना बळी पडून योजना दूषित झाली तर वाङ्मयाला त्याइतके घातक दुसरे नाही.

## नव्या माणसाची अस्मिता

मनोहरांची नियुक्ती हा जनसामान्यांच्या औत्सुक्याचा विषय झाला आहे. याचे कारण मनोहर जनसामान्यांतलेच आहेत. ''नियुक्तीनंतरच्या तुमच्या भावना

जाणून घ्यायच्या आहेत'' असे मी त्यांना सांगितले. ते म्हणाले, ''महाराष्ट्रात विविध वाङ्मयीन चळवळी आहेत. उपेक्षित, ग्रामीण, दलित, जनसाहित्य... आदि, यातून नव्या लाटा येत आहेत. मुक्या प्रतिभांना नवे धुमारे फुटत आहेत. त्यांच्या यातनामय जीवनानुभवातील मनोज्ञ आशयाची जी श्रीमंती आहे ती अद्याप शब्दबद्ध झालेली नाही. ती व्हावी. आताशा मराठी साहित्याचा चेहरा पालटतो आहे. एक नवी जडणघडण होत आहे. मराठी साहित्यात आमूलाग्र स्थित्यंतर होऊ लागले आहे. मी सामाजिक स्तरांशी संबंधित असल्याने हे सर्व बदल मला ज्ञात आहेत. प्रबोधनाची चळवळ नव्या माणसाच्या शोधात आहे. नव्या माणसाच्या अस्मितेचा मी शोध घेईन.''

''साहित्य संस्कृती मंडळाची निर्मिती, उद्देश, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व डॉ. बारलिंगे यांची धोरणे याचा मी अभ्यास करणार आहेत. मंडळाच्या तात्त्विक अधिष्ठानाला प्रवाहित्व यायला हवे असे मला वाटते. मंडळाचा ढाचा थोडा लवचिक करता येईल काय, हाही माझा प्रयत्न राहील. साहित्य संस्कृती मंडळाच्या अस्तित्वात असण्याला अर्थपूर्णता बहाल करणे हे माझे उद्दिष्ट राहील.'' असे डॉ. मनोहर यांनी सांगितले.

मराठी विभागात डॉ. मनोहर यांच्या कक्षात आमचे बोलणे चालले होते. एव्हाना विद्यार्थ्यांनी तेथे गर्दी केली होती. एक विद्यार्थी म्हणाला, आमची अवस्था तर एका डोळ्यात हसू अन् एका डोळ्यात आसू अशी आहे. एकीकडे त्यांच्या नियुक्तीचा आनंद आहे, तर दुसरीकडे ते काही काळ विभाग सोडून जातील याची खंत, हूरहूर.

अशीच भावना कुटुंबियांचीही. थोडेबहुत वाचता येणाऱ्या त्यांच्या मोठ्या भावाने वर्तमानपत्रातील बातमी वाचून व फोटो बघून नागपुरात आल्यानंतर आपल्या यशवंताची कडकडून भेट घेतली. त्याची पाठ आनंदाश्रूंनी भिजवली. घरात सहा भावांमध्ये यशवंत मनोहर हे धाकटे. तेच एकटे शिकले. हे मनोहर कुटुंब काटोलजवळील येरला (धोटे) येथील. यशवंत मनोहर यांचे दोन भाऊ गावीच शेती व शेतमजुरी करतात. सर्वात मोठे बंधू गोधनीला आहेत. ते रेल्वेत गेटमन होते. एक काटोलला व एक नरखेडला आहेत. नरखेडला असलेल्या भावाचे चौथीपर्यंत शिक्षण झाले आहे. यशवंतरावांचे शिक्षण आणि पुढारलेपण त्यामुळे घरच्या सर्वांना कौतुकाचे, गौरवाचे वाटते. वडील राजाराम मनोहर शेती करायचे. ८२ साली त्यांचे निधन झाले. आईचेही निधन झाले.

मनोहरांच्या घरातील इतर मंडळी शिकली नसली तरी अशिक्षित नव्हती.

वाङ्मयभिरुची आणि सामाजिक चळवळीला पोषक ठरेल असेच वातावरण घरात होते. मनोहरांच्या बालमनात ते संस्कार रुजले आणि शिकून खूप मोठे होण्याच्या जिद्दीने अंधार तुडवत तुडवत प्रकाशाच्या दिशेने त्यांचा प्रवास सुरू झाला. या प्रवासात असीम जिद्दीबरोबर त्यांच्या सोबतीला होते संवेदनशील मन आणि त्या मनाची स्पंदने जिवंत ठेवणारी कविता. मनोहर सांगत होते.

''आमचे घराणे १९४८-५० पर्यंत वारकरी संप्रदायी. येरल्यातील आमचे घर म्हणजे या संप्रदायाचे केंद्रच होते. वडील, भाऊ कीर्तन करीत. भजने म्हणत. घरी पखवाज, वीणा, तबला, संबळ, मृदंग, ढोलकी इत्यादी वाद्ये होती. वडिलांना व भावांना ती वाजवता यायची. भजन, कीर्तन यामुळे घर सतत गजबजलेले. शाहिरीचाही वारसा मला मिळालेला. वडील तमाशात ढोलकी वाजवायचे. गायचे. बंधू सदाशिव यांचा तुऱ्याचा फड होता. हे सदाशिवराव गुरे चारता चारता थोडेबहुत लिहा-वाचायला शिकले पण प्रवचने-निरुपणांची देण त्यांना बहाल होती. पांडवप्रताप, शिवलीलामृत, हरिविजय यांची पारायणे, निरुपणे ते गावात व अन्यत्रही करायचे. समजावून सांगण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. लोक त्यांच्याभोवती जमायचे. मी हे सारे बघत, अनुभवत होतो आणि या संस्कारांनी नकळत घडला जात होतो. घरी गरिबी होती पण भावनिक दारिद्र्य नव्हते, अशिक्षितपण होते पण अडाणीपणा नव्हता.''

## अनवाणी पायपीट

''५२-५३ चा तो काळ होता. मी असेन तिसरी-चौथीत. चित्रशाळा प्रकाशनाची सकल संतगाथा त्या लहान वयात मला बघायला मिळाली आणि माझ्या भावविश्वात तुकारामाने अत्युच्च स्थान पटकावले ते आजही कायम आहे. चौथीनंतर पुढे शिकण्यासाठी हट्ट धरला. येरल्याहून काटोलला ३ कोस अंतर रोज पायी येणे-जाणे करून पाचवी ते सातवीपर्यंतचे शिक्षणपण केले. पायी जाण्याचे कारण आगगाडीसाठी पैसे नव्हते. पायात चपला कधी नसायच्याच. पावसाळ्यात चिखल तुडवताना होणारे हाल अद्याप मनात घर करून आहेत. त्या काळात सुटीच्या दिवसात शेतात निंदण-खुरपण करून मी वह्या-पुस्तकांसाठी पैसे जमवत असे. आठवी ते दहावीपर्यंतच्या शिक्षणासाठी काटोलला खोली करून राहू लागलो. काटोलला बी.आर. हायस्कूलमध्येच शिकायचे असे ठरवले होते. कारण तेथील शिक्षक अविनाश वरोकर यांची कीर्ती कानावर होती. ते फार छान शिकवत. त्यांच्याकडे आकर्षित होण्याचा दुसरा एक धागा होता तो कवितेचा. ते उत्तम कवी

होते. आठवी-नववीत असतानाच मीही कविता लिहू लागलो. सुरुवातीला काही चळवळीची गाणी लिहिली. नंतर प्रेमकविता. माझ्या काही कविता वरोकरांनी दुरुस्त करून दिल्या होत्या. बोलण्याविषयी माझ्यात न्यूनगंड होता. आपली भाषा, उच्चार चुकेल याची भीती असायची. लिहायचो मात्र छान. परीक्षेतील माझे मराठीचे पेपर वरोकर सर वर्गात वाचून दाखवायचे. बोलण्यातील न्यूनगंड पुढे हळूहळू नाहीसा झाला.

मॅट्रिकनंतर शिकण्यासाठी औरंगाबादला जायचे मी ठरवले. खरे तर मी जवळचे नागपूरही पाहिले नव्हते. दूर जाणार म्हणून घरच्यांची नाराजी, रडारड झाली पण माझा निर्णय ठाम होता. औरंगाबादला जायचे मी मनावर घेतले. याचे कारण गावातले माझे जवळचे मामेभाऊ चंद्रकांत तायडे. ते तिथे जाऊन बी.एस्सी. झाले होते व असिस्टंट स्टेशनमास्तर म्हणून नोकरीला लागले होते. इंग्लिश बोलायचे. मला आकर्षण वाटले. शिवाय, औरंगाबादला बाबासाहेबांच्या कॉलेजात गेले की माणूस मोठा होतो ही श्रद्धा होती. हट्टाने गेलो. मिलिंद महाविद्यालयात बी.ए. ऑनर्स मराठीच्या पहिल्या बॅचला प्रथम श्रेणीत आलो. नंतर एम.ए. परंतु परिस्थितीमुळे मला शिक्षण बंद करावेसे वाटले. रा.ग. जाधव यांनी मात्र आग्रहच धरला. बी.ए. ऑनर्सच्यावेळी जाधवसरांनी खूप मार्गदर्शन केले होते. त्यांच्या आग्रहामुळे एम.ए. ला प्रवेश घेतला. डिपार्टमेंटल मेरिट स्कॉलरशिप मिळायची. एम.ए.च्या दोन वर्षांनी माझ्या आयुष्यालाच वळण दिले. ख्यातनाम समीक्षक वा.ल. कुलकर्णी विभाग प्रमुख होते. रा.ग. जाधव, गजमल माळी, डॉ. भालचंद्र फडके, यु.म. पठाण, सुधीर रसाळ, श्री.म. पिंगे हे गुरुजन. या सर्वांबद्दल मला अपार आदर आहे.''

## प्रेमापासून दाहकतेकडे

''एम.ए.ला असताना माझ्या प्रेमकवितेला बहर आला होता. एक श्रीमंताघरची देखणी पोर माझ्या प्रेमात पडली. माझ्याजवळ कवितेशिवाय तेव्हा काही नव्हते. अगदी फाटका होतो. प्रेम मात्र अस्सल होते. पण तिला आपलेसे करून घेणे अशक्य होते. तिला आणि स्वतःलाही समजावण्यात एम.ए. पार्ट वनचे वर्ष परीक्षेविना गेले. दुसऱ्या वर्षात दोन्ही परीक्षा एकदम दिल्या आणि मेरिटमध्ये तिसरा आलो. एम.ए.ची ती दोन्ही वर्षे एका विलक्षण धुंदीत गेली. विद्यार्थ्यांविषयी आपुलकी असलेला तज्ज्ञगुरुवर्ग लाभला ही केवढी गौरवाची गोष्ट. वा.लं.नी माझ्यावर खूप प्रेम केले. गजमल माळींनी मदत केली. ''पुस्तक वाचशील तर पुढे उपयोगी पडेल. कॉलेज निवडणुकीच्या

गर्दीत हरवू नकोस.'' हा त्यांनी दिलेला त्यावेळचा सल्ला तेव्हा शिक्षा वाटली तरी आता त्याचे मोल कळते. योगीराज वाघमारे, वामन निंबाळकर, सुखराम हिवराळे हे माझे सहाध्यायी, सोबत. गावकरी, मनोहर, अजिंठा, पंचशील यात तेव्हा आमच्या कविता छापून यायच्या. मिलिंद महाविद्यालयातील काळ माझे व्यक्तित्वांतर घडविणारा ठरला. मिलिंदमध्ये मी भित्तीपत्रक सुरू केले होते. मी लिहिलेले एक गीत महाविद्यालयातील सर्व कार्यक्रमाआधी आवर्जून म्हटले जायचे. कवी वा.रा. कांत यांच्याकरवी मला 'कॉलेज कवी' हा पहिला बहुमान मिळाला होता.''

तुमच्या प्रेमकवितेचा बहर ओसरून सामाजिकतेचे भान कसे व केव्हा प्रखर झाले? असे मी विचारता डॉ. मनोहर म्हणाले, ''६२-६३ सालापासून माझी सामाजिक जाणीव तीव्र झाली. ६७ साली डॉ. म.ना. वानखडे यांनी 'अस्मिता' मासिकासाठी चालविलेल्या आंदोलनात मी सामील होतो. 'अस्मिता' हे एक आंदोलनच होते. त्याच्या पहिल्या तिन्ही अंकात माझ्या कविता आहेत. एम.ए. नंतर मी पैठणला नोकरी धरली आणि पुढे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून नागपूरच्या मॉरिस कॉलेजमध्ये रुजू झालो. विचारांना निश्चित दिशा मिळाली होती. वाचनाचे संस्कार झाले होते. वास्तवदर्शन आणि वैयक्तिक जीवनातील अनुभव आता वेगळ्या तऱ्हेने आकार घेऊ लागले. कवितेला आता स्वत्व प्राप्त झाले होते. ७७ साली उत्थानगुंफा हा माझा पहिला कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. उत्थानगुंफेचे चांगले स्वागत झाले. नरहर कुरुंदकर, रा.ग. जाधव, सु.श्री. पांढरीपांडे, सुधीर बेडेकर, म.सु. पाटील या मान्यवरांनी चांगले अभिप्राय दिले. मला धीर आला. 'उत्थानगुंफेत कविताच नाहीत. मनोहरांनी पुढील संग्रहात कविता लिहाव्या.' असा अभिप्राय अस्मितादर्शमध्ये आला होता. तो तसा अनपेक्षित नव्हता. त्यामुळे त्यांचे काही वाटले नाही. कवितालेखन जोमाने सुरू राहिले.''

''मॉरिसमधील नोकरी ठीक सुरू होती पण अकरावीपासून एम.ए. पर्यंत शिकविणे म्हणजे असमतोलच होता. पुढे विद्यापीठाच्या मराठी विभागात जागा निघाली तेव्हा अर्ज केला आणि माझी निवड झाली. माझ्या मनाप्रमाणे दर्जाचे काम मिळाले. लेखन, अभ्यासाला भरपूर वाव मिळतो. माझी पीएच.डी. याच काळात पूर्ण झाली. नागपुरात आल्याचेही अनेक फायदे मिळाले. शरच्चंद्र मुक्तिबोधांसोबत काम करायला मिळाले ही गौरवाची बाब आहे. त्यांच्याशी वाङ्मयीन विषयावर केलेल्या गंभीर चर्चा म्हणजे आयुष्यभराचे पाथेय आहे. डॉ. द.भि. कुलकर्णी यांच्याशीही त्याच काळात संबंध आला. त्यांच्याशीही मौलिक चर्चा व्हायच्या.

शनवारे, भोळे आदी चर्चेत सामील असायचे. हनुमाननगरात राहात असताना चंद्रकांत वानखेडे, वामन निंबाळकर, प्रसेनजित ताकसांडे आदी असा मोठा ग्रुप होता. कविसंमेलने, चर्चा यात रंगलो की रात्र कधी संपायची हे कळायचे नाही.

## पत्नीचे सहकार्य

या तुमच्या वाटचालीत तुमच्या सौभाग्यवतींचे सहकार्य कितपत?

''पुष्पलता मनोहर यांचे मला संपूर्ण सहकार्य आहे. घरच्या कामांमध्ये, आल्यागेल्यांकडे लक्ष द्यायला मला शक्य नसले तरी तशी गरजही ती पडू देत नाही. सारे व्यवस्थित सांभाळते. आमचे लग्न झाले त्यावेळी ती फक्त सहावीपर्यंत शिकली होती. मी जिद्दीने तिला शिकविले. गेल्या वर्षी ती मराठीत एम.ए. पीएच.डी. झाली. शिक्षणाचे महत्त्व तिलाही आता पटले आहे. 'मी शिकले नसते तर एवढ्या मोठ्या माणसाची अडाणी बायको असे लोकांनी म्हटले असते. म्हणून शिकून तुमची बरोबरी जरी केली नाही तरी तुम्हाला व मला खंत वाटू नये इतपत साध्य केले आहे' असे ती आता म्हणते. माझ्या पीएच.डी.च्या काळात तिने भरीव मदत केली. मुलांचे शिक्षण, संगोपन याकडे तिचेच संपूर्ण लक्ष होते.''

साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्षपद मिळाल्यानंतर अनेकांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या. कुटुंबियांना काय वाटले?

''कुटुंबियांना तर आनंदच झाला. आपल्या नवऱ्याच्या कर्तृत्वाचे चीज झाले असे माझ्या पत्नीला वाटते. मुलांनाही बाबांचा फोटो, माहिती वृत्तपत्रात पाहून आनंद होतो. माझ्या मुलाने तर लेखच लिहिला. तो म्हणतो मी लेखक होईन तुमच्यासारखा. 'आंबेडकर, फुले यांचे कार्य आजही मला या शहरात दिसते.' हे त्याच्या लेखातील एक वाक्य मलाही चकित करणारे आहे.''

येथवरचा पल्ला तुम्ही गाठला. येरल्यातील तुमचे लहानपण आठवल्यानंतर काय वाटते?

''ग्रामीण जीवनात दारिद्र्य, अडचणी अजूनही आहेत. महाप्रश्न वाटावा असे हे जीवन. त्या जीवनातून माणसे बाहेर येत नाहीत. मी जिद्दीने बाहेर आलो हा चमत्कारच. औरंगाबादला मी गेलो नसतो तर आज जो मी आहे तसा नसतो. अशक्य कोटीतील वाटावी अशी गोष्ट आहे. परिस्थितीमुळे इतर भाऊ शिकू शकले नाहीत. मीच एकटा जिद्दीने शिकलो. माझ्याकडे पाहून त्यांना कौतुक वाटते. गौरव वाटतो. येरल्याला आता निमित्तानेच

जाणे होते. मुलांना अधूनमधून घेऊन जात असतो. आपला बाप अशा खेड्यात जन्मला, वाढला, दारिद्र्य अन् हालअपेक्षा सोसत त्याने शिक्षण पूर्ण केले यावर त्यांचा एकदम विश्वास बसत नाही. याची जाणीव फक्त असू द्या, असे माझे मुलांना सांगणे आहे.

यशवंत मनोहर. यशवंत होण्यासाठी जिद्दीने केलेल्या मनोहर प्रवासाचेच हे नाव. डॉ. द.भि. कुलकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे ते आता 'मराठी साहित्याचे मुख्यमंत्री' झाले आहेत. साहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षीय कारकीर्दीत त्यांच्या हातून मोलाची, भरीव कामगिरी घडो आणि या प्रतिष्ठेच्या पदाला वादग्रस्ततेची झळ न पोहोचता वादातीतता लाभो ही शुभेच्छा !

१७

# मनोहरांचे मूर्तिभंजन

## ▪ डॉ.शिरीष गोपाळ देशपांडे

स्वातंत्र्य हे मूल्य मूर्तिभंजनच्या तळाशी आहे. ज्या देशात माणसाचे माणूसपण जपण्याचा आदर नाही त्या देशाच्या प्रस्थापित मूल्यांचा विटाळ झिडकारून देणारे कवी यशवंत मनोहर बंडखोर आरोपपत्र लावताना म्हणतात -

''तुझ्या कुरूपतेची भक्ती करणारे
राष्ट्रकवी, राष्ट्रवादी ठरले.''

समतेच्या गळ्याला नख लावणारी हुकूमशाही सत्ता हे मनोहरांच्या कवितेतील निषेधाचे लक्ष्य आहे. आपल्या देशाच्या गौरवाला उणे आणणारी मस्तवाल प्रवृत्ती निखंदून काढण्याची आस त्यांना लागलेली आहे. मायभूमीजवळून इतर लेकरांना ओरबाडून दूर ढकलणाऱ्या नादात बांधवांची कैफियत मांडताना मनोहर म्हणतात-

''माझ्या देशा! तू आमचाही देश आहेस
तू आम्हाला देश दे माझ्या देशा।''

मनोहरांच्या अंतःकरणाने समतेची धरलेली तहान समतेच्या ध्यासाने पेटलेले त्यांचे श्वासही त्यांच्या स्वातंत्र्य मूल्यांचीच बाजू आहेत. मनोहर म्हणतात -

''मला घेतो तपासून
बेचिराख प्रवास, त्यातील सहवास
विजनवास... दुस्वास...''

मनोहरांची शैली वक्तृत्वाची, आक्रमक आणि ज्वलनशील आहे. आतापावेतो केलेल्या पापी व्यवस्थेला शाप देऊन उद्याच्या जगाचे सुस्पष्ट स्वप्न मनोहर मांडतात.

तुकाराम, केशवसुत यांजसारख्या रोखठोक कवींच्या वारशाने मनोहर बोलतात. मनोहरांच्या मूर्तिभंजन या संग्रहात उत्थानगुंफापूर्वीच्या काही कविता आहेत. त्यात रोमँटिक, सामाजिक कविताही आहेत.

''गवई भावांचे त्यांनी डोळे काढले
मला त्यातले भावार्थ, यथार्थ दोन्ही कळेनात
पण काढलेले डोळेच एकदा म्हणाले

आम्हाला काढले
पण येथे ते कोणाला दिसले नाही
हा देशच आंधळा
याचेही डोळे जन्मतःच
कुणी काढून घेतले असावेत.''

जात हा या देशात अपराध झाला आहे. यापूर्वी कुणी त्याबद्दल आवाज उठवला नव्हता. दलित साहित्याने मराठीत पहिला आवाज उठविला आहे. इथे गर्भातच श्रीमंती वा गरिबी, वेगवेगळ्या जाती असतात. या देशाला शाप देणारी तत्त्वे उगवतात. इथे या फालतू प्रतिष्ठेच्या बाबी जातीप्रमाणे जन्माने ठरतात. असल्या घाणेरड्या जगात कोणत्याही हृदयसंपन्न बुद्धिमंताचा प्राण गुदमरून जाईल. इथे कष्ट, कौशल्य आणि ज्ञानाचा वनवास आहे. ज्यांच्या हाती जात, धर्म आणि सत्ता यांचा रट्टा आहे. तो इथे प्रतिष्ठित ठरतो.

''लबाडांच्या घरी कोल्हे कारभारी
जुगारी भेटले दारूड्यांना
विद्वेषाच्या घरी विषाची मैफल
छिनाल भेटली बाजिंदीला
नपुंसका तारी वांझोटी बाईल
होईल तयांचे भले होवो.''

आणि हा सगळा अन्याय आपण सहन करतो. गुलामगिरीची चटक लागलेले आपण लाथा खाण्यात भूषण मानतो.

उष्टे खावोनिया करिती रवंथ। नाही खेद खंत कुकर्माची
दगडांच्या साठी देऊळ उभारू। माणूस अंथरू स्वार्थाखाली।''

अज्ञान आणि हरामखोरीचे, कैफाने पोषण करणारा, आपला समाज अजून जनावराचा वानरही व्हायचा आहे. मग वानराचा नर आणि नराचा नारायण होण्याचा प्रश्नच कुठे संभवतो.

दुतोंडी समाजात निदान कवी तरी प्रांजळ असता तर तो खरोखरच क्रांतीचे तत्त्वज्ञान देऊ शकला असता. पण इथे सर्वोच्च सज्ञान ग्रहण करणारा कवीही याच समाजाचे अपत्य असल्याचे विदारक चित्र मनोहरांनी रेखाटले आहे. मराठीत प्रतिष्ठा पावलेल्या कवींचे दुटप्पी धोरण आणि कळप करण्याची प्रवृत्ती ह्यांचा नावानिशी आढावा मनोहरांनी घेतला आहे.

१८

# वैदर्भीय काव्याची सत्वधारा

■ प्रमोद शिखरे

सामाजिक अंतर्विरोधामागे ज्या प्रवृत्ती आणि जे घटक कार्यरत असतात त्यांचे विश्लेषण आणि वर्गीकरण मानववंशशास्त्राच्या अभ्यासकक्षेत येणाऱ्या 'देशीवादी' चळवळी ह्या विषयाशी संबंधित आहेत. प्रसिद्ध मानववंश शास्त्रज्ञ 'राल्फ लिंटन' यांनी केलेल्या व्याख्येनुसार ''देशीवादी चळवळ म्हणजे एखाद्या समाजातील सदस्यांनी त्यांच्या संस्कृतीच्या निवडक पैलूंचे पुनरुज्जीवन करण्याचा वा त्यांना चिरस्थायित्व देण्याचा जाणीवपूर्वक व संघटितपणे केलेला प्रयत्न होय.'' ह्या व्याख्येनुसार भारतीय समाजातील वर्ण आणि वर्गव्यवस्थेमागील परस्परविरोधी प्रवृत्ती-संघर्षाचे स्वरूप लक्षात येते. आपल्या समाजातील मध्ययुगीन मूलतत्त्ववादी प्रवृत्ती या देशीवादाच्या चिरस्थायीत्ववादी प्रवृत्ती या उपप्रकारात येतात. परसंस्कृतीच्या सतत संपर्कातून होणाऱ्या बदलांमुळे आपल्या संस्कृतीतील आपल्याला हवे असलेले सांस्कृतिक घटक किंवा परंपरा जर नामशेष झाल्या असतील तर त्यांना पुनरुज्जीवित करणे किंवा नामशेष होत असल्या तर त्यांना चिरस्थायी करण्याचा प्रयत्न समाजातील एक घटक हेतुपुरस्सर करीत असतो. अशा प्रवृत्ती अर्थातच शोषक असतात. पण समाजातील दुसरे घटक अशा प्रवृत्तींविरुद्ध जाऊन, समाजस्वास्थ्यासाठी जाचक किंवा प्रतिकूल असलेल्या सांस्कृतिक घटकांना किंवा परंपरांना नामशेष करण्याचा प्रयत्न करतात. या दुसऱ्या प्रकारच्या प्रवृत्ती या विवेकाधिष्ठित देशीवादी प्रवृत्ती होत. या संदर्भात डॉ. आंबेडकरांचा वर्णव्यवस्थेविरुद्धचा लढा ही एक विवेकाधिष्ठित चळवळ आहे.

परिवर्तनवादी विचारसरणी आणि परिवर्तनवादी साहित्य, वाङ्मय या परस्पर व्यावर्तक बाबी आहेत. विशिष्ट विचारसरणीशी कटिबद्ध असलेले साहित्य हे विशिष्ट विचारसरणीला अभिप्रेत असलेल्या विचारांना, तत्त्वांना एकाच वेळी संप्रेषित आणि प्रस्थापित करीत असते. साहित्याच्या प्रयोजनाची 'सामाजिक उपयुक्तता' ही साहित्याच्या कटिबद्धतेमुळेच अपरिहार्य आणि अपर्यायी बाब ठरते.

कटिबद्धतेच्या संदर्भात वैदर्भीय काव्याची सत्वधारा खऱ्या अर्थाने फक्त

दोनच कवींनी सतत प्रवाही ठेवली आहे. ते दोन कवी आहेत शरच्चंद्र मुक्तिबोध आणि डॉ. यशवंत मनोहर. प्रस्तुत लेख हा दोघांच्या काव्यविषयक उपलब्धीचा तुलनात्मक निबंध नव्हे तर दोघांच्या जीवनदृष्टीचा, तत्त्वप्रणालीचा वैचारिकतेचा आणि चिंतनाचा साकल्याने केलेला अभ्यास होय.

शरच्चंद्र मुक्तिबोधांची कविता बहुआयामी, समग्रलक्ष्यी आहे. संहितेचे वस्तुनिष्ठ आविष्करण आणि सामाजिक विषमतेला भिडणारी प्रज्ञा ही मुक्तिबोधांची वैशिष्ट्ये आहेत. सामाजिक संरचनेच्या वर्गीय आकलनामुळे आणि मूलगामी जीवनदृष्टीमुळे त्यांच्या निर्मितीचा पट विस्तृत आणि बहुआयामी आहे. वस्तुनिष्ठ दृष्टिकोणामुळे त्यांच्या निर्मितीत अनुभवाच्या प्रतिमाकरणाला फारसा वाव नाही. वि-रचित स्वरुपात मांडल्यामुळे अनुभव फ्रॅगमेंटल वाटतात. त्यांच्या एकूणच चिंतनाला असलेल्या वर्गीय बैठकीमुळे त्यांचा काव्यप्रवास व्यक्तीकडून समष्टीकडे झालेला आहे. मार्क्सवादी विचारसरणी, प्रचंड वाचन आणि निर्मितीक्षमता ह्या त्यांच्या जमेच्या बाजूंना चिंतनाची, भाषिक क्षमतेची, अनुभवांची जोड मिळाल्याने त्यांनी आपला प्रचंड काव्य विस्तार मराठी वाचकांसमोर ठेवला आहे. समष्टीच्या अंगाने विकसित होणारी विषमतेवर विखारी भाष्य करणारी आणि निर्णायक विधाने करणारी त्यांची कविता खऱ्या अर्थाने वैदर्भीय काव्याच्या सत्वधारेचे उगमस्थान आहे.

मुक्तिबोधांची जीवनदृष्टी, तत्त्वप्रणाली आणि मार्क्सवादी वैचारिकता ह्यांमुळे त्यांची आवाहक आणि विधानाश्रयी कविता वेगळी उंची गाठू शकली. त्यांच्या समकालीन तत्सम शेरेबाज कवींपेक्षा त्यांची कविता प्रामाणिक वाटते. मुक्तिबोधांची तत्त्वदृष्टी ऐहिक, जडवादी आहे. सतत बदलत्या जीवन परिप्रेक्ष्याचं वस्तुनिष्ठ विश्लेषण ते ऐहिक तत्त्वदृष्टीमुळेच करू शकले. वस्तुतः त्यांची कविता मानवी अवहेलनांच्या, दुःखाच्या आंतरिक चित्कारांची इकोपॉईंट आहे.

दलित वाङ्मयीन चळवळींच्या संदर्भात असे बोलले जाते की, दलित साहित्य आवर्तात सापडले आहे. मुळात ते आवर्त नसून तो एक प्रकारचा साचलेपणा आहे. अन्याय्य व्यवस्थेचा विरोध करीत, क्रांतीचे आवाहन करणारी कविता किंवा इतर साहित्य प्रकार 'सामाजिक आवाहनाच्या' एका 'सार्वजनिक थांब्यावर' येऊन ठेपतात. यामुळे साचलेपणा येतो. आफ्रीकन-अमेरिकन नेग्रीट्युड चळवळीच्या साहित्यातही काही काळ असा साचलेपणा आल्याचा इतिहास आहे. या संदर्भात डॉ. यशवंत मनोहर सरांची कविता ही कोंडी फोडून समोर गेली आहे. व्यक्तीच्या 'स्व'च्या जडण-घडणीस समकालीन सामाजिक धारणा, तत्त्वप्रणाली, व्यक्तीची ज्ञानपातळी आणि घटना-घटिताचा त्याने लावलेला

अर्थ वगैरे घटक कारणीभूत असतात. मनोहरांची कविता ही 'स्व'च्या जडण्या-घडण्याच्या प्रक्रियेची सत्ताशास्त्रीय/ज्ञानशास्त्रीय उकल करणारी प्रगल्भ मीमांसा आहे.

एखाद्या सामाजिक तत्त्वप्रणालीवरचा समाजाचा विश्वास उडाला तर समाज दुसऱ्या एखाद्या पर्यायी तत्त्वप्रणालीचा स्वीकार करतो. तत्त्वप्रणालीवरचा विश्वास उडणे आणि तत्त्वप्रणाली निरर्थक वाटणे यात गुणात्मक भेद आहे. दुसऱ्या प्रकारात समाजमानस अराजकतेकडे वळते. समाजस्वास्थ्याचा सरळ संबंध व्यक्तीच्या जिजीविषेच्या मूळ प्रेरणेशी असतो. आज समाजजीवनावर होत असलेल्या धार्मिक तांत्रिकता आणि धर्मातीत किंवा धर्मबाह्य तांत्रिकतेच्या संक्रमणामुळे अमानवीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला आहे. माणसाची नैसर्गिक महत्ता नष्ट होते आहे. अशा अराजक आणि निर्णायकी समाजावस्थेत विचारवंतच समाजाला स्थैर्य देणाऱ्या तत्त्वप्रणालींना जन्म देतात. मनोहरांची कविता याच तत्त्वप्रणालीचे उत्थान करणारी, आवाहक आणि मार्गदर्शक कविता आहे. एकात्मतेच्या मूळस्रोतांना भिडणारी मुखर वैचारिकता, सांस्कृतिक राजकारणामागे कार्यरत असलेल्या कुप्रवृत्तींचा निषेध आणि प्रगाढ चिंतनशीलता ह्यांमुळे मनोहरांच्या कवितेने आंबेडकरी विचारपट विस्तृत स्वरूपात वाचकांसमोर मांडला आहे.

शरच्चंद्र मुक्तिबोध आणि डॉ. यशवंत मनोहर या दोघांव्यतिरिक्त वैदर्भीय वाङ्मयीन चळवळीत अनेकांचा सहभाग आहे. पण सामाजिक बांधिलकी जपून लिहिणाऱ्या अनेकांचे लेखन सामाजिक आवाहनांच्या कक्षेबाहेर गेले नाही. रंजनवादाचा आंधळा स्वीकार, निर्बुद्ध मध्यमवर्गीय जाणिवा, सर्जकतेचा, वैचारिकतेचा अभाव आणि सवंग लोकप्रियतेच्या मागे लागल्याने मागणी तसा पुरवठा स्वरूपात लिखाण करणाऱ्यांची संख्या जास्त आहे. विदर्भातील एका प्रतिभावंताचा प्रवास गूढवादी-भावनाप्रधान वगैरे मार्गाने गेल्यामुळे रुद्ध झाला आहे. बाजारात कॅसेटच्या रूपाने वीस-पंचवीस रुपयात विकत मिळत असल्यामुळे त्या प्रतिभावंताच्या दुःखाच्या अस्सलतेविषयी शंका उत्पन्न होतात.

रंजनवादी साहित्य मुळात सामान्य माणसाला त्याच्या सामाजिक समस्येपासून अनभिज्ञ ठेवण्याचे कार्य करीत असते. रंजनात गुंतवून त्याला शोषक-शोषित संबंधांचे खरे स्वरूप समजू दिले जात नाही. अशा साहित्याला अभिजन वर्गाच्या हितसंबंधांचा टच असतो. इतर वैदर्भीय कवींपेक्षा मुक्तिबोध आणि मनोहर म्हणूनच वेगळे ठरतात. वैदर्भीय काव्याची सत्वधारा ह्या दोघांनीच वाहती ठेवली आहे.

# १९

# मधुर यातनांच्या हवाल्याने-डॉ.यशवंत मनोहरांना

## ▪ प्रा.मुकुंद राजपंखे

आदरणीय डॉ. यशवंत मनोहर सर, नको... फार दूरचे वाटते ते.

आदरणीय मनोहर सर, असेच बरेय.

वादळाच्या भेटीला जायचे म्हणजे वावटळींना अनेकदा विचार करावा लागतो. वावटळींच्या वाटांवर अनंत अडचणी. तेव्हा भेट अवघड होत गेली. गेल्या अनेक दिवसांपासून मी स्वतःलाच अनेकदा टाळत गेलो, तेव्हा आपणांशी बोलणे, भेटणे दुरावत गेले. पण आपण दूर होतातच कुठे? युगसाक्षी साहित्य, नवे साहित्यशास्त्र, लातूर, अंबाजोगाई, आपली निर्झर पत्रे, कार्यक्रमाच्या कॅसेट्स... या ना त्या रूपाने आपला सत्संग होता. तेव्हा प्रत्यक्ष आपणास भेटलो, बोललो नाही. आपण लिहिता...

''जिंदगीने डोळ्यात आसवे आणि सूर्यानेच हातात लेखणी दिली;<br>
एका हाताने ज्वाळांच्या मिठ्या सोडवल्या, दुसऱ्या हाताने कविता लिहिली.''

माझ्यासमोर आता 'मौजे'चा दिवाळी अंक आहे. आपण आहात. आपला विचार आहे. आपण दूर आहात कसे म्हणू? 'जहरांची मरणे' पाहणारा 'युगसाक्षी' माणूस दूर कसा असू शकेल? आयुष्याला कलाटणी देणाऱ्या क्षणांचा इतिहास आपण दिलात. आपल्या सोबतीने अनेक रानफुलांना जाग आली. परिसर कवितेच्या गंधाने भन्नाट झालाय. पत्रांची सामूहिक आवर्तने झाली आणि खोडांनाही अंकुर फुटले. शब्दांनी अंकुरल्या जखमांचे येथे सोने होत आहे आपल्या परिसपदस्पर्शाने. युगाचे हुंदके आपण पानोपानी पेरून माणुसकीची वाट मोकळी केलीत. तनाची मनमानी थांबली आहे. पिकांची सुगी आहे. हा प्रताप त्या 'सब्बं निच्चं-सब्बं अनिच्चं' वादळाचा. न भागणाऱ्या तहानेचे जसे असते तसेच झालेय सर. भाषण कसले? कविताच ती उत्स्फूर्त... जी आपण इथे पेश केलीत. अनेक निब्बर दगडांना पाझर फुटले. वातावरण अजून गंधारून आहे.

आमच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या मोडांना आपण जी झळाळी दिलीत, त्याचा फुलोरा परिसराला बेधुंद करतो आहे. अत्तर प्याली उनाड

पाखरे भन्नाट उड्डाणे घेताहेत कवितेच्या अंगणात. त्यांनी पाहिलंय 'युगसाक्षी प्रज्ञासूर्याला जायबंदी पंखांनी उड्डाणे घेताना... मरणझडीतही न मरू दिलेल्या त्याच्या प्राणप्रियेला.' सूर्य माथ्यावर मिरवताहेत ही मुले 'ओलाव्याचे स्वप्न घेऊन.' 'जपून रे माझ्या फिनिक्स पक्ष्यांनो जपून जरा...' चा सल्ला त्यांना पटला आहे आणि तरीही 'बेइमान कागदावर ते सौंदर्याची शिल्पे कोरतंच आहेत.' ही प्रज्ञा-शील-करुणेची कवच कुंडले धारण करून आमचे 'वाङ्मय मंडळ' आपल्या डोळस वाटेवर चालत आहे.

आपल्या कवितेतून कविता-युगसाक्षी साहित्य-४१२ त्यांना शिकविलेय 'कविता म्हणजे एक प्रकारे स्वतःला मधुर यातनांच्या हवाली करणे असते.' मधुर यातनांनी जखडून पायबंद केल्यावरही परवाने भीत नाहीत... शमा भोवती भिरभिरायला. ही वादळी आव्हाने कविता पेरते आहे मुलांच्या मस्तिष्कात. आपल्या कवितांनी, भावनांनी अजूनही पोट भरत नाही. प्रत्येकवेळेस एका नव्या संदर्भाने शब्द झेलत आहोत आम्ही आमच्या काळजावर. अमीट शिल्पांनी हल्ली काळजाचे गोंदण गोंजारत असतो. परवा लातूरला गेलो होतो. माणसांना कशी माणुस बनवते आपली कविता याची प्रचिती आली. आपल्या भाषणाची गांभीर्याने दखल घेतलीय लोकांनी. समाजकार्य, साहित्य, लेखन यातला आपण मांडलेला भेद भावून गेला लोकांना. कवींचे उत्थान एकदा Aristotle ने आपल्या Poetics मध्ये केले होते. प्लेटोने कवींना आपल्या आदर्श राज्यातून हाकललं Luanatics वेडे म्हणून. त्याची तितकीच गंभीर दखल घेऊन Aristotle म्हणाला होता...

> 'Poets are not luanatics but philosophers
> They are the best teachers of society.'

आपल्या खास शैलीत आपण मांडलेली आपली भूमिका कवीला चार बोटं आभाळ ठेंगणं करणारीच होती. असं इतकं खरं, मनातून कोणी बोलत नाही सर. त्यामुळे नेमके जायचे कुठे कळत नाही अनेकांना. आपल्या सहवासात मी नेहमी माझ्या लेखनामागच्या प्रेरणा, भूमिका आपल्या युगसाक्षी साहित्याशी पडताळून पाहात होतो. आपला शब्द माझ्यासाठी Mathew Arnold चा 'Touch Stone' आहे हे पटल्यावर आनंदाला पारावार राहिला नाही. खरं सांगू सर, आपल्याला वाचत, ऐकत गेल्याने आपल्याला लिहायचं खूप दिवसांत राहून गेलं. उगी काहीतरी... जयभीम सर... बरे आहे सर, खरे आहे सर... असा फुसका बार कधी मी उडवला नाही. कदाचित माझे थोडेसे राजानंद+प्रतिभासारखे असेल. आपण काय विचार करत असाल, असे एक

दोनदा वाटून गेले आणि तरीही भडभडून William Wordsworth म्हणतो तसा Spontaneous Overflow आला नाही. एकदा शब्दांची जुळवाजुळव केली खरी पण भावनेची वैचारिक बैठक बसली नाही आणि मी स्वतःला सज्जड दम दिला. शब्दांची कलेवरं कागदांवर सजवून भेटण्यापेक्षा चार दिवस थांबू म्हणत म्हणत इतके दिवस थांबलो. थांबलेल्या प्रत्येक दिवसाने मन लावून छळलं. छळण्याच्या सगळ्याच मर्यादा संपल्यावर आपणास प्रत्यक्ष भेटायचं ठरवलं. दरम्यानच्या काळात आपल्या युगसाक्षीने मीच माझा पुनर्प्रवास केला. अनेक चुका कळल्या, दुरुस्त करण्याजोग्या दुरुस्त केल्या. अजून थोड्या आहेत.

आपल्या पत्रांनी इथला परिसर अजून फुलून आहे. श्री बळीराम जोगदंड, श्रीमती जोगदंड परिवार आनंदाने न्हाऊन निघाला. कवितेच्या प्रांतात कधीच रस नसलेली ही आपली मंडळी, आज कवितेच्या उत्थानासाठी तन-मन-धनाने सम्मिलीत झालेली आहेत. श्री बळीराम जोगदंड सरांच्या संपूर्ण कुटुंबीयांच्या मनात काव्यफुलांचा गंध दरवळतो आहे. आपल्या सहभोजनाने जो कौटुंबिक जिव्हाळा दिला तो शब्दातीत आहे. श्री वाघमारे सर, श्री बळीराम जोगदंड सरांचे चुलत भाऊ जोगदंड सर, ही माणसे आज प्रा. अशोक नारनवरे व माझ्यासोबत, म्हणजे आम्ही सर्वजण एका ठराविक कार्यक्रमाच्या दृष्टीने खूप दिवसांपासून चर्चा करतो आहोत. रोजचा दिवस कवितेच्या चर्चेशिवाय थांबत नाही. बळीराम जोगदंड सर, वाघमारे सर, यांचाही काव्यांकुर फुलवण्याचं श्रेय आपल्या अंबोजोगाई भेटीलाच आहे.

आमचे उपप्राचार्य राजेश्वरराव देशमुख सर, साधा भोळा माणूस. आपल्या कवितांनी आणि भाषणांनी भारावून गेला आहे. परिसराच्या प्रत्येक कोपऱ्यातून कवितेचा गंध दरवळतोय. प्रा. डॉ. संतोष मुळावकर, दिनकर जोशी, दगडू लोमटे, प्रा. भगवान शिंदे, प्रा. संभाजी सावळकर ही सगळी मंडळी बेफाम खुश आहेत. आमच्या सगळ्यांच्याच आयुष्यात आपला प्रवेश म्हणजे एका स्वच्छ, वास्तववादी वाटेची सुरुवात आहे. प्रा. सागर मुंडेंचे थांबलेले काव्यलेखन नव्या दमाने सुरू झाले आहे. हे सगळे घडू शकले, त्याचे सगळे श्रेय मी प्रा. अशोक नारनवरेंना देतो. एका स्वच्छ नजरेने आमचा प्रवास आहे. स्पष्ट बोलतोत, तसं वागतोत. मतभेदाला कसला वाव नाही. युगसाक्षी साहित्याने घडवलेला तो चौकोनी चिरा आहे. ज्यांच्या मैत्रीमुळे आपला संपर्क होऊ शकला. आपल्या भूमिकेची योग्य समज असलेली माणसे भेटली की वाट बोजड वाटत नाही सर. अंधारात डोळे मिटून ज्याच्यासोबत जावं असा पाठीचा कणा माझ्यासोबत आहे. कार्यक्रमांची रूपरेषा, आयोजन, नियोजन याचा सुरेख संगम त्यांच्यात आहे. ही मांड आपण आपल्या विचारांनी बसवलीत.

प्रातिनिधिक स्वरूपात ते नेहमी आपल्या सोबत असतात. देहभान विसरून उपक्रमांची यशस्वी बीजं हा माणूस इथे पेरतो आहे. त्यांच्या सोबत आम्ही असतो, म्हणजे आपल्याच सहवासात असतो एका अर्थाने.

आदरणीय मॅडमना माझा जयभीम सांगा सर. त्यांना पाहिल्यापासून सॉक्रेटिसची बायको नेहमी माझ्या समोर असते. दोन दिवस लातूरात त्यांना बघितलं, ऐकलं. तो एक फार सुंदर अनुभव होता. मॅडमचा स्वभाव भावून गेला. एखाद्या महान साहित्यिकाची इतकी समजदार, अभ्यासू, सुखरूप गृहिणी असू शकते याचे आश्चर्य वाटले. आपल्या तब्येतीचे गमक म्हणजे मॅडमच. आता आपण फार लिहिलं पाहिजे या मॅडमच्या मताशी मी नव्वद टक्के सहमत आहे. आपल्या कवितांनी कधीच काळीज काबीज केले होते. पण आता आपल्या सौंदर्यदृष्टीचे किती कौतुक करावे कळत नाही. युगसाक्षी साहित्य, नवे साहित्यशास्त्र यात आपली कणखर भूमिका वाचताना खरोखर वाटते, मॅडमचे म्हणणे अगदी खरे आहे. प्रवास, आहार या गोष्टींची आपली थोडीशी ओढाताण त्यांना हळहळून सोडते. आपल्या लेखनाची खंबीर पाठराखण त्या करताहेत. तशाही तावडीतून त्यांनी आपणाला अंबाजोगाईला येऊ दिलं त्यामुळे त्यांचे आभार मानून मी त्यांना दुरावू इच्छित नाही. परभणीहून आपली गाडी चुकली. फार वाईट वाटलं की मॅडमला काय वाटेल? उभा महाराष्ट्र आपला शब्द झेलतो आहे सर. हा शब्द आमच्या काळजावर कोरण्याची संधी त्यांनी आम्हाला दिली त्या माईला माझा पुन्हा एकदा जयभीम सांगा.

युगसाक्षी साहित्याचा इतिहास आपल्या लेखणीने लिहिला जात आहे. नवे साहित्यशास्त्र मधले आपले सन्माननीय प्रस्ताव अख्या मराठी विश्वाच्या भाळावर गौरवाने मिरवत राहील. ताठ मानेचा, देखणा, रुबाबदार बाबासाहेब मला पुन्हा पुन्हा भेटल्याचे राहून राहून वाटते सर.

अजून सौंदर्याची शिल्पे या युगाच्या माथ्यावर मिरवलेली आम्हाला पाहायची आहेत सर.

आपला शब्द म्हणजे प्रमाण आणि इमान आमचे, इतके खरे.

बाकी आपला...

# २०

# काय आठवावे?

▪ डॉ. सुलभा हेर्लेकर

''क्रांतिसाठी आरती जुळविणाऱ्या
पावसाळी मोसमांनो
आपण उद्याच्या सूर्याशी करू दोस्ती''

अशा आशावादी शब्दांची कविता आहे यशवंत मनोहरांची! विद्रोहाच्या जाणिवेची ही कविता आहे. दलित साहित्यात स्वतःच्या अशा खास अस्तित्वाने ज्यांची कविता ठामपणे उभी आहे, त्यात यशवंत मनोहरांचे नाव फार वरचे आहे. समाजातील आर्थिक आणि सामाजिक नीतिमूल्यांच्या अनुरोधाने जाणारी ही कविता आपले दुःख मांडत जाते. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा डोळस प्रभाव असलेली ही कविता धर्माविरुद्धही बंड पुकारते. ''आभाळाचे कडू तोंड चुकवतो म्हटले तरी जमत नाही.'' अशी आणि ज्यांच्या गावात सूर्य नाही अशांची ही कविता आहे. नव्या सूर्योदयाच्या प्रतीक्षेत ही कविता वाट बघते आहे. ती विद्रोही जरूर आहे पण त्यातून ती चिंतनपर आहे. एक विखारी चिंतन तिच्या आत धुमसत असते. हा राग असला तरी, द्वेष असला तरी त्यांचे भाषेवरचे प्रभुत्व नाकारता येत नाही. चिंतनशील कविता म्हटली की ती वैचारिक पातळीवरची असा समज मनोहरांच्या कवितेविषयी करता येत नाही. एक लखलखते सत्य त्यांच्या कवितेत धगधगत असते. इतके असूनही ती भावोत्कट आहे. नरहर कुरुंदकरांनी म्हटल्याप्रमाणे ''मनोहरांच्या रूपाने सर्वंकष विद्रोहाची उत्कट गाणी गाणारा एक समर्थ बंडखोर कवी कवितेच्या दालनात ज्वालांचे निःश्वास फुंकीत येत आहे. हे अग्निसत्यही मोठे स्तिमित करणारे आहे. एक चिंतन म्हणून हे विद्रोही गाणे मोलाचे आहेत, पण निळसर काळसर अशा धुराने भरलेल्या वातावरणातील भडक लाल आणि केशरी ज्वालांची नर्तनप्रक्रिया म्हणूनही मोठे विलोभनीय आहे!''

अशी ही जिद्दी प्रकाशाची कविता.

''कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही.
सदरहू पीक आम्ही आसवांवर काढले आहे.''

अशी भावोत्कटताही सोबत घेऊन येणारी ही कविता. विद्रोही कवितेला मानवतील अशा प्रतिमांचा साज आणि संघर्षशीलता अशी रणरणती अकृत्रिम

शैली हे मनोहरांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे. डोंगरावर पेटलेल्या वडवानलाच्या ज्वाला खालपर्यंत ओसंडून वहाव्या तसा तप्त अंगार त्यांची कविता काही वेळेला देऊन थक्क करून टाकते.

''दुनियेत चंद्र सूर्याच्या।
मज कुणीच घेतले नाही
या जन्माची कधी माझ्या
कुणी आई झाले नाही.''

आईच झाली नाही तर इतर नात्यांची गोष्टच नको. प्राचीन वर्णव्यवस्था, धर्म, आत्मा, मुक्ती यावर आधारलेली सारीच व्यवस्था कवी नाकारीत जातो. ही परंपरा त्याला नको असणे जितके स्वाभाविक तितकी दुसरी परंपरा मान्य आहे. ज्ञान विज्ञानाला सामोरी जाणारी आणि स्वतःची पारख करून शोध घेणारी ही कविता स्वजनांना-

''यारे वादळूनी। पेटवा या भिंती ।
उदास एकांती। सरू नका।
अपुले मरण। पाहता का डोळा।
करा चोळामोळा। रग्गेलीचा।''

असे सांगायलाही विसरत नाही. दाहक शब्दांच्या झुंजार वृत्तीची ही कविता म्हणूनच मनाला भावते. मूर्तिभंजनामध्ये प्रेमभावनेचा मनोहारी विलास गुंफलेला असला तरी तिचा स्वभाव विद्रोहाचा आहे. ती रूपसौंदर्यवती आहेच पण क्रूरही आहे. बादळ आणि वणव्यात फिरणारी ही कविता कधीतरी व्याकूळ होते.

''काय आठवावे-
सगळेच वाळवंटलेल्या तृषेसारखे कासाविस आहे
काय आठवावे-
सर्वच तर जळत ओसाड वैराण होत आले आहे.
सगळेच तर आयुष्य मुकाट गुदमरलेले कोंडलेले आहे.''

असे सारेच गुदमरलेपण घेऊन ही कविता बहरकळा प्रसवते आहे. आठवांनीही तर सर्व आयुष्यभर निखारेच पसरले आहेत. तेव्हा आठवायचे काय? असा व्याकूळ प्रश्न आरपार मनात घुसमटतो आणि एकाच वेळेस अंगाराची ज्वालाफुले आणि कोमलशा प्राजक्ताची फुले टपटपावी तशी मनोहरांची कविता मनात प्रवाहित होते.

सामना : नागपूर - १७-२-२०००

# जीवनायन : एक सर्वेक्षण

## ▪ डॉ. युवराज सोनटक्के

सत्तरीच्या दशकात यांत्रिक वैशिष्ट्य, भौतिकवादी दर्शन, डॉ. आंबेडकरांचे वैज्ञानिक चिंतन आदिंच्या अभ्यासाने तथाकथित शाश्वत व पारंपरिक मूल्यांची जमीन हादरून गेली. विसाव्या शतकाच्या मनुष्याच्या विचारधारेत व्यापक बदल घडून आला. जुन्या मूल्यांचे विघटन होऊन नूतन मानवीय मूल्ये जरी अधिक प्रमाणात प्रतिष्ठित झाली नाही तरी बदलत्या वातावरणात व समाजात संघर्ष मूल्यांची नवीन दृष्टी प्रस्थापित करण्याचा प्रयत्न मात्र झाला. त्यातच साहित्यिकांची जबाबदारीही वाढली. बौद्धिकतेच्या आधारावर समस्त विश्वात नवीन काव्यान्दोलनाच्या प्रतिष्ठापनेसाठी काही कवींनी व चिंतकांनी बरेच प्रयत्न केले. मराठी आंबेडकरवादी साहित्य नवीन युगाला वाणी देण्यास अग्रेसर राहिले. या अनुषंगाने प्रस्तुत लेखात कवी यशवंत मनोहर यांच्या 'जीवनायन' या काव्यसंग्रहाचे सर्वेक्षण करून त्यांच्या दृष्टीला विश्लेषित व व्याख्यायित करण्याचा प्रयत्न केला आहे.

नवकाव्योत्तर कवितेच्या नावावर ज्या वैचारिकतेची पुष्टी कवी यशवंत मनोहर करतात त्याचे रचनात्मक बिंब उत्थानगुंफा, काव्यभीमायन, मूर्तिभंजन, या कवितासंग्रहात अंतर्भुत आहेत. त्यांचा जीवनायन हा कवितासंग्रह सामाजिक परिवर्तनाच्या उकळत्या तळपत्या चिंतनालाच प्रकट करतो. त्यांच्या कविता काव्यकर्माची दुर्बोधता तसेच काव्यरूपाच्या सृजनाच्या संकटांना पराभूत करणाऱ्या सामर्थ्यानिशी साकार झाल्या आहेत.

### जीवनदृष्टी

डॉ. यशवंत मनोहर एक मनीषी, अध्येता, विचारवंत व कवी असून त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुमुखी आहे. त्यांच्या जीवनदृष्टीत साहित्याचे अधिकतम आयाम उपस्थित आहेत. त्यांनी दूरदर्शिता व अभिव्यक्तीच्या नवीन उपकरणांची प्रतिष्ठापना करून मराठी आंबेडकरवादी साहित्याला नवीन दिशा दिली आहे. सूक्ष्म सौंदर्याच्या स्थळी ते स्थूल सौंदर्याला जास्त महत्त्व देतात. त्यांच्या रचनेत जीवनाचे अनेकविध परिदृश्य दृष्टिगोचर होतात. काल्पनिक जीवनाचे प्राधान्य असलेले काव्य जीवनाच्या सत्यापासून दूर असते व जीवनसंघर्षापासून पलायन करण्याचे एकमात्र साधन

असते. सभ्यतेच्या विकासासोबत अनुभवांचे क्षेत्र व्यापक होत जाते. या अनुभवांना उत्तमप्रकारे संप्रेषित करण्यासाठीच अभिव्यक्तीच्या नवीन उपकरणांचा विकास करावा लागतो. जे आम्ही बघतो, अनुभवतो व उपभोगतो तेच सांगण्यात मोठे सत्य आहे. याप्रकारे कवी यशवंत मनोहर जे सत्य प्रतिपादित करीत आहेत ते या मातीशी व दुःखितांच्या जीवनाशी संबद्ध आहे -

असुंदराशी निर्वाणीचे युद्ध मांडील माझी कविता,
सत्य होते गाठीशी माझ्या सांगेल माझी कविता,
एक निर्भय उजेड वाटत राहील माझी कविता,
चुकलेले गणित अचूक करायला आली माझी कविता.

ध्येयप्राप्ती

कवी आपल्या प्रखर वैचारिकतेच्या आधारावर उद्देशाच्या साफल्यासाठी समर्पण भाव घेऊन जीवनायनात अनुभूतीला शोधत असतो. जीवनासाठी उद्देशाच्या सार्थकतेचे महत्त्व विशद करून ध्येयप्राप्तीसाठी पारंपरिक षडयंत्र व विसंगतीविरुद्ध कवी संघर्षशील आहे. वर्तमान परिप्रेक्ष्यात ध्येयप्राप्तीची समस्या ही जीवनाची समस्या झालेली आहे. उद्देशाच्या प्रती अतिरिक्त सजगतेसोबत व्यक्त झालेल्या या ओळी साक्षीला देता येतील -

''अंधारात शिरताना माथी सूर्य असू द्यावा,
जंगलातल्या वाटेत गाठी शिधा असू द्यावा.
वाळवंट चालताना हवे मनात झाड,
जहराचे ऊन पुढे, हवा काखोटीला आड.''

आपली अस्मिता कायम ठेवण्यासाठी वर्तमानयुगीन परिवेशात मानव सतत प्रयत्नशील असतो. याच अस्तित्वाच्या शोधात 'जीवनायन'चा कवी बेचैन होऊन संघर्ष करीत अस्तित्वसंकटाच्या आवर्ताच्या बाहेर निघण्याची भूमिका करतो. अस्तित्वाचे हे संकट अंतःसंघर्षाच्या अनेक अंगाने प्रस्तुत करीत कवी सचेत दिसतो. आपल्या अस्तित्वाला क्षतिग्रस्त होऊ न देता स्वस्थ तथ्याला उजागर करताना कवी म्हणतो -

''अश्रूंमधूनी जाळ फुंकतो
आणिक थोडे जगून घेतो.
सरणांमध्ये कविता लिहितो.
आणिक थोडे जगून घेतो.

व्यक्ति-अस्तित्वाला जीवनाचा न्यूक्लिअस समजून परिवेश, यथार्थ व दायित्वाच्या परिघात कवी विचरण करताना दिसतो. मनुष्याच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा विध्वंस करणाऱ्या क्रूरतम शोषक सत्तेचा विरोध करून कवी कवितेच्या मुळात वास्तविकतेला शोधण्याचा प्रयत्न करतो. मनुष्याच्या मनाला, त्याच्या दुःखाला, काळाच्या संप्रेषणाला आपल्यात अनुभवून वैयक्तिक बनवतो.

हाती मोडक्या गावाच्या
होते स्वातंत्र्य मी दिले;
दिवे गरीब डोळ्यांचे
कोणी फोडून टाकले?

## व्यक्तिवाद

व्यक्ती व समष्टीचा अन्योन्य-अतूट संबंध आहे. समाजातील निकृष्ट व अधकचरी मान्यता जेव्हा रूढ होते तेव्हा ती व्यक्तीच्या उत्थानासाठी बाधक बनते. व्यक्तिवादात व्यक्तिस्वातंत्र्याच्या आग्रहामुळे विद्रोही स्वर अधिक मुखरित होतो. रूढी, पारंपरिक मान्यता, ईश्वरवादी व राजनीतिक अंकुशाचा व्यक्तिवाद घोर विरोध करतो. परिवर्तनशीलता, गतिमयता, निरंतरता, आशा इ. भावना मनुष्याला संकल्पशील बनवतात. बौद्ध तत्त्वज्ञान इच्छांवर नियंत्रण ठेवण्याचे संदेश देते. याच संदेशाचा धागा पकडून कवी यशवंत मनोहर इच्छाशक्तिला जीवन-स्तराच्या उत्कर्षाची व विकासाची पायरी मानतात. मनुष्याचे जीवन सरळ नसून भूमितीच्या रेषेसारखे वक्र आहे. व्यक्तिवादाच्या चरमपरिणतीला अहंवादाची संज्ञा दिलेली आहे. व्यक्तिवादी कवी आपल्या अहंची प्रतिष्ठा जपण्याचा प्रांजळ प्रयत्न करतो. प्रतिष्ठेसाठी तो प्राचीन परंपरा व सामूहिक संस्थेची मान्यता व नियम यांचा निषेध करतो. बिंबवादी कवी डी.एच.लॉरेन्सप्रमाणे कवी मनोहरांतसुद्धा अहंची पराकाष्ठा दिसून येते. अहं मनुष्याला महत्त्वाकांक्षी बनवते.

''मी बघतो माझे समुद्र होऊन उडणे,
मी उरास बांधुन सूर्य तुडवितो मरणे
रक्ताचा पाऊस पळतो पाहुन मजला
ही ऊर्जा माझी युगान्तराचे गाणे.''

अत्यंत संवेदनशील माध्यमाच्या रूपात विचार केला तर सामाजिक संदर्भात कवीच्या व्यक्तित्वाची विशिष्ट भूमिका प्रत्ययास येते.

## यथार्थवाद

कवी प्रत्ययवादाच्या ऐवजी यथार्थाला प्रतिशापित करून 'जीवनायना'तील कवितेद्वारा जीवनाच्या वास्तविकतेचा साक्षात्कार करवून देतो. जीवनापासून पृथक न होता आपला पथ प्रशस्त करून संघर्षाला झेलत, दर्द-दुःखात गंभीर अर्थ शोधत, अर्थाच्या आधाराने स्वतःला जनव्यापी सत्याच्या सुपूर्त करतो. मनुष्य समस्या आणि संघर्षातून आजीवन मुक्त होत नाही. परंतु कवी मनोहर जीवनात मुक्तीच्या संबंधी असा विचार करतात -

''मी मुक्त झालो आहे
उड्डाणाचा महोत्सव झाले आहेत पंख माझे
गोऱ्या गुलामीचे कवच भेदून
माझ्या प्राणांचे काळे सौंदर्य उधळले आहे दाही दिशांमध्ये
माझ्या ऊर्जेच्या ढगांमधून धो धो चांदणे कोसळत आहे.''

कवितेत 'मी'च्या यथार्थाला केवळ आत्मकेंद्र किंवा व्यक्तिवादाचा अर्थ घेऊन परिभाषित करणे म्हणजे त्याच्या बृहत्तर आशयाला व संभावनेला संकुचित करणे होय. कवी यशवत मनोहर केवळ कविता लिहीत नाहीत तर कविता लिहिण्याची मानसिकता व रचनाप्रक्रियेसंबंधी विस्ताराने विचार करतात. ते यथार्थाला आपल्या संवेदनेद्वारे परिवर्द्धित करतात. त्यांच्या कवितेत शब्द, बिंब, अर्थ, ध्वनि इ. परस्परांशी गुंफून भ्रमरासारखे चक्कर घेऊन पुढे वाटचाल करीत असतात. त्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व सामाजिक यथार्थासोबत लिप्त आहे-

''झेलतो आहे अनावर होऊन
पृथ्वीच्या मर्मबंधातील करुणेचे जिवंत कल्लोळ
मी समुद्रातले नाचणारे तुफान,
मी वेगापुढे धावणारी गुलमोहरांची वस्ती,
मी ऊर्जेचा हिरवा सोहळा.''

## संघर्ष

संघर्षमय जीवनातील सौंदर्याची धार 'जीवनायन'मधून प्रवाहित होताना दिसते. कवी मनोहर जीवनाचा शोध घेत वक्तव्य किंवा भाषणबाजी करीत नाहीत तर दैनंदिन जीवनाच्या क्रियाशील परिदृश्यांना चित्रित करतात. ते आपल्या परिवेशातील लहानात लहान घटना-परिघटना व व्यक्तिस्वभाव सूक्ष्मतेने बघत असतात. त्यांच्यातला कवी हा कवितेचे माध्यम होत नाही तर जीवनाची

सक्रिय उपस्थिती त्यांचे माध्यम बनते. हीच क्रियाशीलता त्यांच्या रचनाप्रक्रियेची प्रमुख विशेषता आहे -

''केवळ कळते प्रेतांना या
कुणी चिरडले श्वास
कधीपासुनी तेजाबाचा
सुरू इथे पाऊस.''

हिन्दी साहित्याचे मूर्धन्य कवी ग.मा. मुक्तिबोध आपल्या काळाच्या अंधाराला केंद्रबिंदू बनवून उजेडाला बघतात तर कवी यशवंत मनोहर सूर्याला केंद्रबिंदू बनवून आपल्या काळाच्या अंधाराला ओळखतात. सूर्य अंधाराच्या मध्यभागी आहे. तो दुःखितांच्या साहसपूर्ण संघर्षात तळपत असतो. सूर्य जगातील आकृतींना उजागर करतो तर अंधार त्यांना आपल्या आत सामावून घेतो. संघर्ष समाजाला मानवीय उत्कृष्टता व अपरिमित समृद्धीच्या पथावर घेऊन जातो. या जाणिवेने कवी यशवंत मनोहर संघर्षाला एका नूतन जीवनमूल्यांच्या, समानांतर काव्यमूल्यांच्या रूपात ठेवतात. त्यांच्यातील सौंदर्य-कमळ संघर्षाचा सूर्योदय झाल्यावरच उमलत असते. त्यांची कविता एका संपूर्ण सृजनाच्या रूपात परिबद्ध असून तिचा फलक अनंतशक्य आहे. संघर्षाच्या मैदानात कवीच्या अस्वस्थतेची जिवंत साक्ष देणाऱ्या या ओळी -

''पेटवावी नसनस
आग मोहोरत जाते
नये थांबवू प्रवाह,
घर अंधारून येते.''

## बौद्धिकता

वर्तमान कवितेत बौद्धिकतेचे एक अंग आधुनिकता बोधाच्या रूपात प्रचलित झाले आहे. हा एक वैचारिक दृष्टिकोण आहे, जो कवी मनोहरांच्या काही कवितेत बघायला मिळतो. विवेक अर्थात औचित्य त्यांच्या काव्याचा प्राण आहे. औचित्याचा संबंध भावनेपेक्षा विचारांशी अधिक आहे. बौद्धिक शक्तीच्या विकासासोबत तिची भावनात्मक शक्ती विकसित होत जाते. त्यांच्या कवितेत वैचारिकता व बौद्धिकता दोन्ही अनिवार्य तत्त्वे अंतर्भुत आहेत. यशवंत मनोहरांच्या कवितेने विचाराला समर्केंद्राच्या रूपात ग्रहण केले आहे. ती पथ हरणारी कविता नव्हे तर मार्ग शोधणारी कविता आहे. ती केवळ मनाची कविता नव्हे तर मनन करणाऱ्या मनाची कविता आहे. ज्ञानात्मक संवेदनेची ती उत्कृष्ट

कविता आहे. कवीची बौद्धिकता व संवेदना बघा -

''असोत लाटा भिन्न भिन्न, पण सागर सारा एक हवा,
सूर असो गाण्यात भिन्न, पण बोल नियंत्रक एक हवा.
असो प्रवासी नाना बोटीत, पंखांसम समतोल हवा,
देहांमधुनी सकलांसाठी कळवळणारा प्राण हवा.''

## अनुभूतीची अनिवार्यता

कवी यशवंत मनोहरांच्या अनुभूतीची प्रामाणिकता त्यांच्या जटिल संवेदनात्मकतेत आहे. भावस्थितीची ही दुर्बोधता रचना-विधान व अभिव्यक्तीच्या माध्यमाला प्रभावित करते. त्यांच्या कवितेत अनुभूतीच्या अनिवार्यतेसंबंधी चिंतन अंतर्भुत असून काव्यानुभूतीला अपरोक्षपणे व्याख्यायित करण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. मनुष्याच्या जीवनातील संतुलित गतीला ओळखणाऱ्या या कवितेत एक विशिष्ट प्रकारची सजगता व आयुष्याच्या प्रती विश्लेषणात्मक क्षमता आहे. प्रस्तुत ओळी द्रष्टव्य आहेत.

आयुष्याने कधी आसवे पुसली, कधी रडवले,
आयुष्याने कधी कुशीत घेतले, कधी तुडवले,
आयुष्याने कधी दिशा अंथरली, कधी चुकवले,
आयुष्याने कधी अनंत हस्ते दिले, कधी चकवले.

कवी यशवंत मनोहर अनुभव, संवेदना व ज्ञानाच्या बळावर कवितेची जमीन तयार करून कवितेला समृद्ध व्यक्तिमत्त्व प्रदान करतात. व्यक्तिसौंदर्य जसे कोणत्याही एका अंगात सामाहित नसते तर संपूर्ण शरीराच्या आवयविक संतुलनामुळे संभव होते. तसेच कवितेची सार्वदेशिकता तिच्या समस्त रचना-प्रक्रियेत दिसून येते. आजच्या मराठी कवितेत यशवंत मनोहरांच्या कवितेचा चेहरा याच अर्थाने वेगळ्या तऱ्हेने ओळखल्या जाऊ शकतो. ज्या धरतीवर ते उभे आहेत त्याच धरतीवर त्यांची कविताही उभी आहे, ती अशी -

''संतापाने बोलते कधी कधी धरती
तेव्हा ज्वालामुखीचा लाव्हा, वणवे आणि भूकंप हे तिचे शब्द होतात.
कधी कधी बोलते धरती व्याकूळ हृदयाने
तेव्हा अगतिक आसवे, अनाथ हंबरडे हेच तिचे शब्द होतात.''

## विद्रोह

कवी यशवंत मनोहर 'जीवनायन'मध्ये विद्रोहाची क्रियात्मक शक्ती व प्रकृती

निर्धारित करतात. विद्रोही स्वरांची व विद्रोहात्मक मूल्यांची तुतारी फुंकत प्रारंभिक आवेशाच्या आवर्ताबाहेर निघून ते विद्रोहाला एक प्रौढ वैज्ञानिक आधार प्रदान करतात. परंतु विद्रोहाला भाव-जगताच्या परिसरात परिक्रमा करण्याची परवानगी देत नाहीत. जहराच्या कारखान्यातील ताकही ते फुंकून पितात. विद्रोही चिंतनाला ते अशाप्रकारे प्रस्तुत करतात -

रक्तातली सारी आग फांद्यामधुनी फुलेना
सागर हे आसवांचे आशयात बांधवेना

किंवा

ऐसा अग्नी मी मरुनी पावसाने जिता होतो,
उजेडाच्या जखमांनी मातीमधून फुलतो."

विद्रोहाच्या अभिव्यक्तीचा स्फुल्लिंग येथे उजागर होतो. विद्रोह संपूर्ण बौद्धिक, मानसिक आणि भावनात्मक बळावर होत असतो. यशवंत मनोहर कर्तव्य निर्वाहात तत्पर आहेत आणि त्यातील विद्रोह हा चिंतनशील विचार आहे. सौंदर्य आणि विद्रोह त्यांच्या चक्षूसमोर विविध रूपात अवतरत असतात. विद्रोहाच्या स्वागतासाठी ते निरंतर जागरूक असतात. वस्तुचा गुण हा वस्तूत नसून वस्तूची पारख करणाऱ्या डोळ्यात अंतर्भुत असतो.

मनोहरांकडे ते डोळे आहेत. डोळ्यांचा उपयोग ते दुःखांची आसवे पुसण्यासाठी करतात -

डोळ्यांचा उपयोग मी सूर्य वाचण्यासाठी केला;
त्यांचा सुखदुःखातीत शस्त्रसाठा चवताळून उठला,
डोळ्यांचा उपयोग मी दुःखांची आसवे पुसण्यासाठी केला.
गुन्हेगार हा किताब देऊन त्यांनी माझा सत्कार केला.

विद्रोहाच्या रूपाला पारखण्याचे कवीजवळ असे यंत्र आहे ज्याच्या परिघातील एकही अणू दृष्टीबाहेर जात नाही. त्यांच्या कवितेतील विद्रोह मनुष्याच्या मनात मस्ती, तनात शक्ती व रोमांच भरतो. या विद्रोहाची विशेषता म्हणजे अमीट नवीनता. हा विद्रोह मनोहरांच्या मनात ज्या गंभीर वेदनेचा संचार करतो, ती वेदना विद्रोहाच्या शाश्वत शक्तीचे द्योतक आहे. कमळाला नाळेपासून तोडले तरी त्याचे तंतू तुटत नाहीत. तसेच हा विद्रोह त्यांच्या कवितेतून तुटत नाही. त्यांच्या कवितेतील विद्रोह हा सत्वासाठी झुंजारवृत्ती धारण करून आणीबाणीत सद्सद्विवेकबुद्धी जोपासणारा विद्रोह आहे. प्रगतीच्या ज्या बिंदूवर आज माणूस

विराजमान आहे तेथून प्रकाशज्योतींची प्रदीप्त शिखरे झळकताना दिसतात. त्या शिखरापर्यंत पोहोचण्याची कवीची इच्छाशक्ती प्रबळ आहे -

दुःखे आहेत गरोदर
आम्ही सर्जनासारखे निघालो आहोत
आम्ही आहोत ऊर्जाघर
नवीन पहाट घेऊन निघालो आहोत.

त्यांची विद्रोही कविता वाचकांच्या अंतर्वृत्तीला मूळापर्यंत धरून ठेवते. या कवितेतील विद्रोह एक पृथगात्म व समर्थ चिंतनशील प्रवाह प्रवर्तक आहे.

## वैज्ञानिक अन्वेषण

ज्याप्रमाणे वैज्ञानिक नवीन आविष्कारासाठी तथ्य एकत्रित करून प्रयोगशाळेत प्रयोगाच्या विभिन्न प्रक्रियांद्वारे सत्याचा शोध घेतो व शेवटी हेच सत्य सिद्धान्त बनते. त्याचप्रमाणे साहित्यकारही प्रयोगाद्वारे सत्याचे अनुसंधान करतो. विज्ञान-सत्य व काव्य-सत्य यांत अंतर आहे. वैज्ञानिक सत्याचा संबंध बाह्यजगाशी तर काव्य-सत्याचा संबंध मनुष्याच्या अंतःकरणाशी असतो. जीवनमूल्ये व कलात्मक मूल्यांचा अविच्छिन्न संबंध असून दोन्ही एकमेकांचे पूरक आहेत. विज्ञान मनुष्याला तर्कप्रधान व सत्यान्वेषी बौद्धिक दृष्टी प्रदान करते. प्रयोगशीलतेच्या कसोटीवर दैवीशक्तीला करकचून ईश्वरासारख्या प्रत्ययाच्या अवधारणेला ते निर्मूल सिद्ध करते. यशवंत मनोहरही आपल्या कवितेत ईश्वरीय शक्तीच्या पुढे प्रश्नचिन्ह ठेवतात. सत्य कुरूप असले तरी सत्याच्या समस्त रूपांना ते रूपायित करतात. जीवन-सत्याला प्रतिष्ठापित करून मानव-विश्वाच्या यथार्थ रूपाला ते संप्रेषित करतात. प्रत्येक मनुष्याला जीवनाची लढाई स्वतः लढावी लागते. या जीवनसंग्रामात केवळ मनुष्याचे बळ, धैर्य, साहस व इच्छाशक्तीचे सातत्य कामी येते. हा सार्थक विचार यशवंत मनोहरांच्या कवितेत दिसून येतो.

भुकेल्यांच्या हातातून तोंडात धावणारी भाकर असते सत्य,
मरणोन्मुख स्वप्नांना जिंदगी भरवणाऱ्या आईचे दूध असते सत्य

... ... ...

सत्याचे निखारे पोलादी जिभेवरच मोरपिसारे फुलवीत असतात,
असत्यांचे वार झेलणाऱ्या छात्याच जीवनाच्या कंठातील रत्नहार होतात

कवीला जीवनदर्शनाची एक अशी वैज्ञानिक व अनुसंधानात्मक दृष्टी लाभली आहे. जी मनुष्याची सुंदरता व कुरुपता, त्यांच्या भावना-विचारांची सार्वजनिकता व आत्मीयता इ. ची ओळख करण्यास सहायक सिद्ध होते.

## मूल्यबोध

मनोहरांच्या कवितेत मूल्यबोधाची अनुभूती व आस्थेची गती अंतर्भुत आहे. त्यांच्या काव्यसृष्टीचे अभिनव अंग आस्वादात सुलभ असतानाही बहुस्तरीय बोधाच्या रूपात विश्लेषणासाठी अनिवार्य ठरतात. सर्जनात्मतेचे स्रोत व काव्यदृष्टीची संपृक्तता घेऊन ते आपल्या गंभीरतम काव्यदृष्टीत सहज व सामान्य दिसतात. 'जीवनायन'मध्ये प्रकाशाची कामना, नवीन सूर्याला धरण्याचीआकांक्षा, ओल्या मातीला अनाम आकार देण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे. प्रत्येक आघाताला सहन करण्यास ही कविता तत्पर आहे. समस्त विवशतेतून प्रवास करूनही स्वशक्तीला जागृत ठेवण्याची प्रेरणा ही कविता देते -

या भिंती आहेत काटेरी मनामनात,
तोडतोच म्हटले तर त्या तुटू शकतात.
हे अभेद्य व्याकरण कठीण आहे, खरे आहे,
वितळवून त्याला नवे आशय देता येतात हेही खरे आहे.

मूल्यांच्या विघटनरूपी अंधारात व भयानक परिस्थितीच्या घात-प्रतिघाताच्या वादळात कवीची आस्था निष्कंप असून मानवाच्या भविष्याच्या प्रती त्यांचा अदम्य विश्वास उमळून येतो. मानव-व्यक्तित्वाच्या असीम सामर्थ्यावर आरूढ होऊन ही कविता नवीन मूल्यांच्या स्थापनेचे दुष्कर कार्य करीत आहे असे वाटते.

## भाषा

यशवंत मनोहर गद्य-प्रवीण रचनाकारही आहेत. परंतु गद्याचा स्वभाव त्यांच्या कविता-स्वभावात बाधक ठरत नाही. त्यांच्या कवितेत मुक्तछंदमयी लयीचा विलय इतका तीव्र व त्वरित आहे की ती हिंदकळण्यापासून मुक्त असते. कवितेतील लय शब्दांना मार्ग मोकळा करते. त्यांची भाषा कवितेच्या प्रांतात केवळ नवोन्मेषच नाही तर काळाच्या सत्यतेची प्रतिष्ठा प्रमाणित करते.

कवी यशवंत मनोहर कवितेत भाषेची लय कायम ठेवून पाठकांच्या मनात क्षेपित दृश्यांना व भावनांच्या गतीला एका निर्धारित तालात सजवितात. भाषा व शब्दांचे संयोजन, अनुभव व स्मृती कवितेत दिसून येते. त्यांची भाषा जीवनानुभवाची व संवेदनेची भाषा आहे. ती शब्दांचे पथ्य पाळत नाही. कवीत भाषिक सजगता व संरचनात्मक क्षमता आहे. विशेषण-विशेष्य, प्रतीक, बिंब, त्रिपदी इ. च्या प्रयोगाने काव्यात जनजीवनाचा प्रवाह दृष्टिगत आहे.

कवितेत प्रतीकांचा पर्याप्त प्रयोग झालेला आहे व ते निर्दिष्ट अर्थवहन करतात. शब्दात समाविष्ट अर्थाद्वारे अतिरिक्त अर्थ योजण्याची लालसा कवीला भाषेच्या प्रती विद्रोह करण्यास विवश करते आणि विवशतावश कवी व्यंजनाच्या नवीन प्रणालीला शोधत असतो. कवीच्या शब्दात -

दुःखातून येती शब्द / अश्रूतून येतो नाद
येते सुसाट कविता / जसे घावातून रक्त.

भाषेत नाविन्य व सुखद ताजेपणा आहे. जो समतल राहूनही स्थिती व घटनेशी घनिष्टता जोडतो.

## निष्कर्ष

कवी यशवंत मनोहर यांच्या 'जीवनायन' या काव्यसंग्रहात अनुभूतीची तत्त्वे विपुल प्रमाणात विद्यमान आहेत. यातील कविता सामाजिक व सांस्कृतिक चिंतनाने संपृक्त आहेत. कवीची रचनाधर्मिता समकालीनांशी संबद्ध विविध अंगांना सामाजिक परिप्रेक्षात ग्रहण करीत यथार्थाचे सर्वेक्षण करते. ऊर्जस्वित चिंतनाची ही कविता कवीच्या रचनादृष्टीला जनसंघर्षाकडे अग्रेसर करते. स्वस्थ जीवनमूल्यांच्या प्रति ती वाचकांना संवेदनशील बनवते. या कवितासंग्रहाचे संयोजन ध्यानाकर्षक आहे. वसंत आबाजी डहाके यांचे मुखपृष्ठ व रेखाटने सुबक असून कवितांसोबत जुगलबंदी करीत समग्र प्रभावाला वृद्धिंगत करण्याचा प्रयास करतात.

२२

# एका वादळलेल्या उजेडाच्या सहवासात...

## ▪ प्रमोद वाळके 'युगंधर'

आयुष्याच्या विद्यापीठात प्रवेश करतानाच आसवांच्या वस्तीत जाऊन भुकेचे संशोधन करावे लागते. अन्यायाचे ट्युटोरिअल्स पूर्ण करावे लागू नये म्हणून बाबासाहेबांच्या क्रांतीशिबिरात प्रशिक्षण घ्यावे लागते. या शिबिरात अनेक वादळे शिकविली जातात. या शिबिरात कधी माणसांचे वादळ भेटत असते तर कधी वादळलेल्या माणसांच्या गाठीभेटी होत असतात. ज्यांच्या चेहऱ्यावर तेजोवलयांचं निवासस्थान आहे; ज्यांच्या मनातील भाव धम्मतरंग आहेत; ज्यांच्या मुखातून निघणारा प्रत्येक शब्द प्रसन्नतेने बाहेर पडतो अशा एका वादळलेल्या उजेडाची म्हणजे डॉ. यशवंत मनोहर सरांची भेट झाली. प्रज्ञा आणि करुणा हे दोन उजेड त्यांच्यामध्ये एकत्र झालेले मी अनुभवले आहेत. त्यांच्यामध्ये प्रज्ञान जन्माला आले आहे. त्यांच्या वैचारिक निबंध लेखनाचा आवाका, समीक्षाग्रंथात आढळणारी त्यांची आंबेडकरदृष्टी, त्यांनी लिहिलेली स्मरणांची कारंजी, रमाईसारखी कादंबरी, त्यांनी रेखाटलेली व्यक्तिचित्रणं या ग्रंथांची नुसती शीर्षकं वाचली तरी त्यांच्या वैचारिकतेची सागरखोली लक्षात आल्यावाचून रहात नाही. प्रज्ञानी माणूस ठिणगी असतो, निखारा असतो, आग असतो तसा तो झुळझुळणारा धम्मझराही असतो. संपूर्ण निळाई असतो. डॉ. यशवंत मनोहर या क्रांतीकुळातील प्रज्ञानी साहित्यिक आहेत. ते विचारसंघर्ष आहेत.

दलित साहित्यिक समरसतेच्या सुळावर उभा असताना डॉ. मनोहर सरांनी आंबेडकरवादी साहित्याची भीमदुंदुभी नागभूमीतून फुंकली. म्हणूनच दलित साहित्याची शोषणगाथा हिंदू समुद्रात बुडाली नि आंबेडकरवादी साहित्य नीलांगण झाले. त्यामुळेच आंबेडकरवादी साहित्याचे अधिनायक डॉ. यशवंत मनोहर आहेत असे म्हणावेसे वाटते. महाविद्यालयीन विस्तवात तारुण्याच्या तिरिपीत गरिबीच्या चमच्याने चंद्रकिरण पिणं सरांना कधी जमलंच नाही. पौर्णिमेच्या शीतल चंद्राची आळवणी त्यांनी कधी केली नाही. वाघीणीचं दूध आणि चवदार तळ्याचं पाणी प्रज्ञाभूक शमविण्यासाठी पीत राहिल्यामुळेच आज ते प्रज्ञासिंह झाले आहेत.

डॉ. यशवंत मनोहर मार्क्सवादी आहेत अशी चर्चा दलित साहित्य संकुलात दबक्या स्वरात बरीच वाजली. त्यांनी मार्क्सवादी प्रेरणा स्वीकारली आहे काय? याचा मी त्यांनी लिहिलेल्या बऱ्याच पुस्तकातून शोध घेतला. परंतु मार्क्सवादी प्रेरणा कुठेच आढळली नाही. हा प्रश्न मी प्रत्यक्ष भेटीत त्यांना विचारला, तेव्हा त्यांची भूमिका विस्ताराने सांगत म्हणाले - ''मार्क्सला जर मी माझा सहप्रवासी मानत असेल तर तेवढ्यामुळे मी मार्क्सवादी कसा ठरू शकेन!''

डॉ. यशवंत मनोहर सरांवर माझेही एखादे हस्तलिखीत असावे असे अनेक दिवसांपासून मला वाटत होते. परंतु उर्दू न समजणाऱ्या श्रोत्याने गालिबचा एखादा शेर ऐकल्यावर जसे वाह! क्या बात है! म्हणावे तसे माझे होते. अशीच प्रतिक्रिया सरांच्या कवितासंग्रहावर किंवा भाषणावर मी देत आलो. सरांच्या ६४व्या वाढदिवसाच्यावेळी मी मुंबईला असताना तीन पुस्तकांचे प्रकाशन झाले. त्यातलेच एक 'काव्यभीमायन'. 'काव्यभीमायन' बाबासाहेबांशी केलेली बातचीत. बाबासाहेबांना सांगितलेले स्वतःचे दुःख. बाबासाहेबांजवळ व्यक्त केलेला मनातील आर्तनाद. बाबासाहेबांना सांगितलेले क्रांती विरुद्ध प्रतिक्रांतीचे वादळ आणि दलित साहित्यिकांनी प्रतिक्रांतीचे वादळ रोखण्याचा केलेला अभिनय. क्रांतीच्या सरसेनापतीच्या मनातील वेदना सर्वांनाच सांगता येत नाहीत; त्या क्रांतीमंतालाच सांगायला हव्यात. दुःखाची बोच सैनिकांना सांगून लढ्याला बोथट करता येत नाही. ती महायुद्धालाच सांगायला हवी. कारण क्रांतीमंत स्वप्नांचे गगनगामी खांब उभे करीत असतात. दुःखाला बांधण्यासाठी प्रकाशाचे दोर वळत असतात. क्रांतीमंत महासंग्राम असतात; महायुद्ध असतात; महाबुद्ध असतात. बाबासाहेब आंबेडकरांशी संवाद साधताना डॉ. यशवंत मनोहर म्हणतात -

तू भांडतोस झोपड्यांमधील अंधाराशी
फाटलेल्या छतातून गळणाऱ्या थेंबांच्या अरेरावीशी
खचणाऱ्या कुडांना देतोस धीर तू
निंदा-खुरपायला जाणारी प्रत्येक माय
माती गोटे वाहून न्यायला;
लाकडे फोडायला जाणारा प्रत्येकच मेहनतीचा पुतळा,
आपल्या एका दिवसाच्या पोरापासून थोरल्या जरठ पोरापर्यंत
सर्वांना पढवीत असतात लाडाने
बाबासाहेबांसारखा मोठा हो.

कारण बाबासाहेबांनी अंधाराला फाडण्याचे सामर्थ्य दिले. फाटलेल्या छतातून

गळणाऱ्या थेंबांच्या अरेरावीशी भांडण्याचे बळ दिले. भुकेशी युद्ध करण्याची विद्या शिकविली. दुःखमुक्तीची दीक्षा दिली. धम्म दिला. डोळे बंद करून अंधाराशी भिडविता येतील काय? तोंड बंद करून अरेरावीशी भांडता येईल काय? कानावर हात ठेवून विद्या शिकता येईल काय? परंतु काही लोक अंधाराशी हात मिळवणी करायला डोळे बंद ठेवा असे सांगतात. असत्याशी भांडू नये म्हणून तोंड बंद ठेवायला भाग पाडतात. मंगलध्वनी ऐकायला येऊ नये म्हणून कानावर हात ठेवायला लावतात. त्यामुळेच आपल्या प्रत्येक भाषणातून डॉ. यशवंत मनोहर सर डोळे उघडे ठेवा असे आव्हान करतात. कारण डोळे उघडे ठेवले तर बुद्ध कळेल. धम्म समजावून घेता येईल. क्रांतीची भाषा शिकता येईल.

एका युगसाक्षी प्रतिभेचा वेध घेताना एका लेखकाने ''तरुण वयात सहवासामुळे निर्माण होणारा जो जिव्हाळा असतो तो अनेक समकालीन लेखक-कवींबाबत निर्माण होऊ शकलेला नाही'' असे आपुलकीच्या भावनेने नाटकातील संवादासारखे लिहून टाकले आणि माझी नजर वारंवार त्या एकाच वाक्यावर फिरत राहिली. मला असे वाटून गेले की युगसाक्षी प्रतिभेचा अधिनायक (अभिनेता नव्हे) डॉ. यशवंत मनोहर आहेत तर मग तो डायलॉग उच्चारताना नेपथ्य कसे असेल? प्रकाश योजना कशी केली असेल? वास्तववादी जीवनावर प्रकाश टाकताना प्रकाशयोजना पण वास्तववादीच असली पाहिजे. युगसाक्षी प्रतिभेचे वास्तव अंधःकारमय असेल तर तशी आणि प्रकाशमय असेल तर तशी प्रकाश योजना करायला पाहिजे. हे सर्व नाटककाराचे मन, त्याची भावना, एखाद्या प्रसंगाकडे पाहण्याची दृष्टी, त्याची अभिव्यक्ती जशी असेल तशी ती नाटकीय संवादातून उतरत असते. युगसाक्षी प्रतिभेचा वेध घेताना समकालीन लेखक-कवींविषयी जिव्हाळा निर्माण होणे किंवा न होण्यासाठी तरुण वयाची अट असू शकत नाही. डॉ. यशवंत मनोहरांची युगसाक्षी प्रतिभा 'चांदण्याने वेढलेल्या जंगलातून एकट्याने प्रवास केला तरी उजेडाचे दान देणारीच आहे.'

डॉ. यशवंत मनोहर अप्रतिम प्रतिभा असलेला एक महाकवी आहे. त्यांच्या कवितांमधून मानवी जीवनसौंदर्याची ते समीक्षा करतात या अर्थाने ते समीक्षक आहेत. त्यांच्या कवितेतून जगण्याचे तत्त्वज्ञान सांगत असतात त्यामुळे ते विचारवंत आहेत. त्यांच्या कवितेतून ते विचारसंघर्षाची दिशा दाखवीत असतात, त्यामुळे ते दिग्दर्शक आहेत. त्यांच्या कवितेतून क्रांतीची व्याख्या सांगत असतात त्यामुळे ते मार्गदर्शक आहेत. त्यांच्या कवितेतून ते निळाईचे तत्त्व सांगत असतात या अर्थाने ते तत्त्वचिंतक आहेत. त्यांनी लिहिलेले लेख आणि केलेली भाषणं

वाचत असताना आपण एक दीर्घ कविताच वाचत आहोत असे जाणवते. वाचत असताना कविता वाटणाऱ्या ओळींच्या मागेपुढे येणाऱ्या ओळी त्या कवितेचा विस्तार असतात. उदाहरणादाखल दिनांक ५ नोव्हेंबर २००६ रोजी नांदेड येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील पहिल्या फुले-शाहू-आंबेडकर साहित्य संमेलनात केलेल्या अध्यक्षीय भाषणातील काही ओळी अशा -

क्रांती ताठ होणाऱ्या कण्यासारखी असते
आपलीच लाचारी जाळणाऱ्या मनासारखी असते
सूर्याचे बोट धरून चालणाऱ्या निर्धारासारखी असते

.....
क्रांती हजारो वर्षांचे मरणांचे पहाड फेकून
ज्वाळांनी फुलणाऱ्या आंबेडकरवादी प्रतिभांसारखी असते

.....
अन्यायग्रस्तांनो उजेडाच्या महोत्सवात आपणही उड्या घ्या.

१९९३ ला बॉम्बस्फोट झालेत. माणसे मेलीत. बॉम्बस्फोट करणाऱ्यांची धरपकड झाली. आरोप सिद्ध झालेल्या कैद्यांना जन्मठेप-फाशी झाली. ११ जुलैला पुन्हा बॉम्स्फोट झालेत. पुन्हा माणसे मेलीत. धरपकड झाली. खटला चालू आहे. सजा व्हायची आहे; होईल! कुपोषणग्रस्त हजारो बालकांचे भुकेशी युद्ध सुरू आहे. भुकेशी युद्ध करताना हजारो बालकांचा मृत्यू झाला. भुकेविरुद्ध एफ.आय.आर. दाखल करता येत नाही. त्यामुळे भुकेविरुद्ध न्यायालयात खटला चालवणार कसा? भुकेविरुद्ध लिखित पुरावे देता येत नाहीत. भुकेची उलटतपासणी कोणताही वकील करेल काय? भुकेची साक्ष न्यायालयात घेता येणार नाही. भुकेवर आरोप सिद्ध करता येतील काय? भुकेने असंख्य बालकांचे खून केले तरी भुकेला कुणी फाशी देईल काय? माणसांनी माणसाची हत्या केली, आरोप सिद्ध झाले तर फाशी देण्याचा कायदा आहे. भुकेविरुद्ध आरोप सिद्ध झालेत तरी फाशीची शिक्षा कुणाला द्यायची? 'तोंडात चांदीचे चमचे घेऊन येणाऱ्यांची बात वेगळी' असते. त्यांना कुपोषणाचा अर्थच माहीत नसतो. 'इतरांच्या खांद्यावर बसून जे आयुष्याच्या वाटा चालतात त्या वाटसरूंना कळणार नाही' कुपोषित बालकांच्या कुटुंबाची व्यथा. 'ज्यांच्या आयुष्यांवर पताकांचे पीक येते त्यांना कळणार नाही' भुकेचे दुःख. डॉ. यशवंत मनोहर सर म्हणतात -

'माझी कविता
उपाशी जन्मांसाठी उपोषणाला बसली आहे

आणि बसली आहेत
तिच्या उशापायथ्याशी डोळ्यांची वाळवंटे'

म्हणूनच आता भुकेनेच युद्ध व्हायला पाहिजे. भुकेच्या दुःखाने क्रांती व्हायला पाहिजे. डॉ. यशवंत मनोहर सर म्हणतात - 'क्रांती दुःखितांच्या पोटी जन्माला येते. त्यांच्या संतापाच्या पावलांनी ती जीवनात उतरते. त्यासाठी दुःखी लोकांच्या जीवनात झपाटलेपणा यावा लागतो. एक उत्कट मनस्वीपणा हवा असतो. हे होईल. आपण सर्व जागे होऊ आणि आग्रही होऊ.'

आंबेडकरवाद बुद्धिवादी आहे. बुद्धाचा धम्मही बुद्धिवादीच आहे. आंबेडकरवादी खूप सारे धम्म बंधू-भगिनी विपश्यनेचा पुरस्कार करताना दिसतात. परंतु विपश्यनेचा पुरस्कार करणे म्हणजे एकप्रकारे आंबेडकरवादाला हुलकावणी दिल्यासारखे आहे हे ते विसरून जातात. आंबेडकरवादी माणसाविषयी डॉ. यशवंत मनोहर सरांची निश्चित अशी भूमिका आहे. ते म्हणतात - 'आंबेडकरवादी माणूस बुद्ध मनाचा अथांग माणूस असतो. आंबेडकरवादी माणूस आंबेडकर मनाचा अभंग माणूस असतो. आंबेडकरवादी माणूस आंबेडकरसंस्कृतीचे साक्षात आदर्शरूप असतो. आंबेडकरवादी माणसाचे जगणे हे केवळ क्रांतीच्या प्रस्तावनेसारखे नसते तर ते क्रांतीच्या निष्कर्षासारखेही असते.' अशा विचारातून विपश्यनेच्या संदर्भात सरांना विचारले असता ते म्हणाले - ''विपश्यनेमुळे सिद्धार्थ गौतमाला ज्ञानप्राप्ती झाली नाही. विपश्यनेमुळे सिद्धार्थ गौतम बुद्ध नाही झालेत. विपश्यना ज्ञानप्राप्तीचा मार्ग होऊ शकत नाही. माणसाला आज विपश्यनेची गरज नाही. माणसाला बुद्धाच्या करुणेची गरज आहे. बाबासाहेबांच्या क्रांतीची गरज आहे. ''बाबासाहेबांची क्रांतीभूमी तयार करण्याची गरज कुणालाही वाटू नये याची खंत सरांना वाटते आणि त्यांच्या मनात नैराश्य निर्माण होते. आता ते प्रतिक्रांतीच्या गुगलीवाऱ्यात सापडलेल्या क्रांतीमनांवरील धुळ झटकताना आम्ही पाहतो आहोत. आता ते समरसतेच्या बाभूळआख्यानाला सुरुंग लावताना आम्ही पाहतो आहोत. आता ते विझलेले समाजमन अंधश्रद्धांपुढे समर्पित करणाऱ्या चवदार तळ्यातील पेटलेल्या पाण्यात फेकताना आम्ही पाहतो आहोत. आता ते वरून वरून भिजणाऱ्या दगडांवर धम्मजलाचे सिंचन करून बोधिवृक्ष उगवताना आम्ही पाहतो आहोत. आता आपण त्यांच्या या विचारसंघर्षाला सहकार्याचे हात देऊ याना!

युगसाक्षी प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या ग्रंथाच्या पानांची संख्या किती? हा सध्या चर्चेचा विषय आहे. खरे तर त्यांच्या विचारांच्या पानांची संख्या अशा विचारकांनी मोजायला हवी. ज्यांच्या मनात अकुशलतेचा उच्चांक असतो

ते असे विचार करणारच. बुद्धाने अकुशल भावनांचा त्याग करायला सांगितले होते. बुद्धाचे आपण उपासक असू तर मनातील अकुशल भावनांचा त्याग करून कुशल भावना, कुशल विचार प्रस्थापित करायला पाहिजे आणि डॉ. यशवंत मनोहर सरांप्रमाणे प्रज्ञाकिरणांचे दिग्दर्शन करायला पाहिजे. कारण प्रज्ञासूर्याची प्रज्ञाकिरणं अंधाराला फाडत असतात आणि स्वतःची वाट मोकळी करीत असतात.

मी गगनाला परवानगी विचारली नाही
त्यानेही माझ्या पंखांना प्रश्न विचारले नाही
मी उडत होतो निळ्या सूर्यासोबत
आणि जमीन माझ्या सोबतीला उत्तरासारखी होती.

अशा प्रज्ञाकिरणांना कुणी रोखू शकत नाही. प्रज्ञाकिरणांना कुणी थोपवू शकत नाही आणि मागेही वळवू शकत नाही हे अकुशलमनांना माहीत नसेल काय?

२३

# डॉ.यशवंत मनोहरःजीवनवादी वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व

■ डॉ.प्रकाश खरात

अ.भा. दलित साहित्य संमेलन ब्रह्मपुरी येथे अध्यक्षपदी प्रा. डॉ. यशवंत मनोहर असल्यामुळे मराठी साहित्यातील जीवनवादी प्रवाहाबद्दल आणि दलित साहित्याबद्दल आस्था बाळगणाऱ्या प्रवाहाचा सन्मान झाला आहे.

डॉ. यशवंत मनोहर मराठी भाषेच्या वाङ्मयातील एक जीवनवादी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी 'उत्थानगुंफा', 'मूर्तिभंजन' या काव्यग्रंथातून विद्रोहात्मक जाणिवेची एक सर्वश्रेष्ठ संवेदना उत्कटपणे व्यक्त केली. 'स्वाद आणि चिकित्सा', 'दलित साहित्य : सिद्धान्त आणि स्वरूप' या समीक्षा ग्रंथातून जीवनवादी समीक्षेला एक नवी मूल्यगर्भ जीवनाशयाची दिशा मांडली. या त्यांच्या लेखनसंपदेने दलित साहित्याला गती दिली. त्याचप्रमाणे मराठी साहित्यातही मोलाची भूमिका बजावली आहे.

डॉ. यशवंत मनोहर यांचे साहित्य विषमतेवर तुटून पडते. दैन्य-दास्यावर आग पाखडते. जीवनाला कुरूपता देणाऱ्या विचाराविरुद्ध विद्रोह करते. म्हणून त्यांच्या उत्थानगुंफेत चांदण्यांचे आभाळ भेटत नाही. पाचूचे रान मिळत नाही. उंच उंच वृक्षांची राई अथवा डोंगरघाटाचे चित्र सापडत नाही. ही झाडे, आभाळ, वनराई, चांदणे, धुके, पाऊस थंडी हा त्यांच्या चिंतनाचा विषय नाही. त्यांच्या काव्याचाही विषय नाही. त्यांनी आपल्या मेंदूत उगवून घेतले आहे हजारो वर्षांचे दुःख! राजकीय, सामाजिक, शैक्षणिक जीवनापासून दूर ठेवलेला माणूस! काहीही गुन्हा नसताना भरडले जाणारे मानवी मनाचे थवे! त्यामुळे त्यांच्या साहित्याचे कूळ 'कलेसाठी कला' म्हणणाऱ्या विचाराचे नाही.

त्यांच्या समग्र साहित्यानेच प्रस्थापित साहित्यमूल्य नाकारले आहे. अनेक प्रश्न विचारले आहेत आणि हे प्रश्न फक्त श्रेष्ठ साहित्यच विचारते, हा जगाच्या साहित्याचा इतिहास आहे. कारण श्रेष्ठ वाङ्मयाला समाजजीवनातील वास्तवतेचे अधिष्ठान असते. त्याला उपेक्षित जीवनाचा शोध घेण्याचा ध्यास लागलेला असतो. हा ध्यास दलित साहित्याने जसा घेतला आहे तसाच मनोहरांनीही घेतलेला आहे.

त्यांना आपल्या कवितेची पूर्वपरंपरा ही कवी केशवसुत यांच्या ''मी हिंदूही नाही, ब्राह्मणही नाही न मी एक पंथाचा'' असे म्हणणाऱ्या काव्यात्मक वैचारिकतेत सापडली.

मनोहर आपल्या संवेदनेला डॉ. आंबेडकरांचा शिष्य म्हणून हजारो वर्षांच्या मुकेपणाला बोलके करतात. या देशातील तळागाळातील माणसाचा मुकेपणा कवितेत बांधतात. त्याला स्वतः जगलेल्या अनुभवाचे रूप देतात. अनेक शतकांचे दास्य वाहून कंबर मोडलेल्या समूहाचा वाङ्मयीन आकृतीबंध मांडतात. जन्मतःच निष्पाप बालकाच्या अंगावर गुलामनोंदी व उच्चनीचतेचा धर्म गोंदणाऱ्या विचारांची घृणा शिकवतात. त्यांचे हे संवेदन ग्रंथातून आले नाही, तर अस्सल ग्रामीण जीवनातून आले आहे. भारतीय सांस्कृतिकतेने डांबून टाकलेल्या किळसवाण्या अनुभवातून आले आहे. विदर्भाच्या कुशीतील एका खेड्यात जन्मास आलेल्या आजच्या संमेलनाच्या अध्यक्षाने काय सोसले नाही? अस्पृश्यतेची वेदना महाभयानक मृत्यूपेक्षाही मोठी असते. नाझीने केलेल्या अत्याचारापेक्षाही महारौद्र असते. या कवी अध्यक्षाला, दारिद्र्य, अस्पृश्यता, परंपरेने दिलेली. घरात शिक्षणाचा गंध नाही. सभोवतालच्या नातलगात चांगली शिकलेली माणसे नाहीत. काव्य म्हणजे काय? तत्त्वज्ञान म्हणजे काय? ते कसे लिहायचे? याची तोंडओळखही हजारो पिढ्यात नाही. परंतु डॉ. आंबेडकरांनी दिलेली ज्ञानपिपासू वृत्ती आणि शिकविलेले ग्रंथप्रेमाचे वेड, मनोहरांना औरंगाबादच्या मिलिंद महाविद्यालयाने दिले. इथेच हा माणूस फुलला. साहित्याचे मन रुजले, बहरले आणि वाढीस लागले.

मनोहरांची भाषाशैली ही दलित-बहुजनाचे मानसशास्त्र होऊन आली आहे. त्यांच्या अश्रुंना व वेदनेला प्रबोधनाचा स्वर देत प्रकटली आहे. त्यांनी जुन्या पारंपरिक संस्कारातून मुक्त होऊन आधुनिक जीवनाचे परिवर्तन घ्यावे, यासाठी लयकारी घाटाने आकारास आली आहे, हे त्यांचे प्रकटीकरण जसे इतर दलित लेखकापेक्षा तसेच मराठी लेखकापेक्षाही भिन्न आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्याचा परिणाम सर्व सामाजिक थरातील संवेदनाक्षम लोकांवर झाला. त्यांच्या अनेक कवितांमधून जीवनवादी विचार आणि कलात्मक अभिव्यक्ती याचा सुंदर संगम झालेला पाहावयास मिळतो.

डॉ. मनोहरांचे हे चिंतन मराठीतील जीवनवादी प्रवाहाला व्यापक अधिष्ठान प्राप्त करून देणारे आहे. १९६० पूर्वी मराठी साहित्यातील जीवनवादी प्रवाह व प्रस्थापित समीक्षकांनी एकाकी पाडला होता. दि.के. बेडेकर, शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्यासारख्या अभ्यासकांवरही अन्याय केला. त्याचे कारण प्रस्थापित

वाचकवर्ग समाज जीवनात नव्हता. आज वाचक वर्ग दलित बहुजनांमधून सारखा वाढतो आहे. त्याला जीवनवादी प्रवाहात आपल्या पूर्वचेहऱ्याचे रूप काही प्रमाणात आढळते आहे. ती परंपरा त्याला मित्रपरंपरा वाटते आहे. मनोहरांनीही तीच परंपरा व आपला कुलारंभ केशवसुतात शोधली. त्यामुळे दलित साहित्य चळवळीने जीवनवादी प्रवाहाला नवे आयाम दिले आहेत. मनोहरांनीही कविता, समीक्षा, नाट्य-एकांकिका, प्रवासवर्णन, वैचारिक निबंध या विविध वाङ्मय प्रकारातून जीवनवादी प्रवाहाला व्यापक अधिष्ठान दिले. त्यामुळे त्यांच्या वाङ्मयीन आविष्काराचे स्वरूप कलावादी, स्थितीवादी, परंपरावादी साहित्यापेक्षा निराळे झाले आहे. दलित साहित्य हे नाव घेऊन जीवनाच्या अधिक जवळ गेले आहे. हे त्यांच्या साहित्याचे व व्यक्तिमत्त्वाचे कार्य खरी सांस्कृतिक संवेदना व खरे साहित्यमूल्य रुजविण्यास आधारभूत ठरावे असेच आहे.

.............................................................

नागपूर पत्रिका २७-२-१९८८

## यशवंत मनोहरांच्या कवितेच्या निमित्ताने

यशवंत मनोहरांची कविता ही मराठीतील आशयसंपन्न व स्वतंत्र अभिव्यक्तीची कविता आहे. नारायण सुर्वे यांच्या कवितेनंतर मराठी कवितेला समृद्ध वळण देणारी कविता म्हणून तिचा गौरव करावा लागेल. अश्लील शब्दकळेच्या माध्यमातून आशय न मांडता निसर्ग आणि मानवी जीवनातील अनुभवांच्या संवेदनांच्या आधारे अभिव्यक्ती करणारी ही कविता आहे. उत्थानगुंफा, डॉ.आंबेडकरःचिंतनकाव्य, मूर्तिभंजन या काव्यसंग्रहांनी मराठी कवितेला गतिमानता दिली आहे. मूर्तिभंजननंतरही त्यांचे काव्यलेखन थांबलेले नाही. अनेक नियतकालिकांमधून त्यांचे काव्यलेखन वाचावयास मिळते. या सगळ्या काव्यलेखनातून निरनिराळे आयाम साकार झालेले आहेत. त्यामधून सामाजिक जाणिवांचा जसा प्रवास सुरू झालेला आहे त्याचप्रमाणे मानवी जीवनातील नैसर्गिक प्रेमभावनाही त्यांनी समर्थपणे काव्यरूपांनी मांडली आहे. आंबेडकरवादी साहित्य चळवळीने परिवर्तन, सामाजिक जाणीव केंद्रस्थानी ठेवूनच मराठी साहित्याला धक्का दिला. त्यामुळे सामाजिक जीवनाची अनुभूतीच अनेक कवींच्या काव्यातून प्रामुख्याने अभिव्यक्त झालेली आहे. उत्थानगुंफा या त्यांच्या काव्यसंग्रहात त्याचा आविष्कार मिळतो. परंतु मूर्तिभंजन या काव्यसंग्रहात प्रेमकविताही आढळतात. आंबेडकरवादी कवितेला जणूकाही प्रेमाचे वावडेच आहे, असा समज मराठी समीक्षकांनी करून घेतला होता. त्याला तडा देण्याचे कार्य उत्थानगुंफामधील कवितेनंतरच्या कवितेने केले

आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेत विविध भावभावनांची निसर्गरूपे साकार झालेली मिळतात.

मनोहरांची कविता सरळसोट विवेक हरपून प्रकट होत नाही. त्यांची कविता सैद्धान्तिक आयामाला मोठ्या जबाबदारीने काव्यात्म अनुभूतीला जन्म देत प्रकट होते. नामदेव ढसाळ यांची कविता जसे मेनहोलमध्ये ज्ञानेश्वर, बुद्ध इत्यादींना बुडविते. स्थितीवादी व परिवर्तनादी या दोन्ही नायकांना एकत्र कोंबते. मनोहरांची कविता परिवर्तनाची प्रकाशरेखा वर्तमान इतिहासातून ते भूतकाळातील इतिहासापर्यंत ओढते. अंधाराला जन्म देणारे विचार व नायक यांना वेगळे करून मांडते. भारतातील समतेच्या योद्धांना जशी काव्यविषय करते त्याचप्रमाणे मार्क्स, नेल्सन मंडेला इत्यादी समतेसाठी, सामाजिक न्यायासाठी लढणाऱ्या योद्ध्यांसाठीही त्यांची काव्यभावना प्रकट होते. आणि आंबेडकरवादी साहित्याचे व कवितेचे नाते असे ते जागतिक लढ्यातील लेखनाशी जोडतात.

कोणत्याही विचार कवितेला अथवा तत्त्वज्ञानाला आपली साम्यस्थळं शोधावी लागतात. आपल्या विचाराशी कमी अधिक जुळणाऱ्या भावनेशी नाते सांगण्याचा मोह होतो. डॉ. आंबेडकरांनी आपल्या विचाराचा वारसा फुले, कबीर, बुद्ध यांच्याशी जोडला. विचारवंताला जसा मोह आवरता येत नाही तसाच गायक, चित्रकार, कवी यांनाही आवरता येत नाही. म्हणूनच की काय कवी केशवसुतांच्या काव्य आशयाशी त्यांनी आपल्या कवितेचे नाते जोडले आणि केशवसुतांच्या कवितेला जणूकाही त्यांनी अधिक गतिमान केले असाच विद्रोह त्यांच्या काव्यात ओतप्रोत भरला आहे. आशय, अभिव्यक्ती प्रतिमा, जीवनदृष्टी, श्रमिकांच्या जीवनातील अनुभव, अस्पृश्यांचे प्रश्न, मजुरांचे दुःख यांनीच त्यांचे काव्यलेखन विविध भावभावनांनी गद्गदून आलेले आहे. म्हणून दुसरे केशवसुत खऱ्या अर्थाने बा.सी. मर्ढेकर न होता कवी यशवंत मनोहर ठरतात, अशीच त्यांच्या कवितेची प्रकृती आहे. केशवसुतांनी तुतारी, नवा शिपाई इत्यादी कवितांतून परिवर्तनाचा स्वर पकडला आणि देव, जातीधर्म नाकारले. मनोहरांच्या कवितेतही तेच विचार विकसित झाले आहेत. २६ जानेवारी १९९४ ला राष्ट्रीय सर्वभाषा संमेलनात त्यांनी महाराष्ट्राचा मराठी कवी म्हणून जी कविता वाचली त्यात स्पष्ट म्हटले आहे.

''जपून रे माझ्या निखाऱ्यांनो जपून जरा, नास्तिकांचे कूळ आपले.''

नास्तिकतेला स्पष्ट शब्दात मांडणारी त्यांची कविता ही खऱ्या अर्थाने

मानवी जीवनाला महान करणारी आहे. श्रम न करणाऱ्या पंड्यांना ईश्वराच्या सावलीतून बाहेर ओढून श्रमिकांच्या शेतात, कष्ट करणाऱ्या कारखान्यात राष्ट्रीय विकासाच्या कार्यात उभी करणारी आहे. बहुजनाला अनिष्ट करणाऱ्या रूढीला, स्वर्ग-नरक, पाप-पुण्य, ईश्वर-चमत्कार या ढोंगी गोष्टींपासून सावध करणारी आहे. एकूणच अज्ञानावर आधारलेल्या या भावना व विचाराला नाकारणारी आहे. आत्मा, ईश्वर, स्वर्ग, पूर्व जन्माचे संचित यांना प्रखर विरोध करणारी व बुद्धिवाद, विवेकवाद, लोकशाही, आंबेडकरी संस्कृती यांचा पुरस्कार करणारी आहे. त्यामुळे जीवनातील व साहित्यातील वातावरण विशुद्ध करण्याचा जणू काय ध्यासच मनोहरांच्या कवितेचे स्वप्न आहे.

सर्वसामान्य माणसाच्या जीवनात आंबेडकरी मूल्य-जाणिवांची चेतना देणे आहे. 'मराठी कविता आणि आधुनिकता' हा त्याचा काव्यसमीक्षा ग्रंथ आणि त्यांनी आतापर्यंत लिहिलेल्या समीक्षा, निबंध, प्रवासवर्णन, कादंबरी, कविता इत्यादी प्रकारातील चोवीस ग्रंथांमधून त्यांनी लोकशाही जीवनदृष्टीच मांडली आहे. परिवर्तनवादी मूल्यजाणीव रेखाटली आहे. मानव्यावर आधारलेल्या भाव-संवेदनाच त्यांच्या कवितेचे प्रमुख काव्यरूप आहे. म्हणून त्यांच्या कवितेचा आकृतिबंध मराठी काव्य इतिहासात अनन्यसाधारण ठरावा असेच त्याचे विराट दर्शन आहे.

दै.जनवाद:२३ जाने. १९९४

२४

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिभेचा हुंकार डॉ. यशवंत मनोहर

■ प्रा.दि.वा. बागूल

बुद्धाच्या शांत, शीतल आणि करुणामयी रूपाची आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रज्ञावंत, समताधिष्ठित सार्वभौमत्वाची पण तरीही मर्मभेदक जाणीव करून देणारा आणि माणसाला माणुसकीने जागवून, माणसातल्या आतील माणसाच्या मनावर हळुवारपणे जाणिवेची फुंकर घालून समस्त नरनारींना बाबासाहेबांचेच बोट धरून जीवनक्रम आचरण्यास शिकवणारा एक सत्यवादी, कृतिशील आणि भविष्याचाही भूतकाळ सांगणारा, उज्ज्वल भवितव्याची आशादायी वाट पाहणारा, अखिल मानवाच्या उरात भविष्याची आशावादी ज्योत पेटवणारा कलंदर असा लेखक म्हणजे डॉ. यशवंत मनोहर.

खरे तर माणसाने किती मनोहर असावे हाही न कळणारा प्रश्न आहे. कशाकशात मनोहर असावे हेही एक न उलगडणारे कोडे आहे. साहित्याच्या सर्वच क्षेत्रात यशवंत व्हावे हेही एक महासत्य पण नवलच आहे. अत्यंत मोठा पण तरीही स्वतःला छोटा मानणारा, असे मला दिसलेले मनोहारी नाते जपणारा आंबेडकरी लेखक म्हणजे डॉ. यशवंत मनोहर.

१५ एप्रिल २००७ ला सरांचा शहरात कार्यक्रम ठेवला होता. १४ एप्रिलला आयु. लक्ष्मण मानेंच्या धम्मयात्रेला यशवंत मनोहरांच्या उपस्थितीत सुरुवात झाली आणि दुसऱ्याच दिवशी पुण्यात कार्यक्रम. कल्याणला सर उतरणार म्हणून मी पुण्यावरून गाडी घेऊन गेलो. ऊन मी म्हणत होते. कल्याण जंक्शनला माणसांचा पूर अन् घामाच्या धारा भरभरून वाहत होत्या. माझ्याअगोदर सर आले होते. ते पाऊण तास उन्हात उभे राहून वाट पाहत होते. एकदाची गाठ झाली. पुण्यात आलो ते सरळ माझ्या घरीच. तोपर्यंत सायंकाळचे पाच वाजले होते. सहा-साडेसहा वाजता कार्यक्रम सुरू करायचा होता. अचानक पाऊस कोसळायला लागला. कार्यक्रमाच्या ठिकाणी पाणीच पाणी. साडे आठ वाजता पाऊस थांबला. कार्यक्रमाच्या नियोजित ठिकाणी सरांना घेऊन गेलो. अशाही स्थितीत सरांची वाट पाहणारे श्रोते बघून आनंद वाटला. वंदना, सत्कार इ. सोपस्कार पार पडले. भन्ते डॉ. तिस्सवन्स आवर्जून हजर

होते. ते सरांचे जुने कॉलेज मित्र. सरांचे भाषण सुरू झाले आणि हळूहळू पावसाच्या धाराही कोसळायला लागल्या. मला वाटले आता पाऊस सुरू झाला तर भाषण बंद करावे लागेल. पण ज्यांच्यासाठी भाषण होते ते लोक एवढे शांत होते की पाऊस पडतोय हे त्यांना जाणवत नसावे, इतक्या तन्मयतेने ते श्रोते यशवंत मनोहरांना स्वीकारत होते. विचारांचा पाऊस आणि श्रोत्यांची तहानलेली जमीनरूपी मने एवढे एक झाले होते. कोणालाच कोणाचा विचार करता येत नव्हता. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धम्मसंकल्पना आणि आजचे आपले कर्तव्य' या विषयावरील मर्मभेदक, चपखल आणि मनाचा ठाव घेणारे शब्द, श्रोत्यांच्या काळजाचा ठाव घेत होते. यशवंत मनोहरांचे शब्द आणि श्रोत्यांची मने एकदमच खळाळून वाहू लागले होते. धीरगंभीर आवाजात सर म्हणाले, ''तुम्ही बुद्धांचे अनुयायी ना? मग भीमाईचे बोट धरून चला लेकरांनो. तुम्ही बुद्ध व्हाल बुद्ध! फक्त बाबासाहेबांचे बोट धरा म्हणजे समतेच्या गावाला जाता येईल.'' बस्स. एवढ्या शब्दांनी सरांनी दीड तास खेळवले. पावसाने अंगावरील कपडे केव्हा कसे भिजले कळले नाही. माणसे मनोहरमय कधी झाली त्यांना कळले नाही. कुशल शेतकरी जसा एकाही वाफ्यात पाणी दिल्याशिवाय राहत नाही तद्वतच जाणिवेने कोरडे असलेले वाफे म्हणजे श्रोते सरांच्या शब्दरूपी ओलाव्याने तुडुंब भरले. शेवटी शेवटी विद्युत पुरवठा खंडित झाला. मला वाटले, लोक आता उठतील. पण छे. लोक उठतीलच कसे? इथे मला वामनदादांचे एक गीत आठवते. महाडचा रणसंग्राम असो की काळ्यारामाचा मंदिरप्रवेश असो, डॉ. भीमराव आंबेडकर ठाम उभे असायचे म्हणून लढणारांना समोरचे दिसायचे. तेव्हा वामनदादा म्हणतात -

''वादळी वाऱ्यामधी तोफेच्या माऱ्यामधी
पाहिला भीम आम्ही रणी लढणाऱ्यांमधी.''

त्या लढणाऱ्या भीमरायाच्या रक्ताची जाणीव यशवंत मनोहर यांना यावेळी झाली असावी. वीज नाही, पाऊस पडत आहे. समोरचा श्रोतृवर्ग जागचा हलत नाही. पूर्ण अंधार होता. आवाज फक्त येत होता. यशवंत मनोहर सांगत होते, ''अरे तुम्ही भीमाची लेकरे आहात. आत्ताच हरून कसे जमेल? जरा बाबासाहेबांना आठवा. त्यांचे तुमच्यासाठीचे तळपते शब्द आठवा. समतेला जिवाच्या पल्याड सांभाळून तुम्हाला घटना बहाल केली तो प्रज्ञासूर्य आठवा. म्हणजे लेकरांनो बाबासाहेबांचेच बोट धरून चला. आपण कुठे चुकतोय हे समजले की बस्स. तुम्ही भीमाची लेकरे आहात. तुम्ही सूर्यपुत्र आहात. तळपणे हेच तुम्हाला ठावं असायला पाहिजे. आपला बाप किती मोठा मग

आपण छोटे होऊन कसे जमेल? इतर समाजात आणि तुमच्यात हाच फरक आहे की आपला बाप आहे बाबासाहेब. अंधाराला कापत जाण्याची ताकद आपल्यात आहे. चला आपण सर्वच दिवे होऊ या. एकसाथ पेटवू आणि सर्वच उजेडात न्हाऊ!'' असे धीरगंभीर आवाजातील शब्द श्रेत्यांच्या कानावर पडत होते. काही वेळाने तशाही अंधारात भन्ते तिस्सवन्स बोलायला उठले. चार-पाच मिनिटे बोलले. त्यांचे भाषण संपते न संपते तोच पुन्हा विद्युत पुरवठा सुरू झाला आणि पुन्हा यशवंत मनोहरांचे भाषण सुरू करण्याची श्रोत्यांनी विनंती आयोजकांना केली आणि १५ मिनिटे पुन्हा बुद्धविचारांचा, आंबेडकरी अनुयायी यशवंत मनोहर खळखळायला लागला. बरसणे, खळखळणे खळाळत होते. अल्लड वासरांसारखे सर सभोवार विचार फेकत होते आणि अकरा केव्हा वाजले कळलेच नाही. पुन्हा विद्युत पुरवठा खंडीत झाला. भाषण संपवून आम्ही माझ्या घरी आलो. जेवायला सरांची फर्माइश काय असावी? पिठले-भाकरी. आयु. रजनीला सरांनी ते स्वतः करतात तसे बेसन करायला लावले आणि रात्री पावणे बारा वाजता गॅलरीजवळ मिणमिण उजेडात आम्ही जेवण केले. खूप मोठा तरीही साधा माणूस यशवंत मनोहर. साहित्यातही असेच हुंदडत हुंदडत दौडत जातात. चहूबाजूंनी साहित्याचा वेध घेतात. पण तरीही किनारा ओलांडून जात नाहीत. तसे त्यांना ते आवडतही नाहीच.

खूप दिवसांपासून त्यांना साहित्यातून ओळखत होतो. १९८० साली १२ वीला असताना 'कालचा पाऊस आमच्या गावी आलाच नाही' इथून मी त्यांना ओळखायला लागलो. पुढे पुढे त्यांचे लेख, कविता मधून मधून वाचायचो. पण तरीही त्यांचा समग्र साहित्याचा आशय मला अजूनही कळला नाही. जो कळून येत आहे तोच भरपूर आहे. सोलापूरच्या विद्रोही साहित्य संमेलनात सर पुस्तकांच्या दुकानापुढून हिंडत होते. मी प्रत्यक्ष हा लंबा-चौडा माणूस पाहत होतो. त्यांच्या मागे जाऊन उभा राहिलो. त्यांच्याबरोबर इतर माणसे होती. 'रमाई' कादंबरीविषयी बोलणे चालले होते. माझी उत्सुकता जागी झाली. मी सरांच्या पाठीमागे विरुद्ध दिशेला तोंड करून ऐकत होतो. सर रमाईबद्दल बोलत होते. त्यांचे बोलणे संपले व मी कॉर्नरच्या दुकानातून सरांनी लिहिलेली 'रमाई' विकत घेतली व संमेलनाच्या ठिकाणी जाऊन बसलो. डॉ. आ.ह. साळुंखेंचे भाषण सुरू झाले. गर्दी असल्याने मला फक्त स्पीकरचा आवाज येत होता. म्हणून मी हातातील पुस्तक उघडले. रमाईचे पहिले पान वाचायला सुरुवात केली. साळुंखेंच्या भाषणात त्यांनी काय सांगितले हे कळलेच नाही. कारण तेवढ्या वेळात रमाई वाचली. वाचताना हृदय चर्रर झाले. रमाई लिहिताना यशवंत मनोहरांनी शब्दांना किती ठिकाणी कोरले याची

जाणीव झाली आणि तेव्हाच ठरवून टाकले. रमाईवर एकपात्री नाटक लिहावे. कित्येक पुस्तके बघितली, वाचली; पण यशवंत मनोहरांची रमाई मनाला जी भावली ती विचारू नका. त्या आईने मला जवळ केले. माझ्यासारख्या वासराचे हंबरणे तिला कळले असावे. मीही रमाईच्या काळजाला बिलगलो आणि थोड्याच दिवसात रमाई नाट्यरूपात लिहून काढली. ते नाटक लिहिताना जवळ जवळ सत्तरवेळा मी अक्षरशः रडलो. पण त्या रडण्यानेच माझी रमाई फुलली. म्हणून मी त्या नाटकाला सूर्याची सावली हेच नाव देऊन त्याचे प्रयोग सुरू केले. ठिकठिकाणी माझ्या रमाईचे प्रयोग होतात. श्रोतृवर्ग आसवांच्या थेंबात न्हातात. ही ताकद माझी नसून मनोहर सरांची आहे. राहुरीचे डॉ. सुधीर क्षीसागर यांनीच मला फोनवरून सरांची भेट घडवून दिली. पण माझ्या रमाईच्या नाटकाच्या उद्‌घाटनाला सरांना येता आले नाही. शेवटी साताऱ्यात लक्ष्मण मानेंच्या शाळेत झालेल्या कार्यक्रमात सरांना तो प्रयोग दाखवलाच.

यशवंत मनोहर सरांनी लक्ष्मण मानेंना लिहिलेली 'धम्मपत्रे' हा आमच्या विचारांना उघड उघडपणे दिलेला एक सल्ला आहे. हे आंबेडकरी जनतेने विसरू नये. त्या धम्मपत्रांतून यशवंत मनोहर जे आक्रंदतात त्यामागील भावना समजून घेणे गरजेचे आहे. आज आपण सर्वच स्तरातील अनुयायी बुद्धाच्या ज्ञानाशी न शोभणारी विसंगत भाषा बोलतो. त्याचा अर्थ कित्येकदा चुकीचाच होतो व मूळ बुद्धापासून दररोज आम्ही दूर जातो. म्हणून बुद्धाचे तत्त्वज्ञान आणि बौद्धांची भाषा हे पुस्तक अनुयायांनी जरूर वाचावे. महाबुद्ध डॉ. आंबेडकर वाचले तर आपण स्वतःलाच बदलून घेऊ असा विश्वास आहे. डॉ. आंबेडकरांनी विपश्यना का नाकारली या पुस्तकात सरांनी बेधडक लिखाण केले. पण तरीही संयम सुटू दिला नाही. बाबासाहेबांच्या व्यक्तित्वाचा शोध घेऊन लिहिलेले काव्यभीमायन तर जातीवंत व प्रतिभासंपन्न कवीची जाणीव करून देते. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ का फोफावली नाही याचे कारण शोधताना त्यांनी दिलेले विवेचन हे त्यांच्या ''आंबेडकरी चळवळीतील अंतर्विरोध'' या पुस्तकातून मिळते तर धम्मदीक्षेचा सुवर्ण महोत्सव नुकताच आम्ही गाजवत आहोत. या धर्तीवर त्यांनी 'धम्मदीक्षेचा सुवर्ण महोत्सव तुम्हाला काय मागतो?' असा प्रश्न समस्त बौद्धजनांना विचारून प्रत्येकाला अंतर्मुख होण्यासाठी भाग पाडले. 'धम्मक्रांतीची पन्नास वर्षे' हे पुस्तक अलीकडील. सरांची वेगवेगळी गाजलेली पुस्तके. धम्मदीक्षेच्या काळात निदान ही वरील पुस्तके जरी वाचली तरी खूप झाले असेच म्हणावे लागेल. अगदी अलीकडील 'बौद्ध आचारप्रणाली' हे एक अत्यंत विचार करावयास लावणारे पुस्तक आहे.

एकूणच मनोहर सरांनी साहित्यातील चौफेर बाजूंनी साहित्याचा लिखाणप्रपंच मांडला आहे. आणि तो मांडीत असताना डॉ. आंबेडकरांचे बोट त्यांनी सोडले नाही. बुद्धाची महाकारुणिकता सोडली नाही की क्रांतिबा फुल्यांचा विश्वासही सोडला नाही- रमाई, भीमाई, सावित्रीबाई आणि यशोधरेच्या आक्रंदनांना त्यांनी न्याय दिलाच आहे. या महामातांच्या कुशीतून बाहेर पडलेल्या वेदनेला आणि हुंकाराला यशवंत मनोहर आपल्या प्रतिमेच्या मलमली गादीवर सहजपणे पेलवताना स्वतःला हरवून जातात.

एवढा मोठा माणूस पण खूप लहान असल्यासारखा जेव्हा वागतो तेव्हा समोरच्यालाच लाज वाटते, स्वतःतल्या खोट्या मोठेपणाची. खरेच. धिप्पाड देहाला गौरवर्ण आणि त्यातून प्रतिभेचा आविष्कार. आवाजातील माधुर्य, हालचालीत कमालीचा संयमितपणा, भाषण करताना रानोमाळ धावत जाऊनही सत्याचाच वेध घेणारे शब्द, ध्येयनिष्ठ नजर, आनंदाचाही हळुवार स्वीकार, न रागवता चेहऱ्यावरील उत्कट आनंदछटा, बुद्ध-फुले-शाहू-आंबेडकरांविषयी प्रचंड आस्था, कमालीचा संशोधक आणि विवेकीस्वभाव, लहानांनाही त्यांच्याबरोबर मोठे म्हणणारा, मोठ्यातही लहान होणारा आणि लहानातही लहान होणारा आणि हे सर्व असूनही नागभूमीच्या मातीतच पाय रोवून चालणारा आणि मातीशी इमान राखणारा इमानदार, सच्चा माणूस. खरेच किती ठिकाणी या माणसाने मनोहर असावे हे न उलगडणारे एक कोडे होय. ज्या गावात त्यांचा जन्म झाला त्या मातीलाही हजारवेळा प्रश्न पडावा की याच मातीतून हे अंकुर अंकुरलेय का? असा हा आमच्या तरुणांचा दीपस्तंभ होय. सहज एकदा विचारले, ''सर, हे सर्व स्फुरते कसे?'' त्यावर ते म्हणतात, ''एकदा बाबासाहेबांचे बोट धरले की सर्व सोपे होते. आम्ही पूर्ण बाबासाहेब स्वीकारीत नाही आणि खरा बाबासाहेब सांगत नाही. इथेच आमची चूक होते. असे आहे बरे ते?'' 'असे आहे बरे ते' हे शब्द सरांच्या तोंडून खूप गोड वाटतात.

याच मेमध्ये ते पुण्यात दोन दिवसीय कार्यक्रमासाठी आले होते. देहुगावाजवळ सांगुर्डीत आमचे मित्र आयु. विजय चव्हाण यांच्या शेतात स्नेहभोजन आयोजित केले होते. भन्ते डॉ. तिस्सवन्स यांनी स्वरचित कविता सादर केल्या. यावर सर मला म्हणाले, ''बागूल, हे भन्ते थेअरॉटीकल नाहीत बरं कां ते प्रॅक्टीकल आहेत. खूप भन्ते पाहिले पण हे भन्ते निराळेच आहेत. तेच खरे तर बाबासाहेबांच्या व्याख्येत बसणारे आहेत.'' सायंकाळी पुण्यात शनिवारवाड्यावर परशुराम वाडेकरांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाला आम्ही निघालो. देहुगावाजवळून जाताना सर म्हणाले, ''चला आता एका श्रेष्ठ कवीला भेटू या.'' तुकारामांच्या मंदिराजवळ गेल्यावर तेथे बरेच पुजारी होते. सर सहज म्हणाले, ''बघा, हे आधुनिक

कमावते लोकोद्धारक!'' पुण्याला आल्यावर एवढ्यात तरी त्यांनी मोठ्या मंडळींचा जेवणाचा आग्रह मोडून ते माझ्याकडेच जेवलेत. या गोष्टीचा मला मनस्वी आनंद वाटतो. सरांचे जेवण तरी काय हो. एखादी भाजी, ज्वारी-बाजरीची भाकरी. बस्स. गोड बाकी खूप आवडते. बऱ्याचदा गोड खाणारे कडवट बोलतात. पण सरांची दोन्हीही कृत्ये सारखीच. पुणे विद्यापीठात कार्यक्रम होता व त्याच रात्री नागपूरला निघायचे होते. सरांना बाहेरचे जेवणाचे निमंत्रण होते. पण मी सरांना जेवण आणून देतो असे सांगितले आणि सहजपणे त्यांनी स्वीकार केला. पण हिरव्या मिरचीचा खर्डा सांगायला विसरले नाहीत. माझा सहकारी राजाराम सरवदे या विद्यार्थ्याबाबत सरांना कमालीचा अभिमान वाटतो. आता तोच सरांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टरेट करणार आहे. कधीही या मनोहरी माणसावर जान कुर्बान करावीशी वाटली तर त्यात नवल काहीच नाही.

मला एक आश्चर्य कायम वाटते ते या गोष्टीचे की असा मनोहरी माणूस, हरहुन्नरी कलावंत, शीलवंत देहाचा पुरुष, भरती आणि ओहटीलाही पेलवणारा संयमी, एका ध्येयाने पूर्ण पछाडलेला, आंबेडकरी प्रतिभेचा हुंकार, डॉ. पुष्पलता मनोहर यांनी कसा जोजवला ते कळत नाही. सहकाराबरोबर असहकाराचा स्वीकारही त्यांनी केलेला दिसतोय. त्यांच्यातील यशोधरा, त्यांच्यातील रमाई, त्यांच्यातील सावित्रीमाई आणि यशवंत मनोहर यांची भीमप्रतिभा या दोहोंच्या समन्वयातून आज भीमाचा प्रबोधनाचा मळा बहराला आला हे निश्चित म्हणावे लागेल.

असतात अशीही माणसे ध्येयवेडी
अंतर्मुख होऊन ते आक्रंदतात
समतेचे गाणे
ज्यांच्या डोळ्यांतल्या मेंदूतून निघतात
अनंत अणू, प्रोटॉन आणि न्यूट्रॉन
जी पेटवतात खोल समुद्रालाही...
त्याच्या लाटांवरच स्वार होऊन
प्रतिभेचे शिड वल्हवून
ध्येयाजवळ आणतात स्वप्नांनाही
एकाच कवेत...
त्या मातीलाही विचारायला हवे
त्या हाडावळ्यांना विचारायला हवे
त्या वेदनेला विचारायला हवे
त्या प्रतिभेलाही विचारायला हवे

यशवंत नावाची प्रतिभा जन्मलीच कशी?
त्या प्रतिभेला मनोहर रूप
कोणाचे मिळाले?
कलंकीत मातीचे की
भीमाच्या श्वासाचे?
अनंत अंतर्दाहाचे की बुद्धाच्या
करुणेचे
कारण हा नुसता मनोहर नाही
तो यशवंत आहे
तो यशवंत आहे...

पुण्यातील शनिवार वाड्यासमोरील कार्यक्रम आटोपून सर खाली उतरत असताना माझ्या शेजारील एक भगिनी दुसरीला म्हणत होती, "या माणसाच्या उंचीएवढी त्यांची बुद्धीही उंच आहे आणि त्या सुंदर शरीराला शोभेल अशी सुंदर भाषाही या माणसाकडे आहे." तर पुणे विद्यापीठात लोकमतचे सहसंपादक प्रदीप निफाडकरांनी एका कविसंमेलनात सरांच्या उंचीची आणि सौंदर्याची तारीफ करताना एक शेर सादर करून टाळ्या मिळवल्या होत्या. मी आणि माझ्या पिढीने बाबासाहेबांना पाहिलेच नाही पण त्यांचे विचार आज वाचत असताना ते सर्व विचार, हुंकार, वेदना, भावना, सौंदर्य यशवंत मनोहरांच्या साहित्यात दिसते. त्यांच्या तळमळीने ते जाणवते. कधीकधी आम्हालाही वाटते की आम्ही यशवंत मनोहरांच्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पाहतो आणि ते वावगेही ठरू नये. अर्थात व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असतात. कुणाला काहीही वाटो मी सत्यापासून का ढळावे?

एकूणच सरांच्या विषयी लिखाण करत असताना प्रतिभा नसलेलाही प्रतिभेच्या वेढ्यात सापडतो हे खरे आहे. मी वय वर्षे चाळिशीतला. मी काय सरांवरती लिहावे? यात माझे स्वतःचे असे काहीच नाही. आदरणीय डॉ. यशवंत मनोहर यांच्याविषयी प्रकाशित होणाऱ्या गौरवग्रंथाला अर्थात नवनिर्माणाच्या या कार्यशाळेतला मी एक प्रशिक्षणार्थी. याहून वेगळा मुळीच नाही. आयुष्यमती रजनी बागूल, चि. विश्वजीत, माझे सहकारी राजरत्न सरवदे, भन्ते डॉ. तिस्सवन्स, विजय चव्हाण, प्रदीप गायकवाड यांचा सरांवर फार जीव आहे. त्यांना सरांबद्दल प्रेम आहे. त्यांच्या सर्वांच्या वतीने मी सरांना त्याचप्रमाणे डॉ. पुष्पलता मनोहर यांना दीर्घ आयुष्य चिंतितो आणि सरांकडून अजून वेगवेगळ्या विचारांच्या पुस्तकांची अपेक्षा व्यक्त करतो.

# डॉ. यशवंत मनोहर:एक मार्गदर्शक दीपस्तंभ

## ▪ डॉ.इंद्रजित ओरके

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि शैक्षणिक क्षितिजांना समृद्ध करणाऱ्या विचारवंत, लेखक, प्राध्यापक डॉ. यशवंत मनोहर सरांचे नाव सर्वच अत्यंत सन्मानपूर्वक घेतले जाते. या क्षितिजावर त्यांनी आपली नाममुद्रा अनेक संकटांचा सामना करीत कोरलेली आहे. अवघ्या महाराष्ट्राच्या समाजजीवनालाच नव्हे तर समग्र मानवी विश्वाला त्यांनी त्यांच्या लेखणी आणि वाणीने नवमूल्यांची सौंदर्यऊर्जा अखंडपणे पुरविली आहे. लोकांच्या भावभावनांना आणि श्रद्धांना स्तुतिसुमने वाहणाऱ्या लेखक, वक्त्याला प्रसिद्धी आणि प्रशस्ती जलद मिळते. परंतु जडवादी दर्शन परंपरा स्वीकारलेल्या आणि ती निष्ठेने पेललेल्या व्यक्तित्वाकडे पारंपरिक मूल्ये उराशी जपणारी आणि कालबाह्य मूल्यांवरच सत्तासूत्रे मुठीत ठेवणारी धूर्त समाजव्यवस्था शत्रूच्या नजरेने पाहते. कधीकधी ती तुटूनही पडते. क्रांतिकारी मांडणी करणाऱ्या विचारवंतांवर प्रतिक्रांतीचे किती बॉम्बवर्षाव होतात, हे मी दोन दशकांपासून पाहतो आहे. डॉ. यशवंत मनोहर यातून सुटणार कसे? फॅसिस्टांच्या सगळ्याच तळावरून त्यांच्यावर हल्ले झालेले आहेत. मात्र काही हल्ले त्यांनी जाणीवपूर्वक ओढवूनही घेतले आहेत. धर्म या संकल्पनेऐवजी धम्म संकल्पना, दलित साहित्य या संकल्पनेऐवजी आंबेडकरवादी साहित्य ही संकल्पना अशी नित्यनूतन मांडणी त्यांच्या लेखणीने आणि वाणीने सतत केली आहे. हिंदुत्ववाद्यांचे ते जगजाहीर विरोधक आहेत, हे खरे आहे. पण धम्मस्वीकारानंतरही कर्मकांड, विपश्यना आणि परित्राणपाठ पूज्यभावाने जपणाऱ्या दांभिकतावाद्यांनीही त्यांना उघडपणे शत्रू मानले आहे. एकूणच प्रतिक्रांतीच्या फौजांनी त्यांना चौफेर वेढा घातला. तरीही ते डगमगले नाहीत. शक्य झाले तेव्हा ते प्रबोधनाचा परिवर्तनाचा प्रकाशझोत दुनियेवर फेकत राहिले. आंबेडकरवादाची मांडणी करताना सॉक्रेटिस, बुद्ध, चार्वाक, मार्क्स, फुले, लोकहितवादी आगरकर, न्या. रानडे, मॅ. गोर्की, देरेंद्रॉ, फिडेल कॅस्ट्रो, लेनिन, स्टॅलिन अशी वैश्विक जडवादी दर्शन परंपरा विकसित करून आंबेडकरी समाजाला व्यापक भान आणि विशाल दृष्टी बहाल केली.

मार्क्स-आंबेडकर या व्यक्ती नाहीत. त्या जुलमी समाजव्यवस्था उद्ध्वस्त करून नवसमाज निर्माण करणाऱ्या सर्जनशील शक्ती आहेत. मार्क्स, आंबेडकर यांचे विभाजन म्हणजे जुलमी सत्तेची दिवाळी होय, हे डॉ. यशवंत मनोहर यांनी अचूक हेरले. त्यांच्या चिंतनाला, चिकित्सेला, व्यासंगाला बुद्धिप्रामाण्यवादी उत्कट किनार असल्यामुळे त्यांनी तात्त्विक तडजोडी परतवून लावल्या. आयुष्याचे कडूगोड घोट घेत घेत लेखनप्रवास सुरूच ठेवला. या प्रवासात ते अनेकदा घायाळही झालेत. संघटना निर्माण करून संघटनेच्या बळावर सत्ता, संपत्ती आणि क्षणिक सुखाचे किल्ले त्यांनी सर केलेले नाहीत. किंबहुना, स्वतःच स्वतःच्या आयुष्याशी झुंज देत देत अनेक यशाची व सन्मानाची शिखरे त्यांनी पादाक्रांत केलेली आहेत. 'माझे दुःख वाहून नेईन मीच, हिरवी झाडे, उभी असेतोवर,' (उत्थानगुंफा) या जीवनसत्यावर मनोहरांनी गाढ प्रेम केले. ही जीवनसत्ये बुद्ध, फुले, आंबेडकर यांच्या जीवनदर्शनातून त्यांनी हंसक्षीरवृत्तीने वेचली आहेत. त्यांनी स्वतःवर आणि स्वतःच्या आयुष्यावर किती प्रेम केले, हे माहीत नाही. परंतु बुद्ध, फुले, आंबेडकर या क्रांतिकारी प्रतिभांवर त्यांनी असीम प्रेम केल्याचा मी जिवंत साक्षीदार आहे.

जडवाद, चैतन्यवाद, कौरूप्य, सौंदर्य असा मानवी जीवनाचा सनातन संघर्ष आहे. या संघर्षात डॉ. मनोहर सरांनी जडवादी आणि सौंदर्य या प्रवाहाची बाजू निष्ठेने स्वीकारली. देखण्या, दिमाखदार देहयष्टीबरोबर विचारांचे अनोखे सौंदर्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वात डोकावते. त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुपदरी आहे. वक्ता, तत्त्ववेत्ता, आदर्श शिक्षक, मार्गदर्शक, संवेदनशील आणि सर्जनशील लेखक अशा अनेक पदरांनी त्यांचे व्यक्तित्व साकार झाले आहे. डॉ. मनोहरांची महानता येथे मुक्काम ठोकत नाही तर गेली तीन दशके त्यांनी प्रबोधनाची क्रांतीबीजे महाराष्ट्राच्या मातीत सर्वत्र आणि सर्वदूर पेरलेली आहेत. पेरते व्हा हा संदेशच त्यांनी क्रांतिकारी तरुण मनाला दिला आहे. डॉ. श्रीराम लागू, पु.ल. देशपांडे, कविवर्य नारायण सुर्वे, कुसुमाग्रज, निळू फुले, डॉ. बाबा आढाव, पद्मश्री बाबा आमटे, नागेश चौधरी, डॉ. कुमार सप्तर्षी, कॉ. शरद पाटील अशा सूर्यकुलाशी कौटुंबिक नाती यशवंत मनोहरांनी बहारदारपणे विणली आहेत. रक्ताच्या नात्यापेक्षा हृदयाची आणि मेंदूची नाती डोळसपणे उभी करणे यात मला त्यांचा वेगळेपणा वाटतो.

ज्ञानक्षेत्र हे त्यांचे आवडते क्षेत्र. या क्षेत्रातही त्यांनी आपली स्कॉलरशिप सिद्ध करून पदचिन्हे कोरली आहेत. महाराष्ट्राच्या विद्यापीठीय क्षेत्रात मराठी भाषा आणि साहित्याचा समर्थ, सर्जनशील, बुद्धिवादी प्राध्यापक म्हणून त्यांची

ख्याती आहे. गुरुशिष्य परंपरेची त्यांनी आरती ओवाळल्याचे दिसत नाही. विद्यार्थ्यांना समजून घेणे, त्यांना मानसिक बळ देणे, आदिवासी, ग्रामीण विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष पुरविणे, विद्यार्थ्यांना आधुनिक मूल्यांचे महत्त्व पटविणे हे व्रत त्यांनी अंगीकारले. केवळ शिकविणे, माहितीची दलाली करणे हे त्यांच्या स्वभावात नव्हते. तर वाङ्मयातून, अध्यापनातून वैचारिक नेतृत्व उभे करणे याचा ध्यासच त्यांनी घेतला होता. विद्यापीठाच्या गुणवत्ता मालिकेत चमकणारे तारे समाजजीवनात निस्तेज ठरत आहेत, याची खंत त्यांनी वेळोवेळी व्यक्त केली आहे. अलीकडे ज्ञानक्षेत्राची सतत पडझड सुरू आहे. ज्ञानाचे संवादाचे स्रोत आटत चालले आहेत. अशा अवस्थेत डॉ. यशवंत मनोहर सेवानिवृत्त होत आहेत.

विद्येविण इतके अनर्थ केले हे म. फुल्यांचे विचारबीज घेऊन हे ज्ञानक्षेत्रात दाखल झालेत. महाराष्ट्राच्या दुर्गम प्रदेशातही त्यांनी ज्ञानाची आणि प्रतिभेची मुक्त उधळण केली आहे. आकर्षक रस्ते, देखण्या इमारती, टुमदार बंगले निर्माण करणे फारसे अवघड नाही, परंतु सुंदर विचारांची देखणी माणसे निर्माण करणे कठीण आहे. ही कठीण आणि जटिल प्रक्रिया आणि प्रयोग त्यांनी यशस्वीपणे करून विद्यार्थ्यांची एक समर्थ पिढी उभी केली आहे.

शिक्षण क्षेत्र हे पवित्र आणि नैतिक क्षेत्र आहे. शिवाय शिक्षण ही एक विधायक चळवळ आहे. अज्ञानाच्या काळोखातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे असे त्या चळवळीचे स्वरूप आहे. ही चळवळ सक्षम आणि परिणामी करायचे असेल तर प्राध्यापक हा बहुगुणसंपन्न असला पाहिजे. त्याचा व्यासंग विषय मांडतानाची तळमळ, आशयसंपन्नता, मनोवेधक वाक्यरचना, स्पष्ट उच्चारण, मुद्दा स्पष्ट करताना संदर्भ साखळीची वीण, हृदयभेदक शब्दकळा, अभिनय क्षमता आणि संदेश अशी यशस्वी प्राध्यापकाची वैशिष्टे आहेत. या साऱ्याच वैशिष्ट्यांचे त्यांच्यात दर्शन घडत आहे. त्यांच्या अध्यापन शैलीने आम्हावर मोहिनी पडायची. त्यांच्या शिकवण्यात विजेची चमक होती. सूर्याचा क्रांतदर्शी प्रकाश होता. चंद्र चांदण्यांची भावव्याकुळता होती. वादळाची ताकद होती. सागराची गाज होती. त्यांच्या वाणीला विद्रोहाचे काठ होते. परंतु त्या काठातून कारुण्य वाहत होते. या साऱ्याच जीवनतत्त्वांना आणि जीवनसत्वांना विद्यापीठीय क्षेत्रातील विद्यार्थी इतःपर मुकणार आहेत.

ज्यावेळी संपूर्ण मानवजातीलाच एका महामृत्यूने आपल्या मुठीत करकचून बांधले आहे. एकूणच पृथ्वीचा उजेड आता दयनीय झालेला आहे आणि मानवाच्या भवितव्याचे स्वप्न एखादे बांधकाम कोसळावे तसे मरून पडलेले

आहे. विनाशकारी दहशतवादाचे ढग दुनियेवर दाटून आलेले आहेत. एकूणच जागतिक पर्यावरण माणसाला केवळ स्मशानाची वाट दाखवत आहे असे व्यक्त करून डॉ.यशवंत मनोहरांनी वैश्विक घडामोडींचा धोकाच समाजापुढे ठेवला आहे. विद्यापीठाच्या संदर्भात मांडावयाचे झाल्यास डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ. भा.ल. भोळे आणि आता डॉ. यशवंत मनोहर अशी दीर्घ झेपेची माणसे एकामागून एक सेवानिवृत्त होत आहेत. विद्यार्थ्यांना डोळसपणे सुजाणतेची नानाविध उड्डाणे भरायला प्रवृत्त करणाऱ्या प्रेरणाच आटत चालल्या आहेत.

अशा भूमिकानिष्ठ प्राध्यापकांशिवाय विद्यापीठे म्हणजे शिक्षणक्षेत्रात येऊ घातलेल्या दुष्काळाची चिन्हे आहेत.

२६ मार्च २००३ हा डॉ. यशवंत मनोहर सरांचा सेवानिवृत्तीचा दिवस. त्यांचा षष्ठ्यब्दीपूर्तीदिनही आहे. त्यांना उत्तम आरोग्य लाभो आणि त्यांच्या हातून भरपूर लेखन होवो ही सदिच्छा!

संदर्भ : नवराष्ट्र, नागपूर, रविवार, २३ मार्च २००३

# स्वतंत्र प्रज्ञेचे बुद्धिवादी विचारवंत डॉ.यशवंत मनोहर

▪ प्रा. अशोक कांबळे

महाराष्ट्रातील प्रसिद्ध विचारवंत व कवी डॉ. यशवंत मनोहर यांना २६ मार्च २००७ रोजी चौसष्ट वर्षे पूर्ण आहेत, त्या निमित्ताने त्यांना आणि त्यांच्या सर्जनशील लेखनकृतीला मनापासून हार्दिक शुभेच्छा !

डॉ. यशवंत मनोहर हे एकूणच मराठी साहित्यातील अत्यंत गंभीर आणि चिंतनशील वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व आहे. आपल्या प्रज्ञेतील आणि प्रतिभेतील निराळेपणाचा सतत शोध घेणे आणि अत्यंत मनस्वीपणे आविष्कार करणे हा बाणा त्यांनी एकदा अंगीकारला व आयुष्यभर जोपासला. डॉ. यशवंत मनोहरांनी लेखन, मनन, चिंतन यांचा मोठा ध्यास घेतला आहे.

१९६० नंतरच्या मराठी साहित्यात डॉ. यशवंत मनोहर यांचे वाङ्मयीन योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते. ज्येष्ठ मान्यताप्राप्त कवी, इहवादी विचारवंत आणि बुद्धिवादी वाङ्मयतत्त्वज्ञ म्हणून महाराष्ट्राच्या साहित्यविश्वात ते सुप्रसिद्ध आहेत. एक अनन्य आणि स्वतंत्र प्रज्ञाशील प्रतिभा अशीच त्यांच्या गंभीर साहित्यिक व्यक्तिमत्त्वाची प्रकृती आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या युगप्रवर्तक तत्त्वज्ञानातून आणि आंदोलनामधून जन्माला आलेल्या साहित्याला 'दलित साहित्य न म्हणता आंबेडकरवादी साहित्य म्हणावे' अशी अभ्यासपूर्ण भूमिका डॉ. यशवंत मनोहरांनी १९८५-८६ सालापासूनच मांडायला सुरुवात केली. १९९०-९१ नंतर त्यांनी दलित संमेलनांना जाण्याचे सपशेल बंद केले. आंबेडकरवादी संमेलन असे नाव देणार असाल तरच मी येतो अशा अटी घातल्या आणि 'दलित साहित्य' या संज्ञेला पूर्णविराम दिला.

डॉ. यशवंत मनोहर यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी आहे. ते कवी, लेखक, समीक्षक, इहवादी विचारवंत, समाजशिक्षक व परिवर्तनाच्या चळवळीतील लढवय्या शिलेदार आहेत. गेली पस्तीस वर्षे ते आपल्या प्रखर लेखणीने आणि विद्रोही वाणीने समाजमनात वैचारिक आंदोलन निर्माण करीत आहेत. जवळपास ६५-७० ग्रंथांची निर्मिती त्यांनी केली आहे. समाजात एक जागरूक

समाजचिंतक, सृजनशील विचारवंत म्हणून आपल्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाची मुद्रा ठळकपणे कोरली आहे. त्यांचे वाङ्मय हे सखोल जीवनानुभवातून आकाराला आलेले आहे. एकंदरीत समाज आमूलाग्र बदलावा व त्याची बुद्धिवाद व समतेच्या चिंतनावर उभारणी व्हावी. आधुनिक जीवनमूल्यांचा समाजाने अंगीकार करावा या उत्कट ध्यासाने त्यांचे लेखन इमाने इतबारे अव्याहतपणे सुरू आहे.

चार्वाक, बुद्ध, फुले व आंबेडकर या युगंधर व्यक्तिमत्त्वांची प्रेरणा त्यांच्या लेखनातून सातत्याने जाणवते. माणसे फॅसिस्टांच्या सोनेरी पिंजऱ्यात सापडू नयेत. परंपरांच्या आणि मूलतत्त्ववादाच्या प्रतिक्रांतीच्या बोळींमध्ये शिरता कामा नयेत यासाठी लेखणी परजली पाहिजे ही प्रांजळ भूमिका डॉ. यशवंत मनोहर सरांच्या लेखनातून स्पष्टपणे जाणवते. स्वतंत्र, बाणेदार, निर्भीड व निष्पक्षपाती विचारांची निष्ठा त्यांच्या लेखनातून दिसते.

ज्ञानसाधना व सामाजिक हित यांचे एक दृढमूल नाते डॉ. मनोहरांच्या चिंतनातून दृष्टोत्पत्तीस येते. एक यशस्वी प्राध्यापक व अभ्यासक म्हणून त्यांचा सार्थ लौकिक आहे. जीवन, साहित्य आणि समाज यांच्यात एक तिहेरी सैद्धांतिक पातळीवर मीमांसा करणारे ग्रंथलेखन मोठ्या निष्ठेने ते करीत आहेत. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वाङ्मयीन चळवळींशी त्यांचा दीर्घकाळ जैविक संबंध असल्यामुळे परिवर्तनवादी सामाजिक प्रबोधनावर त्यांचे विपुल प्रमाणात लेखन होत आहे.

डॉ. यशवंत मनोहरांचे घर हे विद्यार्थ्यांसाठी, कार्यकर्त्यांसाठी एक प्रकारचे वैचारिक चळवळीचे आदान-प्रदानाचे केंद्रच ठरले आहे. त्यांनी केवळ पोटार्थी म्हणून अध्यापनाचे कार्य केले नाही तर विद्यार्थ्यांच्या मनावर प्रबोधनाचे संस्कार करून तो समाजोपयोगी कसा तयार होईल त्यादृष्टीने डॉ. यशवंत मनोहर यांनी विद्यार्थ्यांकडे बघितले. त्यांची प्रभावी वक्तृत्व शैली ही विद्यार्थ्यांच्या आयुष्याची मोलाची ठेव ठरली आहे.

आंबेडकरवादी मराठी साहित्यात ललित आणि वैचारिक साहित्यासोबतच आज उपयोजित आणि सैद्धान्तिक समीक्षेची निर्मितीही दमदारपणे व्हायला लागली आहे. यातील बहुतांश दालनावर डॉ. यशवंत मनोहरांचे नाव एक प्रमुख नाव म्हणून कोरले गेले आहे. एक मान्यवर विद्रोही विचारकवी, 'स्मरणांची कारंजी फुलविणारे प्रवासवर्णनकार, 'रमाई'च्या रूपाने कारुण्याचे शिल्प घडविणारे कादंबरीकार, सेक्युलर जाणिवेचे वैचारिक निबंधकार आणि आंबेडकरवादी समीक्षक म्हणून उभा महाराष्ट्र त्यांना ओळखतो.

भारतीय समाजापुढला सर्वांत महत्त्वाचा प्रश्न नैतिक मूल्यांचा पाया बदलणे हाच होता. भारतीय प्रबोधनाला आता हा विघातक वैचारिक पाया बदलून घेण्यासाठी सर्व शक्तिनिशी प्रयत्न करायला हवेत असा डॉ. यशवंत मनोहर यांची आंतरिक तळमळ आहे. आपली लोकशाही धर्मांधतेच्या गळफासाने आज मरणोन्मुख झाली आहे. भारतीय समाजाचा रूढींचा आणि परंपरांचा ढाचा बदलणे काळाची गरज आहे. डॉ. यशवंत मनोहरांना प्रबोधनाची वा क्रांतीची तीव्र आस लागली आहे. कधीतरी समाज बदलेल असा आशावाद पूर्णत्वास जाईल ही अपेक्षा व्यक्त करून त्यांच्या चौसष्टाव्या वर्षाला लेखणीची अधिक धार यावी ही अपेक्षा व हार्दिक शुभेच्छा !

# २७

# 'मूल्यमंथन' : नवभारताचे टेक्स्ट बुक

## ▪ डॉ.नीलकांत चव्हाण

''मनूने ज्यांना सांस्कृतिक सत्ता दिली त्यांच्या डोक्यात मनू आहेच आणि ज्या ऐंशी टक्के लोकांना हजारो वर्षे या देशात मारले गेले त्यांच्याही डोक्यात मनू आहे. त्यामुळे क्रांतीचे चक्र पूर्ण फिरत नाही.'' असा विचार मांडणारे डॉ. यशवंत मनोहर यांचे 'मूल्यमंथन' हे अलीकडचे अठ्ठावीस लेखांचे नवे पुस्तक. यातील लेखांना पूर्वप्रसिद्धी मिळाल्याने लोकमतांनी गौरव केल्याचे निदर्शनास येते. भूतकाळाचा मागोवा घेत सांप्रत 'मरण माळ प्रश्नांची' चिकित्सा करीत, द्रष्टेपणाने भविष्याचा वेध घेतल्याने नि त्यावर आनंदी भारतावरचे उपचार सांगितल्यास हा ग्रंथ अद्वितीय आणि नवभारताचे टेक्स्ट बुक ठरावा असा उतरला आहे. एकूण समाजजीवनाला खोलवर हैराण करणारे प्रश्न, मूलभूत प्रश्न आणि सांप्रत दृश्य प्रदूषणाच्या मुळाशी कारणे कोणती? याची चिकित्सा लेखकाने संशोधन वृत्तीने केली आहे. तसेच गुदमरत जगण्याच्या मुळाशी कोणते जहर कार्यरत आहे या जहराचे निर्माते आणि विक्रेते हे आरोपी समाजासमोर लेखकांनी धाडसाने उभे केले आहे. नवभारताच्या निमित्ताने ही अभिनंदनीय बाब आहे. प्रा. मनोहरांच्या मते नवभारत कसा हवा हे सांगताना त्यांनी सर्वांगीण अभ्यास, चिंतनपूर्ण मते व्यक्त केली आहेत. प्रामुख्याने मते मांडताना बुद्धिवादाच्या आंतरबाह्य कवचाचा वापर झालेला दिसतो. सहोदर विज्ञाननिष्ठ! त्यामुळे पुस्तकाला काटेकोरपणा तर आलाच सोबत अचूकपणा असल्यामुळे अभिरुची वाढली आहे. धर्म, जात, अंधश्रद्धा या तिन्ही प्रकारच्या अफूच्या गोळ्या खाऊन समाज निवांत एकाच ठिकाणी पडला आहे. ही बाब बौद्धिक जीवनाच्या विरोधी आहे. अशा समाजाला लेखकाने मनोरुग्ण समाज असा शब्द वापरला आहे. देहाने अणुयुगात असणारा हा समाज मनाने पूर्णतः मनुयुगात थांबला आहे. दैववाद, जातीयवाद, धर्मवादी वृत्ती अधिक बळावत चालली आहे. तीर्थस्थळांना कोटी रुपयांच्या देणग्या शासनच देत असल्याने धर्मांध शक्ती वाढत चालली आहे. याचा दुष्परिणाम समाजजीवनावर होत आहे. सोबत नको तेथे पैसे खर्च होत असल्याने दारिद्र्य वाढत आहे. बौद्धिक जीवन चेंगरून प्रवास उलट्या दिशेने चालल्याचे लेखक निदर्शनास आणून देत आहे.

शिक्षणाकडे दुर्लक्ष, त्यातून वाढणारे अज्ञान, अज्ञानातून अंधश्रद्धा, अंधश्रद्धेतून मानसिक दुर्बलता वाढत आहे. त्यामुळे समाज दुर्बल होत आहे. ही बाब देश नष्ट करण्याकडे नेत आहे. ब्रह्मवृंद आणून निवास-जागेची पूजा करणे, नंतर बौद्ध भिक्खू आणून बुद्धवंदना घेणे, घरात उपास-तपासाचे फॅड नवीन स्त्रियांवर लादणे, चतुर्थीचा उपास करणे, विशिष्ट धर्माचे लोक किडत चालले असून मनाने कमकुवत होत चालले आहेत. विशेष म्हणून स्त्रियांच्या शिक्षणावर बंदी घालणारे महाभाग, कुटुंबात वाढत आहेत. स्त्रियांनी चांगले शिक्षण घेतले पाहिजे. शिक्षण वयात आणि विवाहात बंदिस्त करून चालणारे नाही. घरातील कुटुंबातील बी.ए., एम.ए. किंवा त्यापेक्षा जास्त शिकलेली स्त्री संपूर्ण कुटुंबाचा उद्धार करू शकते. शिक्षणाने पशुत्वाचा लोप होतो. विचार करता येतो. स्वावलंबी होता येते. चांगले वाईट याची निश्चिती करता येते. ताठ मानेने जगता येते. अंधश्रद्धा फेकता येते. विद्येचे ध्येय सावित्रीबाई फुले या विद्यामातेने सांगितले आहे. म्हणून लेखक म्हणतो की शिक्षण संस्थांमध्ये शैक्षणिक वाङ्मय कार्यक्रमात केवळ सावित्रीबाई फुले या विद्यामातेची प्रतिमा लावावी. हा सन्मान तिचाच आहे. लेखकाने शिक्षकांना 'तुम्ही कोणाच्या बाजूचे?' असा सवाल विचारून त्यांचे उत्तरही त्यांनी दिले आहे. शिक्षक हा नवनवोन्मेषशालीनी प्रज्ञा असा आहे. या लढाईत ब्रह्मा, विष्णू, महेश असू नयेत. द्रोणाचार्य होता कामा नये. शिक्षक हा ज्ञानाचा क्रांतिदर्शी डोळा आहे. प्रतिगामी, धर्मांध, जातिपूजक व्यक्तीला शिक्षक म्हणू नये. त्यामुळे संपूर्ण पिढीचे मानवी आरोग्य धोक्यात येते. हे शिक्षक ज्ञानदान करीत नाहीत. ते अज्ञानदान व जहरदान करतात या विचारावर लेखकाची भूमिका ठाम आहे. विद्यार्थी हा घटक चर्चेला घेऊन त्यांना मार्गदर्शन करताना लेखक म्हणतो ''शिक्षण हातात घेतल्यावर ते अर्धवट सोडू नये.'' कितीही संकट आले, कितीही जहरी नागांनी शिक्षणाला विरोध केला तरी त्यातून मार्ग काढून शिक्षण पूर्ण करावे. स्वार्थी, लबाड हे शिक्षणाला विरोध करणारच. पण त्यांना ओलांडून पुढे जावे. आपण जेथे आलो तेथे थांबायचे नाही. जे थांबले आहेत त्यांच्याशी नाते जोडू नका. जीवनाच्या पूर्णाकडे आणि आदर्शाकडे जाण्यासाठी धडपडणाऱ्या लोकांशी आणि विचारवंतांशी नाते जोडा. अज्ञानी, शिक्षणाची आवड नसणाऱ्या, शिक्षणाला विरोध करणाऱ्या लोकांपासून शिकायचे नाही आणि दुसऱ्यालाही शिकू द्यायचे नाही. अशात कष्टाने शिकायला लागले तर त्यांचा कमालीचा जळफळाट होतो.

विचार म्हणजे परिवर्तन, विचार सतत पुढे जावे, ज्ञान सतत पुढे जावे. आपले मन सतत विकसित होत रहावे. आपले मन माणूस व्हावे. हा विचार

सांगून लेखक पुढे म्हणतो, ''फॅसिस्ट धर्मांध आणि जातीयवादी यंत्रणांचे ऐकले तर विद्यार्थीपण गमावून बसाल. यात समाजाचा राष्ट्राचा नाश आहे. यात समाजाचे लेखकाचे अवलोकन चिंतन सखोल आहे. आपले जीवन सुखी व्हावे यासाठी काही लोक इतरांना दुःखी करतात. त्यांच्या दुःखात यांचे सुख असते. इतरांना दुःखाच्या दरीत लोटल्याशिवाय यांना सुखी होता येत नाही. आपले वर्चस्व, सांस्कृतिक, राजकीय सत्ता कायम टिकावी म्हणून दैवीरूप दिले जाते. त्यातून खोटेपणा, भ्रमाला खरेपणाचा मुलामा चढविला जातो. हा मुलामा मोहक, सूत्रबद्ध पद्धतीने मांडला जातो. या साऱ्या दुष्ट गोष्टी करण्यासाठी खूप हुशार असावे लागते. या मूलभूत विचारावर समाजव्यवस्था उभी आहे. यातून नशीब, अध्यात्मवाद, चैतन्यवाद, विषमता, वर्णजातीव्यवस्था, वंश, वर्ग निर्माण केले. हे सारे पद्धतशीर लादण्यासाठी माणसांत अज्ञान कसे कायम राहील याची मांडणी केली जाते. अज्ञानातून माणूस पूर्णतः गुलाम बनतो. विशेषतः ही बाब स्त्रियांमध्ये जास्त बघायला मिळते. एखादी स्त्री शिक्षण घ्यायला लागली की तिला मठ्ठ म्हणून हिणवून कमकुवत करतात. ती अज्ञानी राहिली म्हणजे कुटुंबात गुलामासारखी वागवता येते. हे माणसाचे अज्ञान घालवून त्यांना ज्ञानाच्या समुद्राकडे नेण्याचे काम चार्वाक, बुद्ध, फुले, आंबेडकर यांनी केले. त्यांनी स्पष्टपणे धर्म, ईश्वर या गोष्टी नाकारून इहवाद, बुद्धिवाद, समता हे समाज प्रगतीचे परिवर्तनाचे घटक स्वीकारले आहेत. तरीही उभय घटकांमध्ये झगडा आहे. याचा दुष्परिणाम समाजावर झाला. धर्माची व्रतवैकल्याची, उपास-तापासांची अफू फॅसिस्ट स्वभावाने लोकांना चारून माणूस सुखी होऊ दिला नाही. यातून हुकूमशाहीचे स्वागत झाले. गुलाम डोकी तयार झाली.

याच पद्धतीने मनुस्मृतीला घटना मानून संविधानद्रोही वृत्ती तयार केली. हेही या अफूचेच कार्य आहे. देशात धर्म, जाती, दैव, दैववाद अधिक बळकट करण्यासाठी आणि समाज मनाला संविधानाच्या उलट्या दिशेने नेण्यासाठी राजकारण खर्च झाल्याचे मनोहर म्हणतात. संविधान सोडून येथे परिवर्तनविरोधी गोष्टीसाठी राजकारण चालते. परिवर्तन विरोधकांनी लोकशाहीचे व विज्ञाननिष्ठेचे जे धिंडवडे काढले ते थांबवायचे असतील तर संविधाननिष्ठांनी व विचारवंतांनी आता कंबर कसायला पाहिजे. असे सांगून लेखक समान नागरी कायद्याचा अवलंब करायला सांगतो. हिंसा, जाळपोळ, बलात्कार या गोष्टी येथे मोकाट सुटल्या आहेत. वैयक्तिक कायद्यांनी लोकांमध्ये अलगतेची भावना निर्माण झाली आहे. देशात अनेक प्रश्नांनी मूर्त स्वरूप धारण केले आहे. अक्राळविक्राळ रूप धारण केले आहे. गरिबीचा प्रश्न, धर्मांधता, भ्रष्टाचार, बालमजुरांचे प्रश्न,

नोकरभरतीचे प्रश्न, गुंडगिरी, अल्पसंख्यांक, मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध यांच्यावरील अत्याचाराचे प्रश्न, हिंसा चंगळवाद, शेतकऱ्यांचे प्रश्न, पाच पाच वर्षे सी.एच.बी.वर पाचशे रुपये महिन्याचे काम करून पूर्णवेळ शिक्षकांची नोकरी न देणे, मानसिक छळ करणे, नाना घोटाळे, राष्ट्रीय व सामाजिक चारित्र्य या प्रश्नांच्या मरणमाळेत सामील झालेली जागतिकीकरण उदारीकरण, खासगीकरण ही विषारी फुले! आणि या मरणफुलांची लांबी दिवसेंदिवस लांबतच आहे. वासनाकांड हा एक प्रश्न! या साऱ्या प्रश्नांनी तरुणवर्ग अक्षरशः हैराण झाला आहे. नानाप्रकारच्या स्फोटांनी मनाच्या चिंध्या झाल्या आहेत. सहभावाची राख झालेला देश नव्या पिढीच्या हातात दिला जातो हे प्रश्न समान नागरी कायद्याने सुटू शकतात.

राखीव जागांचा प्रश्न राष्ट्रीय होतो. विचारवंत याला उत्तर देत आहेत. सर्व राष्ट्रीय संपत्तीचे विकेंद्रीकरण करून समान वाटप करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. नंतर आरक्षण बंद करा असा सूर आहे. या विचाराला मूल्यमंथन कारणी असल्याचे सांगता येईल. पण ही मागणी वाढली पाहिजे. शेवटी समाजजीवन आनंदी राहणं हा सूर असला पाहिजे. भांडवलशाहीला तडे गेले पाहिजे. बुद्धिवादातून जीवन स्वीकारणे महत्त्वाचे आहे. समाजाच्या चेहऱ्यावरील तेज करपले आहे. धर्म-जातीने, अंधश्रद्धेचे काटेरी संस्कार मनामनात पेरले आहेत. आपण ही रोगी फळे चघळतो आहोत आणि मानवी जगण्यातून वंचित होत आहोत. हे जीवन बदलण्याचे मार्ग लेखक सुचवितात. या जहरांच्या ढगांचा खेदाडा करता येतो. हे संस्कार दफन करता येतात. यासाठी दुबळ्या मनाचे अंधश्रद्धा हे विश्रामगृह फोडले पाहिजे. भ्रष्टाचारांना फाशी दिली पाहिजे. हजारो लोकांजवळ हजारो कोटी रुपये आहेत. त्याचा तपास केला पाहिजे. असा पैसा जप्त केला पाहिजे. राष्ट्राच्या तिजोरीत जमा केला पाहिजे. सर्व कल्याणकारी ध्येयासाठी राजकारणाचा उपयोग झाला पाहिजे. गाडगेबाबा राजकारण स्वच्छता अभियान वापरले पाहिजे. जाती, धर्म, वर्ण, वर्ग, स्त्रीपुरुषभेद, अंधश्रद्धा यांना मूठमाती दिली पाहिजे. राजकारणात धर्म जात येता कामा नये. आपण अजूनही जागता, जागृत, लोकशाहीनिष्ठ मतदार घडवू शकलो नाही ही खंत लेखकाने मांडली आहे.

बर्ट्रांड रसेल म्हणाला होता की, ''जर जग सुखी झाले तर मी हमी देतो की जगात नावालासुद्धा धर्म उरणार नाही...'' पण फॅसिस्ट स्वभावाला जग सुखी होऊ नये असे वाटते. म्हणून तो धर्माची अफू कायम चारत राहतो. यातून हुकूमशाहीची गुलाम डोकी तयार होतात. देशातील गरीब वाचवायचा

असेल तर राजकारण धर्ममुक्त व भ्रष्टाचारमुक्त झाले पाहिजे. लिंकनच्या पत्रातला छोकरा जपला पाहिजे. गोड मुलांना जपले पाहिजे. त्यांच्यावर चांगले निधर्मी संस्कार झाले पाहिजेत. त्यांच्या सुंदर जीवनासाठी त्याला पुढे नोकरी दिली पाहिजे. कोणीही सुशिक्षित तरुण रिकामा राहता कामा नये. त्याची शक्ती विधायक कामात खर्ची घातली पाहिजे. त्यामुळे गुंडांच्या टोळ्या नाश पावतील. राष्ट्रहीत आणि राष्ट्रसंरक्षण ही आद्य बाब मानली पाहिजे. लिंकनला उत्तर देता आले पाहिजे. अन्यथा एक दिवस आपण सारेच जळून कोळसा होऊ. जुन्या भारताची पाठराखण करणारे जुने धर्म, धर्मग्रंथ, प्रथा-परंपरा, अलगतावाद, मनुस्मृती, तिचे नातेवाईक निकालात निघाले पाहिजेत. चातुर्वर्ण्य, जातीसंस्था, अस्पृश्यता, स्त्री-पुरुष विषमता, आर्थिक विषमता, दैववाद, उपास-तापास हे राहता कामा नयेत. इहवाद व समाजवादाचा स्वीकार झाला पाहिजे. बुद्धिप्रामाण्यवाद, विज्ञानवाद, समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय ही मूल्ये नव्या भारतात अंतर्भुत राहतील. आदिवासी, भटके-विमुक्त, बौद्ध, मुस्लीम, ख्रिश्चनादी अल्पसंख्यांक, स्त्रिया, ओबीसी, यांचे गळे मोकळे झाले पाहिजेत. त्यासाठी आंदोलन पेटले पाहिजे. गरिबीवर, बेकारीवर डॉ. मनोहर मार्ग सुचवतात. देशातील काही लोकांचे हजारो कोटी रुपये स्विस बँकेत आहेत. मनोहर जोशी जवळ दहा हजार कोटींची मालमत्ता असल्याची माहिती म.टा.त वाचल्याचे लेखक सांगतो. देश गरीब नाही. नामानिराळ्या, भ्रष्टाचारांनी, सफाईदारीने गिळलेला आणि स्विस बँकेतील पैसा एकत्र केला तर देशातील गरिबी हद्दपार करता येईल. तसेच डॉ. पंजाबराव देशमुखांची जीवनदृष्टी लक्षात घ्यायला हवी. माणसांच्या दुबळेपणातून आलेली देव ही कल्पना नष्ट झाली पाहिजे. हे एकदा पुन्हा लक्षात आणणे महत्त्वाचे आहे. इहवादी परंपरेशी नाते जोडावे. क्रांतीच्या प्रवासाला निघावे. लेखकाने या ग्रंथात विचारवंत, सर्जनशीलता, बुद्धिवाद, इहवाद, नवभारत, विद्रोह या शब्दांच्या व्याख्या दिल्या आहेत. व्याप्ती विषद केली आहे. संविधान शब्दाची व्याख्या सांगताना राष्ट्राच्या सुसंघटनेचे तत्त्व म्हटले आहे. संविधान नाकारणे हा केवळ संविधानद्रोह नाही. तर राष्ट्रद्रोह असल्याचे मनोहर म्हणतात. भारत शब्दाविषयी लेखकाला अभिमान आहे. 'मेरा भारत महान' असे ट्रक्सच्या मागे लिहिले असते. हा आदर्श हिंदुस्थान म्हणणाऱ्यांनी घ्यावा. असे लेखकाचे म्हणणे आहे. त्या विषयी ते म्हणतात, ''वेद प्रामाण्य हे हिंदुत्वाचे लक्षण टिळकांनी मानले. स्त्रिया शूद्रातिशूद्र, भटके-विमुक्त, आदिवासी या मूळ निवाशांना आर्यांचे वेद वाचण्याची बंदी होती. मग वेद कसे प्रमाण मानायचे? वेद मानणाऱ्यांची संख्या पाच-दहा टक्के होती. म्हणजे नव्वद टक्के बहुजन समाज लोकसंस्कृतीचा उपासक

आहे. मग येथे हिंदू किती राहतात? त्यांचा हिंदुस्थान केवढा होईल? म्हणून देशाला हिंदुस्थान म्हणू नये तर भारत म्हणावे. कोणत्याही धर्माचे नाव देशाला देऊ नये. भारत नाकारणारे, संविधान नाकारणारे, यांनी द्रोहपर्व सुरू केले आहे. त्याला विरोध करायला हवा. 'हिंदुस्थान' हा शब्द अलीकडचा आहे. हिंदू हा शब्द इराणी, फार्शी भाषेत गुलाम या अर्थाचा द्योतक असल्याचे लेखक म्हणतो. येथील पराभूत लोकांसाठी तो वापरला आहे. म्हणून लेखक मूल्यमंथनमधून विचारवंत, साहित्यिक, गरीब आणि सत्याची कास धरणाऱ्यांना, सज्जनपणे जगू पाहणाऱ्यांना आवाहन करतो की हे महासंकट परतून लावण्यासाठी, मानवभक्षक संस्कृती नष्ट करण्यासाठी एकत्र आले पाहिजे. संघर्ष केला पाहिजे. धर्मांधता, दहशतवाद, बॉम्बस्फोट, जागतिकीकरण, खाजगीकरण यांचे विजय म्हणजे आपले समतावाद्यांचे, परिवर्तनवाद्यांचे, विचारवंतांचे सामूहिक मरण होय. हे नाट्य भारतीय रंगभूमीवर कैक पिढ्यांपासून दृश्य स्वरूपात दिसते आहे. दंडक असा आहे. हे महानाट्य डोळे उघडे ठेवून व मन जागे ठेवून बघायचे नाही हे कधीपर्यंत चालणार? त्या अनुषंगाने लेखकाने गंभीर इशारे दिले आहेत. त्यांना समाजवादी असे पर्यायी जग हवे आहे. सर्वांनी कष्ट करावे. सर्वांनी विचार करावा. येथे कोणी मालक नाही, कोणी कामगार नाही. सर्वच कष्टनिष्ठ, शोषणविहीन जग, जात, धर्म, वर्ग, स्त्री-पुरुष असा कोणताही आणि कोणत्याही पातळीवरचा भेद नाही. असे हे समाजवास्तव असलेले जग लेखकाला हवे आहे.

संघर्षपर्व : नाशिक : १४ ऑगस्ट २००६

# २८

# महाप्राध्यापक डॉ. यशवंत मनोहर

## ▪ प्रा. प्रकाश राठोड

मनोहर सर मला माझे खरे गुरू वाटतात. त्यांनी केवळ अभ्यासाला नेमलेली पुस्तकेच शिकविली नाहीत तर त्यासोबतच जीवनही शिकविले. जीवनातील सर्व मर्मस्थळे, दंभस्थळे, थांबलेपण, प्रवाहीपण अशा अनेक गोष्टी त्यांनी शिकविल्या. जीवनाला जे जे आवश्यक असते ते ते सर्वच त्यांनी शिकविले. म्हणून मी मनोहर सरांचा विद्यार्थी होतो याचा मला अपार गौरव वाटतो.

मनोहर सर दिवसातून दोनदा शिकवित असत. तसे तर ते दिवसभर शिकवित. त्यांच्यातील शिक्षकाला स्थळाकाळाच्या मर्यादा कधीही पडल्या नाहीत. कोणी कुठेही आणि केव्हाही भेटला तरी त्यांच्यामधला अध्यापक जागा होई आणि चार-दोन हिताच्या गोष्टी सांगितल्याशिवाय तो स्वस्थ बसत नसे. पण खास औपचारिक पद्धतीने ते दोनदाच शिकवित. एकदा विद्यापीठ परिसराच्या मराठी विभागात आणि दुसऱ्यांदा त्यांच्या राहत्या घरी. सायंकाळ झाली की आम्हा विद्यार्थ्यांची पावले त्यांच्या घराकडे वळत. सायंकाळची वेळ सरांनी विद्यार्थ्यांसाठी आणि समाजातील विविध स्तरातील कार्यकर्त्यांसाठी राखून ठेवलेली होती. ते शक्यतोवर सायंकाळी लेखन करीत नसत. आम्हाला त्यांचे दैनंदिन वेळापत्रक पाठ असल्यामुळे आम्ही न चुकता सायंकाळी त्यांच्याकडे जायचो.

वरपांगी अनौपचारिक वाटणाऱ्या सरांच्या अध्यापनात नेमके काय फायद्याचे होते हे मला शब्दात नीट मांडता येते की नाही कुणास ठाऊक, परंतु एवढे मात्र खरे की सरांचे ते अध्यापन म्हणजे विद्यार्थ्यांचे मेंदू सक्रिय करणारे जातिवंत रसायनच होते आणि हे रसायन ते मातृहृदयाने पाजीत असत. त्यांचे वर्गातले अध्यापन बापाचे अनुशासन होते तर घरच्या अध्यापनात मायेचा जिव्हाळा होता. त्यामुळे मनाचे तगमगणे दोन्हीकडे सारखेच होते. वर्गात जबाबदार बापासारखे आतल्याआत रडत तर घरात गंभीर व्यक्तिमत्त्वाच्या आईच्या डोळ्यात चमकावेत तसे आणि तेवढेच अश्रू चमकत. आमच्या लक्षात येणार नाही या पद्धतीने ते हळूच चष्मा वर करून रुमालाने डोळे पुसून घेत. त्यावेळी फारसे कळले नाही पण आज कळते की हेच दुखरे मन सरांच्या

लेखना-वाचनाच्या, चिंतनाच्या आणि अध्यापनाच्या केंद्रस्थानी आहे. म्हणूनच आज वयाच्या पासष्टीतही ते तासन्‌तास लिहितात. वाचतात. चिंतन करतात आणि आलेल्यांना मार्गदर्शनही करतात.

आजपर्यंत मला अनेकांनी शिकविले. त्यातले काही शिक्षक मला भावलेही परंतु विद्यार्थ्यांच्या दुःखाने दुःखी होणारा डॉ. मनोहरांशिवाय दुसरा शिक्षक निदान माझ्या वाट्याला आला नाही. सरांनी गरिबी अनुभवली तशी इतरांनीही अनुभवली असेल. सरांनी केलेल्या खडतर शैक्षणिक वाटचालीप्रमाणेच इतरांचीही वाटचाल झालेली असेल; परंतु तरीही ही तफावत का जाणवावी? त्याचे खरे कारण आहे गरिबीशी आणि गरिबांशी असलेले नाते. या नात्यांशी प्रतारणा करणारे कठोर बनतात. पण सरांना प्रयत्न करूनही कधी कठोर बनता येणार नाही. भूतकाळाने मांडलेला छळवाद ते विसरूच शकत नाही. नव्हे 'सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय' हेच त्यांच्या एकूणच लेखनाचे अंतिम उद्दिष्ट होय. म्हणूनच त्यांची लेखणी आणि वाणी 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंगा'प्रमाणे निर्वाण मांडत असते. या निर्वाणीत विध्वंस नाही तर माणुसकीची सुंदर प्रस्थापना आहे. माणूस नावाच्या सर्वश्रेष्ठ मूल्याच्या विजयासाठीच सरांचा विद्रोह असल्यामुळे त्यांच्या लेखणीत करुणा व विद्रोहाची सुंदर मैफल रंगलेली दिसते.

सर आम्हा विद्यार्थ्यांकडे मोठ्या आशेने पाहतात. आम्ही त्यांना कुठेतरी या निर्वाणीच्या युद्धातले विश्वासू सैनिक वाटत असलो पाहिजे. म्हणूनच ते आमच्याशी बोलताना घड्याळाकडे पाहात नाहीत. माणसाच्या सामर्थ्यावर त्यांचा विश्वास आहे. माणूस हाच त्यांना मुळात शक्यतांचा पुंजका वाटतो. म्हणूनच ते माणसासाठी नवनिर्माणाचा राग गातात. कोणत्याही माणसाचा आपल्या हातून अवमान होऊ नये याची ते जिवापाड काळजी घेतात. त्यांनी कधीही माणसाला टाळले नाही. एरव्ही जीवनात बरेवाईट अनुभव आले की माणसे माणसालाच टाळतात. असे अनुभव सरांच्याही वाट्याला आले. त्यांनीच एका कवितेत म्हटले आहे -

''आयुष्याने कधी लुटले, कधी लुटून दिले;
आयुष्याने कधी हात दिला, कधी हात कलम केले;
आयुष्याने कधी मरण चारले, कधी सरण पाजले;
आयुष्याने कधी चांदण्याने गोंजारले, कधी जाळले.''

(जीवनायन, पृ. २६)

असे संमिश्र जगणे सर जगले. त्यांचे आयुष्य कधी 'कडाडता नकार'

झाले असले किंवा कधी 'स्वागताचे महाद्वार' झाले असले तरी या संपूर्ण उपेक्षेच्या आणि उत्कर्षाच्या काळात त्यांच्या ठायी माणसांप्रती नांदणारा जिव्हाळा मात्र अबाधित होता. आयुष्य 'दहनभूमी' झालेले असो किंवा आयुष्य 'सर्जनभूमी' झालेले असो, आयुष्याचा जाळण्यापोळण्याशी संबंध नसणाऱ्या निरपराध जिवांना ते करुणाच वाटत राहिले.

मला विलक्षण भावली ती सरांच्या अंगी असलेली करुणा. त्या करुणेचे नाते बुद्धाच्या करुणेशी होते. केशवसुतांच्या 'नव्या शिपायाशी' घरोबा सांगणारी ती करुणा होती. म्हणूनच त्यांनी कधीही कोणाचीही जातपात पाहिली नाही. व्यवस्थेच्या जात्यात जे जे भरडले गेले त्या सर्वांनाच त्यांनी उराशी कवटाळले.

सरांच्या अंगी असलेली करुणा, नम्रता, सोज्वळता आणि त्यांचा व्यासंग यांकडे आकर्षित होऊन महाराष्ट्रातील खेड्या-पाड्यातून अनेक गोरगरीब विद्यार्थी केवळ सरांच्या नावाने नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागात शिकायला येत. या विद्यार्थ्यांची नवनिर्माणाची कार्यशाळा म्हणजे सरांचे घर. घरी दररोज सायंकाळी गुरू-शिष्यांची मैफल रंगे. ही मैफल म्हणजे आमच्यासाठी बौद्धिक मेजवानीच असायची. बऱ्याचदा ती आमची अग्निपरीक्षाही असे. सर विद्यार्थ्यांचे मेंदू तपासत. अवतीभवतीच्या समाजवास्तवातील किंवा वर्तमानपत्रातील एखाद्या ताज्या घटनेचा उल्लेख करून त्याकडे विद्यार्थी कोणत्या दृष्टिकोनातून पाहतात हेही ते तपासत आणि मग स्वतःचे चिंतन मांडत. ते ऐकून आम्ही थक्क व्हायचो. आपल्यापैकी कोणालाही असे का सुचले नसावे असा प्रश्न आम्हाला पडे. सर बोलत असताना गाफील राहून चालत नसे. कधीकधी ते मुद्दामहून विसरल्यासारखे करून आमची स्मरणशक्ती तपासत. हे लक्षात आल्यापासून आम्ही कागद आणि पेन घेऊनच सरांसमोर बसायचो. कारण केव्हा कोणावर कोणती पाळी येईल याचा नेमच नसे. प्रत्येकवेळी नोटस् सोबत नेणे शक्य नसे म्हणून घरी आल्याबरोबर काढलेल्या नोटस्चा अभ्यास करावा लागे. त्यांची ही सर्व धडपड होती विद्यार्थ्यांना चिकित्सक बनविण्यासाठी.

हे विद्यार्थी आयुष्यात निरर्थक ठरू नयेत यासाठी सर त्यांना निष्ठेने जपत. विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती जाणून घेणे, त्यांच्या कौटुंबिक परिस्थितीची आस्थेने चौकशी करणे, त्यांचे मेंदू सक्रिय होतील अशी पुस्तके त्यांना वाचायला देणे, विभागात विविध उपक्रम राबविणे ही सर्व विद्यार्थीहिताय कामे सर मनापासून करीत आणि त्यातूनच विद्यार्थी चिकित्सक बनत. त्यांची एका वेगळ्याच अंगाने बौद्धिक जडणघडण होई. 'मूर्तिभंजन' करण्याचे मानसिक बळ त्यांना मिळे. सरांचे आणखी एक वैशिष्ट्य असे की सर कधीही आपले

विचार विद्यार्थ्यांवर लादत नसत. त्यांच्या वक्तृत्वातील कसदारपणा, त्यांची आदर्श समाजाची संकल्पना, त्यांची तळमळ, त्यांची वाङ्मयीन उंची, त्यांच्या वाचना-लेखनाची बैठक या सर्व गोष्टींमुळे विद्यार्थी आपोआपच प्रभावित होत आणि ते सरांच्या विचाराचे बनत. सरांमुळेच आम्हाला बुद्धिवाद कळला. या बुद्धिवादाने आम्ही इतके प्रभावित झालो की मी स्वतः आणि डॉ. प्रभंजन चव्हाण आम्ही दोघांनीही आमची लग्ने इहवादी तथा बुद्धिवादी पद्धतीने केली. आमच्या लग्नाच्या संदर्भात डॉ. पुष्पलता मनोहर म्हणतात, ''बंजारा समाजातील मुलांमध्ये परिवर्तन जे घडले ते मला येथे आवर्जून सांगावेसे वाटते. प्रकाश राठोड, प्रभंजन चव्हाण हे दोघेही प्राध्यापक आहेत. सरांच्या वैचारिक विचारसरणीचा प्रभाव या मुलांवर असल्यामुळे त्यांनी आपली लग्ने पारंपरिक पद्धतीने न लावता, कुठलाही बडेजाव न करता, हुंडा न घेता साध्या पद्धतीने केली.'' (डॉ. यशवंत मनोहर एक प्रज्ञाशील प्रतिभा, संपा. डॉ. अरुणा देशमुख आणि इतर, पृ. २३२) ही सर्व सरांच्या सहवासाची व विचाराची किमया होती. सरांचा सहवास लाभला नसता तर कुठलीही परिवर्तनवादी, बुद्धिवादी तथा इहवादी विचारधारा आम्हाला कळली नसती. बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर, पेरियार रामस्वामी आणि मानवेंद्रनाथ रॉयसारखे परिवर्तनवादी महापुरुषही आम्हाला कळले नसते. आम्हाला दीक्षाभूमी कळली नसती. तीर्थक्षेत्रे कळली असती आणि आमच्या तांड्याला आम्ही तीर्थक्षेत्रांचे महात्म्य पटवून दिले असते. तांड्यातील नवीन पिढीला आहे त्यापेक्षाही खोल गर्तेत ढकलण्यात आमच्यासारख्या शिकलेल्या पोरांचा हातभार लागला असता. सरांमुळेच हे अरिष्ट टळले. आणि म्हणून आम्हाला बुद्धिवादाचा उजेड देणाऱ्या डॉ. यशवंत मनोहर नावाच्या महान प्रतिभावंताला पासष्टीपूर्तीनिमित्त आम्हा तमाम विद्यार्थ्यांकडून हार्दिक शुभेच्छा !

# २९

# यशवंत मनोहर:आंबेडकरी साहित्याचा महामेरू

■ डॉ.भूषण रामटेके

''देवाच्या गळ्याचा। घेईन मी घोट
चितारीन पाठ। खेटराने॥'' (उत्थानगुंफा, 'नागड्यांनी साऱ्या', पृ. ५०)

किंवा

''मी आंबेडकरांच्या ओठावर उगवलेला प्रलयंकारी सूर्य आहे.''
(उत्थानगुंफा, 'मला पाहून आता', पृ. ७५)

असे उद्‌गार डॉ. यशवंत मनोहर सर यांच्या तोंडीच शोभतात. आंबेडकरवादी साहित्याचे खंदे पुरस्कर्ते, जीवनदायी साहित्याशी बांधिलकी मानणारे व आंबेडकरी साहित्याचे स्वतंत्र सौंदर्यशास्त्र मांडणारे; बुद्ध, चार्वाक, मार्क्स, कबीर, फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रेरणास्थान मानून साहित्यलेखन करणारे साहित्यिक अशी ओळख सरांची आहे.

दलित साहित्याला 'आंबेडकरवादी साहित्य' ही पर्यायी संज्ञा मूल्यसंदर्भासहीत त्यांनी मांडली. दलित आत्मकथनांना स्वकथन अशी संज्ञा प्रथम सरांनी मांडली.

त्यांच्या 'उत्थानगुंफा', 'डॉ. आंबेडकर : एक चिंतनकाव्य', 'मूर्तिभंजन', 'जीवनायन' या कवितासंग्रहाकडे दृष्टी टाकली म्हणजे किंवा 'दलित साहित्यःसिद्धान्त आणि स्वरूप' या ग्रंथापासून ते आंबेडकरवादी मराठी साहित्याच्या प्रवासापर्यंतची त्यांची मजल पाहिली म्हणजे त्यांच्या असीम कर्तृत्वाची साक्ष पटते. 'जीवनायन'ला पद्मश्री विखे पाटील पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल अभिप्रायार्थ ''या संग्रहातील मनोहर यांच्या कविता या गेल्या दशकातील अत्यंत लक्षणीय व समर्थ कविता असून मराठी कवितांचा आशयगाभा किती संपन्न, ऊर्जस्वल व तेजस्वी आहे, याची साक्ष देणाऱ्या आहेत.'' असे गौरवोद्‌गार डॉ. रावसाहेब कसबे यांच्या अध्यक्षीय समितीने काढलेले आहेत.

डॉ. यशवंत मनोहर सरांना आम्ही ऑल इंडिया रिपब्लिकन स्टुडंट फेडरेशन, आरमोरी यांच्या द्वारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीप्रीत्यर्थ व प्रबुद्ध वाचनालयाच्या उद्‌घाटनासाठी बोलाविले होते. दिवंगत अनिल शेंडे, अरुण

गोवर्धन, सुरेश ठवरे, हेमंत शेंडे, गौतम सुखदेवे, सुधाकर सोनपिंपळे व भास्कर रामटेके इत्यादी आम्ही मित्र त्यामागे होतो. आमच्या घरी भाजीपाल्याचे दुकान व साऊंड सर्व्हिस डेकोरेशन होते, जे माझा चुलत भाऊ भास्कर रामटेके चालवीत असे. सरांना पहिल्यांदा विचारमंचावर (डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ बुद्धविहार येथे) भाषण देताना पाहिले. आम्ही भारावून गेलो. इतके अमोघ, बांधीव आणि विचारशील भाषण कधी ऐकले नव्हते. 'समुचित'मधून तशी सरांची ओळख झाली होती. सरांचे व्यक्तिमत्त्व आणि भाषणाची शैली मनात भरली.

बी.ए.ला शिकत असताना दै. जनवादच्या रविवारीय 'मोहोर' पुरवणीमधून कुलदीप शेंडे आणि अनिल नितनवरे यांनी घेतलेली मुलाखत वाचली आणि सरांबद्दलचा आदर द्विगुणीत झाला. आजही ती पुरवणी जपून ठेवली आहे. बी.ए. झाल्यानंतर एम.ए. मराठीतच नागपूरला करावे (१९९२ मध्ये) व मनोहर सरांचे मार्गदर्शन मिळवून त्यांच्या सान्निध्यात राहावे हाच प्रामाणिक हेतू त्यामागे होता. एम.ए. ला प्रवेश घेतल्यानंतर मनोहर सरांच्या सान्निध्यात आलो. सरांसोबत सभा-संमेलनांना हजर राहू लागलो. सरांच्या तासाला बसणे म्हणजे एक पर्वणी असायची. त्यांच्या शिकविण्याची शैली आजही आम्हाला शिकवताना अनुकरणीय वाटते. सरांची कोट्या करीत बोलण्याची शैली आवडणारी आहे. सरांचे व्यक्तिमत्त्व आकर्षक, भरदार व प्रभावी आहे. त्यांचे वक्तृत्व ऐकतच राहावे असे वाटते.

एम.फिल्.ला 'वामन निंबाळकरांची कविताःएक चिकित्सक अभ्यास' हा चौथ्या पत्रिकेकरिता घेतला. तेव्हा दलित साहित्याच्या अनुषंगाने त्यांच्याशी झालेली चर्चा व मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. सरांची विविध ठिकाणी झालेली भाषणे वाचली म्हणजे आजही त्यांच्या कित्येक अप्रकट पैलूंचेही दर्शन घडते. सरांचे काव्यवाचन, त्यातल्या त्यात 'जपून रे माझ्या फिनिक्स पक्ष्यांनो...' ही कविता ऐकली आणि आजच्या काळातील चळवळींची झालेली पडझड पाहून तितकीच प्रेरक वाटली. ''उत्थानगुंफा'तील आक्रमक गद्यात्म मुक्तशैलीऐवजी येथे आढळणाऱ्या छंदात्मक, छांदस, अभिव्यक्तीमुळे खिन्नतेचे, दुःखाचे, अपेक्षाभंगाचे, क्रोधाचे, प्रक्षोभाचे विविध स्वर कवेत घेऊन त्यावर तरळत राहणारा एक आश्वासक गंभीर स्वर निनादत असल्याचा प्रत्यय येतो.'' असे 'जीवनायन'बद्दल काढलेले गौरवोद्गार सार्थ वाटतात. 'जीवनायन'मधील कविता अधिक संयत, उपरोधिक आणि जवळच्या वाटतात. माणसांना जोडणाऱ्या वाटतात. त्यांच्याच शब्दांत-

"तिमिरकुलाशी भाडावा दीप तसा शूर माणूस हवा,
मानव मी मानव म्हणणारा सर्वप्रकाशक सूर्य हवा"

('जीवनायन', 'इतका माणूस खुळा हवा', पृ. ८७)

अशी म्हणणारी आहे. म्हणून "मनोहरांनी फारशी न चोखाळलेली वाट या कवितांची आहे. त्यांनी तिकडे वळणे त्यांच्या कवितेचा लौकिक वाढविणारे तर होईलच पण ते दलित कवितेची रूद्धगतिकता संपवून तिचे विस्तारणारे होईल. मनोहर हे करतील काय?" अशी शंका प्रा. बाळकृष्ण कवठेकरांनी व्यक्त केली होती. ती 'जीवनायन'ने संपुष्टात आणली आणि सरांची कविता एका वळणावर येऊन पुढे पाहते आहे. आज यशवंत मनोहर आंबेडकरी साहित्याचे महामेरू ठरले आहेत. यात शंका नाही.

सरांची आज षष्ठ्द्वीपूर्ती आहे. त्यांचे काव्यलेखन व समीक्षालेखन सुरू आहेच. त्यांनी ते तसेच सुरू ठेवावे अशी अपेक्षा ठेवून त्यांच्या षष्ठ्द्वीपूर्ती निमित्ताने अभीष्टचिंतन. त्यांना दीर्घायुष्य लाभो व मराठी साहित्याची सेवा त्यांच्या हातून घडो, हीच अपेक्षा.

..................................

(सकाळ, नागपूर,२६ मार्च, २००३)

## सम्यक क्रांतीचे भाष्यकार डॉ.यशवंत मनोहर

यशवंत मनोहरांनी 'विद्रोह' हे मूल्य आंबेडकरवादी कवितेत रुजविले.

यशवंत मनोहरांची कविता विचारकवितेच्या भक्कम पायावर उभी आहे. त्यांच्या प्रत्येक कवितेतून डॉ. आंबेडकरांनी दिलेले आत्मभान दिसून येते.

प्रा. बाळकृष्ण कवठेकरांनी यशवंत मनोहरांच्या कवितेचा गौरव विचारकविता म्हणून केला आहे.

"येथून पुढे मी सूर्यकुलाची लागवड करणार आहे
आणि तुमच्या निंदलेल्या ओठातून
ज्वालांचे जळते पीक घेणार आहे.
पीक नासवणारे मधले मधले मेंढ
प्रथम काढून टाकणार आहे
शेकडो वर्षांची पडीत जमीन ही
आता कुठे तिच्या नजरेत स्वप्ने रांगू लागली आहेत

इथेच मी तुमच्या महाकाव्याची बागाईत करणार आहे
आणि उद्याच्या क्रांतीला खतपाणी घालणाऱ्या
युगंधर विवेकाचे खतपाणी देणार आहे
राखण करील या पिकांची माझी कविता
या चोरांपासून, हरामखोरांपासून
रोग जाऊ देणार नाही फुलोरावर
आणि दगड हाणून वाचवीन पाखरांपासून.''

यशवंत मनोहरांच्या या कवितेतून उद्याची सम्यक क्रांती घडवून आणण्याची भाषा आहे. त्याबरोबरच सूर्यकुलांची लागवड करण्याची उर्मी आहे. ती विचारकविता आहे.

यशवंत मनोहरांची काव्यशैली आशय अंगात मुरवून, त्यांचे काव्य निव्वळ वेष्टण किंवा आवरण बनून येत नाही किंवा ती नियमोल्लंघनाच्या आहारी जात नाही. ती विचारप्रवृत्त करण्यास भाग पाडणारी आहे. 'उत्थानगुंफा' या पहिल्या कवितासंग्रहापासूनच त्यांची शैली आक्रमक आहे. तिला विचारप्रवर्तक शैली म्हणता येईल. ती सर्वस्वी नामदेव ढसाळ, वामन निंबाळकर, दया पवार, ज.वि. पवार, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जुन डांगळे, त्र्यंबक सपकाळे यांच्या काव्यशैलीहून पृथगात्मक आहे.

''मी बोलतो हृदयाची भाषा
नसेल जरी मोल या कावळ्यांच्या गावात सरळपणाला
तरी मी असतो सरळ
आत असते तुझ्या रक्ताच्या नात्याचे बळ.''

वामन निंबाळकर किंवा दया पवार यांच्या कवितेतील प्रतिमा आणि आशयविश्व स्वानुभवातून अवतरते. यशवंत मनोहरांचा भर तत्त्वज्ञान व वैचारिकतेवर आधारित आहे. मनोहरांची कविता विधानेची विधाने करीत जाते. त्यांच्याजवळ वक्तृत्वाचे अफाट बळ आहे. त्यांच्या कवितेचा आवाका फार मोठा आहे. मनोहरांच्या कवितेला कवितापण प्राप्त करून देणारी, आणखी महत्त्वाची कारणे म्हणून त्यांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे निर्मितीचे प्रचंड सामर्थ्य.

मनोहरांच्या कवितेतून एक दुःखव्याकूळ, अस्वस्थ, अशांत, विद्रोही, युद्धसज्ज आणि आशावादी व्यक्तिमत्त्व प्रकट होते. या सर्व अवस्थांचे मनोहरांच्या कवितेतून होणारे दर्शन झपाटून टाकणारे आहे, असे प्रा. बाळकृष्ण कवठेकरांनी नमूद केले आहे. एकंदरीत यशवंत मनोहरांची काव्यशैली आशयानुगामी आहे, तत्त्वज्ञानावर

जास्त भर देणारी आहे.

यशवंत मनोहरांच्या कवितेने मराठी कवितेत 'विद्रोहा'चे एक नवे दालन निर्माण केले. आजवर मराठी कविता पानां-फुलांत, निसर्गात रमत होती. परंतु तिने कधी दलित जीवनाला विषयवस्तू केले नव्हते, ते आंबेडकरवादी कवितेतून प्रथम अवतरले. तत्त्वज्ञानात्मक आणि वैचारिकतेतून आंबेडकरवादी कविता शब्दबद्ध होते.

''ते ग्रीष्म माझे वैरी आहेत
ज्यांनी इथे प्रामाणिकपणा रुजू दिला नाही
ते आहेत आपमतलबी बगलबच्चे
ज्यांनी सत्याचा जन्म उजेडात येऊ दिला नाही
सैतान असली ते आहेत
ज्यांच्या शोषक कल्पनांनी भीषण गावकूस घडवले
कपटी चांडाळ ते आहेत
ज्यांनी माणूसपण इथे शब्दातच सडवले
ज्या नियमांनी सृष्टीचा हा विद्रुप विकास सिद्ध झाला
त्यांचा मी जळजळीत निषेध करतो.''

इतका प्रखर विद्रोह पारंपरिक मराठी कवितेत शोधूनही सापडणार नाही. यशवंत मनोहरांच्या कवितेच्या रूपाने प्रथम मराठी कवितेत विद्रोहाचे दालन निर्माण केले.

आंबेडकरवादी कवितेने प्रथमच येथील दलित शोषितांच्या वेदनांना एक विचारमंच मिळवून दिला आणि यशवंत मनोहरांच्या कवितेने 'विद्रोह' हे मूल्य आंबेडकरवादी कवितेत रुजविले.

संदर्भ : सप्तरंग दै. सकाळ नागपूर, दि. २३ मार्च २००६

# युगसाक्षी साहित्यिक:डॉ.यशवंत मनोहर सर

## ▪ अक्रम खान हबीबखान पठाण

डॉ. यशवंत मनोहर हे एका विलक्षण प्रतिभेचे नाव आहे. मराठी साहित्यजगात सरांचे योगदान डोंगराएवढे प्रचंड आहे. विदर्भाच्याच साहित्यक्षेत्रात, शैक्षणिकक्षेत्रात सरांचे प्रसन्न व्यक्तिमत्त्व आपल्या प्रगल्भ वक्तृत्वशैलीच्या, विचारशैलीच्या सुगंधामुळे मान्य आहे असे नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात नावारूपाला आलेले आहे. लोकसेवा नगर, येथील 'लुम्बिनी' हा बंगला म्हणजे विदर्भातला एक सांस्कृतिक केंद्र बनलेला आहे. या परिसरात येणारा कोणताही साहित्यिक त्यांची भेट घेतल्याशिवाय राहत नाही. चळवळीतील कोणताही कार्यक्रम त्यांच्या उपस्थितीशिवाय होत नाही. १९९२ ला बाबरी मशिद पाडल्यानंतर नागपुरातही त्याचे पडसाद उमटले. त्याचा विरोध करण्यासाठी नागपुरातील बुद्धिजीवी वर्गाने मोर्चा काढला होता. त्याचे नेतृत्व डॉ. मनोहर सरांनी केले होते. त्याचप्रमाणे प्रा. लक्ष्मण माने यांनी भटक्या विमुक्त जातींच्या धर्मांतराचा कार्यक्रम घेतला. त्यात सरांनी निरपेक्षपणे वृत्तीने भाग घेतला. यावरून त्यांचे धर्मनिरपेक्षतेचे जीवन वलयांकित होते.

डॉ. मनोहरांचे व्यक्तिमत्त्व सुसंस्कृत, संयमी व गंभीर प्रवृत्तीचे असले तरी त्यांचा स्वभाव हा सौम्य स्वरूपाचा असल्याने त्यांच्या परिघात विलक्षण लोकसंग्रह आहे. एक उत्कृष्ट वक्ता, एक कुशल प्राध्यापक, एक कुशल संघटक, एक विचारवंत, एक साहित्यिक, एक सौंदर्यशास्त्राचा मीमांसक म्हणून सरांचा परिचय उभ्या महाराष्ट्राला आहे. कोणत्याही विषयाची मांडणी आपल्या साध्या व आकर्षकशैलीने करून श्रोत्यांची मने जिंकून घेण्याची त्यांच्यात विलक्षण अशी हातोटी आहे. विचलित न होता शांत डोक्याने विचार करून निर्णायक भूमिका घेण्याची जबरदस्त क्षमता त्यांच्यात आहे. म्हणूनच परिस्थितीशी सतत संघर्ष करीत आलेले डॉ. मनोहर सर शांत आणि हसतमुख दिसतात.

आपल्या लेखणीद्वारे समाजप्रबोधनाचे आणि जनमानसाला नवीन दृष्टी देण्याचे त्यांचे कार्य अविरत सुरू आहे. त्यांनी आपल्या साहित्यातून समाजाचा नेमका वेध घेऊन आपला अभिप्राय नोंदविलेला आहे. हा त्यांच्या प्रगल्भतेचा द्योतक आहे. आपल्या जडवादी भूमिकेत व आचारशैलीत त्यांनी कधीही अंतर्विरोध

येऊ दिला नाही. आपल्या भूमिकेत कधीही तडजोड केली नाही. अपवादानेच दिसावी अशी प्रखर आंबेडकरवादी जीवनशैली त्यांनी निष्ठापूर्वक पत्करली आहे.

गेल्या चाळीस वर्षांत डॉ. मनोहरांनी कविता, समीक्षा, कादंबरी, वैचारिक निबंध आणि प्रवासवर्णन अशा विविध साहित्य प्रकारांवर आपल्या सर्वस्पर्शी प्रतिभेचा ठसा उमटवलेला आहे. मराठी साहित्यातील काही अग्रमान्य लेखकांमध्ये डॉ. मनोहर सरांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. सामाजिक बांधिलकीच्या सर्व शोकांतिका डोळ्यात साठवून त्यांनी आपल्या साहित्याचा प्रवास सुरू केला.

सरांचे उत्थानगुंफा, मूर्तिभंजन, जीवनायन, काव्यभीमायन, अग्नीचा आदिबंध, स्वप्नसंहिता इ. कवितासंग्रह प्रकाशित आहेत. त्यांनी आपल्या कवितेचा कुळारंभ आदीविद्रोही कवी केशवसुतांपासून मानला आहे. रमाईच्या रूपाने कारुण्याचे शिल्प घडविणारी एक कादंबरी लिहिलेली आहे. पत्रप्राजक्ताच्या रूपाने विचारसुंदर आणि लालित्यसंपन्न पत्राचा नजराणा वाचकांना दिलेला आहे. मृत्यू हा अथांग पूर्णविराम पण अनेक आयुष्यांच्या शेवटी मृत्यूला पूर्णविराम होताच येत नाही. याचा प्रत्यय देणारे 'सातवा ऋतू अश्रूंचा' हे पुस्तक म्हणजे सरांनी महान लोकांवरील लिहिलेले मृत्यूलेख आहेत. मृत्यूलेख कसा लिहावा याचा नमुनाच या पुस्तकातून त्यांनी प्रकट केलेला आहे.

समीक्षेच्या क्षेत्रात रॅशनल ॲस्थेटिक्सची मांडणी करणारा प्रचंड कुवतीचा समीक्षक म्हणून त्यांची ख्याती आहे. समीक्षेच्या क्षेत्रात त्यांनी तर्कनिष्ठ विचाराने लेखन करून समीक्षेला समृद्ध केलेले आहे. सरांनी समीक्षेचा प्रारंभ १९७८ मध्ये 'दलित साहित्य : सिद्धान्त आणि स्वरूप' या पुस्तकाने केला. त्यानंतर त्यांचा समीक्षालेखनाचा प्रवास हा विविध समीक्षाग्रंथ रूपाने झालेला आहे. स्वाद आणि चिकित्सा, निबंधकार डॉ.आंबेडकर, दलित साहित्य चिंतन, आंबेडकरवादी आस्वादक समीक्षा, समाज आणि साहित्यसमीक्षा, मराठी कविता आणि आधुनिकता, आंबेडकरवादी मराठी साहित्य, आंबेडकरी चळवळ आणि साहित्य, परिवर्तनवादी जीवनमूल्ये आणि वाङ्मयीन मूल्ये, साहित्यसंस्कृतीच्या प्रकाशवाटा, युगसाक्षी साहित्य, विचारसंघर्ष असे विपुल वैचारिक व समीक्षात्मक लेखन सरांनी केलेले आहे. सरांनी समीक्षेच्या क्षेत्रातील उपयोजित समीक्षा आणि सैद्धान्तिक समीक्षा यावर भर दिलेला आहे. या दोन्ही समीक्षा प्रकारात त्यांचे विचार हे तर्कनिष्ठ व बुद्धिनिष्ठ स्वरूपाचे आहेत. त्यामुळे मराठी समीक्षेला एक नवे वळण मिळाले. सरांनी आपल्या समीक्षेतून बुद्धिवादी सौंदर्यशास्त्राची

मांडणी केलेली आहे. त्यांच्या बुद्धिवादी सौंदर्यशास्त्रामुळेच मराठी समीक्षेने एक वेगळी उंची गाठलेली आहे. डॉ. यशवंत मनोहर हे समीक्षा विद्यापीठाचे कुलगुरू आहेत असे वाटते. त्यांचा अस्तित्ववाद समजण्यासाठी आकलन व समजूतदारपणा हवा. त्यांचे विपुल वैचारिक साहित्य हे मराठी साहित्याला एक मौलिक ठरावे असे आहे. त्यांचे वैचारिक निबंध हे विविधतेने नटलेले आहेत. समकालीन मराठी साहित्यात त्यांचा वैचारिक निबंध हा अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यांच्या विचारनिबंधातून एका कसलेल्या प्रतिभेचा प्रत्यय येतो. त्यांच्या सृजनात्मक विचारदृष्टीने त्यांचे वैचारिक निबंध अत्यंत आकर्षक, वाचनीय व मननीय स्वरूपाचे आहेत. त्यांच्या विचारनिबंधाने आंबेडकरी विचारविश्व समृद्ध केले असे नव्हे तर एकूणच महाराष्ट्रातील प्रबोधनाची, परिवर्तनाची विचारधाराच समृद्ध केलेली आहे. त्यांचे साहित्य हे पारंपरिक चौकटींना उद्ध्वस्त करणारे. त्यामुळे त्यांचे साहित्य हे समृद्ध आणि जीवनांच्या विविध स्तरांना स्पर्श करणारे आहे. त्यांच्या साहित्याचे प्रयोजन हे मानवमुक्तीचे आहे. माणसाला केंद्र मानणारे त्यांचे साहित्य आहे.

आंबेडकरवाद ही सर्व उजेडाची बेरीज आहे. ती एक उच्चतम संस्कृती आहे. आंबेडकरवाद ही उजेडाची हाक आहे. छोट्याशा हृदयाने देहाला शुद्ध रक्ताची रसद पुरविणे म्हटले तर ओझे आहे आणि म्हटले तर उजेडाची कावड आहे. आपल्या मनाला समतोल देणारा एकच दोस्त आहे, तो म्हणजे आंबेडकरवाद अशी सरांची धारणा आहे. जडवादी जीवनजाणीव त्यांच्या वाङ्मयातून प्रभावीपणे व्यक्त झालेली आहे. त्यांनी आपल्या साहित्यातून जीवनमूल्यांची आणि सौंदर्यमूल्यांची मांडणी केलेली आहे.

सर एक विचारकवी म्हणून परिचित आहेत. त्यांच्या काव्यातून विद्रोही विचारांचे सौंदर्य पाहावयास मिळते. त्यांच्या कवितेतील आशय हा शोषित, पीडित, स्त्री, शूद्र, अतिशूद्र, भटके, विमुक्त, आदिवासी, कामगार आणि अल्पसंख्यांक यांच्यावर प्रस्थापितांनी केलेला अन्याय यावरचा प्रखर निषेध नोंदविणारा आहे. त्यातील उत्कटता, प्रखरता, नकार निषेध हा उत्कटपणे अभिव्यक्त झालेला आहे. त्यांच्या काव्यातील आशय हा वास्तवदर्शी असून त्यातून समाजाचे सूक्ष्मनिरीक्षण केल्याचा प्रत्यय येतो. त्यांच्या काव्यातून विद्रोहाचा सूर्य उगवताना दिसतो. 'कालचा पाऊस' गावात न आल्याने ते विचलित होत नाहीत तर उज्ज्वल भविष्याच्या सूर्यकुलाची लागवड करण्यासाठी त्यांची कविता धडपड करणारी आहे. त्यांची कविता ही सौंदर्याच्या शिल्पकारांना सावधतेचा इशारा देणारी आहे. त्यांची कविता ही प्रस्थापितांच्या ओठातून ज्वालांचे पीक घेण्याचे सामर्थ्य ठेवणारी आहे.

डॉ. मनोहर सरांच्या साहित्यातून जडवादी तत्त्वज्ञानांची रेखीव मांडणी दिसून येते. त्यांच्या साहित्यातून साहित्य हे कुणाचे बटीक नाही हे सिद्ध होते. त्यांनी आपल्या साहित्यातून शोषित समाजाचे रुदन व्यक्त केलेले आहे. विद्रोहाबरोबर चिंतनशीलतेचा आग्रह त्यांच्या साहित्यातून प्रामुख्याने दिसून येतो. त्यांचे साहित्य हे विध्वंस करू पाहणारे नाही तर संवेदनशील नवनिर्मितीची आस बाळगणारे आहे. सरांच्या साहित्यातून समृद्ध जीवनजाणिवा प्रकट झालेल्या आहेत. त्यांच्या साहित्यातून विचार आणि चिंतन यांचा समन्वय असला तरी एक नवे क्रांतीविज्ञान त्यातून प्रकट होते.

फुले-आंबेडकरी साहित्याचा प्रवास एका निर्णायक दिशेने गतिमान करण्यात डॉ. मनोहर सरांचा सिंहाचा वाटा आहे. मानवाच्या माणुसकीच्या संवर्धनासाठी व परिवर्तनासाठी त्यांनी आपली लेखणी झिजवली आहे. सरांच्या साहित्याने फुले-आंबेडकरी साहित्यक्षेत्रात मूलगामी पातळीवरून आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. त्यांनी आपल्या साहित्यातून मानवमुक्तीच्या उदात्त जीवनमूल्यांचे प्रकटीकरण केलेले आहे. साहित्य हे समाजाचे जीवनभाष्य समजले जाते. सरांच्या साहित्यातून समाजावरचे भाष्य दिसते. त्यांच्या साहित्याचा केंद्र हा अखिल मानव आहे. आंबेडकरांच्या आणि जगातील सर्वच जडवादी तत्त्वज्ञानांच्या ज्ञानप्रकाशात त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमाने वाट शोधलेली आहे. त्यांचे साहित्य ध्येयवादी व क्रांतिवादी स्वरूपाचे आहे. त्यांनी आपल्या साहित्यातून वेदना, व्यथा टिपून वर्तमानकाळातील त्याचे बदलते स्वरूप आणि त्यावरील उपाय याचे दर्शन घडविलेले आहे. ते क्रांतीच्या जडवादी तत्त्वज्ञानाशी एकनिष्ठ आहेत. त्यांच्या साहित्यातून स्वच्छ क्रांतिवादी जीवनदृष्टी, जीवनमूल्ये या गोष्टी झळाळताना दिसतात. अखिल मानवाच्या जीवनातील उजेडासाठी ते सातत्याने परिवर्तनाचे सारथी झाले आहेत. डॉ. मनोहर सरांचा स्वच्छ कणखर आणि बुलंद आवाज ही त्यांची आगळीवेगळी श्रीमंती आहे. त्यांच्या मुखातून निघणारा शब्द लाव्हा रसाप्रमाणे व श्रोत्यांना विचारप्रवण करणारा असतो. तो शब्द श्रोत्यांवर राज्य करणारा असतो. डॉ. मनोहर सरांच्या चिंतनाला प्रतिभेची जोड आहे. त्यामुळेच त्यांच्या साहित्यातून विद्रोहाचे उत्कट प्रकटीकरण दिसून येते. कलेतून जीवनाचे प्रचंड स्वरूप व्यक्त करून कलेद्वारे जीवनाचे अर्थात जीवनकलहाचे विश्वदर्शन त्यांच्या साहित्यातून प्रकट होते.

डॉ. यशवंत मनोहर गेल्या चाळीस वर्षांपासून साहित्यनिर्मिती करीत आहेत. आज त्यांच्या नावावर जवळजवळ सत्तर पुस्तके आहेत. या पुस्तकांच्या माध्यमाने सरांनी महाराष्ट्राला बौद्धिक नजराणाच दिलेला आहे असे वाटते. महाराष्ट्रभर

आपल्या भाषणांद्वारे जनमानसावर आगळीवेगळी छाप सोडलेली आहे. सरांच्या भाषणामुळे प्रेक्षकांच्या डोळ्यातून आसवांचे पीक येताना मी पाहिलेले आहे. सरांवर जीव ओवाळून प्रेम करणाऱ्यांनाही मी पाहिलेले आहे. सरांनी विशिष्ट कालखंडातील साहित्याचे व साहित्यप्रकाराचे आढावे घेतलेले आहेत. त्यांच्या काही लेखनाने साहित्यक्षेत्रातील काही प्रश्नांविषयीचे मतप्रदर्शनही केले. हे सर्व लेखन वेगवेगळ्या प्रसंगाच्या निमित्ताने केले असले तरी अखिल माणूस हाच त्यांच्या साहित्याचा केंद्र आहे.

ज्याप्रमाणे डॉ. मनोहर सर एक साहित्यिक म्हणून लोकप्रिय आहेत त्याचप्रमाणे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणूनही त्यांचा लौकिक आहे. विचाराचा कस, बौद्धिक पीळ आणि अमोघ वक्तृत्वाचा धबधबा त्यांच्या वर्गात कसेळताना विद्यार्थ्यांनी पाहिलेला आहे. जाणिवेच्या नव्या राज्यात नेण्याचे त्यांचे कौशल्य अजोड आहे, यात शंका नाही. प्रत्येक विद्यार्थ्याला आपलेसे वाटावे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचा तास कधीच संपू नये असे प्रत्येक विद्यार्थ्याला वाटत असे. सर विभागप्रमुख असताना विद्यार्थ्यांच्या हितासाठी त्यांनी विभागात अनेक चर्चासत्रांचे आयोजन केले. त्यात प्रामुख्याने य.दि.फडके, संभाजी कदम, डॉ. श्रीराम लागू, नारायण सुर्वे, भालचंद्र नेमाडे, कॉ. शरद पाटील, लक्ष्मण माने, रुस्तुम अचलखांब, आत्माराम राठोड अशा अनेक दिग्गज साहित्यिकांना विभागात आणून विद्यार्थ्यांसमोर ज्ञानाचे दालन उघडे केले.

# ३१
# कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही!
## ▪ प्रा. सुरेश खोब्रागडे

'कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही
सदरहू पीक आम्ही आसवांवर काढले आहे.
कालपर्यंत पावलांनी रस्त्यापाशी तक्रारी मांडल्या नाहीत
झाडे करपली माथी हरपली
नदीच्या काठाने मरण शोधित फिरलो
आयुष्याच्या काठाने सरण नेसून भिरभिरलो
...कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही.'

मराठी साहित्यात नवख्या शब्दरचनेने आणि आगळ्यावेगळ्या आविष्कारशैलीने आंबेडकरी साहित्याचे पदार्पण झाले. विद्रोही भावाविष्काराने अंधार पिणारे शब्द ज्वालामुखीच्या उद्रेकापेक्षा भयंकर उग्र रूप धारण करू लागले. अंधारयुगात खितपत पडलेला तळागाळातला घटक जगण्याची जाणीव होताच कित्येक वर्षांची हृदयात दाटलेली आग ओकू लागला. फुले, आंबेडकरांच्या प्रेरणेतून शब्दनिर्मिती करू लागला. दुःख, दैन्य, दारिद्र्य आणि गुलामगिरी सोसत सोसत उभ्या आयुष्याचे मातेरं झालेला पूर्वाश्रमीचा दलित आणि आजचा आंबेडकरी समाज आपल्या शब्दाला शस्त्र करू लागला. शब्दाला कधी शिव्यांचे रूप देऊन, कधी आगीचे रूप देऊन तर कधी वैचारिकतेचे रूप देऊन आपला जगावेगळा ठसा मराठी जगतात उमटवू लागला. १९६० पासूनच्या निर्मितीच्या अशा अनोख्या विद्रोही साहित्यप्रवाहात डॉ. यशवंत मनोहर यांचा 'उत्थानगुंफा' मराठी विश्वात हादरे निर्माण करणारा आहे. डॉ. यशवंत मनोहर यांची सदरहू कविता विलक्षण आशयसंपन्न आहे. जेमतेम ७ ओळीत असणारी ही रचना महाराष्ट्रात रसिकांच्या समीक्षकांच्या ओठांवर कायमस्वरूपी निवास करून आहे. कधीही शब्दांशी सौदा न केलेला हा कवी आपले हंबरणारे काळीज आणि व्यवस्थेविरुद्धच्या जीवघेण्या संघर्षात संयमाचा अंत न पाहता माथे भडकलेल्या अवस्थेत शब्दात वादळ पेरतो. पावसाची प्रतिमा निर्माण करून कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही, सदरहू पीक आम्ही आसवांवर काढले आहे, ही उपरोक्त वस्तुस्थिती अत्यंत संयमाने स्वीकारतो. इथे पाऊस म्हणजे आकाशातून

कोसळणाऱ्या नैसर्गिक पाऊसधारा नव्हेत. तर त्या आहेत मानवनिर्मित व्यवस्थेत दलदलीत पिचत पडलेल्या कित्येक वर्षे नरकयातना भोगत मरणासन्न अवस्थेत जगणाऱ्या कित्येक निरपराध माणसांच्या डोळ्यातील आसवांच्या! कवीच्या मनात अपेक्षित आहे तो सुखाचा पाऊस. दुःख, दैन्य दारिद्र्य संपुष्टात येणारा सुखद क्षण त्यांच्या वस्तीत अपेक्षित आहे. असा हा क्षण कवीच्या वस्तीत आलाच नाही. होऊ घातलेले पीक आसवांवर काढावे लागते ही किती आकाशव्यापी शोकांतिका झाली. 'पीक आसवांवर काढणे' हा खरे तर नवाच वाक्यप्रचार उत्थानगुंफेतून कळला आणि असे अनेक नवनवे शब्द, मोठमोठी वाक्येची वाक्ये विलक्षण रसायन निर्माण करतात आणि मग सगळे चित्रच मनोहारी होऊन जाते. दुःखाचे, व्यथेचे दर्दभरे गाणे पण त्यातील आशयघन भावमयतेने समृद्धीचेही विश्व समृद्ध करते. 'यशवंती' करते. कालपर्यंत पावलांनी रस्त्यांपाशी तक्रारी मांडल्या नाहीत. झाडे करपली, माथी हरपली. कालचे ते भीषण जगणे अंगावर आजही काटे उभे करते. एक विदारक सत्य आकांत करते. हृदयात कालवाकालव करते आणि नकळत बंड करते. सर्वंकष क्रांतित्व करते. कालचा गहिवरलेला इतिहास कवीला अस्वस्थ करतो. कवी म्हणतात, कालपर्यंत आमच्या पावलांनी सुख समृद्धीच्या तक्रारी रस्त्यांपाशी केल्या नाहीत कारण सगळ्या दिशा आमच्यासाठी संपल्या होत्या. कुठल्याही वाटेवर भरवसा राहिला नव्हता. यामुळे आमची पावले तिकडे वळली नाहीत कारण त्या रस्त्याचा अनुभव वाईट होता. काळोखाच्या, वेदनेच्या प्रदेशात एकटाच भटकणारा कवी दिवस लचके तोडीत येत असल्याचे आणि रात्री निखाऱ्यांवर काळीज भाजत गेल्याचे 'उत्थानगुंफे'त सांगतो. 'झाडे करपली' या शब्दातून रस्त्यांपाशी असणाऱ्या झाडाचा संदर्भ देत कवी म्हणतात की, ही झाडे करपून गेली, ती वांझ ठरली त्या झाडांनी सावलीही दिली नाही. शीतल छाया हा झाडांचा गुणधर्म पण ती अपेक्षा व्यर्थ गेली म्हणून 'माथी हरपल्याचे' कवीला वाटते. मानवी अस्तित्वाचे निर्देशक इंद्रिय म्हणजे मन. मेंदू. मेंदू वा मने या अर्थाने त्यांनी माथी हा शब्द वापरला असावा. असे हे वाट्याला आलेले अनपेक्षित वांझ जीणे पांघरून आयुष्यभर नदीच्या काठाने कवी मरणाच्या शोधात फिरतात. त्या जिंदगीचे वर्णन ओसाड डोळ्यात कडा ओलावणारे आहे.

नदीच्या काठाने मरण शोधित फिरलो
आयुष्याच्या काठाने सरण नेसून भिरभिरलो

अस्तित्वशून्य जीवनाच्या काठाने मरण शोधित सरणासारखे आयुष्य कवी

जगले. घायाळ जीवनाला मृत्यू कवटाळलेला असतानाही कवी जगतोय पण कालचा पाऊस त्यांच्या गावात येत नसल्याची भीषण खंत कवीला आहे. अशी ही श्वास गुदमरणारी मनुष्यनिर्मित अवस्था कवीला घायाळ करते. रक्तबंबाळ करते असे हे दलितांच्या वाट्याला आलेले अगतिक सांगाडेवजा जगणे कवी अत्यंत कमी शब्दातून पण प्रतिभासंपन्न ताकदीने आविष्कृत करतात. या कवितेत कवीने ज्या प्रतिमा आणि प्रतीके वापरली त्यांना एक नवाच अर्थ आणि आशय प्राप्त करून दिला. चिंतनशील, भावोत्कट पातळीवर नेणारी त्यांची ही प्रतिमासृष्टी स्फोटक आहे. गहन आहे. 'पीक आसवांवर काढणे', 'रस्त्यापाशी तक्रारी मांडणे', 'मरण शोधित फिरणे', 'सरण नेसून भिरभिरणे' या प्रत्येक ओळीतील आशयगर्भ प्रतिमा विलक्षण सुसंवेद्य व सक्षम अशा आहेत. तेथील वाङ्मयीन सौंदर्यजाणीव फारच कलात्मक वाटते. सदर कवितेतील विद्रोही जाणीव काहीशी संयत वाटत असली तरी तिचा प्रदेश हा शेवटी वादळवाऱ्याचाच आहे हे निर्विवाद!

# क्रांतदर्शी कवी यशवंत मनोहर

## ■ डॉ. स्मिता शेंडे

समूहनिष्ठा ही आंबेडकरी जाणिवेच्या कवितेची महत्त्वाची विशेषता आहे. नवा समाज घडविण्याचे तिचे स्वप्न आहे. तिच्यातून आंबेडकरवादाची निष्ठावंत मांडली केली जाते; म्हणून तिच्यातून एक महावादळ अभिव्यक्त होते. अन्यायाच्या विरोधात अत्यंत ताकदीने लढा देण्याकरिता शब्दाचे शस्त्र ती घेऊन उभी राहते. त्यामुळे तिच्यातून युद्धक्रांतीचा जोम उत्कटपणे प्रकटतो. मानवी जीवनाची प्रतारणा करणाऱ्या प्रस्थापित व्यवस्थेला ती खंबीरपणे जाब विचारण्याचे धारिष्ट्य बाळगते. जीवनाचे सौंदर्य खुलवून त्याला जोपासण्याचे कार्य करताना कुरूपतेवर प्रहार करते. म्हणूनच तिला मानवी सन्मानाकरिता लढा देण्यासाठी मूल्यात्मक वैचारिकतेच्या विचारसौंदर्याने संघर्ष करण्यासाठी उभे राहावे लागते. याकरिता ती बुद्धाच्या बुद्धिप्रामाण्यवादी तत्त्वज्ञानाचा, आंबेडकरांच्या वैचारिक चिंतनाचा अंगीकार करून सर्वसामान्याच्या हिताकरिता झटत राहण्याचा ध्यास घेऊनच साकार होते.

आंबेडकरी जाणिवेचे इहवादी कवी म्हणून यशवंत मनोहरांचे नाव संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहे. त्यांची जीवननिष्ठा आणि साहित्यनिष्ठा ही डॉ. आंबेडकरांच्या विचाराने संस्कारित झालेली आहे म्हणूनच त्यांची कविता आंबेडकरी विचाराचा ज्वलंत, दाहक असा आविष्कार रेखाटते. मनोहरांचा काव्यप्रवास उत्थानगुंफा(१९७७), डॉ. बाबासाहेब आंबेडकरः एक चिंतनकाव्य (१९८२), मूर्तिभंजन (१९८५), जीवनायन (२००१), प्रतीक्षायन (२००६), काव्यभीमायन, आंबेडकर चिंतनकाव्य (२००७, द्वि.आ.), असा दीर्घकाळ चाललेला प्रवास आहे. आंबेडकरवादी कविता आवर्तात सापडली आहे. तिच्यात तोचतोपणा येत चालला आहे; ती कोंडीत सापडलेली आहे असा आरोप होत असतानाच मनोहरांचा पहिला काव्यसंग्रह 'उत्थानगुंफा' प्रकाशित झाला होता आणि त्याने या काव्यप्रवाहाला प्रवाहित करण्याचे कार्य यशस्वीपणे पार पाडले होते. एकूणच मराठी कवितेला वैचारिकतेचे आणि विद्रोहाचे परिमाण उत्थानगुंफेने बहाल केले होते. हेच तिचे श्रेष्ठत्व आणि यश आहे.

आधुनिक मराठी कवितेतील आंबेडकरवादी कवितेला विद्रोहाचे उंच उड्डाण घेण्याचे बळ मनोहरांच्या कवितेने दिले आहे. कारण तिच्यातील आशय आणि

अभिव्यक्ती अत्यंत दाहक स्वरूपात प्रकटली आहे. तिच्या हातात वणवे आहेत. अमानुषता, अन्याय, धर्मांधता यांना जाळणे हे तिचे प्रयोजन होते तर त्या ठिकाणी नवा समाज निर्माण करणे हा तिचा ध्यास होता. अमानुषतेवर प्रहार करताना विद्रोह अत्यंत दाहक आणि प्रपातासारखा कोसळताना पाहायला मिळतो. कवीने स्वतः अनुभवलेली अस्पृश्यता, दारिद्र्य, धर्मांधता यामुळे करपून गेलेल्या कवीच्या मनातील आग कवितेतून व्यक्त झाली आहे. ते साहजिकच होते. जडवादाने कवीचे मन इतके दाहक आणि ज्वलंत झालेले आहे याचा प्रत्यय त्यांची कविता देते. दैववादावर हल्ले करताना,

''ते सर्व देव-दैववादी माझे वैरी आहेत,
ज्यांनी अस्पृश्यता अभंग केली तिची मधुर ओवी केली
ते शब्दप्रामाण्यवादी सगुण निर्गुण वैरी आहेत माझे,
ज्यांनी आजवर मला मुक्त होऊ दिले नाही.'' (उत्थानगुंफा पृ.१५)

असा रोष व्यक्त करतात. कारण माणसाचे माणूसपण गोठविणारे ईश्वर, अध्यात्म हे तत्त्वज्ञान त्यांना मान्य नाही. त्यांनीच इथे अस्पृश्यता अभंग केली असे कवीला वाटते. अमानुषतेच्या झऱ्याचे मूळ कवीला गवसले आहे म्हणून मुळावरच घाव घालताना ते विजेच्या गर्जनेसारखे गर्जन करीत कवितेतून कोसळतात. यातूनच विद्रोही कवितेचे लावण्य फुलत गेले आहे.

'उत्थानगुंफा'मधील कविता या अन्यायाचे मूळ नष्ट व्हावे त्याकरिता नकार, निषेधाचा तीव्र स्वर व्यक्त करतात. येथील कर्मविपाक, अध्यात्म, ईश्वराचे अस्तित्व, धर्माचे स्तोम यांना नाकारून त्याठिकाणी बुद्धाच्या कारुण्याचा, आंबेडकरांच्या वैचारिकतेचा म्हणजेच सम्यक विचाराचा अंगीकार करायला सांगतात. हेच तिचे मोठे यश म्हणावे लागते. जुन्याला नकार देताना नवीन पर्याय द्यावा लागतो ही क्रांतिकारी कवितेची विशेषता असते. मनोहरांची कविता जुने नष्ट करून त्याठिकाणी दुर्गंधी नसलेला समाज स्थापण्याचे स्वप्न मांडते. अमानुषतेवर प्रखर हल्ला करीत असताना मनोहरांची कविता बुद्धापासून चालत आलेल्या सम्यक विचाराची नम्रतापूर्वक आठवण करून देऊन त्याविषयीचा कृतज्ञभाव व्यक्त करते. तेच सम्यक विचाराचे दर्शन आहे. मनोहरांच्या कवितेला परिवर्तनाचा मार्ग शोधत असताना मुळापर्यंत जाता येते. कारण त्यांचे प्रतिभासामर्थ्य आणि त्यांच्या वाचनाचा आवाका विस्तृत आहे याचा प्रत्यय त्यांची कविता देते. आपल्या कवितेचे कूळ आणि प्रयोजन ते कवितेतून वारंवार नमूद करतात.

''...मी आहे नास्तिक, महानास्तिक
भौतिकाशी आहे माझे नाते...''

'आम्ही आहोत नास्तिक' हे त्यांच्या कवितेचे कूळ आहे आणि इथला समाज नव्याने स्थापन करणे; समता, बंधुता, न्याय या तत्त्वावर त्याची पायाभरणी करणे हे त्यांच्या कवितेचे प्रयोजन आहे. म्हणूनच प्रचंड आशावाद कवीच्या मनात आहे याची प्रचिती त्यांची कविता देते. जडवादाचा स्वीकार करून जीवनप्रवास करणे अत्यंत कठीण कर्म आहे. या वाटेवर सहप्रवासी मिळतीलच याची शाश्वती नसताना कवीने ही वाट एकट्यानेच जाण्याकरिता जाणीवपूर्वक अंगीकारली आहे. हा भाव कवितेतून प्रकट होतो -

"आहे जीव जोवर तोवर पाखडीत जाणारच आहे
शेवटचा दिस गोड होवो न होवो
आता बांधलेच आहे घर या निषिद्ध मैदानात
आतड्यांचे गहिवर कुणी घेऊन येवो न येवो." (उत्थानगुंफा-पृ.९४)

यशवंत मनोहरांनी आपली भूमिका इथे स्पष्ट केली आहे. प्रस्थापितांना नकार देताना तो अंतापर्यंत देत जाणे कुठल्याही कारणास्तव तडजोड करता कामा नये ही कणखर भूमिका हेतुपुरस्सर कवीने स्वीकारली आहे. बुद्धाच्या कारुण्याचा स्वीकारच त्यांना अंधारातून प्रकाशाकडे मार्गक्रमण करण्यास प्रवृत्त करतो आणि आंबेडकरी विचाराचे क्रांतितत्त्व संघर्ष करण्याची स्फूर्ती देते.

'उत्थानगुंफे'तील कविता अत्यंत टोकदार विद्रोहाचे कारंजे फुलवताना सौंदर्यपूर्ण आविष्कार अधोरेखित करते. क्रांतीची भव्योदात्तता अप्रतिम आहे. तिच्यात शौर्य आहे म्हणून तिला मानवाच्या मुक्ततेचे गीत गाता आले. ती माणसाची गाणी गाते. अंधार असणाऱ्यांच्या हातात उजेड देते हेच तिचे प्रयोजन आहे. 'माणूस' हा तिचा केंद्रवर्ती विषय आहे. ओघवत्या भाषाशैलीतून आणि वैविध्यपूर्ण प्रतिमानिर्मितीच्या अफाट सामर्थ्यातून नवा आशय, नवीन अभिव्यक्ती यामुळे मनोहरांच्या 'उत्थानगुंफे'ने एकूणच मराठी कवितेत स्वतःला अढळस्थानी विराजमान केले आहे.

यशवंत मनोहरांचा काव्यप्रवास उत्तरोत्तर अधिक संयत आणि रूंद होत गेला आहे. त्यांच्या कवितेचे आणि जगण्याचेही प्रेरणास्थान म्हणजे डॉ. आंबेडकर आहेत हे त्यांच्या लेखनावरून लक्षात येते. आंबेडकरांच्या जीवनावर अनेक आंबेडकरी कवींनी कविता रचलेल्या आहेत. परंतु दीर्घ चिंतनकाव्य फक्त मनोहरांनीच लिहिलेले पाहायला मिळते. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरःएक चिंतनकाव्य' आणि याचीच द्वितीय आवृत्ती 'काव्य भीमायन' या काव्यसंग्रहाने मनोहरांच्या प्रतिभेच्या संपन्नतेचा आणि बौद्धिकतेचा प्रत्ययच आणून दिला आहे. चिंतनकाव्य हे विचाराचे चिंतन अभिव्यक्त करणारे अत्यंत महनीय

काव्य साकारले आहे. डॉ. आंबेडकर यांच्या जीवनप्रवासावर यातून प्रकाश टाकण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांनी केला आहे. त्यांच्या कर्तृत्वाची आणि वैचारिक चळवळीची, संघर्षाची भव्योदात्तता यातून प्रकट झाली आहे. डॉ. आंबेडकरांचे कार्य हे आईच्या मायेप्रमाणे आहे असे कवीला वाटते. ज्या कुशलतेने आणि सजगपणे आईची माया आपल्या मुलांना संस्कारित करते त्याच भावनेतून क्रांतीमंतांच्या कार्याचा परिचय कवितेतून करून दिला आहे. त्यातून वात्सल्यभाव व्यक्त झाला आहे. शोषितांचे भुके, कंगाल, उघडे, नागडे जीवन कवितेतून रेखाटताना कुठेही अश्लीलता येणार नाही याचे सजग भान ठेवून काव्यमय भाषेतून व्यक्त करतात हे मनोहरांच्या सुसंस्कृत कवीमनाचे द्योतक आहे.

ज्यांच्या प्रेरणेतून कवीला जीवनाचा अचूक मार्ग निवडता आला अशा आदरस्थानाचे ऋण कसे फेडता येईल याविषयीची खंत कवीने व्यक्त केली आहे.

> ''मी होऊ कसा उतराई
> आयुष्याच्या बुंध्याला फळा-फुला-फांद्यांना तूच तर
> मुळाचे अधिष्ठान झाला आहेस
> तुलाच उमगली असती माझी वादळवाणी
> कुणाहीपेक्षा मीच तर तुझा अधिक आहे.''
> (डॉ. बाबासाहेब आंबेडकरःएक चिंतनकाव्य पृ. ९)

कवीच्या कवितेचा प्रवास ज्या मूल्यांनी परिपूर्ण होतो त्याविषयीची भूमिका इथे स्पष्ट झालेली आहे. तसेच आंबेडकरी समाजाची, चळवळीची झालेली वाताहत आणि त्याविषयीची खंतही इथे विशेषत्वाने प्रकट होते. परिवर्तनवादी समाज प्रस्थापितांच्या भूलथापांना बळी पडून कसा वाहवत जातो; याविषयीचे शल्य मनोहरांच्या अतिसंवेदनशील कवीमनाला झाले आहे. याचा प्रत्ययही चिंतनकाव्यातून येतो. त्यांचे हे चिंतन भौतिकवाद, जडवाद आणि जीवनवाद यांच्या संपृक्ततेतून प्रकटते. त्यांना हा समाज बदलेल असा आशावाद वाटतो म्हणून लिहितात -

> ''गळत जातील त्याच्या पोरकटपणाच्या पाकळ्या
> पक्व होत जाईल त्याच्या भौतिकवादाचा देठ
> जसजशी माणसे धरतील गतीची संगती
> होतील विवेकाचे साथी...'' (डॉ. आंबेडकरःएक चिंतनकाव्य पृ.१५)

मनोहरांच्या काव्यातून स्वपरीक्षण आणि समाजनिरीक्षण अत्यंत कठोरपणे

व्यक्त झाले आहे. एकूणच आंबेडकरवादी कवितेत याचा प्रत्यय फारसा येत नाही. प्रस्थापित व्यवस्थेचा त्याग करून समाज हा आंबेडकरी विचाराचा विवेक मनात घेऊन जगण्यासाठी प्रवृत्त होईल हा कवीचा दृढ आशावाद आहे. हे मनोहरांच्या कवितेचे अविभाज्य अंग आहे. माणसाच्या कर्तृत्वावर त्यांचा अपार विश्वास आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची चळवळ आणि त्यांनी समाजाला दिलेला जीवनावश्यक विचार याविषयीचे भौतिक चिंतन मनोहर कवितेतून रेखाटतात. शोषितांना सुसंस्कृत कशाप्रकारे केले, त्यांची अस्मिता कशी जागृत केली, सन्मानाने जीवन कसे जगावे याचे भान आणून दिले. याविषयीच्या चिंतनशील विचाराला कवितेतून अत्यंत परखडपणे कवीने मांडले आहे. शोषितांच्या अस्मितेला जागृत करणारे युगनायक, क्रांतीची युद्धसंहिता, क्रांतीमंता, विद्रोही शक्तीपीठाचे संचालनघर अशा संबोधनातून कवीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचे महत्त्व पटवून दिले आहे. कारण विसर पडलेल्या समाजाला आंबेडकरी विचाराचे स्मरण परत करून देणे हाही त्यामागील उद्देश असावा. या काव्यसंग्रहातील कवितेत आग आहे. तिची प्रवृत्ती लढाऊ आहे. पण संयत स्वरूपात ती प्रकटते कारण इथे ओथंबलेल्या मनाने एका उत्तुंगतेला आदरांजलीच्या रूपाने वाहिलेला हा अनोखा आविष्कार आहे. याचीच वाढीव आवृत्ती 'काव्य भीमायन' या नावाने प्रकाशित झाली आहे. ही एक दीर्घ महाकविताच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर कर्तृत्वावर प्रकाश टाकणाऱ्या पूर्वीपासूनच्या कवितांचे संकलन केले आहे. क्रांतिकारी व्यक्तिमत्त्वाचे अत्यंत गंभीरपणे दर्शन या काव्यचिंतनमधून झालेले आहे. हे एकप्रकारचे उत्कृष्ट चिंतनकाव्य आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर एवढी प्रदीर्घ कविता आजपर्यंत एकूणच मराठी कवितेत कुणीही लिहिलेली पाहायला मिळाली नाही. हा या काव्यसंग्रहाचा विशेष आहे. मनोहरांचे हे चिंतनकाव्य अपूर्व असेच झाले आहे.

'मूर्तिभंजन' या काव्यसंग्रहातील प्रेमकविता आणि विद्रोही कविता यांचे सामर्थ्यही महनीय आहे. तारुण्यातील प्रेमभावना त्यातील उत्कटता आणि प्रेमविरहाचा आकांत त्यातून व्यक्त झाला आहे. या काव्यसंग्रहातील कविता 'उत्थानगुंफा' या काव्यसंग्रहाच्या पूर्वीची निर्मिती आहे. विद्रोहीकाव्य आणि प्रेमकाव्य असे दुहेरी स्वरूप या काव्यसंग्रहातून अभिव्यक्त झाले आहे. यातील विद्रोही कवितेची आग 'उत्थानगुंफे'तील विद्रोहाची आठवण करून देते. तिचा जोश, आवेग, गतिमानता, काव्यात्मकता, प्रतिमांचे अफाट सामर्थ्य, विचारशीलता या सर्वांचे स्मरण करून देते. क्रांतीकरिता मने पेटविण्याचे कार्य तेवढ्याच सामर्थ्याने झाले आहे. 'उरातील उग्रते' या कवितेची दाहकता अत्युत्कट रूप

धारण करते. कवितेने अभावग्रस्तांच्या यातनाविश्वातून उगवायला पाहिजे अशा काव्याचा ध्येयवाद मनोहरांनी वरील कवितेतून मांडला आहे. सत्याला नेस्तनाबूत करणाऱ्या प्रवृत्तीला समूळ नष्ट करण्याकरिता हा पसाराच पेटवून द्यायला ते सांगतात. त्याकरिता पायात विजांचे पैंजण बांधून सर्वच विद्रूप जाळायला सांगतात. कवितेला निर्णायक होण्याचे आव्हान करतात. यातून कवी नव्या युगाशी संवाद साधण्याचे कार्य जाणीवपूर्वक करताना पाहायला मिळते.

शब्दांशी प्रामाणिक राहून अनुभव रेखाटणारा कवीच श्रेष्ठ कवी असतो. त्याने समाजाला युगपरिवर्तनाची दिशा दाखवावी अशीच निर्णायक कविता मनोहरांना अभिप्रेत आहे. कवितेत क्रांतीचे बळ असते. जगात उलथापालथ घडवून आणण्याचे सामर्थ्य कवितेत असावे असा प्रबळ विश्वास कवीचा आहे. म्हणून कवितेला ते निर्णायक व्हायला सांगतात. या काव्यसंग्रहातील विद्रोहाचे लावण्य फुलविणाऱ्या कविता विचाराने, आचाराने आशयाचे नवे रूप रेखाटतात. यातून कवीच्या मनातील अंतरंगाचे प्रतिबिंबच प्रकटले आहे. मनोहरांच्या विद्रोही कवितेचे हे विलोभनीय रूप आहे. तसेच यातील प्रेमकाव्य हेही त्याच्या वेगळेपणाने अपूर्व आहे असेच प्रत्ययाला येते. मनोहरांच्या प्रेमकवितेचा प्रारंभ हा महाविद्यालयीन जीवनातील तरुण मनाच्या भावस्पंदनांनी परिपुष्ट झालेला आहे. त्यामुळे प्रेयसीविषयीची आंतरिक हूरहूर, सहवासातील माधुर्याचे क्षण, प्रेमातील साफल्याचे स्वप्न, प्रेयसीची ओढ अशा छटा त्यातून अभिव्यक्त झाल्या आहेत. कवीची प्रेमनिष्ठा ही एकनिष्ठ आहे. त्यांना प्रेयसीचा मानसिक पातळीवर सहवास आयुष्यभर मिळालेला आहे. याचा प्रत्यय त्यांच्या 'जीवनायन'मधील काही प्रेमकविता आणि 'प्रतीक्षायन' हा प्रेमकाव्यसंग्रह देतो. मनोहरांची उत्तरोत्तर व्यक्त होत जाणारी प्रेमकविता ही अत्यंत गहन व गंभीर होत गेल्याचे जाणवते. त्यातील प्रेमाचे तत्त्वज्ञान, प्रेमातील गहनता, भावविभोर उत्कट संवाद यामुळे तिची उत्कटता वाचकांच्या मनाला जाऊन भिडते.

यशवंत मनोहरांच्या प्रेमकवितेच्या प्रवासात प्रियकराचा हा एकट्याचाच जळण्याचा प्रवास आहे. 'माझ्यापुरता वणवा' ही प्रेमातील अनुभूतीचा प्रत्यय कविता देते. मनोहरांची प्रेमकविता प्रारंभी विफल प्रेमाची उत्कटता, व्याकुळता अत्यंत भावुकतेने रेखाटते म्हणून त्यातून वेदनेचा आकांत व्यक्त होतो. मनोहरांच्या जीवनातील वेदनेचे स्वरूप बहुपेडी आहे. त्यांना दुधानेही पोळले आणि मधानेही पोळले आहे. याचा प्रत्यय त्यांची प्रेमकविता देते. स्वतःच्या दुःखात इतरांना सहभागी न होऊ देता ही एकट्याचीच मैफल कवीने उरी कवटाळलेली आहे. प्रेयसीशिवाय जीवनाचा प्रवास त्यांना करपून गेलेला वृक्ष वाटतो. या दुःखाच्या डोहात स्वतःला बुडवून घेण्याचा प्रयत्न प्रियकराने केला आहे. कारण त्याला

जीवनानेही क्षमा केली नाही. याविषयीचे दुःख मनोहरांची 'मूर्तिभंजन'मधील कविता रेखाटते. प्रेमभंगाचे दुःख अतिव्याकूळ होऊन संवादलयीतून व्यक्त झाले आहे. भावनिक पातळीवरून चाललेला हा दोघांच्यामधील संवाद आहे. संवादित्व ही तिची आविष्कारपद्धती आहे. त्यामुळे कवितेचा आशय अर्थपूर्ण होऊन थेट मनाला जाऊन भिडतो.

मनोहरांचे व्यक्तिमत्त्वच त्यांच्या कवितेतून व्यक्त झाले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील चिंतनशील गंभीर प्रवृत्ती आणि सुसंस्कारित भावना व विचाराचे प्रकटन ही कविता करते. प्रेमकाव्यात प्रेयसीच्या मनाचा विचार प्रामुख्याने केला आहे. इथे शारीरप्रेमापेक्षा अशारीरिक प्रेमाचाच उत्कट प्रत्यय येतो. वैयक्तिक प्रेमानुभव हा मनोहरांच्या प्रेमकाव्याचा अंतःस्वर आहे. ही कविता त्यांच्या जीवनातील व्याकुळता, उत्कटता, गंभीरता याचे दर्शन प्रभावीपणे घडवते. तिच्यातील तरलता, अतिसंवेदनशीलता, निसर्ग या छटा कवितेतून उत्कटपणे प्रकटतात. म्हणून त्यातून निसर्गातील हिरवा चाफा, निर्जन समुद्र किनारा, पाऊस, वारा, झाडे, तापलेली वाळू, मोसम, वणवा, पाखरे, चांदणे, विजांचे हात, क्षितिज, ऋतू यासारख्या प्रतिमांमधून निसर्गाचे दर्शन घडते. एकीकडे चाफ्याचे हिरवे बन तर दुसरीकडे मरणाचा मांडव अशा विरोधलयीतून कवीमनातील प्रेमाची हिरवी भाषा आणि जीवनातील उद्ध्वस्तता अभिव्यक्त झाली आहे.

उत्तरोत्तर ही प्रेमकविता मानसिक पातळीवरून उत्कट प्रेमाचे दर्शन घडविताना बौद्धिक पातळीवर जाताना दिसून येते. म्हणून तिला चिंतनकाव्याचे रूप प्राप्त होते. कारण प्रेमाचे तत्त्वज्ञानच तिने प्रतिपादित केले आहे. हे वैश्विक प्रेमभावाचे दर्शन आहे. कारण बुद्धाच्या कारुण्याचा, मैत्रीचा इथे प्रत्यय येतो. प्रारंभी प्रेयसीच्या मूर्तीचे भंजन करू पाहणारा हा कवी प्रेमाची वैश्विक जाणीव व्यक्त करून बुद्धाच्या सम्यक विचारातील प्रेमाचे अथांगपण अधोरेखित करीत जातो. म्हणून मनोहरांची प्रेमकविता एकूणच मराठी प्रेमकवितेपेक्षा स्वतःचे वेगळेपण निर्माण करण्यात यशस्वी झालेली आहे. 'प्रतीक्षायन' आणि 'जीवनायन'मधील प्रेमकविता याचा प्रत्यय देतात. विद्रोहाची कारंजी फुलविणारा हा कवी प्रयणाची तरलता, उत्कटता, व्याकुळता कशा शैलीतून रेखाटतो याचा उत्कट प्रत्यय त्यांची प्रेमकविता देते. मनोहरांची प्रेमकविता मराठी प्रेमकवितेला दिशा दाखविणारी कविता आहे. तिचे मूल्य वाढविणारी आहे हेच तिचे वेगळेपण आहे आणि तिच्यात उत्कृष्ट काव्यत्व आहे असे नमूद करावे लागते.

'जीवनायन'मध्ये वर्तमानाचे भयावह दर्शन विशेषत्वाने प्रकटले आहे. प्रस्थापित

व्यवस्थेच्या मनातील आणि मनसुब्यातील जहराचे दर्शन कवीला झाले आहे. या कारस्थानाला बळी पडणारा समाज त्यांना दिसतो. त्यांचे अंधाराकडे जाणारे भवितव्य दिसते. म्हणून कवीचे मन अस्वस्थ आणि अशांत झाले आहे याचा प्रत्यय जीवनायनात विशेषत्वाने येतो. शोषित, पीडित यांचा भविष्यकाळ हा संपूर्ण अंधाराचाच असणार! याविषयीचा वेध ही कविता घेते. संपूर्ण शोषण झालेल्या समाजाविषयीची करुण जाणीव व्यक्त करताना मनोहरांचे मन मातृत्वाच्या मायेने चिंताग्रस्त झालेले दिसते. म्हणून त्यांना वास्तवाचे भान करून देताना 'जपून रे माझ्या फिनिक्स पक्ष्यांनो' असा इशारा देतात. इतिहासाचा ठाव घेऊन, भविष्याची काळजी करीत वर्तमानाचे दर्शन घडवितात. ही कविता मानवी संवेदनशीलता अस्वस्थ करण्याचे सामर्थ्य बाळगते.

नास्तिकाचे कूळ असणाऱ्यांचा इथे वधच होत असतो म्हणून आपली वाट चोखंदळपणे स्वीकारावी हा उदात्त ध्येयवाद उरात क्रांतीची कविता घेऊन मनोहर रेखाटतात. संपूर्ण जगातील घडामोडींकडे त्यांचे बारीक लक्ष आहे. वास्तवातील भयाणतेचा अचूक वेध भेदक दृष्टीने घेऊन समाजाला जागृत करणे याविषयीचे उत्कट चिंतन इथे विशेषत्वाने प्रकटले आहे. 'माणूस' म्हणून त्यांच्या सर्वच स्तरावरील सभ्यतेचे प्रकटन या काव्यसंग्रहातून करायचे आहे असा कवीचा ध्येयवाद इथे अभिव्यक्त झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या मायेने संपूर्ण मानवी समाज सुखी व्हावा हे स्वप्न बघितले होते तसेच मनोहरांच्या कवितेचेही स्वप्न आहे. याचा प्रत्यय त्यांची कविता देते. वर्तमानाचे चित्र रेखाटताना अत्यंत करुण गंभीर चिंतन व्यक्त झाले आहे. चिंतनाचा गंभीर स्वर काव्यत्वाचा साज घेऊनच साकारतो हे मनोहरांच्या काव्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

मनोहरांच्या काव्यप्रवासातील उत्तरोत्तर काळातील कविता ह्या त्यांच्या प्रज्ञापरिणत प्रतिभेने उजळून निघालेल्या आहेत. छांदस अभिव्यक्तीतून त्यांचे विचारसौंदर्य हे अत्यंत कलासक्त झालेले आहे. अनोख्या प्रतिमाविश्वाने विचाराच्या वैभवाला पेलून धरले आहे हे त्यांच्या व्यापक अशा व्यासंगामुळे शक्य झाले आहे. आंबेडकरी विचारांनी संपृक्त मानवीमूल्यांचा विचारच या काव्यातून सतत खळखळून वाहणाऱ्या झऱ्याप्रमाणे प्रवाहित होताना दिसतो. तरीही तिच्या कलासक्ततेला जराही बाधा येत नाही. संघर्षमय जीवनातही अचूक मार्गाची निवड हे फक्त विचारवंतालाच शक्य असते. मनोहर हे खऱ्या अर्थाने विचारवंत आहेत. म्हणूनच भरकटलेल्यांना दिशा दाखविण्याचे कार्य त्यांची कविता करते हेच या कवितेचे सामर्थ्य आहे.

मनोहरांच्या मनात सतत सुगंध दरवळत असतो म्हणूनच त्यांना नित्य नवनवीन विचाराचे झरे लागत जातात. हा प्रवास चिंतनाचा-मननाचा असतो. समाजाने सतत जागृत असावे असे त्यांना वाटते म्हणून त्यांच्या मनातील ध्येयवाद जागविण्याचे कार्य त्यांची कविता सातत्याने करत आहे. प्रस्थापितांचे मनसूबे प्रकट करताना त्यावर मात करणारा उदात्त आशावाद त्यांची कविता मांडते.

''रस्त्यांना गोठवीत आहेत मंदिरे, नास्तिक्य पोलाद झाले पाहिजे
अजून पाठ लागली नाही भूमीला, वादळाने कल्पान्त झाले पाहिजे.''

(जीवनायन पृ.२३)

''आम्हीच होऊ विजयी आमच्या पाठीवर शुद्ध उजेडाचा हात
वाकवतो आहे युगाची कमान मुठीतील आमच्या तप्त झंझावात.''

(जीवनायन पृ.९)

समतेच्या तत्त्वावर उभा असलेला समाज निर्माण करण्याचे हे स्वप्न कवीने अत्यंत उदात्त ध्येय बाळगून पाहिलेले आहे. कारण स्वप्ने, ध्येये आकाशातून पडत नसतात ती स्वबळावर निर्माण करावी लागतात. त्याकरिता ते आपणच व्हाल्तेअर व्हायला सांगतात. हा प्रकाशपूजनाचा सोहळा संपूर्ण काव्यभर वावरताना दिसतो. कारण या काव्याचे प्रयोजनच मुळी 'माणूसच आहे अंतिम सत्य आणि सौंदर्यही' हे आहे. कलावादी कवितेचे बेगडी सौंदर्य मनोहरांच्या कवितेतून, समीक्षेतून अत्यंत परखडपणे व्यक्त झाले आहे. जीवनावादानेच मानवीजीवनाचे सर्जन केले आहे. ऐहिक जीवनाचे दर्शन घडविले आहे. पारलौकिक जीवनाला महत्त्व न देता मानवी जीवनाचेच गीत मनोहरांची कविता गाते. तिला समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय या तत्त्वावर उभा असणारा नवसमाज निर्माण करायचा आहे. त्यातून कारुण्य आणि मैत्रीचा गंध दरवळणाऱ्या समाजाची प्रतिष्ठापना करायची आहे. म्हणून ते लिहितात -

''स्वर्ग नको मज, देव नको, हा इथला सुंदर स्नेह हवा
नकोच भक्ती, नको मुक्तीही, दुनियेचा मज मोह हवा.''

(जीवनायन पृ.---)

मुक्त मानवाचे गीत गाणे, मुक्त माणसाचे स्वप्न पाहणे त्यासाठीच रात्रंदिन प्रयत्नाची पराकाष्ठा करीत राहणे याच जीवनध्यासातून मनोहरांची कविता अविरतपणे प्रवाहित झालेली दिसते. जीवनावर भाष्य करण्यासाठीच तिचा जन्म झालेला आहे. तिच्यातील झपाटलेपण याचा प्रत्यय देते.

यशवंत मनोहरांच्या कवितेचे अंतरंग व बाह्यांग असे ज्वलंत आहे. सत्यावर भाष्य करण्याचे धारिष्ट्य या कवीने जाणीवपूर्वक स्वीकारले आहे. त्याकरिता अनेकांचा रोषही त्यांनी पत्करला आहे. म्हणूनच त्यांना पाब्लो नेरूदा, मायकोव्हस्की अशा उपमा दिल्या गेल्या आहेत. त्या सार्थही आहेत. याचा प्रत्यय मनोहरांच्या संपूर्ण कवितेचा आजपर्यंतचा प्रवास देतो.

यशवंत मनोहरांच्या कवितेचा दीर्घप्रवास सुरू आहे. 'उत्थानगुंफा' ते 'प्रतीक्षायन' या काव्यप्रवासातील पाच काव्यसंग्रह विचाराच्या सौंदर्याने फुललेले आहेत. त्यांचे केंद्रस्थान माणूसच आहे. अंतिम सत्य आणि सौंदर्यही हे आहे. म्हणून माणुसकीच्या स्थापनेकरिता गहिवरणारा लळा त्यांना लागलेला आहे. प्रारंभीच्या कवितेतील उत्कटता, विद्रोह, आक्रमकता, दाहकता, विफलग्रस्तता उत्तरोत्तर अत्यंत पक्व होत गेल्याचे जाणवते. अभिव्यक्तीत संथलय येऊन उपहास, उपरोध याचा वापर करून अंतरंगातील विचारचिंतनाचा अग्नी तसाच चेतवित ठेवलेला आहे. त्याची आग आक्रमकतेपेक्षाही ज्वलंत व दाहक आहे. त्याला अस्सल अनुभवाचा स्पर्श आहे. प्रतिमासामर्थ्याच्या बळावरच त्यांनी काव्य अस्सल आणि श्रेष्ठतेच्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. शब्दसामर्थ्य, भाषाप्रभुत्व, मानवीमूल्याची कास आणि अतिसंवेदनशीलता यामुळे मनोहरांच्या कवितेला एकूणच मराठी कवितेत अग्रस्थानी विराजमान होता आले आहे. त्यांची काव्यशैली शब्द, भाषा, प्रतिमा, प्रयोगशीलता, मुक्तछंद, छांदस, काव्यात्मता या गुणविशेषाने युक्त आहे. तसेच आशयाचे वेगळेपण या नाविन्यपूर्णता त्यांच्या काव्यदृष्टीतून प्रकट झालेली आहे. त्यांच्या कवितेचा प्रवास हा असा विकसित होत गेलेला आहे. प्रयोगशीलतेचा धनी असलेला हा कवी मराठी कवितेत स्वतःचे वेगळेपण नोंदविण्यात यशस्वी झालेला आहे. काव्यात्मता आणि आशयसंपन्नता हे त्यांच्या काव्याचे विशेष होय.

यशवंत मनोहरांची कविता आशावाद, मानवी जीवनावरचा उदंड विश्वास आणि प्रगाढ चिंतनाची बैठक असलेली समज तसेच धारदारपणा व्यंगात्मक भाषा, धारदार भाषा, जिवंत अनुभव व अस्सल प्रतिमासृष्टी यामुळे एकूणच मराठी कवितेत स्वयंतेजाने झळकत राहील. आंबेडकरवादी विचाराशी त्यांची कविता एकनिष्ठ असून समूहनिष्ठ जीवनाशयाशी आपले नाते ती अबाधित राखते. म्हणून तिच्यातील जीवनमूल्ये जीवनाला प्रबळ आशावादाकडे नेण्यास प्रवृत्त करतात. या कवीच्या कवितेचा प्रवाह असाच उद्दिपीत होत राहील आणि मराठी कवितेला समृद्धतेचा वारसा बहाल करीत राहील हेच तिचे सामर्थ्य आहे.

# डॉ. यशवंत मनोहर नावाचा विद्रोही उजेड

▪ प्रा. अनमोल शेंडे

डॉ. यशवंत मनोहर म्हणजे प्रतिभेचे विस्तारलेले क्षितिज! विद्यार्थ्यांसाठी आणि प्राध्यापकांसाठी असणारा एक मार्गदर्शक दीप! प्रज्ञा आणि करुणेचा झालेला अजोड असा संगम! आणि परिवर्तनवादाचे गाणं गुणगुणत आयुष्याची वाटचाल करणारे एक विद्रोही झाड!

या विद्रोही करुणेला आज २६ मार्च २००३ रोजी वयाची साठ वर्षे पूर्ण होत आहेत. तसेच ते नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागातून ते निवृत्तही होत आहेत. आज ही निवृत्ती माझ्यासारख्या असंख्य विद्यार्थ्यांच्या काळजाला छेद देणारी आहे. सरांनी आमच्या आयुष्याच्या पारड्यात जी उजेडाची दौलत मुक्तहस्ताने प्रदान केलेली आहे तिचे वर्णन तरी कसे करावे! खऱ्या अर्थाने सरांनी आमच्या उरात विचारांच्या क्रांतिगुफा खोदलेल्या आहेत. आजवर सरांच्या मार्गदर्शनाखाली असंख्य विद्यार्थी शिकून बाहेर पडले. ते सर्व विद्यार्थी आज विविध क्षेत्रात सौंदर्याचे शिल्पकार बनून उजेड वाटण्याचे काम इमानेइतबारे करीत आहेत.

वाङ्मयीन क्षेत्र असो वा सामाजिक सांस्कृतिक क्षेत्र असो. सरांनी त्यावर आपल्या प्रतिभेचे असामान्यत्व कोरलेले आहे. ज्वालांचे पैंजण हृदयाला बांधून साहित्यात समतेची नि परिवर्तनाची सौंदर्यशिल्पे जी त्यांनी अभिव्यक्त केलेली आहेत, त्याने तर संपूर्ण मराठी वाङ्मयाचीच स्वाभिमानाने मान उंचावलेली आहे. पारंपरिक मराठी साहित्यात जे कौरुप्यशास्त्र आपल्या सिद्धहस्त विकृतीनिशी प्रकट केले गेले त्या कलावादी शब्दांच्या बाजीगरांना सरांनी आंबेडकरी सौंदर्यशास्त्राने अगदी बेचिराख करून टाकलेले आहे. त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या, प्रवासवर्णन, समीक्षापर लेखन, वैचारिक पुस्तके पाहिली म्हणजे त्यांच्या प्रतिभेचे उड्डाण मानवी मनाला किती वेगवेगळ्या अंगांनी प्रभावी करू शकते, याची आगळीवेगळी प्रचिती येते. त्यांचे काव्य तर एक स्वतंत्र इतिहासच आहे. 'विद्युत दिव्यापेक्षा आकाशात सळसळणाऱ्या विजेशीच त्यांचे नाते अधिक आहे.' 'ती अंगावर अग्नीचे अलंकार ल्यायली आहे.' 'तिच्या हातात वादळ आणि वणवे आहेत.' '...इतका समग्र विद्रोह मराठी साहित्यातच नव्हे तर भारतीय साहित्यातही अशा

रूपात प्रकट झालेला आहे काय?' अशा प्रकारची बिरूदे त्यांच्या काव्याचा अपार गौरव करतात हे काय कमी आहे? अलीकडच्या 'जीवनायन' या काव्यसंग्रहामधून अभिव्यक्त झालेली वेस्टलँड भेदक आहे. इलियट त्यांच्या वेस्टलँडपाशी थांबतात. परंतु मनोहर इथेच थांबत नाही तर 'जीवनायन'मधून आदर्श समाजाची 'ड्रीमलँड' ही मांडून दाखवतात. हे त्यांच्या कवितेचे अनन्य वैशिष्ट्य आहे. 'नवे साहित्यशास्त्र' या पुस्तकात सरांनी बुद्धिवादी सौंदर्यशास्त्र महाराष्ट्रात प्रथमच अजोड अशा बौद्धिक सामर्थ्याने मांडलेले आहे. हेही त्यांचे काम ऐतिहासिक स्वरूपाचे आहे.

सरांचे अध्यापन म्हणजे त्यांनी त्यांच्या आयुष्यात ध्येयप्राप्तीकरिता घेतलेले अविरत व्रत होते. एक सर्जनशील कलावंत, एक जडवादी विचारवंत आणि समीक्षक त्यांच्या रूपात नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागाला पहिल्यांदाच मिळाला. त्यांच्या अध्यापनातून आज त्यांचे कितीतरी विद्यार्थी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पसरलेले आहेत, जी क्रांतीची फुले होऊन विद्यार्थ्यांवर तथा समाजात सुगंधाचा वर्षाव करीत आहेत. सरांचं आयुष्य म्हणजे अश्रूंचे महाकाव्य आहे. या महाकाव्याने मात्र आजपर्यंत कोणत्याही अंतर्विरोधाला जवळ फिरकूही दिले नाही. नास्तिकता ही त्यांच्या जीवन जगण्याची सर्जनशीलता बनून गेलेली आहे. आंबेडकरी तत्त्वज्ञानाचे गाणे आपल्या ओठावर घेत असंख्य निराधार मनाच्या फुलबागेत सरांनी परिवर्तन आणि इहवादाच्या रोपट्याची रोवणी केलेली आहे. आम्हा तरुण विद्यार्थ्यांच्या आणि प्राध्यापकांच्या हातात भविष्यात सतत तरुण राहण्यासाठी त्यांनी उजेडाच्या कमानी दिलेल्या आहेत.

आज आपल्या देशातील माणुसकीला कॅंसर झालेला आहे. विकृतीच सौंदर्याचे बेगडी पांघरूण घालत मानवी मनाभोवती पिंगा घालते आहे. येथील मने दुर्गंधीचा आर्केस्ट्रा होत चाललेली आहेत. वाङ्मयीन, सामाजिक नि सांस्कृतिक वातावरणात कलावादी शहेनशहाची पैदास वाढते आहे. अशा आणीबाणीच्या वातावरणात सरांचा विचार आपल्या अख्या माणुसकीच्या आयुष्यालाच तारून नेणारा आहे.

सरांचे वैचारिक विचारपीठ म्हणजे माणूस फुलविण्याचे साहित्यशास्त्र नि सौंदर्यशास्त्रही आहे. आज सर विभागातून निवृत्त होत असले तरी आपल्या साहित्यनिर्मितीच्या उत्सवातून आम्हा सर्व विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना सतत मार्गदर्शन करण्याच्या निरंतर कार्यातून ते कधीच निवृत्त होणार नाहीत!

..........................................

निर्मल महाराष्ट्र, नागपूर, २६ मार्च २००३

# डॉ. यशवंत मनोहर:उजेडाची कार्यशाळा

■ प्रा. रुपेश नरहरी कऱ्हाडे

बी.ए.भाग दोनला असताना ग्रंथालयात 'उत्थानगुंफा' या कवितासंग्रहाची प्रत मला मिळाली. तेव्हापासूनच मनाच्या कुठल्यातरी एका कोपऱ्यात उत्थानगुंफेतील कविता पाहण्याची, भेटण्याची, संवाद साधण्याची उत्कंठा साठून होती. उत्थानगुंफेतील कवितांच्या भाषेचा धगधगता ज्वालामुखी माझ्या मनाला बी.ए.भाग दोनपासूनच आकर्षित करीत होता. त्यातील विद्रोही शब्दकळा, भाषा वाकविण्याची कवीची सुंदर कलाकुसर या गोष्टींनी मनाला वेगळीच मोहिनी घातली की, मनात ठरविले डॉ. यशवंत मनोहर सरांचाच विद्यार्थी होऊन स्नातकोत्तर शिक्षण नागपूर विद्यापीठाच्या कॅम्पसमध्येच घ्यायचे.

माझ्यासारख्या असंख्य ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डॉ. मनोहर सरांच्या साहित्याने विलक्षण भुरळ घालून नवी वैचारिकता प्रदान केली. त्यांच्या शब्दप्रभुत्वाने माझे डोळेच दिपून गेले. ज्यांच्याविषयी, ज्यांच्या काव्याविषयी खूप सारे ऐकले होते ते सर म्हणजेच डॉ. यशवंत राजाराम मनोहर त्यावेळी स्नातकोत्तर मराठी विभागाचे प्रमुख होते.

कॅम्पसमधील स्नातकोत्तर मराठी विभागात प्रवेश मिळाल्यानंतर काही दिवसांनी तासिकांना सुरुवात झाली. ज्यांच्या अध्यापनाच्या शैलीविषयी खूप सारे ऐकले होते, ज्यांची 'उजेडाच्या प्रार्थना' ही कविता अभ्यासली होती असे ते उजेडाची फुले अंधारात खितपत पडलेल्यांच्या हातावर देऊ इच्छिणारे, उंच-धिप्पाड देहाचे, सदैव चेहऱ्यावर स्मित असणारे, विलक्षण बुद्धिमत्ता ज्यांच्या एकूणच व्यक्तिमत्त्वात ओतप्रोतपणे एकवटली होती असे अतिशय चित्ताकर्षक व्यक्तिमत्त्वाचे धनी, आपला विषय अतिशय मनापासून गंभीरतेने मांडणारे, आश्चर्यचकित करून सोडणारी त्यांची अध्यापनाची पृथगात्म शैली, बुद्धिप्रामाण्यवाद-जीवनवाद अत्यंत तळमळीने मांडणारे, चांगले काय, वाईट काय? जीवनात मित्र कोण? शत्रू कोण? अशा अनेक बाबी निर्भीडपणे भारदस्त आवाजात मांडणारे माझे सर म्हणजे डॉ. यशवंत मनोहर!

एम.ए. भाग एक (मराठी) चे जवळपास वर्षभराचे तास म्हणजे आम्हाला

सरांची जबरदस्त, मन हेलावून सोडणारी भाषा, त्यांची त्या भाषेला वाकविण्याची हातोटी, अत्यंत गंभीरतेने, भावनावेगाने महत्त्वपूर्ण विषय मांडण्याची उत्कंठा हे एक आगळेवेगळे स्वप्नमय जगच वाटत होते. असा शब्दांचा आणि भाषेचा नायगारा यापूर्वी वर्गात कधीच कोसळताना पाहिला नव्हता. सरांचा व्यासंग, त्यांची वैचारिकता यांच्याद्वारा आम्ही धगधगत्या रसायनाचा अनुभव घेत होतो. आतापर्यंत फक्त सरांच्या कवितांमधून भाषेचा प्रचंड आगडोंब उसळताना पाहिला होता परंतु आता सर आमच्यासमोर प्रत्यक्ष सावयव व साभिनय विषयाची खोलवर मांडणी करताना मी आणि वर्गमित्र पाहात होतो. वेगाने कोसळणाऱ्या धबधब्यासारखे एकामागून एक आम्हाला अपरिचित असे शब्द धाडधाड वर्गात कोसळत होते आणि आम्ही आपल्या अल्पशा कुवतीनुसार त्या शब्दशिल्पांना आपल्या काळजावर कोरून ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत होतो.

डॉ. मनोहर सरांच्या या उत्तुंग अशा व्यक्तिमत्त्वाकडे बघून एक वेगळीच पण आदरयुक्त भीती मनात प्रथम घर करून होती. मनातल्या मनात सरांशी गप्पा कराव्या असे वाटत असे परंतु काय बोलावे? कसे बोलावे? सुचत नव्हते. खेड्यातून नागपूरसारख्या शहरात आल्याने भाषेच्या अशुद्धतेची भीती वाटत होती. माझी मले-तुले वाली भाषा होती. सर अतिशय शुद्ध आणि स्पष्ट बोलत होते. भाषेच्या या न्यूनगंडामुळे मनात सरांशी संवाद साधण्याच्या असलेल्या इच्छेला मनातच बरेच दिवस दडपून ठेवले. परंतु सरांशी भेटण्याची-बोलण्याची अतीव उत्कंठा जोमाने आकार घेत होती. त्यातच आम्ही काही सिनियर मंडळींच्याकडून सरांच्या ज्ञानाविषयीच्या, त्यांच्या प्रेमळ व विद्यार्थ्यांना समजून घेणाऱ्या स्वभावाच्या चर्चा बऱ्याच ऐकल्या होत्या. त्यामुळे सरांना भेटण्याची आकांक्षा शिगेला पोहचत होती. एका सिनियर विद्यार्थ्याला सरांच्या घरी घेऊन जाण्याविषयी बोललो परंतु सरांकडे जाण्याची संधीच मिळाली नाही. परंतु एकेदिवशी आधुनिक कविता या पेपरचा अभ्यास करताना कविवर्य केशवसुत, मर्ढेकर, यांच्या कवितेवर समीक्षेचे पुस्तक कॅम्पसच्या ग्रंथालयात शोधताना 'मराठी कविता आणि आधुनिकता' हे पुस्तक मला गवसले. त्या पुस्तकाचे लेखक डॉ. यशवंत मनोहर सरच होते. ते पुस्तक वाचले त्यात आमच्या अभ्यासक्रमात असलेल्या बऱ्याच कवींच्या कवितेवर सरांनी जबरदस्त समीक्षा लिहिली होती. ते पुस्तक आपल्याजवळ असावे असे मला वाटत होते. अनोळखी शहरात पुस्तकांची दुकाने शोधण्याची पुरेशी हिंमत माझ्यात नव्हती. मनात मात्र ठरविले की, या पुस्तकाच्या निमित्ताने तरी सरांकडे जायचे. एकटाच सरांचे घर शोधत सरांच्या क्वार्टरमध्ये गेलो. मनात खूप भीती होती. साऱ्या अंगाला घाम सुटला होता. छातीची धडधड वाढली

होती. सर घरीच अभ्यासात मग्न होते. मॅडमने मला बसायला सांगितले. थोड्यावेळाने सर आले. अत्यंत प्रेमाने सरांनी विचारपूस केली. नाव-गाव, वर्ग, वडील काय करतात? भाऊ-बहिणी किती? नागपुरात कुठे राहतोस? इत्यादी सगळी माहिती वडिलांच्या प्रेमळपणाने विचारली. मी थोडं घाबरतच उत्तरे दिली. ज्या 'मराठी कविता आणि आधुनिकता' या पुस्तकासाठी सरांकडे गेलो होतो ते पुस्तकही सरांनी लगेचच मला दिले. प्रत्यक्ष लेखकाच्या हातून पुस्तक घेताना मला अत्यानंद झाला होता. नागपुरात माझ्याजवळ असलेले ते पहिले पुस्तक होते. पुन्हा माझ्यासाठी आनंदाची बाब म्हणजे पुस्तकावर सरांनी आपली अत्यंत सुंदर स्वाक्षरी केली. ते पुस्तक घेत सरांचा निरोप घेऊन, मी बाहेर आलो तर सर स्वतः मला सोडायला फाटकापर्यंत आले. त्यामुळे सरांच्या मनातील आपल्या विद्यार्थ्यांविषयीचा भाव, त्यांना समजून घेऊन मदत करण्याची वृत्ती, सरांच्या प्रेमळ मनाचा आलेला अनुभव यामुळे डॉ. मनोहर सर म्हणजे माझ्यासारख्या खेड्यातील वाळवंटाला सापडलेला ओयासिसच भासत होते.

माझ्या मनातील सगळी भीती जाऊन एक ऊर्जा मनात निर्माण होत होती. सरांचा सखोल व्यासंग, सरांचे इहवादी मानवकेंद्री विचार मनाला वेगळ्याच प्रकारची बळकटी देत होते. त्यांची शिकविण्याची तळमळ, अभ्यासाची जिद्द, चिकाटी, समाजासाठी काहीतरी नावीन्यपूर्ण करण्याची आकांक्षा, माझ्यासारख्या असंख्य विद्यार्थ्यांना नवीन प्रेरणा देणारी होती. धमन्या-धमन्यात या नवऊर्जेचा प्रवाह सळसळत वाहत होता. डॉ. मनोहर सरांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्वच प्रत्येक विद्यार्थ्याला महाप्रेरणादायी असेच आहे. महाराष्ट्राच्याच नव्हे तर समग्र भारतातील विद्यार्थ्यांच्या आणि समाजाच्या मनावरील तिमिर पुसून काढणारे डॉ. मनोहर हे एक महाउजेडच आहे. जीवन जगताना त्यांनी आपल्या तत्त्वांशी कधीही तडजोड केली नाही, आपला स्वाभिमान कुठेही ढळू दिला नाही. संकटांशी निधड्या छातीने मुकाबला केला.

मराठी साहित्याच्या क्षेत्रात मुकुटमणी शोभावा इतकी भरघोस आणि दर्जेदार साहित्यकृतींची निर्मिती डॉ. मनोहर सरांनी केली आहे. आज कविता, कादंबरी, वैचारिक निबंध, ललितनिबंध, समीक्षा, प्रवासवर्णन, पत्रसंग्रह अशा लेखनप्रकारांसोबतच समुचितचे संपादक, बुद्धिवादी सौंदर्यशास्त्रकार, प्रस्तावनाकार अशा विविध क्षेत्रात आपली जबरदस्त पकड ठेवून अमीट असा ठसा उमटविणारे डॉ. यशवंत मनोहर सरच! डॉ. मनोहर सरांना आजतरी मराठी साहित्याच्या क्षेत्रात तद्वतच आंबेडकरवादी मराठी साहित्यक्षेत्रात दुसरा पर्याय असेल तर ते स्वतः डॉ. यशवंत मनोहरच!

'येरला' या काटोल तालुक्यातील गरीब आणि अशिक्षित शेतकऱ्याच्या या मुलाने स्तंभित करणारी विचारशृंखला आपल्या छोट्या-मोठ्या जवळपास ६०-७० पुस्तकांच्यारूपाने वाचक-विचारवंतांसमोर अनन्यसाधारण असा वैचारिक अक्षय खजिनाच उपलब्ध करून दिला आहे. कुठलाही वैचारिक, शैक्षणिक असा वारसा नसतानाही एवढा मोठा ज्ञानाचा हिमालय सरांनी गाठला ही गोष्टच अद्भुत अशी आहे. त्यामागे जिद्द, चिकाटी, नव्या विज्ञानवादी विचारांचे आकर्षण, अविश्रांत मेहनत, अविरत व्यासंग, इहवादी-सामाजिक जाणीव यांचा सर्वांत महत्त्वपूर्ण असा वाटा आहे. असा हा अत्यंत सामान्य, गरीब कुटुंबातील मुलगा आज महाराष्ट्राचाच नव्हे तर या देशाचा महान साहित्यिक म्हणून अत्युच्च शिखरावर विराजमान आहे.

एवढ्या बलाढ्य उंचीचा हा माणूस. परंतु कुठलाही गर्व, दंभ सरांना शिवत नाही. मोठे राजकारणी, महान साहित्यिक, अधिकारी, चित्रपटकलावंत सरांच्या भेटीसाठी आसुसतात. त्यांच्यात नेहमी विविधांगी परिवर्तनवादी वैचारिक चर्चा रंगत असतात. परंतु एखादा सामान्य माणूस अथवा विद्यार्थी यांच्यासोबत वागताना बोलताना हा मोठेपणाचा बडेजाव सर कधीही बाळगत नाही.

डॉ. मनोहर सरांच्या जीवनातील आचारसंहितेत जाती-पातीचा, पोटजातीचा असा कुठलाच विचार नाही. सर अक्रम पठाण, प्रा. डॉ. प्रभंजन चव्हाण, प्रा. प्रकाश राठोड, प्रा. कोमल ठाकरे, डॉ. अरुणा देशमुख, प्रा. इंदिरा आठवले, डॉ.वासुदेव डहाके अशा विविध स्तरांतून आलेल्या विद्यार्थ्यांना डॉ. मनोहर सरांनी समतेची वागणूक दिली. एवढे हे मनाचे औदार्य सरांच्या व्यक्तिमत्त्वात साठलेले आहे. सगळ्यांनाच मायेची उब प्रदान करून प्रज्ञेच्या क्षेत्रात शक्तिशाली बनविण्याची क्षमता सरांच्या एकूणच व्यक्तिमत्त्वात ओतप्रोत भरलेली आढळून येते. त्याचप्रमाणे सरांना कुठलेही वाईट व्यसन नाही. सिगरेट, मद्यपान व इतर तत्सम व्यसनांपासून सर फार दूर आहेत. सरांचे चारित्र्यही अत्यंत निर्मळ आहे. त्यांची शिस्तप्रियता, लेखनातील सातत्य, व्यासंगातील सातत्य अतुलनीय आणि अनुकरणप्रिय आहे.

नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर मराठी विभागात २० जून १९७८ ला ते प्राध्यापक म्हणून रुजू झाले आणि ३१ मार्च २००३ ला याच विभागातून सेवानिवृत्त झाले. या विभागातील प्रदीर्घ सेवेत अनेक खाचखळग्यांचे अनुभव त्यांनी घेतले. कुठल्याही संकटाला न जुमानता अतिशय खंबीरपणे संकटांचा मुकाबला केला. स्नातकोत्तर मराठी विभागात अध्यापनाचे कार्य करत असताना सरांची वर्गातील एन्ट्री अत्यंत जबरदस्त देखणी, गंभीर व शालिनतापूर्ण असायची.

वेळेवर तासाला येणे आणि तास संपताच निघून जाणे हा सरांचा नित्यनियमच असायचा. कुठल्याही प्रकारचा गोंधळ, अशांतता या गोष्टी सरांना विभागाच्या व्हरांड्यात तसेच वर्गातही खपायच्या नाहीत. अत्यंत गंभीर अशा विषयाला विलक्षण चातुर्याने आणि सोपेपणाने सर हात घालायचे की कळत-नकळत आम्ही विद्यार्थी ॲरिस्टॉटल, डोस्टोव्हस्की, मॅक्झिम गोर्की, मायकोव्हस्की, पॉल रॉबसन, पाब्लो नेरुदा या मोठमोठ्या विचारवंतांचे विचार आम्ही आपल्या कुवतीनुसार ग्रहण करायचो. त्यांचा एकूणच व्यासंग, आशयसंपन्नता, उच्चाराची स्पष्टता, मुद्दा स्पष्ट करण्याची आगळीवेगळी हृदयभेदक शब्दकळा या बहुआयामी वैशिष्ट्यांनी नटलेले सरांचे अध्यापन खरोखरच आमचे अंतर्बाह्य मत आणि मनःपरिवर्तन करणारे होते.

विषय कोणताही असो सर त्या विषयाला अतिशय वेगळ्या अप्रतिम शैलीने न्याय देणारच! कोणताही कठीण मुद्दा सोपा करून व विविध संदर्भासहीत सुंदर अशी गुंफण करून सर स्पष्ट करायचे. शिकविताना सर अध्यात्म, कलावाद याविरुद्ध अत्यंत नेमके व स्पष्ट विचार मांडत. अध्यात्म व कलावाद याविरुद्ध त्यांनी या स्नातकोत्तर मराठी विभागात एकप्रकारे बंडच उभारले होते. परंतु अध्यात्म व कलावाद याला अत्यंत सुंदर उत्तर सरांनी दिले. हा संघर्ष सरांच्या वाणीतून वर्गात धबधब्यासारखा कोसळताना दिसे. अध्यात्म, कलावाद यांच्याविरुद्धच्या संघर्षात सरांचा बुद्धिप्रामाण्यवाद, जीवनवाद जिंकल्याचे दिसून येते. वर्गात फळ्याचा संपूर्ण तासभर वापर करणारे एकमेव सर म्हणजे डॉ. मनोहर सरच. विद्यार्थ्यांचे आदर्श आणि अत्यंतिक प्रिय असे सर. आजही माझ्यासारखे सरांचे विद्यार्थी त्यांच्या शिकविण्याच्या शैलीचे आपल्या अध्यापनात अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात. महाराष्ट्रात कानाकोपऱ्यात सरांचे विद्यार्थी अत्यंत जागृत राहून समाजप्रबोधन करताना दिसतात म्हणजेच सरांच्या अध्यापन आणि त्यांच्या वैचारिकतेचा अभंग असा प्रभाव विद्यार्थ्यांवर पडलेला आहे असे माझ्या प्रत्ययास येताना दिसते.

नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर मराठी विभागाचे विभाग प्रमुख म्हणून सरांनी ३१ जानेवारी १९९५ ते २१ ऑगस्ट १९९६ पर्यंत अत्यंत यशस्वीपणे काम केले. या काळात अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चासत्रांचे तसेच अभ्यासापयोगी कार्यक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना साहित्याभासांची एक पर्वणीच त्यांनी उपलब्ध करून दिली.

नागपूर विद्यापीठातील 'साहित्यशास्त्र आणि भाषाशास्त्र' या महत्त्वपूर्ण विषयांचा नवा अभ्यासक्रमही डॉ. मनोहर सरांनी अतिशय परिश्रमपूर्वक तयार

केला. नवे विचारप्रवाह या अभ्यासक्रमात समाविष्ट केले. हेही सरांचे अतिशय उल्लेखनीय कार्य आहे.

स्नातकोत्तर मराठी विभागाचा सरांनी कायापालट केला. या सर्व कार्यामुळे सर या विभागाचे बहुमोल रत्नमणीच शोभताना दिसतात.

सरांनी आपल्या अध्यापन व मार्गदर्शनाच्या बळावर अनेक उत्कृष्ट प्राध्यापक, समाजसेवक, अधिकारी निर्माण केले. हे सर्व शिष्य सरांकडून घेतलेला उजेड अखिल भारतभर पेरताना दिसत आहेत. आपल्या अप्रतिम अध्यापनकौशल्याच्या व सखोल वैचारिकतेच्या बळावर नवीन पिढीला नवप्रबोधनवादी दिशा देण्याचे कार्य सरांनी केले. आपल्या विद्यार्थ्यांनी कुठल्याही वावटळीत सापडू नये, दिशाहीन, आशयशून्य अशा वावटळीतून बाहेर पडून अतिशय आशयसंपन्न बुद्धिवादी वैचारिकता जोपासावी यासाठी डॉ. मनोहर सरांनी अथक परिश्रम घेतले. या वादग्रस्त वस्तीतील जीवघेण्या अंधाराला पायदळी तुडवून लखलखीत उजेडाचा वारसदार आपला प्रत्येक विद्यार्थी व्हावा, आपला विद्यार्थी अत्यंत डोळस बनावा यासाठी सरांनी जीवनभर आटापीटा केला आणि आजही त्यांचे हे कार्य चालूच आहे. विद्यार्थ्यांना विविध ज्वलंत सामाजिक विषय देऊन त्यांच्याकडून प्रेमळपणे त्या विषयावर निबंध/लेख लिहून घेऊन त्यातील शुद्धलेखन आवडीने तपासणे अशीही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण हिताची कामे सरांनी कुठलाही कंटाळा न बाळगता केली. गोरगरीब, खेड्यापाड्यातील, तांड्यातील, पाड्यावरील दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्तांना, ओबीसी, मुस्लिम एवढेच नव्हे तर समग्र उपेक्षितांना व संपर्कात येणाऱ्या समग्र विद्यार्थ्यांना सरांनी जातिभेद-धर्मभेद न बाळगता पित्याच्या मायेने उराशी कवटाळले तसेच सौ. पुष्पलता मनोहर या आमच्या आईनेही अतिशय मायेची उधळण माझ्यासारख्या असंख्य विद्यार्थ्यांवर केली.

एकूणच डॉ. यशवंत मनोहर नावाच्या महाप्राध्यापकाने आपल्या विशाल मनाने आमच्यासारख्या छोट्या नदीनाल्यांना आपल्या कुशीत जागा देऊन मनाने केवढे मोठे औदार्य दाखविले हे शब्दात मावण्यासारखे नाही, ते शब्दांच्याही पलीकडचे आहे.

डॉ. यशवंत मनोहर सर म्हणजे आम्हा विद्यार्थ्यांसाठी नेहमीच खुले असणारे एक स्वयंभू ज्ञानपीठ, विद्यापीठच होत. कधीही सर विद्यार्थ्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, समस्यांना सोडविण्यासाठी सदैव तत्पर असतात. सर आपल्या विद्यार्थ्यांना आणि समग्र आंबेडकरवादी समाजाला सावध करताना म्हणतात -

"पायाखाली सुरुंग आणि माथ्यावर आगीचा ढग ओथंबून आहे
जपून रे, माझ्या फिनिक्स पक्षांनो, खूपदा इथे आपला वध झाला आहे.
या जंगलातील खुळ्या अंधाराला चालत नाहीत सूर्य आपले
जपून रे, निखाऱ्यांनो, जपून जरा नास्तिकांचे कूळ आपले."

असा अत्यंत जिव्हाळ्याने सावधगिरीचा इशारा सर देताना दिसतात. डॉ. मनोहर सर हे अत्यंत आशावादी आंबेडकरवादी विचारवंत आहेत म्हणूनच ते म्हणतात -

"पूर बदलतील पात्र, डाळ दगडी शिजेल
आज पेरतो सुगंध, उद्या काव्य उगवेल."

अशी दुर्दम्य आशावादी भूमिका सर घेताना दिसतात. सरांचे एकूणच व्यक्तिमत्त्व सामाजिक बांधिलकी स्वीकारणारे असे आहे. इहवादी भूमिका स्वीकारून बुद्धिप्रामाण्यवाद जीवनवाद यांची पेरणी सरांनी या अखिल महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात केली. या महत्त्वपूर्ण भूमिकेतून अतिशय सर्जनशील मांडणी करून इतरांना दिशा दर्शविणारा प्रबोधनाचा दीपस्तंभ सर बनले आहेत. सरांच्या कवितेतील विधानरूपे, उपहास-विरोध, त्यातील उत्कटता व व्याकुळता, आर्तता या गोष्टी इथल्या विषमतावादी व्यवस्थेच्या विरोधातून निर्माण झालेल्या दिसून येतात.

महाराष्ट्र शासनाने २००३ सालचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सरांचा गौरव केला परंतु सरांनी युगसाक्षी प्रतिभेने अवघ्या महाराष्ट्रालाच नव्हे तर भारताला दिलेले इहवादी, बुद्धिप्रामाण्यवादी विचार आणि विद्यार्थ्यांसाठी त्यांनी केलेल्या अतुलनीय कामगिरीचा आलेख बघितला तर आदर्श शिक्षक हा पुरस्कार सरांच्या कार्यकर्तृत्वापेक्षा अतिशय लहान वाटतो. इतके हिमालयापेक्षाही उत्तुंग असे कार्यकर्तृत्व डॉ. मनोहर सरांचे आहे. सर अत्यंत संयमी आणि सागराप्रमाणे धीरगंभीर आहेत. एकूणच परिवर्तनवादी आंबेडकरसंस्कृती निर्माण करणारे विलक्षण पृथक असे व्यक्तिमत्त्व म्हणजे फक्त डॉ. यशवंत मनोहरच!

डॉ. यशवंत मनोहरांचे लेखन, भाषण, अध्यापन म्हणजे नुसती उजेडाची कार्यशाळाच वाटते. सरांच्या समग्र लेखनातून प्रबोधनाच्या उजेडाचीच पखरण, उधळण झालेली दिसून येते. म्हणूनच डॉ. यशवंत मनोहर हे उजेडाचे असंख्य पथिक निर्माण करणारी उजेडाची एक कार्यशाळाच होत. असेच मला मनापासून म्हणावेसे वाटते. सरांची ही महाउजेडाची कार्यशाळा अशीच विविध टप्प्यांनी वृद्धिंगत होवो आणि त्यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्ताने त्यांना अक्षय जीवन लाभो हीच शुभकामना!

# डॉ. यशवंत मनोहर नावाच्या विद्रोहाचा वाढदिवस

▪ प्रा. धनंजय वाघमारे

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ओठावर उगवलेला प्रलयकारी सूर्य पासष्ट वर्षांचा होत आहे. अर्थात माणसांसाठी आरती गाणारा आणि ज्यांच्या गावी सूर्य नाही अशा माणसांच्या हाती सूर्य देणारा स्वतंत्र प्रज्ञा, प्रतिभेने झळकणारा, ह्या महाराष्ट्रच्याच नव्हे तर, समग्र भारतभूच्या विश्वात सांस्कृतिक आणि साहित्यिक तेजाने तळपणाऱ्या या विद्रोही सूर्याचा २६ मार्च हा वाढदिवस. डॉ. बाबासाहेबांचे विचार कृती आणि उक्तीमध्ये उतरविणाऱ्या आणि बाबासाहेबांनीच दिलेल्या बुद्धाच्या धम्मावर जीवापाड प्रेम करणाऱ्या यशवंत मनोहरांचा जन्म २६ मार्च १९४३ रोजी राजाराम आणि मैनाबाई या दाम्पत्याच्या पोटी झाला.

चौथीपर्यंतचे त्यांचे प्राथमिक शिक्षण येरल्यातच झाले. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी काटोल या गावी रोज सहा मैल पायी जावे लागले. नवव्या वर्गात शिकत असताना मनोहरांना अविनाश वरोकर यांचा सहवास लाभला येथूनच त्यांचा गीत व कवितालेखनास प्रारंभ झाला. मनोहरांचे मोठे बंधू उत्तम प्रवचनकार असल्याने त्यांचाही प्रभाव त्यांच्यावर होताच. त्या बंधुसोबतच मनोहरांनी बालपणी आंबेडकरी गीतगायनाचे कार्यक्रम गावोगावी केले. ती सर्व गीते मनोहरसरांनी स्वतःच रचलेली होती.

राजाराम मनोहरांना बाबासाहेबांच्या चळवळीचा, कार्याचा थोडाफार परिचय झालेला असल्याने बाबासाहेबांसारखेच आपल्या मुलानेही शिकून मोठे व्हावे असे वाटत होते आणि म्हणूनच शाळेमधून पळून येणाऱ्या किंवा शाळा चुकविणाऱ्या छोट्या यशवंताला राजाराम मनोहर गाठोड्यासारखे चादरीत बांधून नेत आणि मास्तरांसमोर टाकत व म्हणत असत की, 'ह्याला मारा, कापा काहीही करा पण घरी पाठवू नका.' शिक्षणावरचे एवढे प्रेम खचितच पाहावयास मिळते. झोपडीवजा घरात छोट्या यशवंताचे बालपण गेले. त्या झोपडीत दोनच खोल्या. आतील स्वयंपाकाची खोली व बाहेरची पडवी. ही बाहेरची पडवी म्हणजे सर्वकाही असलेली खोली. इथेच मनोहर अभ्यास करीत. इथेच पाहुण्यांची उठबस असे. इथेच शेतीचे साहित्य ठेवले जाई. मातृमुखी त्याचा मनोहरांना खूप अभिमान. मनोहर आपल्या आईला माय म्हणून हाक मारत. त्या हाकेत एक जिव्हाळा

होता. ममत्व होते तर ही माय आपल्या लाडक्या प्राध्यापक लेकाला साहेब म्हणत असे. या मातेला आणि राजाराम मनोहरांसारख्या पित्याला अभिमान वाटावा एवढी कीर्ती मनोहरांनी संपादित केली. आई-वडिलांच्या नावाने मुलांना ओळखले जाते इथे मात्र उलट झाले. यशवंत नावाच्या विद्वान, व्यासंगी, कवी, लेखक, विचारवंताच्या नावाने या मातापित्यांना नवी ओळख मिळाली.

ज्या नागसेन वनाने खूप विचारवंत लेखक, कवी घडविले त्या मिलिंदच्या मातीचा पहिला स्पर्श जुलै १९६१ साली मनोहरांच्या पायांना झाला. १९६५ साली कवी वा.रा. कान्त यांच्या हस्ते कॉलेजचा सर्वोत्कृष्ट कवी म्हणून मनोहरांचा सन्मान झाला.

त्या सर्वांच्या सहवासात राहूनदेखील मनोहरांनी आपली स्वतंत्र विचारशक्ती शाबूत ठेवली. कुणाचाही रंग चढू दिला नाही. हे विशेषत्वाने सांगावे वाटते कारण, माणसं लगेचच पंथीय बनतात. गटातटाची बनतात. मनोहरांचे तसे झाले नाही, नव्हे त्यांनी तसे होऊ दिले नाही. हेच खऱ्या विचारवंताचे लक्षण आहे. जुलै १९६७ साली पैठणच्या प्रतिष्ठान महाविद्यालयात मनोहर अधिव्याख्याता म्हणून रुजू झाले. त्यानंतर हिंगोली, नागपूरचे शासकीय महाविद्यालय आणि शेवटी नागपूर विद्यापीठ असा त्यांच्या अध्यापकीय सेवेचा चढता आलेख सांगता येईल. नागपूरच्या शासकीय महाविद्यालयात असताना शरच्चंद्र मुक्तिबोधांचा सहवास लाभला. ७ जून १९७० साली मनोहरांचा विवाह पुष्पलता तायडे यांच्याशी झाला. विशेष म्हणजे लग्नसमारंभासाठी मनोहरांनी नवे कपडे शिवले नाहीत. आहे त्याच कपड्यांवर ते विवाहाला उभे राहिले. इथे मनोहरांमधील काटकसर दिसून येतें. सातव्या वर्गापर्यंत शिकलेल्या पुष्पलताबाईंना मनोहरांनी स्वतः शिकविले. त्या आज एम.ए., एम.फिल.,पीएच.डी. होऊन नागपूरच्या उमाठे मोखारे कॉलेजात मराठीच्या प्राध्यापिका आहेत. इथे आठवण होते ती महात्मा फुले दाम्पत्याची.

१९७७ साली मनोहरांचा 'उत्थानगुंफा' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. आजही पुस्तक प्रकाशित झाले की अपत्य जन्माएवढा आनंद मनोहरांना होतो. त्यानंतर मनोहरांची 'दलित साहित्यःसिद्धान्त आणि स्वरूप', 'स्वाद आणि चिकित्सा' इत्यादी जवळजवळ छोटीमोठी सत्तर पुस्तके प्रकाशित झाली.

मनोहरांनी मनातले विचार मनात जिरू दिले नाहीत तर ते तत्क्षणी कागदावर उतरविले. त्या विचारांची सुंदर भाषणे झाली, कविता झाल्या. अनेक पुस्तकांना मनोहरांनी भरभरून प्रस्तावना लिहिल्या. भाषणे तर पुष्कळच दिली व आजही देत आहेत. मनोहरांचे भाषण म्हणजे एखादा झंझावात किंवा अखंड कोसळणारा

धबधबा. मनोहरांना शब्दासाठी अडून राहावे लागत नाही. एखाद्या गवयाचा जसा सूर लागतो तशी मनोहरांच्या भाषणाची लय लागते. ह्या भाषणात तत्त्वजडता नसते. सामान्यातल्या सामान्य माणसाला आपलीशी वाटणारी ही ओघवती भाषा असते. मनोहरांनी अनेक साहित्य संमेलने केवळ आपल्या भाषणांनी गाजविली आहेत. त्यांच्या कार्यकर्तृत्वाने प्रसिद्धी, कीर्ती त्यांच्यामागे धावत आली. मनोहर १९८९-९० या कालखंडात महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती महामंडळाचे अध्यक्ष झाले. अनेक साहित्य संमेलनांची अध्यक्षपदे मनोहरांनी भूषविली. भारतीय ज्ञानपीठाच्या भारतीय कवितामध्ये मनोहरांच्या काही कवितांचा समावेश आहे.

जानेवारी १९८४ साली मनोहरांनी 'समुचित' हे त्रैमासिक सुरू केले ते बारा वर्षे अतिशय वेगाने चालविले. समुचितने महाराष्ट्राचा सांस्कृतिक तळ ढवळून काढला. यशस्वी संपादक म्हणून मनोहर समाजासमोर आले. मनोहरांच्या अनेक ग्रंथांना, पुस्तकांना मोठमोठे पुरस्कार मिळाले. त्यात १९८० साली उत्थानगुंफाला महाराष्ट्र राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला. स्मरणांची कारंजी, निबंधकार डॉ. आंबेडकर, समाज आणि साहित्य समीक्षा या पुस्तकांना राज्य शासनाचे पुरस्कार लाभले. तसेच प्रादेशिक स्तरावरील छोटे-मोठे अनेक पुरस्कार मनोहरांच्या पुस्तकांना लाभले आहेत.

मनोहरांच्या साहित्याचा महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील अनेक विद्यापीठांमध्ये समावेश करण्यात आला आहे. मनोहरांच्या साहित्यसंपदेचा व्याप पाहिल्यास आपण थक्क होऊन जातो. वैचारिक, ललित, समीक्षा आणि संपादनपर असे त्यांचे समग्र साहित्य पाहिल्यास हा मनुष्य एवढे कधी लिहीत असेल असा प्रश्न सहजच पडतो. मनोहरांच्याच भाषेत सांगायचे झाल्यास उपाशी पोटीच हे सर्व लेखन होते. या विधानात दोन अर्थ दडले आहे. सुज्ञास सहजच कळेल. मनोहरांनी आपल्या एकूण साहित्यिक आणि सांस्कृतिक जीवनात परिवर्तनाला अतिशय महत्त्व दिले आहे. हे परिवर्तन, ही क्रांती सर्वंकष आहे. बुद्धाचा, चार्वाक, फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मनोहरांवर अतिशय प्रभाव आहे हे आपण जाणतोच. जडवाद, इहवाद, सामाजिक समता, समाजवाद, विज्ञानवाद, बुद्धिवाद हे मनोहरांच्या कोशामधील अत्यंत प्रिय शब्द आहेत. किंबहुना या शब्दांशिवाय त्यांचा कोश अपूर्ण राहील.

प्रस्थापित समीक्षेने दलित साहित्य नाकारले किंवा नाकडोळे मुरडले तेव्हा वेगळ्या समीक्षाशास्त्राची आणि सौंदर्यशास्त्राची मांडणी करणारे प्रमुख समीक्षक आणि सौंदर्यमीमांसक म्हणून यशवंत मनोहर हे नाव आपल्यापुढे येते. प्रस्थापितांच्या या सौंदर्यशास्त्राला त्यांनी कौरुप्यशास्त्र म्हणून संबोधले आणि बुद्धिवादी सौंदर्यशास्त्र

जन्माला घातले. नवे साहित्यशास्त्र निर्मिले.

आणखी एक मोलाची गोष्ट मनोहरांनी केली. ती म्हणजे कुचेष्टेने वापरला जाणारा किंवा आपले कमीपण दाखविणारा दलित हा शब्दच त्यांनी नाकारला. दलित साहित्याचे नामांतर आंबेडकरवादी साहित्य ही घोषणाच त्यांनी केली. त्यासाठी एक पुस्तकच लिहून काढले. हा निर्णय अत्यंत धाडसाचा होता. प्रसंगी एकूणच चळवळीतून त्यांना बाहेरही फेकले जाऊ शकले असते पण मनोहर डगमगले नाहीत. आपल्या भूमिकेवर ते ठाम राहिले आणि मनोहरांचा विजय झाला. आंबेडकरवादी साहित्य हे नाव लोक उच्चरवाने घेऊ लागले आहेत. या नावाने चळवळीला नवा आयाम दिला गेला. आंबेडकरी चळवळीवर मनोहरांचे बारीक लक्ष आहे. मार्गभ्रष्ट झालेल्या, वाट चुकलेल्या पाखरांना मार्ग दाखविण्यासाठी मनोहरांनी 'आंबेडकरी चळवळीतील अंतर्विरोध' आणि 'रिपब्लिकन पक्ष : बांधणीची एक दिशा' असे ग्रंथच लिहिले आहेत. त्यातून खरोखरच आंबेडकरवादी समाजाने बोध घ्यावा असेच ते ग्रंथ आहेत. मनोहरांचे कार्यकर्तृत्व एवढे व्यापक आहे की शब्द कमी पडावेत. मनोहर एवढेच करून थांबले नाहीत तर त्यांनी अनेक विद्यार्थी घडविले. अनेक प्राध्यापक घडविले. त्याचीच पावती म्हणून याच विद्यार्थ्यांनी मनोहरसरांवरील प्रेमापोटी तीन गौरवग्रंथ काढले आहेत. त्यांच्या साहित्यावर संशोधन करणाऱ्या तीन संशोधकांना आजवर पीएच.डी. पदवी मिळाली आहे आणि आठ-दहा संशोधक त्यांच्या साहित्यावर पीएच.डी.साठी संशोधन करीत आहेत. २००३ मध्ये मनोहर नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर विभागातून सेवानिवृत्त झाले. ही निवृत्ती तांत्रिक होती आता खरी त्यांची सेवा सुरू झाली आहे. त्यांच्या घरीच आता विद्यापीठ भरते, चर्चा होते, संमेलने होतात. महाराष्ट्रातील मोठ्या कवी, लेखकांनी या चालत्या बोलत्या विद्यापीठातील मैफिलींचा लाभ घेतला आहे. पु.ल.देशपांडे, भाई वैद्य, वा.लं., बाबा आढाव, बाबुराव बागूल, जनार्दन वाघमारे इ. थोर लोकांचा सहवास मनोहरांना लाभला. त्यातूनच त्यांच्यातील लेखक, कवी, समीक्षक तयार झाला. वाढला असेच म्हणावे लागेल.

संपूर्ण महाराष्ट्र व्यापून उरलेलं असं हे व्यक्तिमत्त्व आपणा सर्वांच्या साक्षीने ६६ वर्षात पदार्पण करीत आहे. महाराष्ट्राचे सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि शैक्षणिक क्षितिज आपल्या विचारांनी समृद्ध करणाऱ्या या ज्ञानसूर्यास वाढदिवसानिमित्त कोटी कोटी शुभेच्छा!

# ३६

# नीलाग्नी संप्रदायाचे अग्रणी : डॉ. यशवंत मनोहर

■ प्राचार्य डॉ.भगवान ठाकूर

मराठीच्या काव्येतिहासात कुसुमाग्रजादी कवींना अग्नी संप्रदायाचे कवी म्हणून सन्मानाने गौरविले जाते. आंबेडकरवादी काव्येतिहासात आपल्या ऊर्जस्वल, क्रान्तदर्शी, सूर्याशी दोस्ती, उजेडाशी जवळीक करून, प्रकाशाची नीळी वस्ती उभारण्याची जिद्द बाळगणारे डॉ. यशवंत मनोहर हे निलाग्नी संप्रदायाचे एक अग्रणी कवी आहेत. दलित कवितेच्या वेदना, विद्रोह आणि नकाराच्या पुढे जाऊन धम्मदर्शनाचा, प्रज्ञा-शील, करुणा, मैत्रीचा, नास्तिकता, इहवाद, लोकशाही मानवतावादी मूल्यधारणेचा प्रांजळ जागर चालणारा हा कवी अन्य समकालीन आंबेडकरवादी कविपेक्षा तर वेगळा, शुद्ध निळ्या जाणिवेचा आहेच, पण एकूणच मराठी कवींमध्येही वैशिष्ट्यपूर्ण आहे. भाकरीच्या लढाईची कविता लिहिणारा, समाजवास्तवाशी इमानदारी राखणारा, बुद्ध-फुले-शाहू-आंबेडकरांच्या बांधिलकीचे त्रिसरण आणि पंचशील श्वासाश्वासातून गाणारा, बोधिवृक्षाला करुणेची कार्यशाळा, करुणेला माणुसकीचे विद्यापीठ मानणारा सच्चा आंबेडकरवादी कवी, समीक्षक, विचारवंत, कादंबरीकार, प्रवासवर्णनकार, ललितनिबंधलेखक आणि आंबेडकरी सांस्कृतिक, वाङ्मयीन इतिहासाचे मर्मज्ञ संशोधक आणि भाष्यकार म्हणूनही त्यांचे कार्य खूप मौलिक आहे. त्यांच्या समग्र साहित्यात विद्रोह नकाराचा तीव्र स्वर जसा आहे तसा धम्मदर्शनाचा सुगंध आणि निळे सौंदर्यही आहे. 'आंबेडकरवादी साहित्य' या संकल्पनेची त्यांनी केलेली शास्त्रशुद्ध मांडणी धम्माधिष्ठित कालोचित आणि यथार्थ आहे.

> 'ए बादे सबाँ, कुछ तुने सुना?
> फनकार भीम का यशवंत बनकर छाये है
> कलियाँ न बिछाना राहों में
> हम आँख बिछाने वाले है।'

या शब्दात यशवंत मनोहर यांचा गौरव करणे उचित होईल. सातत्याने ३०-३५ वर्षे ६०-७० सकस, मूलग्राही लहानमोठ्या मौलिक पुस्तकांची निर्मिती करून धम्ममार्गावरून एखाद्या निष्ठावंत समता सैनिकासारखा 'आम्ही' सोबत राहणारा हा कलावंत त्यांच्याच कवितेत ते म्हणतात तसे 'कार्यकर्ते सूर्य व्हा'

याप्रमाणे कार्यकर्ते सूर्य झाले आहेत.

एक ख्यातकीर्त निग्रो नेता त्याच्या महानतेच्या वाटचालीबद्दल विचारले असता म्हणाला होता, 'Please don't Judge me where I am, Judge me from where I have started.' याप्रमाणे यशवंत मनोहर यांची बालपणापासूनची खडतर वाटचाल पाहिली की आजच्या त्यांच्या स्थानाचं मोल कळते. नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील येरलासारख्या लहानशा गावात संपूर्ण अभावग्रस्त, नाहीरे कुटुंबात २६ मार्च १९४३ रोजी जन्मलेले यशवंत मनोहर अडचणी, वंचना आणि उपेक्षांचा काटेरी माळ तुडवतच इथवर आलेत. 'जन्माला १९४३ साली आलो तरी जगण्याला फार उशिरा सुरुवात झाली' हे त्यांचेच वाक्य फार सारगर्भ आहे. त्यांचे साहित्य म्हणजे जगण्याच्या प्रश्नांनी घेतलेली त्यांची मुलाखत होय. जेव्हा ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निळ्या छायेत आलेत, तेव्हा त्यांना प्रतीत झाले की,

"जीवन मला आता कळू लागले
भीमपथी पावले वळू लागले
तुडविल्या त्या वाटा नव्हत्याच माझ्या
राज मार्गास सारेच वळू लागले."

संस्कृती म्हणजे माणुसकीचे सौंदर्यशास्त्र आणि माणुसकी म्हणजे संस्कृतीचे तत्त्वज्ञान असे मानणारा हा प्रज्ञावंत कलावंत. त्यांच्या मायमाउलीने नक्कीच,

"सखे लेकरू माझे लडिवाळ व्हावे ग
जात धर्मांधांसाठी ते काळ व्हावे ग
जोतीबासम विजाळ अन् तेजाळ व्हावे ग
अण्णा भाऊंसम क्रांतीचा फाळ व्हावे ग
वाढताना भीमासम निळे आभाळ व्हावे ग"

असे निळे स्वप्न पाहिले असेल.

जन्माला तर कोट्यवधी माणसे येतात. कावळे-चिमण्या चार काटक्या गोळा करून घरटी बांधतात, पिलावळीची वीण वाढवतात अन् शेवटी मरून जातात अशी कावळे-चिमण्यांसारखी अस्तित्वशून्य माणसे कोट्यवधी पण,

"प्राप्त काल हा विशाल भूधर
सुंदर लेणी तयात खोदा
निज नामे त्यावरती नोंदा
बसुनी वाढविता का मेदा"

या केशवसुत उक्तीप्रमाणे काळाच्या पाठीवर स्वकर्तृत्वाची अक्षर स्वाक्षरी उमटविणारी यशवंत मनोहरांसारखी माणसे इतरांनाही जगण्याचं बळ देऊन जातात. पे बॅक टू सोसायटी,

''अपने लिये जिए तो क्या जिए
ए जी तू जी जमाने के लिये''

असे मानणारी यशवंत मनोहरांसारखी थोडी माणसे दिसतात आणि मग सहज वाटून आणि पटूनही जाते की,

''गर्दीत माणसांच्या प्रज्ञावंत पाहिला मी
होताच मनोहर आधी 'यशवंत' पाहिला मी''

संख्यात्मकता आणि गुणात्मकता या दोन्ही निकषांवर यशवंत मनोहर यांचे लेखन सरस आणि श्रीमंत आहे. विविध वाङ्मय प्रकारात सिद्धहस्त लेखन करणारे, चतुरस्त्र प्रतिभेचे, कलात्मक, काव्यात्मक, सौंदर्यासक्त वृत्तीचे आणि त्याचवेळी आंबेडकरवाद, जीवनवाद, नास्तिकता, इहवाद आणि एकूणच समग्र वैश्विक मानवतावादाचे नवे जातक निर्मिणारे सूर्यकुळातील प्रांजळ प्रज्ञावंत ते आहेत.

''माझ्या पेटत्या काळजातील अग्नीचा आदिबंध व्हा तुम्ही'' असं समष्टीला आवाहन करणारा कवी हा इतिहासदत्त जबाबदारीच इमानदारीने निभावतो आहे असे म्हणावे लागेल. दलित साहित्याच्या प्रारंभकाळी काही दलितेतर काव्यकोविदांनी दलित कवितेची धर्मादाय समीक्षा केली आहे. या प्रकारच्या समीक्षेत न मावणारे, कवितेच्या कविता म्हणून सर्व कलामूल्यांच्या निकषांवर बावनकशी सोन्यासारखी खरी उतरणारी यशवंत मनोहरांची कविता आहे. शिवाय ती आंबेडकरवादाकडे वेगाने वाटचाल करीत आल्यामुळे समकालीन दलित कवितेपेक्षाही वेगळी आहे. आंबेडकरवादी साहित्य मीमांसेला नवी दिशा, आयाम, मानदंड देणारे ते भाष्यकार आहेत. त्यांची कविता हे त्याचेच प्रमाण आहे. तथापि परक्यांनी काय आणि स्वकीयांनी काय जशी आणि जेवढी त्यांच्या कार्यकर्तृत्वाची वाङ्मयीन नोंद घ्यायला हवी होती तेवढी घेतलेली दिसत नाही.

''उन्ही फकीरों ने यहाँ इतिहास बनाया है,
जिनपे लिखने के लिये इतिहास के पास भी वक्त न था।''

असेच म्हणावेस वाटते. त्यांची 'रमाई' ही कादंबरी आंबेडकरवादी कादंबरीत 'माईल स्टोन' आहे. अश्रू हे कृतज्ञतेचे सर्वांत निर्मळ रूप आहे. 'रमाई' वाचल्यावर रडला नाही असा एकही वाचक नाही. यशवंत मनोहरांच्या गद्यातही लालित्य आणि भावोत्कटता आहे. 'लिरीकल प्रोज' असेच त्यांचे प्रवासवर्णनही

आहे आणि ललित निबंधही. ते विचारकवी आहेत. त्यांच्या कवितेला विद्रोहाची धार आहे. सौंदर्याची भरजरी किनार आहे आणि सुगंधित धम्मफुलांची निळी वेलबुट्टी आहे. प्रज्ञा, शील, करुणा आणि मैत्रीचा 'बुद्ध गयेचा पिवळा वारा' त्यांच्या काव्यभर जाणवतो.

आशयलय-विचारलय - आशयसौंदर्य म्हणजे विचारसौंदर्य हा तर त्यांच्या काव्याचा कणाच आहे. भावलय शब्दसौंदर्य अभिव्यक्तीची नजाकत ही विलक्षण आहे. ती काहीशी विधानात्मक असली तरी त्यांच्या कवितेत प्रपातासारखी अभिव्यक्तीची गतिमानता, वेग-आवेग आहे. अर्थपूर्ण प्रतिमा आणि प्रतिकांचं अण्वस्त्रसामर्थ्य त्यात ठासून भरले आहे. आवेगी भावस्थिती हा त्यांच्या कवितेचा स्थायीभाव आहे.

स्त्रीशूद्रातिशूद्र समाजाची सर्वार्थाने कोंडी करणारी, नागवणूक करणारी इथली धर्मव्यवस्था, जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, मनुवाद इ. बद्दल निषेधाची तीव्रतर भावना त्यांच्या सर्व कवितांमधून प्रकट होते. उद्याच्या सूर्याशी दोस्ती करणारी, विजांशी गुजगोष्टी करणारी, वादळाच्या मोर्चात नाचणारी क्रान्तदर्शी कविता असेच त्यांच्या कवितेचे वर्णन करता येईल. वैचारिकता, भावनात्मकता, सामाजिकता आणि आत्मनिष्ठा असा चौपदरी गोफ असावा तशी घट्ट विण असलेली 'मी' आणि 'आम्ही' यांची सेंद्रिय एकरूपता असलेली अशी त्यांची कविता अनन्यसाधारणच म्हटली पाहिजे.

''देव, दैव, अध्यात्म, वर्णव्यवस्था या साऱ्यांवर आपण नांगर धरतो.'' अशा शब्दात ते मूलतत्त्ववाद नाकारतात. ''आंबेडकरांच्या ओठावरील सूर्य होऊन आपण त्या साऱ्यांना जाळत सुटणार आहोत, दलित-शोषितांच्या दुःखाला आपली कविता शब्द देते, प्रकाश देते, त्यांच्या हातातले शस्त्र बनते असेही ते म्हणतात. विद्रोही, उद्रेकी जाणिवांनी त्यांची कविता दारूगोळ्यांच्या कोठारासारखी ठासून भरली आहे. त्यांच्या कवितेचे वर्णन त्यांच्याच शब्दात करायचे तर विद्रोही, चार्वाकप्रिय शायरी, संस्कृतीच्या नावाने लिहिलेली जेलडायरी, मार्क्सच्या हृदयाचे वणवे हाती घेतलेली कविता असे करता येईल. मी म्हणेन यशवंत मनोहरांची केवळ कविताच नव्हे तर समग्र लेखन म्हणजे तथागत बुद्धाच्या डोळ्यातील अपार करुणा, धम्मदर्शनाचा निळा सागर. विजिगिषावृत्ती आणि उदंड आशावाद हा या कवितेचा मोठा गुण आहे. ''इथून विजा ओकतील ओठ अटळ आता इथून स्फोट'', ''या रे वादळूनी पेटवा ह्या भिंती'' असा बुलंद हाकारा ते करतात. उजेडाची सार्वभौम युगे आभाळातून पडत नसतात व मातीच्या पायात ज्वाळांचे चाळ बांधून आणि यातनांच्या

ऐतिहासिक अरण्यात विजांचे, शिस्तशीर काफिले पेरून ठेवण्यासही कवी सांगतो. येथून पुढे मी सूर्यकुलाची लागवड करणार आहे असा संकल्प त्यांनी आपल्या उत्थानगुंफेत केला आणि आजतागायत ते त्या निळ्या वाटेवरूनच निष्ठेने चालत आहेत. प्रस्थापित व्यवस्थेच्या ठेकेदारांना ठणकावत कवी म्हणतो, ''शब्दांची पूजा करीत नाही मी माणसांसाठी आरती गातो, ज्यांच्या गावात सूर्य नाही त्यांच्या हातात उजेड देतो.'' एवढेच नव्हे तर कवी असेही बजावतो की, ''या कसाबांच्या जगात माणसे कत्तल केली जातात, हे आकांतून सांगत जाईन, येताना उत्तरे घेऊन आलो होतो, जाताना प्रश्न घेऊन जाईन, जाताना मुक्याने जाणार नाही, या पसाऱ्याला शाप देऊन जाईन.'' कारण इथल्या व्यवस्थेने बहिष्कृतांच्या वाट्याला माणसाचे जगणे कधी येऊच दिले नाही.

''कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही
सदरहू पिक आम्ही आसवांवर काढले आहे.''

हेच भूतकालीन वास्तव होते. म्हणून इथल्या व्यवस्थेला नीट आणि धीट खडसावणारी त्यांची कविता आहे. ''कधी नव्हे असे आज आभाळ भरून आले आहे आणि स्मशान पेटेस्तोवर इथे विद्रोहाचा पाऊस कोसळणार आहे'' असे म्हणूनच ते म्हणतात, ''मनात सुगंध आणि हातात कवितांची वही घेऊनच एका प्रकाशमान जीवनाचे स्वप्न पाहणारा विलक्षण तरल प्रतिभेचा, प्रांजळ प्रज्ञेचा हा कवी आहे. प्रकाशाचे निळे पंचशील गात, सौंदर्याचे त्रिसरण अनुसरत हा कवी 'जपून रे माझ्या फिनिक्स पक्ष्यांनो' असा भीमपुत्रांना इशाराही देत आहे. स्वतःचा स्वर समूहात आणि समूहाचा स्वर स्वतःच मिसळणारा विराट जनयात्रेतील यात्रिक कवी म्हणजे यशवंत मनोहर. सत्यनिरपेक्ष काव्य आणि काव्यनिरपेक्ष सत्य या दोन्ही गोष्टी काव्याच्या संदर्भात संभवत नाहीत. अशी सत्यान्वेषी कबीरपंथी धारणा असलेला हा कवी आंबेडकरवादी काव्यपरंपरेत स्वतःच एक मानदंडरूप आहे.

''सिर्फ हंगामा खडा करना मेरा मक्सद नहीं
मेरी कोशिश है की ये सुरत बदलनी चाहिए
मेरे सिने में नहीं तो तेरे सिनेमे सही
हो कहीं भी, लेकीन ये आग जलनी चाहिए।''

ही या कवीची समाजाचा जागल्या म्हणून प्रतिज्ञा आहे. ते बुद्धिवादी सौंदर्यशास्त्राची शास्त्रशुद्ध मांडणी करणारे मर्मज्ञ मीमांसक आहेत. सौंदर्य हीच सौंदर्याची संस्कृती आहे असे ते मानतात. सौंदर्य हे स्वतःच सर्व विधायक मूल्ये पोटात वागविणारे महामूल्य आहेत असे त्यांना वाटते. ''सब्बे सत्ता

सुखी होन्तु, सब्बे होन्तुच खेमिनो। सब्बे भद्राणि पस्सन्तु, मा कच्चिदुक्खमागमा'' असे मानणारे आणि यालाच प्रज्ञावंत माणुसकीची काव्यपौर्णिमा संबोधणारे ते साक्षात माणुसकीच्या गदगदलेल्या झाडासारखे करुणामयी आणि विश्वकल्याणाची कामना निळ्या आभाळाकडे करणारे प्रतिभावंत सर्जक आहेत. त्यांच्या आंबेडकरवादी साहित्याने मराठी ललित साहित्यासोबतच उपयोजित आणि सैद्धान्तिक समीक्षेतही नवीन प्रकाशगर्भ क्षितिज खुले करून दिले आहे.

यशवंत मनोहर सच्चा कलावंत कार्यकर्ता आहेतच, एक सच्चा माणुसही आहे.

''कित्येक पाहिलेत कलावंत आणि त्यांची कलाही
माणुसकीच आहे श्रेष्ठ सर्वत्र हिंडुनी पाही.''

कुणी कलावंत, विचारवंत म्हणून कणभर कमी असला तरी चालतो पण माणुसकीत काकणभर सरसच हवा. यशवंत मनोहर यांनी अशी माणुसकी जपली आहे.

''ज्याला म्हणून आपला मानले
साथ कधी अर्ध्यावर सोडली नाही
बेहिशोब केले प्रेम सर्वस्वी सर्वांवर
बेइमानांशी मैत्री कधी जोडली नाही
तत्त्वांशी तडजोड कधी जमलीच नाही.''

चांगल्याला चांगलं म्हणण्यासाठी मन दर्यादिल असावे लागते आणि वाईटाला वाईट म्हणण्यासाठी हिंमत तुफान लागते. यशवंत मनोहर यांचा जवळपास १९८० सालापासून आंबेडकरवादी साहित्यक्षेत्रातील एक इमानदार भीमसैनिक म्हणून माझा परिचय व स्नेह आहे. मी केवळ मैत्रभावाने लिहितोय असे नव्हे पण -

''दशकों के बाद कोई दाता पैदा होता है।
मुद्दत के बाद कोई नेता यहाँ होता है।
अर्सों के बाद कोई गीतकार जनम लेता है।
लेकीन सदियों के बाद यशवंत मनोहर जैसा
सच्चा फनकार दुनिया में आता है।''

त्यांच्या धम्मदर्शनप्रिय निळ्या निष्ठेला सादर जयभीम घालून शेवटी एवढेच म्हणेन,

''आहे जपूनी आपल्या सहवास कुपीतील सुगंध
राहतीलच सोबतीला स्नेहाचे शब्दातीत अनुबंध।''

# माझ्या उत्थानाचे विद्यापीठ : डॉ. यशवंत मनोहर

▪ धनराज हनवते

युगसाक्षी प्रकाशनाच्या आजच्या वाटचालीवर उभा राहून मी जेव्हा प्रकाशनाच्या आरंभबिन्दूकडे बघतो त्यावेळेस मला अंधारातून प्रकाशाकडे जाणाऱ्या क्षणांची आठवण येते आणि आठवण होते अंधारलेल्या जीवनाची. सेवानिवृत्त झाल्यानंतर पुढे काय? हा प्रश्न माझ्यासमोर तेजाब उधळीत उभा होता. भाऊसाहेब डॉ. यशवंत मनोहर माझे शालेय जीवनातले मित्र असल्यामुळे वेळ घालविण्यासाठीच अधूनमधून मी भाऊसाहेबांकडे जायचो. भाऊसाहेबांकडे मोठमोठे साहित्यिक, विचारवंत यायचे. अनेक विषयांवर त्यांच्या चर्चा व्हायच्या. कधी सामाजिक, कधी राजकीय तर कधी धम्म चळवळींच्या या चर्चा असायच्या. चर्चा ऐकताना वेळ कसा निघून जायचा कळत नसे. हे सामान्यतः रोजच होत असे. यावेळी भाऊसाहेबांसारखं मला होता आलं नाही याची खंत वाटत होती. त्याबरोबरच कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीकडेही लक्ष जात होते. माझ्या मोठ्या मुलाचा पगार जेमतेमच होता. लहान नितीन; त्याचे तर शिक्षणच थांबले होते आणि मुलगी शाळेत जात होती. माझ्या अल्पशा निवृत्तीवेतनावरच माझ्या कुटुंबाचा चरितार्थ चालत होता. पुढे येणाऱ्या संकटांच्या चिंतेचे प्रतिबिंब माझ्या चेहऱ्यावर उमटत होते. भाऊसाहेबांचे बारीक लक्ष मित्र या नात्याने नेहमी माझ्याकडे असायचे. माझ्या चेहऱ्यावरील भाव एकेदिवशी त्यांनी टिपले आणि मला नाराजीचे कारण विचारले. माझे मन मोकळे करण्याची वाट मला गवसली. माझ्या मनाच्या वेदनेला प्रवाहित करण्याचा मार्ग मोकळा झाला. माझ्या मनात निर्माण झालेल्या आर्थिक विवंचनेला थोपवणारे उत्तर मला सापडले. त्याच दरम्यान भाऊसाहेबांकडे नागपूरचाच एक नवा प्रकाशक आला. त्या प्रकाशकाकडे भाऊसाहेबांनी एक पुस्तक प्रकाशनासाठी दिले होते. त्या प्रकाशकाला ते पुस्तक छापणे अशक्य होते. भाऊसाहेबांनी ते पुस्तक प्रकाशित करण्याविषयी मला विचारले आणि सहकार्य करण्याची तयारी दर्शविली. ते पुस्तक म्हणजे 'मूल्यमंथन' होय. हा क्षण माझ्या जीवनाच्या पुढील वाटचालीला दिशा देणारा ठरला. माझ्या जगण्याची दिशा बदलणारा ठरला. माझ्या

आयुष्याचे आर्थिक गणित सोडविणारा ठरला. हा क्षण मला उत्थानाच्या विद्यापीठात प्रवेश देणारा ठरला.

मूल्यमंथन हा ग्रंथ प्रकाशनासाठी मी घेतला पण तोपर्यंत प्रकाशनाचे नामकरण झाले नव्हते. दिनांक ७ जुलै २००४ ची सकाळ यासंदर्भात माझ्यासाठी नवी प्रेरणा घेऊन उगवली. त्यादिवशी भाऊसाहेबांनी सकाळीच मला बोलावून घेतले. प्रा. प्रकाश राठोड आणि प्रा. अनमोल शेंडे दोघेही माझ्या आधीच त्यांच्या घरी आले होते. प्रा. चंद्रकांत नगराळेंनी संपादित केलेले 'युगसाक्षी साहित्य' हे पुस्तक त्यांच्याजवळ होते. प्रकाश राठोडांच्या मुलीचे नाव युगसाक्षी आहे हे भाऊसाहेबांना माहीत होते आणि हे नाव त्यांनी 'युगसाक्षी साहित्य' या पुस्तकावरूनच ठेवले होते. त्यांची नजर 'युगसाक्षी साहित्य' या ग्रंथावर गेली आणि प्रकाशनाचे युगसाक्षी हे नाव निश्चित झाले आणि तेव्हापासून अनमोल-प्रकाशच्या साक्षीने माझा आणि माझ्या मुलाचा एक युगसाक्षी प्रवास सुरू झाला. 'मूल्यमंथन' प्रकाशित झाले. आज भाऊसाहेब डॉ. यशवंत मनोहर यांच्या ७० पुस्तकांपैकी सुमारे ४०-४५ पुस्तके युगसाक्षी प्रकाशनाने प्रकाशित केली आहेत. हे सांगताना माझे मन स्वाभिमानाने भरून येते आणि डोळ्यात अश्रू डबडबून येतात.

अशी युगसाक्षी प्रकाशनाची उत्थानझेप सुरू झाली. भाऊसाहेबांच्या पुस्तकांची विक्री करीत असताना अनेक संमेलनातून विक्रीचा उच्चांक गाठला गेला. ही उत्थानझेप सुरू असतानाच माझ्या मनात अनेक प्रश्नही निर्माण झालेत. त्यापैकी एक प्रश्न कुटुंबाच्या स्वास्थ्याचा होता. भाऊसाहेबांनी माझे बोट धरले नसते आणि प्रकाशन व्यवसायात चालायला शिकविले नसते तर खरंच मी निवृत्तीवेतनात माझे कुटुंब सांभाळले असते? पोटी-अर्धपोटी उपाशी राहून कुटुंबाची निगा कदाचित मी राखली असती. परंतु मुलांना योग्य मार्ग मिळाला असता काय? धम्मसंस्कारामुळे योग्य मार्ग मिळालाही असता; कुठेतरी हजार-दीड हजाराच्या पगारावर नोकरीही मिळाली असती. परंतु नितीन व्यावसायिक झाला असता काय? अमेरिकेतील सॅन होजे येथे होणाऱ्या विश्व मराठी साहित्य संमेलनात युगसाक्षी प्रकाशनाची पुस्तके घेऊन जाण्याची इच्छा नितीनने दर्शविली असती काय? सॅन होजेला तो कदाचित जाईल किंवा जाणारही नाही पण प्रकाशन व्यवसायातून सॅन होजेला जाण्याचे स्वप्न माझ्या मुलाला नितीनला पडणे ही गोष्ट युगसाक्षी साहित्यिक भाऊसाहेब डॉ. यशवंत मनोहर यांच्यामुळेच शक्य झाली हे मला प्रामाणिकपणे सांगितले पाहिजे.

भाऊसाहेब डॉ. यशवंत मनोहरांची पुस्तके मौज प्रकाशन, मुंबई; साहित्य अकादमी दिल्ली; प्रियदर्शी प्रकाशन आणि प्रचार प्रकाशन, कोल्हापूर; ऋचा प्रकाशन आणि विजय प्रकाशन, नागपूर; श्रीविद्या प्रकाशन, कॉन्टिनेंटल प्रकाशन, सुगावा प्रकाशन, पद्मगंधा प्रकाशन आणि सुविद्या प्रकाशन पुणे या प्रकाशनांनी प्रकाशित केली आहेत. हे सर्व प्रकाशक अनेक वर्षांपासून प्रकाशन व्यवसायात आहेत आणि त्यांच्या या प्रकाशनांची नावे सर्वमुखी झालेली आहेत. मी युगसाक्षी प्रकाशनाच्यावतीने भाऊसाहेब डॉ. यशवंत मनोहरांची पुस्तके प्रकाशित न करता इतर अनेकांनी पुस्तके प्रकाशित केली असती तर या दिग्गज प्रकाशनासमोर माझा टिकाव लागला असता काय? हा दुसरा प्रश्न माझ्यासमोर उभा राहतो आणि मी न डगमगता या प्रश्नाला उत्तर देतो की, एक दिग्गज विचारवंत, एक दिग्गज प्रतिभावंत ज्यांच्या प्रतिभेची एक स्वतंत्र शैली आहे. ज्यांच्या लेखणीतून 'सब्बे सत्ता सुखी होन्तु' हा बुद्धविचार बाहेर पडतो. ज्यांच्या शब्दांमधून आंबेडकरक्रांती लोकांच्या मनाचा ठाव घेते, ज्यांच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या कवितेच्या ओळी कधी करुणरसात भिजून येतात तर कधी टोकाच्या विद्रोहाची धार होऊन येतात अशा युगसाक्षी चिंतनातून निर्मिलेले ग्रंथच मी प्रकाशित करण्याचे ठरवले आहे. त्यामुळेच या दिग्गज प्रकाशकांच्या मालिकेत युगसाक्षी प्रकाशनाचे नाव एक दिवस जोडले जाणार आहे, असे मला प्रामाणिकपणे आणि नम्रपणे वाटते.

प्रकाशन व्यवसायात महाराष्ट्रभर फिरत असताना मी हे पाहिले आहे की भाऊसाहेबांची पुस्तके खूप लोक घेतात. त्यांचीच पुस्तके सर्वांत जास्त प्रमाणात घेतली जातात. त्यांच्या पुस्तकांचे संचचे-संच घेणारे असंख्य लोक आहेत. याचे कारण मराठी वाचकांना भाऊसाहेबांच्या साहित्याची मोहिनीच पडते. सर्व स्तरातील लोक भाऊसाहेबांची पुस्तके घेतात. मित्रांना भेट देण्यासाठी पाच-पाच, दहा पुस्तकांचा संच घेतात. खूप वाचक तर मला असे भेटले की डॉ. मनोहरसाहेबांचे अमुक पुस्तक मी घेतले होते पण मित्र घेऊन गेला आणि त्याला ते इतके आवडले की त्याने ते परतच केले नाही. म्हणून परत मला ते पुस्तक द्या, असे म्हणतात. फार आनंद होतो. भाऊसाहेबांसंबंधीचा आदर वाढतो.

म्हणूनच युगसाक्षी प्रकाशनाने 'यशवंत मनोहर उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार' मागल्या तीन-चार वर्षांपासून द्यायला सुरुवात केली आहे. रुपये दोन हजार, शाल, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. आजवर

भाऊ पंचभाई, सुखदेव पाटील आणि उत्तम कांबळे या कवींना हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

भाऊसाहेबांनी छोट्या पुस्तिका खूप लिहिल्या. त्याचे कारण त्यात्यावेळी चळवळीत निर्माण झालेले प्रश्न. त्या त्या प्रश्नांची मांडणी त्या छोट्या पुस्तिकांमध्ये भाऊसाहेबांनी केली. चळवळीला अशा पुस्तिकांची खूप गरज असते. सर्वसामान्य वाचक ही पुस्तके खूप मोठ्या प्रमाणात विकत घेतो. त्याला ही छोटी पुस्तके कमी किंमतीतही मिळतात आणि ती लवकर वाचूनही होतात. महाराष्ट्रात अशी मांडणी करण्याचे श्रेय फक्त डॉ. मनोहरांना आहे. या पुस्तिकांच्या मला सतत आवृत्त्या काढाव्या लागतात. 'डॉ. आंबेडकरांनी विपश्यना का नाकारली?' या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या मला काढाव्या लागल्या. इतके ते पुस्तक वाचले गेले, वाचले जात आहे. 'रमाई'च्या तर १७-१८ आवृत्त्या मला काढाव्या लागल्या. मला तर असेही वाटते 'रमाई' हे पुस्तक मागल्या दहा-पंधरा वर्षांमधले सर्वांत जास्त वाचकांनी वाचलेले पुस्तक असावे.

या छोट्या पुस्तिकांच्या झेरॉक्स करून लोक वाटतात. त्यांचे सामूहिक वाचन होते. लोकं हे मला सांगतात तेव्हा फार आनंद होतो. इतके त्या त्यावेळी निर्माण होणाऱ्या विषयांवर लेखन करणारा बहुआयामी लेखक, त्यांच्याइतके वाचले जाणारा लेखक आज महाराष्ट्रात दुसरा नाही असे मला नम्रपणे वाटते. म्हणून रा.ग. जाधव, डॉ. रावसाहेब कसबे, सतीश कुलकर्णी, गंगाधर वाघ असे आणि बहुजन समाजातील असंख्य जाणते वाचक यशवंत मनोहरांची ही पुस्तके वाचून त्यांच्यावर अपार प्रेम करतात. २६ मार्च २००८ रोजी पुण्याच्या काही संस्था एकत्र आल्या आणि त्यांचा वाढदिवस मोठ्या पमाणावर साजरा केला.एक दिवसीय प्रबुद्ध साहित्य संमेलनच या निमित्ताने घेतले गेले. खूप लोक होते. भाई वैद्य होते. डॉ. भगवान ठाकूर, प्रा. विठ्ठल शिंदे, भंते एन्. बोधिरत्न, डॉ. मेत्तानंद असे खूप मान्यवरही होते. हे एका लेखकासंबंधी महाराष्ट्रात प्रथमच घडले.

मुंबईच्या साहित्यिक गंगाधर वाघांनी डॉ. मनोहरांचे हे मौलिक विचार प्रकाशित करून समाजात पोचविणाऱ्या युगसाक्षी प्रकाशनाला ५ हजाराचा पुस्कार याच कार्यक्रमात दिला. नाशिकच्या अ.भा. मराठी साहित्यसंमेलनात इतर प्रकाशनांबरोबर युगसाक्षीला प्रमाणपत्र मिळाले. त्यावर वर्तमानपत्रात लिहून आले. भाऊसाहेबांवर प्रेम करणारे असंख्य लोक महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर आहेत. इतके प्रेम क्वचितच कोणा लेखकाला मिळाले असेल पण त्यांचा दातओठ खाऊन हेवा करणारेही थोडे का होईना आहेतच. मग त्यातला एखादा जळणारा 'काही लेखक आपल्या छोट्या पुस्तिकांनाही ग्रंथ म्हणतात' असे बोलतो आणि आपले

वाङ्मयीन अज्ञान आणि मनातील द्वेष व्यक्त करतो. भाऊसाहेबांनी चळवळीसाठी ३०-४० छोट्या पुस्तिका लिहिल्या तसे पाचशे, साडेतीनशे, तीनशे पानांचे, दोनशे, दीडशे पानांचे असंख्य ग्रंथही लिहिले. इतके विपुल, इतके प्रभावी, इतके बहुआयामी आणि वाचकांच्या मनात घर करून बसणारे लेखन करणारा भाऊसाहेबांएवढा दुसरा लेखक नाही. पण द्वेषाची समजूत नाही काढता येत आणि भाऊसाहेबांना तर या जळणारांचा रागही येत नाही.

आर्थिक उत्पन्न कमी असणाऱ्या वाचकांच्या वाचनाची भूक भागविण्यासाठी कमी पानांची पुस्तके छापणे गैर नाही. दुसरे असे की धम्मचळवळ, सामाजिक चळवळीची पुस्तके सामान्य वाचकांना परवडणाऱ्या किंमतीचीच असावीत कारण सामान्यांच्या कृतिशीलतेवरच चळवळींना मूर्तरूप प्राप्त होत असते असे भाऊसाहेबांचे म्हणणे आहे आणि युगसाक्षी प्रकाशनाचा मालक या नात्याने भाऊसाहेबांचा शब्द मी शिरसावंद्य मानतो. भाऊसाहेबांनी प्रकाशित करायला दिलेली छोटेखानी पुस्तके युगसाक्षी प्रकाशनाला दिलेली देण आहेत. त्यामुळेच डॉ. यशवंत मनोहर = युगसाक्षी प्रकाशन = धनराज हनवते हे समीकरणच तयार झाले आणि भाऊसाहेबांनी नामकरण केलेल्या युगसाक्षी प्रकाशनामुळे धनराज हनवते, नितीन हनवते यांना महाराष्ट्रात ओळख निर्माण झाली. युगसाक्षी प्रकाशनामधून डॉ. यशवंत मनोहर वजा केले तर युगसाक्षी प्रकाशनामार्फत साहित्य चळवळीला आणि समाजमनाला मिळालेल्या जीवनसत्वांना त्यांचा फॅन असलेला वाचकवर्ग अंतरेल. हे मला ठाऊक आहे. वर्तमानपत्रात आलेले भाऊसाहेबांचे लेख अधिक अंक घेऊन लोकांना वाटणारे जाणकार मला माहीत आहेत. त्यांच्या लेखांचे फोल्डर छापून वाटणारे लोक मला माहीत आहेत. त्यांच्या नव्या पुस्तिकांची आणि पुस्तकांची वाट पाहणारे, तशी विचारणा करणारे लोक मला माहीत आहेत.

भाऊसाहेब माझ्या शालेय जीवनातील मित्र, आठव्या वर्गापासून आम्ही दहावीपर्यंत एकत्र शिकलो. भाऊसाहेब उच्चशिक्षणासाठी औरंगाबादला गेलेत आणि मी आर्थिक अडचणींमुळे आणि साहस न करण्याच्या वृत्तीमुळे शिक्षकाची नोकरी पत्करली. आज भाऊसाहेब सेवानिवृत्त झालेत. मीही झालो. भाऊसाहेब फार मोठे विचारवंत झालेत, साहित्यिक झालेत. तत्त्वज्ञ झालेत. त्यांचा नावलौकिक भारतभर आहे. त्यांच्याच प्रेरणेतून, त्यांच्या विचारातून, त्यांच्या चिंतनातून युगसाक्षी प्रकाशन मी सांभाळत आहे; सांभाळत राहणार आहे. कारण या प्रकाशनाने मला सामाजिक प्रतिष्ठा आणि आर्थिक सुबत्ता दिली आहे. भाऊसाहेबांच्या या ऋणात राहणे हाच माझ्यासाठी मोठा गौरव आहे.

# यशवंत मनोहर यांचे शिल्पकार कुटुंब

■ प्रा.विलास मनोहर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाचे नवे सांस्कृतिक विद्यापीठ उभे झाले. या विद्यापीठातून विविध नवनव्या दमदार प्रतिभांचे थवेच्या थवे सळसळून बाहेर येऊ लागले. कधी नव्हे अशा विद्रोहाच्या पावसाची झड सुरू झाली. नकाराचे थैमान सुरू झाले. लोककलावंतांच्या सुप्त कला वीजा होऊन कडाडल्या. शतकांची दुःखे रस्त्यावर आली आणि विद्रोह होऊन गरजू लागली. त्यालाच आंबेडकर पर्व म्हणतात!

आंबेडकरवादी कला पलिते हातात घेऊन कोंडवाड्यातून बाहेर आली तेव्हा दुनियेचे डोळे दिपले. हा काळ साधारणतः १९६० नंतरचा. आंबेडकरवादी प्रेरणांच्या आविष्कारांचा. परंतु सन १९६० पूर्वीचा फार मोठा कालखंड असा होता की त्या काळातील दलित आणि बहुजन समाजातील कलावंतांची कला पूर्णतः विद्रोही नव्हती. तरीही आक्रमक मात्र नक्कीच होती. त्यामुळे त्याही वेळी दलितांची कला सकस आणि पीळदारच होती असे म्हटले पाहिजे. तो काळ म्हणजे आंबेडकर नावाच्या वादळाचा छोट्या खेड्यांना पूर्ण परिचय न झालेला काळ. वादळापूर्वीच्या शांततेचा हा काळ. जीवन जाणिवा पेटून उठण्याच्या आधीचा काळ. दैन्य, दारिद्र्य, विषमता, रूढीपरंपरांच्या अघोरी सावलीत खितपत पडलेला हा काळ. या काळात कलावंत कसे जगले असतील? त्यांच्यातील कलांना त्यांनी कसे जगवले असेल? असे कितीतरी प्रश्न सुन्न करून सोडणारे आहेत. याच काळातील विदर्भातले एक मोठे कलावंत लोकशाहीर राजाराम विश्राम मनोहर. स्वतः ढोलकी वाजवून शाहिरी करणारे राजारामजी मनोहर. राजाराम शाहीर तुर्रेवाले. हा माणूस धिप्पाड. पीळदार मिशा, डोक्याला कोशाचा फेटा. कुटुंबातलेच लोक सहकलावंत म्हणून सोबतीला. सहा-सहा महिन्यांची मुलुखगिरी. तमाशा या लोककलेचे नामाभिधान झाले असेल त्यानंतरचा तमाशा. त्यालाच खडा तमाशा म्हणायचे.

खरे तर राजारामजी पूर्णतः अशिक्षित. पण तुकाराम, नामदेव, एकनाथ, ज्ञानेश्वर यांचे अभंग जवळजवळ पाठ. कबीराचे अनेक दोहेही जीभेवर नाचत. शाळेचे तोंड न पाहिलेल्या या माणसाने संत साहित्य कसे पाठ केले आणि कसे पाठ झाले याचे उत्तर माझ्याकडे नाही. शाहीर राजाराम मनोहर नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील येरला या गावचे. त्यांचा कोल्हापूरच्या शाहू महाराजांशी किंवा पुण्याच्या महात्मा जोतीबा फुल्यांशी थेट संबंध कधी येऊ शकत नाही. तेव्हा महात्मा फुले, शाहू महाराजांच्या तत्त्वज्ञानाचाही थेट संबंध येऊ शकत नाही. त्यात राजारामजी निरक्षर. पण मला वाटते संतांनी एक चांगले काम केले. भक्तांना स्वतःकडे बोलावण्यापेक्षा ते स्वतःच भक्तांकडे गेले. तुकाराम घरोघरी कसा गेला आणि लोकांना अभंगांच्या माध्यमातून कसे पढवले हे मी नव्याने सांगण्याची गरज नाही. कबीर आणि तुकाराम यांचा राजाराम मनोहर यांच्याशी असा सहसंबंध असावा कदाचित. राजाराम मनोहर हे तुऱ्याचे गाणे म्हणत असत. तुर्रा म्हणजे मर्द. कलगी म्हणजे स्त्री. इथे मर्द माणूस म्हणजे शंकर. स्त्री म्हणजे पार्वती. शंकर आणि पार्वतीचे भांडण म्हणजे कलगी-तुर्रा. ब्रह्माच्या मुखातून सृष्टी जन्माला आली या तत्त्वज्ञानाला ताबडतोब मूठमाती. शंकर आणि पार्वती ही प्रतीके तमाशातून मांडली असली तरी त्याही काळात वेद शास्त्राला गोळ्या घालण्याचे काम राजाराम मनोहर यांनी केले. आणि समारोपात पुरुष आणि स्त्री आणि त्यांचे परस्परावलंबन हेच दुनियेचे अंतीम सत्य आहे हे तमाशातून सांगितले.

राजारामला विश्रामजींनी ताकीद दिली. सहा-सहा महिने तमाशाला जाणे बरे नव्हे. राजारामजींनी ऐकले. कीर्तनाकडे वळले. एकतारी, पखवाज, टाळ, मृदंग सोबत घेतले. संगीत रक्तातच होते. त्याचवेळी माणुसकीचे तत्त्वज्ञान राजारामच्या मेंदूत मावत नव्हते. बौद्धिक प्रसादासाठी पंचक्रोशीतील संत राजारामजींच्या घरी येत असत. आठ-आठ दिवस सप्ताह कीर्तन, चर्चा, महाचर्चा. चर्चेचे विषय अध्यात्म. पण राजारामजींचा प्रश्न एकच. धर्माचा एवढा दांडगा अभ्यास करून आणि पालन करूनही दारिद्र्य का? मला वाटते राजारामजींना महात्मा फुल्यांचे सूत्र कळले होते. एवढे अनर्थ एका अविद्येने केले. तरीही कीर्तन आणि तमाशा सुरूच. म्हणजेच नाथ संप्रदायाचा पुरस्कार हे राजारामजींचे पहिले तत्त्व तर तमाशातून आलेल्या मिळकतीतून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे हे दुसरे सामान्य तत्त्व. रेल्वेत चौकीदार असलेल्या विश्रामजींना पोराच्या ढोलकीचे मोठे वेड. आजुबाजूच्या दहा गावात आपल्या पोरासारखी ढोलकी कोणी वाजवू शकत नाही याचा अपार गर्व. पण सहा-सहा महिने मुलुखगिरीवर जाणे हेही बरे नव्हे. राजारामच्या मेंदूतली घालमेल विश्रामजींना

स्वस्थ बसू देत नव्हती. राजाचे हातपाय बांधलेच पाहिजे आणि तेच झाले. एका घराच्या पलीकडचे घर. डोमाजी तायडे यांची सुस्वरूप कन्या नाव मैनाबाई. नावापेक्षाही सुंदर. गोरी गोमटी, नाकीडोळी चिच्यासारखी. अपार ऐश्वर्य. रेल्वेच्या चौकीदाराची सून होणे त्या काळातल्या कोणत्या राजकन्येला आवडणार नाही? लग्न झाले. पण तरीही तमाशा बंद झाला नाही. त्यात पारधीणी नर्तकींना नाचवणे बंद झाले नाही. राजाराम शाहीरी दुनियेचा कलगीतुर्रा दुनियेसमोर मांडतच होते. त्याचवेळी जीवनावेगळी मासोळी तैसा तुका तळमळी हेही सांगतच होते.

राजाराम मनोहर यांना एकूण आठ मुले. पहिला पुंडलिक व मुलगी शांता प्लेगमुळे मरण पावली. नंतरची सहा मुलेच. शंकर, संतोष, सदाशिव, रामाजी, केशव व यशवंत. राजारामजी मनोहर यांचा सर्वांत धाकटा मुलगा यशवंत म्हणजे आजचे सुप्रसिद्ध जहाल आंबेडकरवादी साहित्यिक.

## राजारामजींचे ज्येष्ठ चिरंजीव शंकरराव मनोहर

मूकनायक, जनता, प्रबुद्ध भारत ही बाबासाहेबांची वृत्तपत्रे म्हणजे शंकररावांच्या जीवनाचे सिल्याबस. बाबासाहेबांच्या हाका मूकनायक, जनता, प्रबुद्ध भारत यातून शंकररावांच्या कानावर त्याही वयात आदळत होत्या. शंकरराव वयाने वाढत होते. नोकरी करण्याचे वय होण्याआधीच विश्राम मनोहरचा नातू म्हणून शंकररावला रेल्वेत गँगमनच्या जागेवर साहेबाने रुजू करून घेतले. काहीही न शिकलेल्या आणि गुरे चारणाऱ्या शंकररावांचा रेल्वेत पैसे न घेता ट्युशन क्लास चाले. नागपूरपासून नरखेड, मुलताईपर्यंत बाबासाहेबांचे पेटलेले आंदोलन रेल्वेतले कर्मचारी व प्रवासी यांच्यापर्यंत पोहचविण्याचे काम हे शंकररावांचे मुख्य काम. लाखो मुक्या जीवांचे नायक डॉ. आंबेडकर काय सांगतात ते शंकरराव शेकडो लोकांना सांगत होते. शंकरराव सन १९५६ कडे सुसाट वेगाने धावत होते. १४ ऑक्टोबर १९५६ म्हणजे कोट्यवधी दलितांचा मुक्तिदिवस. या दिवशीच्या धम्मचक्र प्रवर्तनाच्या बातमीने शंकररावांचे मन अधीर झाले होते. पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून त्यांनी रेल्वेने शेकडो लोकांना विना तिकीट नागपूरच्या दीक्षाभूमीवर नेले होते. दीक्षा घेऊन आल्यानंतर येरला या त्यांच्या जन्मभूमीत पहिल्यांदा पंचशीलेचा ध्वज शंकररावांच्या पुढाकाराने फडकविला गेला. नित्य नियमाने झेंड्याजवळ बुद्धवंदना होऊ लागली. मेलेली ढोरे कोणी ओढणार नाही याची काळजी घेण्यात येऊ लागली. विशेष म्हणजे भीमबाबांची गोडवे गाणारी गीते गाण्यासाठी स्वतःच्या भावांचीच टीम तयार केली. त्या संचात तबल्यावर रामाजी, गायक केशव, हार्मोनियम यशवंत, सहभाग सदाशिव,

मार्गदर्शक शंकरराव आणि संतोष.

तबलपेटी शंकरराव यांनी घेऊन दिली होती. शंकररावांच्या मार्गदर्शनाखाली येरल्याची भीम पार्टी गावोगावी जाऊन प्रबोधन करू लागली. यशवंत मनोहर हार्मोनियम, रामाजी तबला, ढोलक, संबळ ही वाद्ये व केशव, सदाशिव हे गायन कसे शिकले, कुठे शिकले आणि कधी शिकले हे कोणालाच कळले नाही. राजाराम मनोहर यांची मुलं ही आईच्या उदरातूनच कलावंत होऊन आली असावी असे क्षणभर कोणालाही वाटेल.

## संतोष मनोहर

संतोषराव हे शंकररावपेक्षा जास्तीत जास्त दीड-दोन वर्षांनी लहान असतील. संतोषराव आईसारखेच मृदू स्वभावाचे.कमी बोलणे आणि जास्त चिंतन करणे हे त्यांचे वैशिष्ट्य. त्या काळात येरल्यासाठी रेल्वे तशी नवीनच. रेल्वेत गँगमनची मोठी गरज. रेल्वे आपल्याच आजोबाची म्हणून शंकररावाने संतोष यांनाही रेल्वेत गँगमन म्हणून भरती करून घेतले. पुढे केशवराव सोडले तर सदाशिव व रामाजीचा जीव रेल्वेत फार रमला नाही. शंकरराव, संतोषराव व केशवराव यांनी मात्र आयुष्यभर रेल्वेची नोकरी केली.

संतोषराव हे शंकररावसारखे तल्लख बुद्धीचे आणि आक्रमक स्वभावाचे नसले तरी त्यांची चिंतनशीलता फार गंभीर होती. गावातील शाळेतच चार वर्ग तेही शिकलेले होते. ते चार वर्ग मनापासून शिकले असतील कदाचित. म्हणूनच त्यांना चांगले वाचता येते ही गोष्ट शंकररावांनी हेरली. बाबासाहेबांची मूकनायक, जनता, प्रबुद्ध भारत ही वृत्तपत्रे घरी येत असत. नागपूरपासून मुलताईपर्यंतच्या रेल्वे कामगारांच्यासमोर सवडीनुसार संतोषरावकडून शंकरराव ती वाचून घेत असत. संतोषराव बाबासाहेबांच्या वृत्तपत्रातले मराठीतले लेखन वाचत. त्यावर शंकरराव हिंदीत भाष्य करायचे. रेल्वेत अनेक जाती-पातीचे कामगार असतील म्हणून की काय, शंकररावची हिंदीवर मोठी कमांड. शंकररावच्या हिंदी भाषेमुळे सर्वच लोक प्रभावित होत असत. शंकररावप्रमाणे संतोषरावलाही गाणे प्रत्यक्ष जमत नसे. पण सदाशिव, रामाजी व केशव मात्र ऑल राऊंडर. त्यांनी वडिलांचा शाहिरी पॅटर्न निवडला होता. राजारामजी मनोहर हे आधी सांगितल्याप्रमाणे ढोलकीवादक आणि गायक म्हणून प्रसिद्ध होतेच. रामाजीने वडिलांकडून वाद्याची कला घेतली होती. त्याचवेळी सदाशिव आणि केशवराव यांनी वडिलांकडून गाण्याची कला हस्तगत केली होती.

सदाशिव रामाजी आणि केशव हे शाहीर झाले होते. शंकररावप्रमाणेच

संतोषरावलाही याचे भूषण वाटत होते. धाकटी भावंडे हजारो लोकांच्या समोर कलावंत म्हणून जेव्हा उभी रहात असत तेव्हा या वडीलभावांची हृदये भरून येत असत.

कलेच्या क्षेत्रात ही मुले जसजशी मोठी होत होती आणि राजारामजी मनोहर थकत चालले होते. पण मुलांच्या शाहिरीने त्यांच्या जुन्या शाहिरीला नव्यानेच स्फुरण चढायचे. मग येणाऱ्या-जाणाऱ्यांना त्यांच्या तमाशातील गमती-जमती ते सांगत असत. शंकरराव व संतोषराव हे पाहत असत. एकदा घरच्या ओट्यावर बसून आई मैनाबाई व वडील राजारामजी यांनी संतोषरावांच्या लग्नाची गोष्ट छेडली होती. तेव्हा संतोषरावाच्या उरातील आनंदाचे उफाळ शंकररावाने जवळून न्याहाळले होते. सदाशिव, रामाजी व केशवरावाला यातले काहीच कळत नाही असा आई-वडिलांप्रमाणेच शंकररावांचा समज होता. काटोल तालुक्यातील मेंढेपठार येथील बारकुजी बाजीराव ढोके यांची मुलगी निंबोनाबाई हिच्याशी संतोषरावचा विवाह ठरला हे यशवंतला पुस्तक पूर्ण वाचून झाल्यावरच कळले होते. त्याला कारणही तितकेच सबळ होते. अभ्यासाव्यतिरिक्त घरच्या कोणत्याही भानगडीत लक्ष द्यायचे नाही अशी ताकीद वडिलांकडून यशवंतला मिहाली होती. बापाचा रूबाब भयंकर होता. पण तरीही निवांतवेळी यशवंत बुलबुलतरंग वाजवीत असे तेव्हा वडिलांचा ऊर भरून यायचा. चुलीवर भाकरी करता करता मैनाबाईचेही डोळे आनंदाच्या आसवांनी भरून यायचे. आपली सारीच पोरे हुशार निघाली याची खात्री तिला चूल फुंकता फुंकता येई.

## सदाशिव, रामाजी व केशवराव

सदाशिव, रामाजी व केशवराव हे पट्टीचे कलावंत. शाहिरीच्या एकाच पॅटर्नमध्ये त्यांनी स्वतःला गुंतविले नाही. सदाशिवरावाने गोंधळाचा पॅटर्न निवडला होता तर केशवरावाने शाहिरीचा. रामाजी मात्र दोन्हीकडे. कधीतरी वर्धा मनेरीचे गोंधळी गावाकडे आले होते. त्यांच्या गोंधळाची गायनकला आणि कथानकाचे सादरीकरण सदाशिवरावांना खूपच भावले होते. गोंधळाचा संबंध विशेषतः अभिनयाशी निगडित होता आणि अभिनय हा सदाशिवरावांचा अंगभूत गुण होता. त्यामुळे सदाशिवराव गोंधळाकडे आकर्षित झाले. आपण गोंधळ करावा असे त्यांना वाटू लागले. परंतु समस्या होती संबळ हे वाद्य वाजविण्याची. घराच्या पाठीमागे राहणारे कोलबा बागडे नावाचे गृहस्थ होते. त्यांनी रामाजीला संबळ वाजविण्याची कला हस्तगत करण्याचे आव्हान केले आणि ते आव्हान रामाजींनी लीलया स्वीकारले. रामाजीला ढोलक, पखवाज, तबला इत्यादी

वाद्ये वाजविता येत होतीच म्हणूनच अगदीच अल्पावधीत रामाजींनी संबळ वाजविण्याची कला हस्तगत केली आणि रामाजी विदर्भातले त्यावेळी एकमेव उत्कृष्ट संबळ वादक म्हणून सुप्रसिद्ध झाले.

सदाशिवरावचा गोंधळ आणि त्यांचाच लहान भाऊ रामाजी यांचा संबळ ऐकणे म्हणजे गावोगावच्या लोकांसाठी आनंदाची पर्वणीच. ज्या गावात सदाशिवरावांचा गोंधळ असायचा त्या गावी आजूबाजूच्या दहा गावचे लोक केवळ रामाजींचा संबळ ऐकण्यासाठी येत असत. रामाजींचा संबळ वाजविण्याचा एकच गोंधळ पॅटर्न नव्हता. ढोलक, तबला व पखवाजवर वाजविले जाणारे मुखडे रामाजी संबळावर वाजवित असत. त्यामुळे त्यांचा संबळ रसिकांच्या हृदयाचा ठाव घेत असे. सत्तर-पंचाहत्तरच्या वयात असताना आजही रामाजींचा संबळावर तोच रूबाब कायम आहे.

सदाशिवराव निव्वळ गायक नव्हते तर ते संतसाहित्याचे गाढे अभ्यासक होते. धर्मशास्त्र व पुराणांचे फार मोठे चिकित्सक होते. सदाशिवला शाळेत पाठविण्याची गरज राजारामजींना वाटली नसेल असे नाही. घरची आर्थिक परिस्थितीच इतकी बिकट होती की सदाशिव व रामाजीला शाळेत जाण्याची संधीच मिळाली नाही. तरीही सदाशिवरावने रानात गुरे चारताचारताच भराटीच्या पानांवर अक्षर ओळख करून घेतली आणि संतसाहित्य, धर्मशास्त्र, पुराणांचा चिकित्सक अभ्यासक म्हणून आसपासच्या गावात नावलौकिक कमावला.

भागवत सप्ताहाच्या निमित्ताने येरल्याला महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातून साधु-संत मंडळी कीर्तनासाठी यायची. आठ-आठ दिवस सप्ताह चालायचा. त्यावेळी तिथे आलेल्या संत मंडळींसोबत सदाशिवरावांची खडाजंगी व्हायची. रामायण, महाभारत या महाकाव्यांचे ते शास्त्रशुद्ध पद्धतीने ऑपरेशन करत असत. येरल्याला हा सप्ताह दरवर्षीच आयोजित करण्यात येत होता. पण गावोगावची साधू-संत मंडळी सप्ताहाला कमी व सदाशिवरावलाच भेटायला येत असत. बाहेरून आलेल्या संतांना आपल्या ज्ञानाच्या बळावर मंत्रमुग्ध करून टाकण्याची किमया सदाशिवरावांमध्ये इतकी होती की सदाशिवराव सोबत बोलताना साधु-संतांची बोबडीच वळायची. सदाशिवराव म्हणजे चालतेबोलते छोटेसे शाहिरी विद्यापीठच होते. ग्रंथज्ञानाच्या पातळीवर त्यांच्याशी कोणीच पंगा घेत नव्हते. इतके सदाशिवराव ख्यातकीर्त होते. मृत्यूपर्यंत हा ग्रंथ त्यांच्या उशाशी होता. हल्लीच्या वरूड तालुक्यातील ढगा या गावची नत्थूजी गावंडेंची लेक वेणू ही सदाशिवरावची शेवटपर्यंत प्रामाणिक, नम्र आणि सुशील सहचारिणी होती. ती अशिक्षित असल्यामुळे तिला शास्त्र पुराणातले

अ म्हणता ढ समजत नव्हते. पण सदाशिवरावच्या ज्ञानी पण फाटक्या संसाराची ती सांगाती होती. त्या दोघांची एकटी-एक मुलगी बहिणाबाई ही मला आजही बहिणाबाई चौधरीसारखी दिसते आणि वाटते.

शंकरराव, संतोषराव, सदाशिव आणि रामाजी यांच्यापेक्षाही बुद्ध्यांकाच्या पातळीवर सरस असलेला राजारामजी मनोहर यांचा पाचवा मुलगा म्हणजे केशव. केशव शाहीर. मधल्या काळात कदाचित आर्थिक परिस्थिती सावरली असेल म्हणून केशवरावांचे शिक्षण चौथ्या वर्गापर्यंत झाले. राजारामजी मनोहर यांचा शेवटचा आणि सहावा मुलगा म्हणजे यशवंत. महात्मा जोतीबा फुल्यांनी आपल्या दत्तक मुलाचे नाव यशवंत ठेवले होते आणि डॉ. बाबासाहेबांच्याही मुलाचे नाव यशवंत आहे हे राजाराम मनोहरला; बाबासाहेबांच्या साहित्याची आणि चळवळीची जवळून माहिती असलेल्या शंकरराव व संतोषराव या दोन मुलांनी सांगितले होते. म्हणून बाबासाहेबांच्या चळवळीला दुरूनही न पाहिलेल्या गुराख्याने म्हणजे राजारामजी मनोहर यांनी आपल्या शेवटच्या सहाव्या मुलाचे यशवंत हे नाव जाणिवपूर्वक ठेवले असावे. हजारो लोकांचे मनोरंजन करणारा शाहीर राजाराम मनोहर हा अशिक्षित असला तरी डॉ. आंबेडकरांच्या चळवळीच्या वार्ता राजारामजीची वावरातच थोडी लिहाय-वाचायला शिकलेली मोठी दोन मुले म्हणजे संतोषराव व शंकरराव हे बापाला सांगत होती की डॉ. आंबेडकर हा आपल्या गोरगरीब समाजाचा उद्धारकर्ता आहे. त्यामुळे अशिक्षित शाहीर राजारामजी मनोहर डॉ. आंबेडकरांच्या चळवळीकडे आकर्षित झाले. पण वयाने थकले होते. ढोलकीची थाप संसारात फारशी मदत करीत नव्हती. आपला शाहिरीचा वारसा मोठी मुले सदाशिव, रामाजी, केशव चालवतील या विश्वासाने अत्यंत हलाकीच्या परिस्थितीतही यशवंतला शिकविण्याचे त्यांनी ठरविले. यशवंतला यशवंत करण्याचे ठरवले. कर्ज काढून राजारामजींनी यशवंतला औरंगाबादला मिलिंद महाविद्यालयात शिकायला पाठविले. रेल्वेत विश्राम मनोहरांचे नाव असल्यामुळे शंकरची, संतोषची रेल्वेत नोकरी पक्की झाली होती. पण शाहिरीत गुंतलेल्या सदाशिव व रामाजीला रेल्वेची नोकरी सांभाळता आली नाही. केशवराव मात्र चाणाक्ष बुद्धिमत्तेच्या बळावर रेल्वेत पक्के झाले. पण शाहिरीतही कच्चे राहिले नाहीत. व्यवहारचातुर्य व बुद्धिमत्तेच्या बळावर आणि प्रेमळ स्वभावाने केशवरावाने रेल्वे अधिकाऱ्यांनाही आपलेसे करून टाकले होते. रेल्वेत नोकरी करताकरताच केशवराव शाहिरीही करीत होते. त्यांची शाहिरी पहाडी आवाजाची आणि जिगरबाज होती. आणि ती सहकारी भाऊराव वंजारी, संपतराव बागडे आणि ढोलकमास्टर रामाजी यांच्या बळावर उच्चांकावर पोहचली होती. बुद्धाच्या पोथ्या म्हणजे वडील राजारामजी मनोहर यांचे

संकलित साहित्य आणि धर्मपुराण, संत साहित्य, दुनियेचा सत्य आरसा संत कबीर यांच्या दोह्यांची अमूल्य ठेव मोठे भाऊ सदाशिवराव यांच्याकडून केशवरावांना मिळालेली होती. परंपरागत शाहिरी वाङ्मयाला केशवरावाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारदर्शनाने बदलून टाकले होते. शाहीर केशव मनोहर यांचा तमाशा परंपरागत तमाशा नव्हता. आंबेडकरी विचाराची धार आणि काठ असलेला नवा तमाशा केशवरावाने उभा केला.

इथे एक आवर्जून सांगितले पाहिजे की राजारामजीची मुले फक्त शंकरराव व संतोषराव या दोघांना सोडले तर सदाशिवराव, रामाजी, केशव आणि यशवंत ही चारही मुले वडिलांसारखीच धिप्पाड आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वाची होती. केशवरावांच्या हातात डफ आणि रामाजींच्या गळ्यात ढोलकी जेव्हा हजारो लोक पाहात आणि ऐकत तेव्हा टाळ्यांचा कडकडाट आकाशाला भिडत असे. केशव आणि रामाजी या दोघाही भावांची जुगलबंदी इतकी खतरनाक असायची की लोक रात्रभर एकाच जागी खिळून बसलेले असायचे. येरलेवाला केशव शाहीर होय. ढोलक्या त्याचा मोठा भाऊ होय, अशी चर्चा सकाळी गावोगावी परतीला निघालेले लोक आपसात करायचे.

केशवरावांनी मोठमोठ्या शाहिरांची जिरवली होती. शाहिरी वाङ्मयात सवाल-जबाब हा एक महत्त्वपूर्ण प्रकार होता आणि आजही आहे. सवाल जवाबाच्या मुद्यावर त्या शाहिराचे यश-अपयश अवलंबून असायचे. अटी-तटीच्या वेळी केशवरावाचा धर्मग्रंथ, अध्यात्मशास्त्र, संतसाहित्य आणि व्यावहारिक जीवनशास्त्र या सर्वांचा परिपाक म्हणजे केशवरावांचे वडीलबंधू सदाशिवराव मनोहर! अटीतटीच्या वेळी कुठेही दुय्यमचा तमाशा किंवा शाहीर संमेलन असे तेथे सदाशिवरावाला केशवराव चला न दादा अशी नेहमीप्रमाणे विनवणी करीत असे. पण सदाशिवरावांचे एकच वाक्य 'मले काय येते गां? मी पाह्यला बह्याड मानूस' असे म्हणून सदाशिवराव केशवरावाची बोळवण करून टाकत.

पण केशवराव विद्वान शाहीर होते. भावाच्या सर्व हिकमती त्यांना ठावूक होत्या. भावाचं व्याकूळ मनही त्यांच्या चिरपरिचयाचं होतं. केशवरावही वस्ताद. गावातले त्यांचे चार-पाच वडीलधारे दोस्त बैलगाडीने सदाशिवरावांना कार्यक्रमाच्या ठिकाणी घेऊन येत असत. कार्यक्रम सुरू झाल्यावर सदाशिवराव श्रोत्यांमध्ये कुठेतरी बसून आहेत असा कोणीतरी केशवरावाच्या कानात निरोप सांगत. बस्स! दादा आले, आता पाहून घेऊ असं मनातल्या मनात म्हटल्यावर केशवराव मोठे भाऊ रामाजीकडे वळून पाहत. म्हणायचे, दादा कडसा ढोलक, मोठे दादा आले आणि वीजांचा कडकडाट व्हावा अशी रामाजींची ढोलकी कडकडाटत

होती. सर्व शास्त्रांचा पंडित सदाशिवराव आमचा मोठा भाऊ. केशवराव व रामाजी आम्हा दोघाही भावांची इज्जत आणि इभ्रत सुरक्षित ठेवायला आपला मोठा भाऊ इथे हजर आहे हे कळल्यावर केशव आणि रामाजीच्या शरीरात अक्षरशः वीजांची शक्ती संचारत होती. रात्री १० पासून बसलेले हजारो लोक दुसऱ्या दिवशीच्या दुपारच्या २-३ वाजेपर्यंत थक्क होऊन कार्यक्रम ऐकत असत. केशवरावची बुद्धिमत्ता, वैचारिक उंची, ताल-सूर, खड्या आवाजाची देणगी, हजरजवाबीपणा रात्रभर लोकांना एकाच जागी खिळवून ठेवण्याची कुवत इ. गुणवैशिष्ट्ये पाहिली की असे वाटते की विदर्भाचा प्रथम श्रेणीचा शाहीर राजारामजी मनोहर यांचा पाचव्या क्रमांकाचा मुलगा केशव मनोहरच होता. पण दारिद्र्याने केशव मनोहरला मोठे होऊ दिले नाही. दारिद्र्यावरही केशवरावला मात करता आली असती पण पुढे यशवंत आणि त्याचे मिलिंदचे स्वप्न होते ते पूर्ण करण्यासाठी त्याला स्वतःला गरीबच ठेवावे लागले. सहा मुलांपैकी मोठी पाच मुले गुणवान असूनही लहानच राहिली ही खंत राजारामजी मनोहर यांना डसत होती. शाहिरीचा जमाना संपला होता. गायी राखणे, शेती करणे हे कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी करणे क्रमप्राप्त होते. पण आपल्या सर्व मुलांना राजारामजींनी एकदा ओट्यावर बसवून ठणकावून विचारले, 'लेकरं हो माही वीच्छा असूनही तुम्हाले मी शिकू शकलो नाही. पण आपला यसोंता शिकला पायजे. तुमच्या परिस लहान असला तरी गोरागोमटाही आहे. मी मंतो थो सायबच झाला पायेजे. अन् त्याची ही विच्छा तशीच होय. औरंगाबादले बाबासाहेबांच्या शाळेत शिकाले जातो म्हंते तर त्याले जाऊ देता का?' प्रश्न गंभीर होता. शंकररावपासून केशवरावपर्यंत सर्व एकमेकांच्या तोंडाकडे पाहत होते. सर्व मुलांमध्ये तेज केशवराव होता. त्याने मिटींगचा फैसला केला. 'आम्ही आमचं काही बी करू, पण यशवंताला औरंगाबादला पाठवायचं. मी स्वतःले गहाण ठेवीन पण यशवंताले शिकू द्या. शंकरराव सर्वांत शहाणे असल्यामुळे तेही बोलले, जाऊ द्या त्याले, शिकू द्या.' 'बुढा काय आनं पोट्टं काय माह्या येसोंताले हजार कोसावर सिकाले पाठवून राह्यले,' या जाणीवेने मैनाबाईच्या काळजाला हजारो बांध फुटले. आई-वडिलांचे, मोठ्या भावांचे व सर्व वहिनींचे विवश होणे समजण्यासारखे होते. पण बाबासाहेबांच्या मिलिंद महाविद्यालयाची हाक यशवंत मनोहरला होती हे यशवंत मनोहर या साध्या अडाणी माणसांना सांगत नव्हते. बस्स मला शिकायचे आहे. हे यशवंत मनोहरचं एकच वाक्य. पुनःपुन्हा तेच वाक्य 'मला शिकायचे आहे' राजारामजींनी काळजावर दगड ठेवला. मैनाबाईच्या चिरेदार चेहऱ्याचा यशवंत याला औरंगाबादला पाठवायचे ठरले.

बाबासाहेबांच्या कॉलेजात शिकायला जाणार म्हणून मैनाबाईनेही आपलं मन मारलं. पोराला दूर जाण्यासाठी सोडले पण पोराला पाठवताना आई म्हणून अनंत प्रश्न उभे राहिले. माझं पोरगं कुठे जाईल आणि कुठे राहील काय खाईल हे तिचे प्रश्न होते. तेव्हा बुढा गरजला, 'मी आयुष्यभर तमासगिरी केली. हजारो लाखो लोकांचं मनोरंजन केलं. पण बाबासाहेबांची चळवळ पुढे नेण्याचे भाग्य मले नाही मिळालं मैना! जाऊ दे यशवंताले शिकू दे. यशवंता शिकला तर बाबासाहेबांच्या बोटापुढे धावत राहीन. आपली नाही तर कमीतकमी आपल्या समाजाची परिस्थिती दुरूस्त करन. जाऊ दे त्याले शिकू दे.'

झाले. ठरले. माय, बाप, भाऊ आणि सर्व भावजयांनी घरातल्या सर्वांत लाडक्या आणि गोजिरवाण्या यशवंतला औरंगाबादला पाठविण्याचे ठरविले. औरंगाबादला यशवंतला पाठविणे इथपर्यंत ठीक आहे. यशवंतला बाबासाहेबही माहीत आहेत. बाबासाहेब आपले उद्धारकर्ता आहेत हेही ठीक आहे. पण औरंगाबाद म्हणजे काय? कोणीतरी म्हातारा मध्येच बोलल्याचे ऐकले, औरंगाबाद म्हणजे परदेश. त्यावर यशवंतची सर्वांत मोठी वहिनी मनाबाई बोलली, मी माह्या सोन्यासारख्या देराले परदेशात नाही पाठवत. काय म्हणता तुम्ही? यशवंतच्या सगळ्या भावजयांनी ज्येष्ठ जावू मनाबाईच्या या प्रश्नाला अनन्यसाधारण महत्त्व दिले. तेवढ्यात राजारामजी गुर्रावले आणि सगळेच थंडे झाले. यशवंताची औरंगाबादची तयारी झाली. घरी हे सगळं सुरू असतानाच गावात वार्ता पसरली, राजारामजीचं लहान पोरगं परदेशात चाललं. मग गावातले लोक राजारामजीच्या घरी. सर्वांचा एकच प्रश्न, येसोंता कुठं चालला? राजारामजीच्या वतीने त्यातल्या त्यात जास्त हुशार असल्यामुळे केशवरावांनी उत्तर दिले, यशवंत औरंगाबादला चालला. औरंगाबाद हे काय प्रकरण आहे हे कोणालाच कळत नव्हते. गावातला कोणीतरी एकाने केशवच्या कानात विचारले, औरंगाबाद कोणत्या देशात आहे? तेव्हा एकमेव जास्त हुशार असलेल्या राजरामजीच्या केशव नावाच्या पोराने सर्वांना खडसावून एकच उत्तर दिले, औरंगाबाद म्हणजे दुसऱ्या देशात वगैरे नाही. आपल्याच देशात आणि महाराष्ट्रात आहे. फक्त शे-पाचशे कोसावर. आपल्या बाबासाहेबांची कर्मभूमी औरंगाबाद! तिथे आपला यशवंत जात आहे. कशाकरिता तुम्ही आपली मने हलकी करता? ताबडतोब शंकरराव बोलले, केशव म्हन्ते ते बराबर आहे. चाला गाडीची वेळ झाली. यशवंतला रेल्वेस्टेशनवर पोहचवायला नातेवाईकांबरोबर गावचे सर्व नागरिक आले. पोरगं गाडीत बसल्याबरोबर मायचे डोळे भरून आले. आसवं पुसता पुसता मायेचा पदर आपोआप ओला झाला. पहाडासारखा खंबीर बाप

खचल्यासारखा दिसत होता. कलंभा रेल्वेस्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर उभे असलेले पाच भाऊ यशवंतच्या डोळ्यांकडे भिजलेल्या डोळ्यांनी पाहत होते. तेव्हा यशवंतचेही डोळे पाहण्यासारखे होते. मला वाटते यशवंतचे डोळे त्याहीवेळी भाषणच करीत होते आणि त्यावेळी त्या डोळ्यांचे भाषण कोणालाच कळत नव्हते. पण तरीही भाषण अर्थपूर्ण होते. त्यावेळी घटना एकच यशवंत चालला आणि त्या घटनेचा अर्थही एकच यशवंत बाबासाहेबांकडे चालला. बाबासाहेब आणि यशवंत या दोन गोष्टी या अडाणी माणसांनी एकत्र कशा आणल्या याचेच मला आजही मोठे आश्चर्य वाटते.

गाडीच्या पायांनी चालायला सुरुवात केली तेव्हा यशवंतही चालू लागला आणि क्षणात धावू लागला तेव्हा गावचे गरगर फिरणारे घर स्थिरावले. मनाबाई, निंबोनाबाई, वेणूबाई यशवंतच्या लाडक्या वहिन्या पण शांताबाई या वहिनीचे भाबडे प्रेम आणि सखुबाईचे कर्तबगार हात, या दोघींची आसवे किती प्रामाणिक होती हे यशवंत मनोहर शेवटपर्यंत विसरले नाहीत याचे अपूर्व समाधान आहे.

साऱ्यांनीच आपापले डोळे पुसले आणि आंबेडकरवादी संस्कृतीच्या चळवळीचा एक सैनिक होण्यासाठी बाबासाहेबांच्या मिलिंद महाविद्यालयात पोचविणाऱ्या रेल्वे गाडीत बसलेल्या यशवंतला वडील राजारामजी, आई मैनाबाई, भाऊ शंकरराव, संतोष, सदाशिव, रामाजी, केशव व सगळ्या वहिन्या या सर्वांनी डोळ्यातील आसवं लपविली आणि निरोप दिला. गावकऱ्यांनीही भरभरून सदिच्छा दिल्या. नागपूर जिल्ह्यातील काटोल तहसिलमधील राजारामजी मनोहर यांच्या यशवंत मनोहर नावाच्या पोराचं पुढे काय झालं हे मी आणि कोणीही कोणालाही विचारले तर काय सांगणार? सारा महाराष्ट्रच सांगेल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सांस्कृतिक चळवळीचा खरा, निष्ठावंत आणि खंबीर नायक यशवंत मनोहर हा राजारामजी मनोहर यांचा मुलगा आहे. म्हणूनच यशवंत मनोहरांना घडवणारे त्यांचे वडील राजारामजी मनोहर यांना आणि त्यांच्या सर्व मुलांना आणि सुनांना मी धन्यवाद देतो.

# यशवंत पासष्टी

■ भदन्त डॉ.तिस्सवंस महास्थवीर, पुणे

माणुसकीच्या विद्यापीठाचा एक प्राध्यापक
जयभीमाच्या ज्ञानतरुंचा एक प्रज्ञामोहर
बुद्धाच्या धम्मांकुरातील एक सुशीलवृक्ष
मानवतेच्या सिद्धान्ताचा एक कार्यकारण
क्रांतिकारी साहित्याचा एक ध्रुवतारा
बुद्धिवादी सौंदर्याचा एक वण्णगंध
बाल मनोविज्ञानाचा एक वैज्ञानिक
अत्त दीप भव महामार्गाचा एक पथिक
बुद्ध विज्ञानाचा एक अन्वेषक
प्राणीमात्राच्या सौख्याचा एक अहिंसक
संघसागराचा एक प्रवाह उदन्त
पासष्टीतील अमुचे भीमरत्न
मनोहर यशवंत!

दिनांक २६-०३-२००८

# यशवंत

■ भदन्त डॉ.तिस्सवंस महास्थवीर, पुणे

अंतरातील वैभवाचे भाष्य करणारा भास्कर
उणिवांना जाणिवा करून देणारा ज्वालामुखी
धगधगत्या आगीला धाक दाखवून
उष्णतेचा स्वाभिमान जपणारा
जपुर्जींच्या टोळ्यांना टोकरून टोकरून पोखरून
त्यातील द्वेषाच्या दानवी भग्नतेला भेसूर करणारा समतावीर
स्वातंत्र्याला स्वत्व समजावून
न्यायाला अन्यायाची जाणीव करून देणारा न्यायाधीश
प्राणीमात्रांना सुखाचा संदेश देऊन
दुःखाला सुखाची परिभाषा उलगडवून सांगणारा
प्रज्ञासम्राट महाउन्नत
तोच आहे यशवंत!

# नागसेनवनातील दोन फुले

■ भदन्त डॉ.तिस्सवंस महास्थवीर, पुणे

महाडच्या महाक्रांतीत जन्मला
विद्रोही साहित्याचा विद्रोही महंत
बलदंड, उदंड, पाखंड, खंड खंड करणारा
प्रज्ञादंड यशवंत.
गुणवंताचा गुणी मुनीहून थोर
तो भीमरायाच्या ज्ञानतरुचा ज्ञानवंत मोहर
भ्रमर बौद्धिकतेचा, बुद्धिवादी सौंदर्याचा अजर अमर मनोहर
गुणवंत, नसे त्या पंथ, कुणाची खंत
प्रज्ञेचा उपासक उपजतगंधी अनंत
मिलिंदाचे दोन बुद्धसुमने
तू यशवंत मी भदन्त!

दि.२६-०३-२००८

# एक पत्र : यशवंत मनोहरांना

■ प्राचार्य दिवाकर बोबडे

बंधो, तू खूप मोठा झालास
आणि तेही या माणुसकीच्या दुष्काळात
जनजीवनाच्या आलेख आकृती शिल्पित करणाऱ्या
'जीवनायन'ने तुला खूप मोठे केले
आतापर्यंत तुला मिळालेले पुरस्कार सारे तुझेच होते
तुझ्या अपार दुःखाचे, तडफडीचे, फडफडीचे
तुझ्या अफाट कष्टाचे, तुझ्या अपूर्व अभ्यासाचे...
आणि हा पुरस्कार तुझा...? की, गरिबीशी भांडणाऱ्या,
तुझे गाठोडे करून शाळेत फेकणाऱ्या,
'याला कापा' म्हणून 'गुरुजी'ला सांगणाऱ्या
स्वतःत रामजी सुभेदार शोधणाऱ्या वडील राजारामजींचा...
की, तुझ्या लेखणीसाठी हातात खुरपे घेऊन
तुला जिद्दीचा अंगार चारणाऱ्या,
अंधाराची मूर्ती भंजणाऱ्या तुझ्या 'अक्षरवेड्या' मैना आईचा...
की, तनामनाचे एक होऊन आपल्या डोळ्यात चंद्रसूर्य घेऊन
तुझ्या अक्षरांच्या छिन्नीने व विचारांच्या हातोड्याने
उत्थानाच्या गुंफा खोदण्यासाठी सर्वोपरी साह्य करणाऱ्या
रमाईचा कित्ता उराशी बाळगणाऱ्या माझ्या पुष्पादीदीचा...
बंधो, पुरस्कारच मोठा झाला.
'विद्यापीठीय उत्कृष्ट प्राध्यापक पुरस्कार'
ही चौकट मला एवढीशी वाटते.
माझ्यासाठी तू 'जनशिक्षक'
तुझ्या या अक्षरफेरीतील आणि विचारफेरीतील मी शेवटचा
तुझे हे धावणे मला पेलवत नाही, समजत नाही
आत्ता कुठे थोडे समजायला लागले आहे.
माझी फरफट होते आहे तरीही मी चालतो आहे
डुलकी घेत... थबकत... थबकत... थोडासा लंगडत...!

## यशवंत तुझ्या ज्ञानाचे

▪ प्रमोद वाळके 'युगंधर'

यशवंत तुझ्या ज्ञानाचे चुंबन घेतो
मज भासे आकाशाचे चुंबन घेतो.

जी माझ्या उड्डाणाची जीवनसत्वे
प्रज्ञानी प्रज्ञानाचे चुंबन घेतो.

आयुष्यप्रभा किरणांनी मुक्त कराया
त्या सम्यक सूर्यकुळाचे चुंबन घेतो.

जुलुमाशी युद्ध कराया शुद्ध कराया
मन प्रेरक त्या क्रांतीचे चुंबन घेतो.

निर्वाण 'युगंधर' झाले धम्मपथाने
या जीवनसौंदर्याचे चुंबन घेतो.

## मुक्तक

यशाची पावटी चढती मनोहर
शरारा पेरण्या वदती मनोहर
वंदुनी झुंझकीवेळी भीमाला
तमस उजळावया लढती मनोहर.

# हा यशवंत आहे

■ प्रा.दि.वा.बागूल, पुणे

असतात अशीही माणसं ध्येयवेडी
अंतर्मुख होऊन जी आक्रंदतात
समतेचेच गाणे...
ज्यांच्या मस्तिष्कातून निघतात
अनेक अणू, न्यूट्रॉन व प्रोटॉन देखील
जे पेटवतात अनंत खोल समुद्रतळाला
आणि त्याच समुद्राच्या लाटांवर स्वार होऊन
प्रतिभेचे शिड वल्हवून आणतात
ध्येयाजवळ, भविष्यातील स्वप्नांनाही
तेही एकाच कवेत...
खरंच कधीकधी वाटते...
त्या मातीलाच विचारायला हवे
त्या वेदनांना विचारायला हवे
त्या गावकुसाला विचारायला हवे
त्या हाडकी हाडवळ्यांना विचारायला हवे
त्या यातनांना विचारायला हवे
ही 'यशवंत' नावाची प्रतिभा
जन्मलीच कशी?
मग विचारावं त्या प्रतिभेला
मनोहर रूप आलेय कुठून?
कलंकित मातीतून, राखेच्या ठिणगीतून
भीमरायाच्या श्वासातून?
की बुद्धाच्या अनंत अंतर्दाहातून?
की मधाळ करुणेतून?
कारण मनोहर असतीलही अनेक पण
हा यशवंत आहे...
हा यशवंत आहे... हा यशवंत आहे...

''यशवंत मनोहरांचा जन्म नागपूर जिल्ह्यातील येरला नावाच्या खेड्यात झाला. या गावच्या मातीतच असे काही गुण असावेत की जेणेकरून तिने आपल्या कुशीतून एका युगसाक्षी प्रतिभावंताला जन्म दिला. एखाद्या अद्ययावत प्रयोगशाळेत येरल्याच्या मातीचे परीक्षण केले पाहिजे.

पुढे ऐन युवापर्वात यशवंत मनोहर नागसेनवनात कॉलेज शिक्षणासाठी दाखल झाले. ते एकोणीसशे साठीचे दशक होते. अत्यंत सृजनशील दशक! नागसेनवनात त्यावेळी नव्या सर्जनाचे वेध लागलेले प्रदीप्त वातावरण होते. त्या विद्युतभारित वातावरणात वावरणाऱ्या कुणाही संवेदनशील तरुणाला कवी होणे वा ठरणे अपरिहार्य होते. याला पर्यायच नव्हता. येरल्याच्या मातीत नागसेनवनातील चिमूटभर माती मिसळली आणि त्या वाफ्यातून एक सदाबहार सृजनवेल वाढून गगनावरी गेली. तिचे नाव यशवंत मनोहर!''

**- प्रा. रा.ग. जाधव**

'डॉ. यशवंत मनोहर : वेध एका युगसाक्षी प्रतिभेचा' मधून.

**युगसाक्षी प्रकाशन,**
नागपूर